# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
# समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी
# सादर केलेला शोधप्रबंध

## अलंग रिसायकलींग शीपयार्डातील
## स्थलांतरित कामगारांचे शोषण : एक समाजशास्त्रीय अभ्यास.
## (समाजशास्त्र) गुजराथ राज्य – जिल्हा भावनगर


**संशोधक**

सदाशिव शंकर शेंडे

**मार्गदर्शक**

डॉ. रॉबिन त्रिभूवन


**सादरीकरण**

तात्वीक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत


**समाजशास्त्र विभाग**

नेहरु सामाजिक शास्त्र विद्यास्थान

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी पुणे – ४११०३७.


सन २०१५

# प्रतिज्ञापत्र

मी सदाशिव शंकर शेंडे प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करतो की अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे शोषण एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयातील शोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेरील कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोध प्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापींठाच्या समाजशास्त्रातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करत आहे. सदर माहितीचा या शोध प्रबंधा व्यतिरिक्त अन्यत्र उपयोग केलेला नाही.

ठिकाण

दिनांक : सदाशिव शंकर शेंडे

संशोधक

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, तात्विक सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत समाजशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री.  सदाशिव शंकर शेंडे यांनी अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे शोषण : एक समाजशास्त्रीय अभ्यास (गुजराथ राज्य जिल्हा भावनगर) या विषयातील शोध प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधात त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

ठिकाण : पुणे                                        डॉ रॉबिन त्रिभुवन

दिनांक :                                                मार्गदर्शक

# ऋण निर्देश

हा अभ्यासक्रम पुरा करताना अनेकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मला माझे संशोधन करण्यासाठी व शोध प्रबंध सादर करण्यासाठी संधी उपलब्ध कारुन दिली. कुलसचिव उमेश केसकर, सामाजिक शाखा विभागाचे माजी अधिष्ठता. श्री विजय कारेकर, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख अनुपमा केसकर, त्याचप्रमाणे आत्ताचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. विशाल जाधव, डॉ. प्रवीण जाधव, डॉ. पाटील या सर्वांनी वेळोवेळी मोलाचा सल्ला दिला  मार्गदर्शक, मानववंश शास्त्रज्ञ डॉ. रॉबिन त्रिभूवन यांनी संशोधन पूर्ण होईपर्यंत प्रोत्साहन देऊन दिशा देणारे मार्गदर्शन केले.

आई वडिलांचा तर मी सदैव ऋणातच राहणे पसंत करतो. त्याचप्रमाणे मला सदैव आधार देणारी माझी पत्नी मानसी शेंडे, स्नेही आशा औंढेकर, डॉ. पुष्पा घळसासी, श्री व सौ. यशोधन औंढेकर , एस.पी कॉलेजमधील मित्र श्री. प्रदीप गडदे, त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालयातील सर्व कर्मचारी वर्ग, सोलापूर, औरंगाबाद व कोल्हापूर व नांदेड येथील विद्यापीठाच्या ग्रंथालयातील सर्व कर्मचारी वर्ग, औरंगाबाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील ग्रंथालयाचे श्री. राठोड सर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. परभणी येथील शारदा महाविद्यालयातील प्रा. मित्र श्री. सच्चिदानंद खडके, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा. अविनाश पांचाल, डॉ. बाळासाहेब फिसफिसे, प्रा. डॉ. नवनाथ सिंगापूरे, डॉ. विजय सूर्यवंशी, डॉ. दादासाहेब मोटे – औरंगाबाद, डॉ. प्रदीप आगलावे नागपूर विद्यापीठ, डॉ. सुनील मायी– जळगाव विद्यापीठ, डॉ. जगन्नाथ कऱ्हाडे – शिवाजी विद्यापीठ, डॉ. घोडगे डी.डी. – नांदेड विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाचे, सामाजिक शास्त्र अधिष्ठता. डॉ. जोगदंड, डॉ. स्वाती शिरवाडकर, डॉ. श्रुती तांबे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. गरवारे महाविद्यालयाच्या डॉ. चेतना देसाई व डॉ. नारायण चौधरी या सर्वच तज्ञ लोकांनी हा अभ्यास करताना खूपच मोलाचे मार्गदर्शन केले.

भावनगर येथील डॉ. सुमनबेन चौधरी, अहमदाबाद, निरमा युनिर्व्हसिटीतील विद्यमान – डॉ. विद्यूत जोशी, भावनगर व पाटडी येथील फोटोग्राफर श्री. गहन देव धवल देव आणि विशाल आचार्य, याच बरोबर श्री. विनोद मकवाणा, पंकज राठोड त्याच प्रमाणे एडस् प्रकल्पाचे सर्व सहकारी कर्मचारी, संदीप सबनीस, विनायक पवार, अमीत पाटील व अवनी पाटील, यांनी

संगणकाच्या बाबतीत खूप मोलांचे मार्गदर्शन केल. श्री व सौ. मालन वैद्य, सुनिता पालकर, शीला लिमये, सुचित्रा वैद्य, निलिमा बापट यांनीही खूप चांगले सहकार्य केले. त्याचप्रमाणे पुणे प्रवासी संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती हर्षा शहा, वसुधा भंडारे, विजया जोगळेकर, पभा सोनवणे, मीरा शिंदे या सर्वांचेही विशेष आभार मानावे लागतील. महालक्ष्मी एंटरप्रायझेसचे श्री. केळकर व त्यांचे सर्व सहकारी यांनी वेळेवर संगणकीकरण व शुद्धलेखन करण्यास हातभार लावला त्यामुळे त्या सर्वांचेही खूप खूप आभार.

त्याचप्रमाणे श्री प्रदीप मराठे, श्री. प्रकाश तुळपुळे, दया तुळपुळे, पराग तुळपुळे व श्री.एन.एल. जोशी व गजानन नायक यांचेही सहकार्य विसरता येणारा नाही.

अलंग शीप यार्डातील सर्व अकिरी वर्ग, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे पोर्ट ऑफिसर श्री.चड्डा, अलंग शीप ब्रेकर्स असोसिएनचे पदाधिकारी, ज्या सर्वांनी आपला अमूल्य वेळ देऊन मुलाखती दिल्या त्याचप्रमाणे माहिती संकलन करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. त्याचप्रमाणे अलंग शीप यार्डात काम करणारे स्थलांतरित कामगार यांनीही माहिती देऊन सहकार्य केले. अशा रीतीने प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रीतीने ज्य ज्या लोकांनी संस्थानी सहकार्य केले त्या सर्वांच्या मी ऋणातच राहू इच्छितो.

**संशोधक**

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | प्रकरण १ | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्ड | |
| १.१ | प्रस्तावना व विषय प्रवेश | |
| १.२ | जागतिकीकरणाचा प्रभाव | |
| १.३ | स्थलांतर | |
| १.४ | संघटित व असंघटित कामगार | |
| १.५ | जगातील, भारतातील व गुजराथ राज्यातील महत्त्वाची बंदरे | |
| १.६ | अलंग गावाचा इतिहास | |
| १.७ | अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्डाची निर्मिती | |
| १.८ | जगातील व भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्र | |
| १.९ | अलंग शीपयार्डातील स्थलांतरीत कामगार | |
| १.१० | गुजराथ मेरीटाईम बोर्ड | |
| १.११ | अलंग शीप ब्रेकर्स, असोसिएशन | |
| १.१२ | रिसायकलींग चे फायदे आणि तोटे | |
| १.१३ | अलंग शीपयार्डामुळे अलंग व अलंग परिसरातील गावांचा झालेला सामाजिक आर्थिक बदल. | |
| १.१४ | साहित्याचा आढावा (जनरल व समाजशास्त्रीय दृष्टीकोन) | |
| १.१५ | समस्या सूत्रण | |
| १.१६ | संशोधनाची उद्दिष्टे | |
| १.१७ | गृहितके | |
| १.१८ | संशोधनाचे महत्त्व | |

| | | |
|---|---|---|
| १.१९ | संशोधनाच्या मर्यादा | |
| १.२० | समारोप | |
| | प्रकरण २ रे | |
| | संशोधन पद्धती | |
| २.१ | प्रस्तावना | |
| २.२ | संशोधन | |
| २.३ | अभ्यास क्षेत्र निवड | |
| २.४ | माहिती संकलन | |
| २.५ | नमूना निवड | |
| २.६ | वर्गीकरण/विश्लेषण | |
| २.७ | सैद्धातिक दृष्टीकोन | |
| २.८ | अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा | |
| २.९ | प्रकरणे | |
| | प्रकरण ३ रे | |
| | गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स असोसिएशन कार्यप्रणाली | |
| ३.१ | प्रस्तावना | |
| ३.२ | परिशिष्ट अ<br>१) गुजराथ मेरी टाईम बोर्डाविषयी<br>२) अलंग रिसायकलींग असोसिएशन विषयी<br>३) ब्ल्यू लेडी जहाज रोमांचकारी प्रवास. | |
| ३.३ | परिशिष्ट ब<br>स्थलांतरित कामगारांच्या मुलाखतींचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण<br>तालिकांची यादी | |

| | | |
|---|---|---|
| | १) बिहार<br>२) झारखंड<br>३) ओरिसा<br>४) पं. बंगाल<br>५) उत्तर प्रदेश | |
| ३.४ | विषयाला अनुसरून विशेष व्यक्तिंच्या मुलाखतींचा गोषवारा<br>१) डॉ. विद्युतजोशी निरमा युनिर्व्हसिटी गुजराथ<br>२) डॉ. सुमनबेन चौधरी<br>माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख भावनगर युनिर्व्हसिटी गुजराथ<br>३) शीप ब्रेकर्स<br>१) त्रिवेणी शीप ब्रेकर्स श्री. कनाकिया<br>२) चिंतन कलाथिया<br>३) हरीश परमार (सह–सेक्रेटरी)<br>४) देवेन जागड<br>५) विनोद मकवाणा–फॅमिली प्लॉनिंग असोसिएशन एडस प्रकल्प अधिकारी.<br>६) व्यावसायिक<br>१) जितेंद्र मकवाणा<br>२) रामसिंग शर्मा<br>७) सुरक्षा अधिकारी १) श्री. बरैय्या २) श्री. मकवाणा ३) आशिष अंधारिया<br>८) अलंग रिसायकलींग वर्क्स असोसिएशन उपाध्यक्ष श्री. राम पटेल व सेक्रेटरी<br>९) मुकादम (१) (२) | |

| | | |
|---|---|---|
| ३.५ | समारोप | |
| | प्रकरण ४ थे | |
| | अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांचे मूलभूत प्रश्न | |
| ४.१ | प्रस्तावना | |
| ४.२ | स्थलांतरित कामगारांचे मूलभूत प्रश्न | |
| | १) भाषा<br>२) निवास<br>३) पाणी उपलब्धता<br>४) वीज पुरवठा<br>५) शौचालये–स्वच्छतागृहे<br>६) मुकादम– मक्तेदारी<br>७) कामगार वेतन–जादा कामाचे पैसे<br>८) उधारी<br>९) एकीचा अभाव संघटनेचे पाठबळ नाही<br>१०) आरोग्य–स्वच्छता<br>११) स्थानिक लोकांचे वर्चस्व व सुरक्षा | |
| ४.३ | समारोप | |
| | प्रकरण ५ वे | |
| | स्थलांतरित कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षितता | |
| ५.१ | प्रस्तावना | |
| ५.२ | सामाजिक समस्या | |
| ५.३ | सामाजिक सुरक्षितता | |
| ५.४ | सामाजिक सुरक्षा | |

| | | |
|---|---|---|
| ५.५ | कामगारांचे स्थलांतर | |
| ५.६ | आर्थिक सामाजिक परिस्थिती | |
| ५.७ | स्थलांतरित कामगारांवर पडणारा प्रभाव | |
| ५.८ | कामाच्या ठिकाणी असलेला सुरक्षिततेचा अभाव | |
| ५.९ | कामगार कायदे | |
| ५.१० | समारोप | |
| | प्रकरण ६ वे | |
| | समरी अनुमान व निष्कर्ष | |
| ६.१ | प्रस्तावना | |
| ६.२ | गृहितकांचे पुर्नविलोकन | |
| ६.३ | निष्कर्ष | |
| ६.४ | सूचना | |
| ६.५ | समारोप | |
| | संदर्भसूची | |
| | परिशिष्ट | |
| १) | कामगार मुलाखत अनुसूची | |
| २) | गुजराथ मेरी टाईम बोर्ड | |
| ३) | शीप ब्रेकर्स | |
| ४) | तालिका | |
| ५) | आलेख | |
| ६) | नकाशा | |
| ७) | वृत्तपत्रातील कात्रणे | |

## प्रकरण १ ले

## अनुक्रमणिका

## प्रस्तावना व विषय प्रवेश

१.१. अलंग सोसियो रिसायकलिंग शीपयार्ड

१.२ जागतिकीकरणाचा प्रभाव

१.३ स्थलांतर

१.४ संघटित व असंघटित कामगार

१.५ जगातील, भारतातील व गुजराथ राज्यातील महत्त्वाची बंदरे

१.६ अलंग गावाचा इतिहास

१.७ अलंग–सोसियो रिसायकलींग
शीपयार्डाची निर्मिती

१.८ जगातील व भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्र

१.९ अलंग शीपयार्डातील स्थलांतरीत कामगार

१.१० गुजराथ मेरीटाईम बोर्ड

१.११ अलंग शीप ब्रेकर्स, असोसिएशन

१.१२ रिसायकलींग चे फायदे आणि तोटे

१.१३ अलंग शीपयार्डामुळे अलंग व अलंग परिसरातील गावांचा झालेला सामाजिक आर्थिक बदल.

१.१४ साहित्याचा आढावा (जनरल व समाजशास्त्रीय दृष्टीकोन)

१.१५ समस्या सूत्रण

१.१६ संशोधनाची उद्दिष्टे

१.१७. गृहितके

१.१८ संशोधनाचे महत्त्व

१.१९ संशोधनाच्या मर्यादा

१.२० समारोप

## प्रकरण १ ले

# प्रस्तावना व विषय प्रवेश

## १.१ प्रस्तावना

कृषीप्रधान समजल्या जाणाऱ्या भारत देशाला आज बदलत्या पर्यावरणाबरोबरच पावसाच्या अनिश्चिततेला सामोरे जावे लागत आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, काही वेळा गारपीटीने पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सुद्धा एक महत्त्वाचे उदाहरण आपल्याला पहायला मिळत आहे. त्याचबरोबर आहे ती शेतजमीन विकून फोफावत जाणारी बिल्डर लॉबी, त्याचप्रमाणे शेतीला उपलब्ध न होणारा मजूर वर्ग त्यामुळे शेतीप्रधान भारताचे आजचे चित्र बदललेले दिसून येत आहे. या सर्व कारणांमुळे सरकारी तिजोरीवर वाढत जाणारा बोजा, या गोष्टींचा देशाच्या आर्थिक विकासावर विपरित परिणाम झालेला आहे. या सर्व बदलांचा परिणामांचा माणसाच्या वैयक्तिक जीवनावरच नव्हे तर संपूर्ण समाजजीवनावर त्याचा परिणाम झालेला दिसून येत आहे.

**बेरोजगारी व स्थलांतर :**

एकीकडे शेतीची होत जाणारी दुरावस्था दुसरीकडे भारत देशाची वाढती लोकसंख्या वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत जाणारी बेरोजगारी वाढत्या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे नवनवीन उद्योगधंद्याना मिळालेली चालना, वाढते शहरीकरण व शहरात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधीमुळे आज मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होताना दिसून येत आहे. स्थलांतरापाठीमागे बेरोजगारी व गरीबी हे जसे महत्त्वाचे घटक आहेत त्याचप्रमाणे भौतिक सुख-सोयी कामाच्या ठिकाणी मिळणारी उचल याही गोष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होताना दिसून येत आहे.

**संघटित व असंघटित कामगार :**

भारतात आपल्याला प्रामुख्याने संघटित व असंघटित असे कामगारांचे दोन वर्ग पहायला मिळतात. स्थलांतरित होणाऱ्या लोकांमध्येही संघटित व असंघटित अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांचा समावेश आहे. त्यातही काही कुशल तर काही अकुशल असे कामगार आहेत. संघटित कामगारांचे भवितव्य हे सुरक्षित असते. मात्र असंघटित कामगारांना कुठल्याही प्रकारचे संरक्षण वा फायदे मिळत नाहीत. त्यांचे आजही मोठ्या प्रमाणावर शोषण होताना दिसून येत आहे. त्यांना

भेडसावणाऱ्या समस्याही अनेक आहेत. गरजू असंघटित स्थलांतरित कामगारांना कंत्राट पद्धतीने कामावर ठेवून त्यांच्या कडून कमी पैशात मोठ्या प्रमाणावर काम करून घेतले जाते. मुकादम/ठेकेदार यांच्यामार्फत हे काम होत असल्याने मुख्य मालकाशी कामगारांचा कधीच संबंध येत नाही. ठकेदारांच्या हातातच कामगारांचे भवितव्य असते. त्यांच्या कामाची त्यांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्याची सुद्धा अनिश्चितता असते. त्यामुळे या कामगारांमध्ये आर्थिक, मानसिक व सामाजिक असुरक्षितता निर्माण होते. या कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. यातूनच गरीबी व वेठबिगारी आणि संघर्ष अशा गोष्टींना चालना मिळते. त्यातूनच समाजविघातक प्रवृत्तींना वाव मिळतो.

**विषय प्रवेश :– अलंग–** सोसियो रिसायकलींग शीपयार्ड येथील स्थलांतरित कामगारांचे शोषण: एक समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधकाचा संशोधनाचा विषय आहे. अलंग रिसायकलींग शीपयार्ड हे गुजराथ राज्यातील भावनगर जिल्ह्यातील तळाजा तालुक्यात येते. भावनगर शहरापासून हे ५० कि.मी. अंतरावर आहे. या शीपयार्डात देश–विदेशातील निकामी झालेली जहाजे इथे विघटनासाठी येतात. या बोटींचे विघटन करण्यासाठी येणारे कामगार हे स्थलांतरित असून ते ओरिसा,बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश व पश्चिम बंगाल येथील आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व नेपाळ येथूनही इथे कामासाठी स्थलांतरित झालेले कामगार आहेत. परंतु त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. स्थानिक लोकही या अशा अतिशय कठोर परिश्रमाच्या कामात सहभागी होत नाहीत. शेतीचे तुटपुंजे उत्पन्न, ते ज्या राज्यातून इथे येतात. तिथे म्हणावा तसा विकास नाही त्यामुळे उद्योगधंद्याना चालना नाही रोजगाराचे कुठलेच साधन उपलब्ध होत नसल्याने हे कामगार इथे गुजराथ राज्यात रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत आहेत. स्थलांतरापाठीमागे गरिबी, बरोजगारी, शिक्षणाचा अभाव व समाजातील निम्नस्तर ही सुद्धा महत्त्वाची कारणे आहेत. अलंग शीपयार्डात काम करताना या कामगारांना कोणकोणत्या गोष्टींचे समायोजन करावे लागते त्यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते या सर्व गोष्टींवर या शोधनिबंधातून प्रकाश टाकण्याचा अभ्यासकाने प्रयत्न केलेला आहे.

या विषयाचा अभ्यास एकूण सहा प्रकरणातून मांडला असून पहिल्या प्रकरणात प्रस्तावना व विषय प्रवेश. त्याचबरोबर अलंग गावाचा इतिहास, स्थलांतर, जगातील महत्त्वाची बंदरे, भारतातील व गुजराथ राज्यातील महत्त्वाची बंदरे, भारतातील संघटित/असंघटित कामगार. जगातील व

भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्रे अलंग रिसायकलींग शीपयार्डाची माहिती अलंग रिसायकलींग शीपयार्डात येणारे स्थलांतरित कामगार रिसायकलींगचे फायदे तोटे, गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स असोसिएशनचा थोडक्यात परिचय. अलंग शीपयार्डामुळे अलंग व अलंग परिसरातील गावांचा सामान्य व समाजशास्त्रीय अभ्यास दृष्टीकोन, संशोधन समस्या, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितके, अभ्यासाचे महत्त्व, अभ्यासाच्या मर्यादा व समारोप या गोष्टींचा समावेश आहे.

दुसऱ्या प्रकरणात संशोधन पद्धती, तथ्य संकलन, नमुनानिवड, विश्लेषण सैद्धांतिक दृष्टीकोन, प्रकरण मांडणी, विषयाची व्याप्ती आणि मर्यादांचा समावेश आहे.

तिसऱ्या प्रकरणातील परिशिष्ट अ मधे गुजराथ मेरी टाईम बोर्ड व अलंग शीप ब्रेकर्स असोसिएशन यांच्या कार्य प्रणालीचा आढावा घेतलेला आहे. परिशिष्ट ब मधे या विषयाच्या संदर्भातील तज्ञ व अधिकारी लोकांच्या मुलाखती, शीप ब्रेकर्स यांच्या मुलाखती, मुकादम व्यावसायिक यांच्या मुलाखतीचा गोषवारा घेतलेला आहे. याच परिशिष्टामधे अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या विविध राज्यातील कामागारांच्या मुलाखतीच्याद्वारे भरून घेतलेल्या अनुसूचीनुसार मिळालेल्या माहितीच्या आधारे गुणात्मक पद्धतीचे विवेचन केले आहे आणि तक्त्यांच्या माध्यमातून महत्त्वाच्या घटकांचे संख्यात्मक विश्लेषण ही केलेले आहे. यासाठी एकूण पाच राज्यातील प्रत्येकी ६० या प्रमाणे ३०० कामगारांच्या मुलाखती घेऊन अनुसूची तयार केली आहे. नमुना निवडीसाठी यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा वापर केला आहे.

चौथ्या प्रकरणात अलंग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांच्या मूलभूत प्रश्नाविषयी विवेचन केले आहे.

पाचव्या प्रकरणात 'शोषण' या संकल्पनेवर भर दिला आहे. अलंग शीपयार्डातील कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षितता या बाबतीत विचार मांडले आहेत. सहाव्या प्रकरणात समरी अनुमान व निष्कर्ष मांडलेले आहेत.

## १.२ जागतिकीकरणाचा प्रभाव

प्रस्तावना:– खुल्या आर्थिक धोरणाचा जेव्हा भारताने स्वीकार केला तेव्हा त्या गोष्टींचा परिणाम हा फक्त आर्थिक दृष्टिकोनापुरता मर्यादित राहिला नाही तर त्याचे प्रतिबिंब हे आपल्याला संपूर्ण समाजात उमटलेले दिसून आले. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जगालाच व्यापार करण्याच्या दृष्टीने मोठी चालना मिळाली आणि या जागतिकीकरणाचा प्रभाव हा आपल्याला अगदी

उच्च वर्गापासून ते समाजातील तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहचलेला दिसून येत आहे. यापूर्वी 'शीप ब्रेक्रिंग' व्यवसाय हा पूर्वेकडील देशांमधेच त्याचे वर्चस्व होते. परंतु आता हा व्यवसाय पूर्वेकडील देशांकडून पश्चिम देशातील राष्ट्रामध्ये हस्तांतरित होताना दिसून येत आहे. या पाठीमागे उदारीकरण  हे एक जरी कारण असले तरी सुद्धा अजूनही बरेच महत्त्वाचे घटक दडलेले आहेत. ते आपण आपल्या विषयाला अनुषंगून असलेल्या प्रकरणात नक्कीच पाहू. मात्र आता आपण जागतिकीकरण या संकल्पनेविषयी थोडक्यात जाणून घेऊ.

नव्या आर्थिक धोरणाचा सर्वात महत्त्वाचा मुलभूत पैलू म्हणजे जागतिकीकरण अथवा वैश्विकीकरण आहे. शिथीलीकरण अथवा उदारीकरण खाजगी क्षेत्राला अधिक वाव देऊन सरकारच्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी करणे आज जो जागतिकीरणाचा विचार मांडला जात आहे. तो भावनिक धार्मिक स्वरूपाचा नसून तो आर्थिक स्वरूपाचा आहे.

जागतिकीकरणाची आधुनिक संकल्पना ही मुख्यत्वे देशादेशांतर्गत व्यापार, भांडवलाच्या स्तरावर, तंत्रहस्तांतरावर, असलेली बंधने दूर करून मुक्त व्यापाराची प्रस्थापना करणे. या अर्थाने प्रामुख्याने घेतली जाते. जागतिकीकरणाचा गाभा जरी आर्थिक असला तरी सुद्धा त्याची व्याप्ती सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्वांना असणारी आहे. जागतिकीकरणाचे स्वरूप हे व्यापक राहते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे फलीत म्हणून स्पर्धात्मकता वाढते. सर्वच उत्पादकांना बाजारपेठ मुक्त होते. ही स्पर्धा केवळ उपादक वा वस्तू बाजारापुरती मर्यादित राहत नाही तर उत्पादनाचे घटक म्हणजे कामगार भांडवल याही बाबतीत लागू होते. उद्योजकांना योग्य गुणवत्तेचे कामगार उपलब्ध होतात व कामागारांनाही मालकाची मनमानी न पत्करता रोजगार कधीही प्राप्त होतात. आवश्यकतेनुसार कामगारांचे स्थलांतर हे उद्योगनिहाय व प्रदेशनिहाय होते. जागतिकीकरणामुळे (१) आंतरराष्ट्रीय व्यापारात वृद्धी होते. २) प्रगत तंत्रज्ञानाच्या जलद हस्तांतरणाने सर्वच देशांना आपल्या साधन–सामग्रीचा पर्याय व कार्यक्षम वापर करणे शक्य होते. ३) बहुराष्ट्रीय कंपन्या व राष्ट्रीय कंपन्या यात भेद न करता दोघांकरीता समान धोरण स्वीकारता येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विनियम दर हा नियंत्रित किंवा अधिकृत नाही तर बाजार निर्धारित असतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतही अमेरिकेनेही कायम आपले वर्चस्व ठेवून स्वत:चे वेगळेपण दाखवले आहे. जागतिकीकरणाचे फायदे हे काही मूलभूत अटींची पूर्तता होत असेल तरच मिळतात. हेही लक्षात घेणे जरूरीचे आहे.

**जागतिकीकरणाचा परिणाम:–**

जागतिकीकरणाचे तथाकथित लाभ हे सर्वच देशांना सारख्याच प्रमाणात मिळतात असे म्हणणे योग्य ठरणार नाही. जागतिकीकरणाचा फायदा हा त्या देशाच्या विकासाच्या टप्प्यावरच प्रामुख्याने अवलंबून असतो.

मुक्त स्पर्धेच्या परिस्थितीत ‘बळी तो कान पिळी’ हा जंगलाचा नियम खरा ठरत असतो. प्रगत देशातील उद्योगसंस्था सहजासहजी आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकतात. परंतु विलिनीकरण प्रक्रियेमुळे लहान व मध्यम उद्योगांवर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. कुशल गुणवत्तापूर्ण गतिमान अशी श्रमशक्ती ही नव्या तंत्राच्या नव्या वस्तूच्या नव्या सेवेच्या विकासास आवश्यक पूर्ण अट असते. अशी लोकसंख्या स्पर्धात्मकतेचा मूलाधार ठरते. परंतू दुसऱ्या बाजूला केवळ लोकसंख्या अधिक असेल अकुशल निरक्षर लोकांचा अधिक भरणा असेल तर मात्र जागतिकीकरणाची प्रक्रिया ही अशा लोकांना गुलामगिरीकडे नेणारा मार्गच ठरू शकतो. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही बाजार केंद्रित असल्याने मागणी तसा पूरवठा हाच एकमेव नियम उत्पादनास लागू होतो. जागतिकीकरणास तांत्रिक प्रगतीवर फार मोठा भर दिला जातो.

विदेशी भांडवलाला व विदेशी उद्योजकांना आर्कषित करण्याच्या हेतूने भारतीय कंपन्यांना मात्र सापत्नभावाची वागणूक दिली जात आहे. एकीकडे समान संधीची भाषा बोलताना विदेशी गुंतवणूकदारांना अधिक झुकते माप दिल्याचे दिसते.

जागतिकीकरणाचा भारताच्या संदर्भात विचार केला तर मुळातच भारतात बेरोजगारीची मोठी समस्या असलेल्या देशात रचनात्मक समायोजनाचा कार्यक्रम व जागतिकीकरणाची प्रक्रिया ही बेरोजगारीत वृद्धी ठरणारी ठरते. १९९० नंतरही संघटित क्षेत्रातही रोजगार वाढला नाही तर उलट त्यामधे घट झालेली दिसून येत आहे. विविध उद्योगांमधे कायमस्वरूपी कामगारांना कमी करून तात्पुरते कामगार होणे अथवा ते काम कंत्राटी पद्धतीने करून घेण्याची पद्धती वाढलेली दिसते. वाढत्या आयात वस्तूच्या स्पर्धेतून आधुनिक तंत्र वापरातून रोजगार संधीही असंघटित क्षेत्रात फारशी वाढलेली नाही. जी काही रोजगारात वाढ दिसते ती केवळ संघटित कायमस्वरूपी

कामगारांचे काम असंघटित, तात्पुरत्या कामगाराला दिलेल्या कामामुळेच झालेली दिसते. अनेक श्रमबचत, करणाऱ्या वस्तूची विक्री आकर्षकपणाने केल्याने असंघटित क्षेत्रातही, रोजगार संधी घटल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या नकारात्मक निराशाजनक प्रवृत्तीला प्रचलित कामगार संघटनाही फारसा विरोध करू शकलेल्या नाहीत. 'सार्थ आणि दावला' यांनी या संदर्भात विशेष अभ्यास केला आहे. काही ठिकाणी स्वेच्छा निवृत्तीचे समर्थन केले आहे. आणि कामगार संघटनाचे नेतेही रचनात्मक समायोजनाच्या फायदेशीर प्रवाहात वाहताना दिसून येत आहेत.

एका बाजूला एकूण रोजगारात घट, दुसऱ्या बाजूला संघटित कायमस्वरूपी रोजगारात घट, नैमित्तीकरणात वाढ हे जसे रोजगारावर प्रतिकूल परिणाम दिसतात तसेच दीर्घकाळात रोजगाराची रचना आणखी एका पद्धतीने विपरीत परिणाम करू शकते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित देशातील आरोग्यास घातक

प्रदुषण वाढविणारे उद्योग विकसनशील देशात स्थलांतरित करण्याची प्रवृत्ती वाढती आहे. उदा. ॲसबेस्टॉस चे उत्पादन करण्यास विकसित देशांनी बंदी घातली आहे. त्यामुळे विकसनशील देशातच याचे उत्पादन घेतले जाते. या प्रकारचे जागतिक विशेषीकरण झाल्याने निर्माण होणारा रोजगार हा केवळ तात्पुरता कमी वेतनाचा असणार नाही तर तो आरोग्यासही घातक असण्याची शक्यता अधिक आहे. अलंगचा संदर्भ इथे घेता येऊ शकतो.

विकसित देशातील रासाययनिक कचरा विकसनशील देशांनी घ्यावा म्हणून काही रक्कम ही देण्यात येते. अर्थातच आम तो आम और गुठली ते दाम असा प्रकार असून विदेशी चलन व हा कचरा भारतासह अनेक देशांनी आयात केला आहे.

आज औद्योगिक क्षेत्रात उद्योग बंद करण्यासाठी आवश्यक ते निर्गम धोरण नसल्याने मूठभर संघटित कामगार आपल्या वेतनवाढीच्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात. या प्रक्रियेचा परिणाम म्हणून श्रमबाजारात उच्च वेतन असलेला संघटित कामगार वर्ग व कितीतरी पटीने कमी वेतन असलेला असंघटित कामगार वर्ग अशी दुहेरी श्रम बाजारपेठ उदयास आली आहे. यातूनच उत्पादनात भांडवलप्रधान तंत्राचा वापर करण्याचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून येत आहे.

## १.३ स्थलांतर

**प्रस्तावना :** औद्योगिकीकरण आणि वाढत्या शहरीकरणामुळे उपलब्ध होणारा रोजगार यामुळे दिवसेंदिवस स्थलांतराचे प्रमाण हे आपल्याला वाढलेले दिसून येत आहे. औद्योगिकीकरण आणि

शहरीकरण हे जरी प्रमुख घटक असले तरी सुद्धा दिवसेंदिवस भारताची वाढत जाणारी लोकसंख्या, वाढती बेरोजगारी, पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीप्रधान भारताचे बदलत जाणारे चित्र याही गोष्टी स्थलांतराला कारणीभूत ठरत आहेत. तसेच वाढत्या शिक्षणाच्या संधी, आधुनिक विचार प्रवाह आपल्या जीवनशैलीत आलेला बदल त्याचप्रमाणे गरीबी आणि आपले जीवनमान सुधारण्याची सुप्त इच्छा या साऱ्या गोष्टी स्थलांतराला कारणीभूत ठरत आहेत.

गुजराथ राज्यातील अलंग शीप ब्रेकींग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित आहेत. स्थलांतर ही पूर्वापार पासून चालत आलेली एक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून स्थलांतर या संकल्पनेकडे पाहिले असता त्याचे खूप महत्त्व दिसून येत आहे. कारण अभ्यासकांच्या दृष्टिकोनातून भारतीय समाज हा एकसंघ आणि स्थिर समाज म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. परंतु आज बदलत्या परिस्थितीनुसार यातही अनेक स्थित्यंतरे आपल्याला पहायला मिळत आहेत. आज बदलत्या समाजात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाचे व्यापक स्वरूप आपल्यापुढे दिसून येत आहे.

भारत देशाची वाढती लोकसंख्या त्यामुळे वाढती बेरोजगारी, वाढत्या शिक्षणाच्या संधी, भौगोलिक, नैसर्गिक असमानता यासारख्या गोष्टीही माणसाला स्थलांतर करायला प्रोत्साहित आणि प्रेरित करतात. त्यामुळेच माणसाचे भौगोलिक, सांस्कृतिक आणि भौतिक वातावरणही पूर्णपणे बदललेले दिसून येत आहे आणि त्यामुळेच स्थलांतराच्या या प्रक्रियेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून वेध घेणे जरुरीचे आहे.

स्थलांतराचा अर्थ –

चरैवेति चरैवेति

चरन्वे मधु विन्दति,

चरन्स्वादु मधुम्बरम

चरैवेति चरैवेति.

यावरील श्लोकाचा अर्थ सदैव चालत राहणे. जो चालत राहतो त्यालाच अनुरुप असे फळ मिळते आणि या चालत रहाण्या पाठीमागचा अर्थ गतिशीलतेकडे संबोधित करतो. आपला समाजसुद्धा परिवर्तनशील आहे. तो सतत नव्या बदलांचा स्वीकार करत असतो आणि जिथे गती आहे तिथेच

प्रगती आहे. त्यासाठी एखाद्या उद्दिष्टापोटी ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी माणसाला भ्रमंती ही करावीच लागते. तो त्या दृष्टीने प्रयत्न करतच असतो. माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा आहेत त्या आपल्याला अधिक चांगल्या रीतीने कशा मिळतील यासाठीच माणूस स्थलांतर करत असतो. त्यामुळे स्थलांतर ही एक सामाजिक प्रक्रिया आहे आणि ती अखंडपणे निरंतर चालू आहे. ग्रामीण भागातून नागरी भागात, एका नागरी भागातून दुसऱ्या नागरी भागात रोजगारासाठी स्थलांतर केले जाते. कुटुंबाच्या चरितार्थासाठी, रोजगाराची साधने पुरेशी उपलब्ध नसतील, किंवा आहे त्या साधनांनिशी कुटुंबाचा चरितार्थ चालविणे शक्य नसल्यास स्थलांतराशिवाय पर्याय उरत नाही. चांगला रोजगार मिळावा व चरितार्थासाठी उत्पन्न वाढविणे हा उद्देश स्थलांतरापाठीमागे असतो.

## स्थलांतराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

स्थलांतर ही व्यापक आणि सार्वत्रिक अशी सामाजिक प्रक्रिया आहे. भारतात अगदी प्राचीन काळापासून विविध कारणांसाठी स्थलांतर झालेले दिसून येत आहे. प्राचीन काळी प्रामुख्याने धर्म आणि आपल्या संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी विविध संतांनी स्थलांतर केल्याचे दाखले आहेत. इ. स. पूर्व २५०० किंवा त्यापेक्षाही आधी स्थलांतर प्रक्रिया सुरू असल्याचे संकेत मिळतात. आर्यांनीसुद्धा आपल्या धर्माच्या प्रचार प्रसारासाठी केलेले प्रयत्नही स्थलांतराची ऐतिहासिकता स्पष्ट करत आहे. 'मनुस्मृति' ग्रंथातसुद्धा स्थलांतराचा उल्लेख आढळून येत आहे.

गणपती शंकर यांच्या मतानुसार आर्यांचे मूळ निवासस्थान हे भारत होते. तरीही आर्यांनी इराण, इराक, रोम, सिरीया, इजिप्त इथेसुद्धा वास्तव्य केलेले होते. त्याचप्रमाणे रामायण आणि महाभारत या महाकाव्यातही स्थलांतराचे उल्लेख आहेत. दंडकारण्यातील अगस्त ऋषी आणि इतर ऋषीमुनींनी भारतीय संस्कृतीचा प्रचार प्रसार करण्यासाठी स्थलांतर केल्याचे उत्तम उदाहरण आहे. यादवांनी आपल्या स्वरक्षणासाठी पश्चिमी सागरी किनाऱ्यावरील द्वारकेच्या ठिकाणी आपले वास्तव्य केले हे सुद्धा स्थलांतराचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

मौर्य काळात बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अनेक धर्मप्रचारक धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अफगाणिस्तान, तिबेट, चीन, नेपाळ, बर्मा, थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम, मलेशिया, इंडोनेशिया व श्रीलंका या देशात गेल्याचे उल्लेख आहेत. धर्मप्रचाराबरोबरच व्यापार आणि राजकीय

संबंध ही सुद्धा स्थलांतराची महत्त्वपूर्ण उदाहरणे आहेत. त्या काळात भारतीय व्यापारी समुद्रमार्गाने दुसऱ्या देशात व्यापार करण्यासाठी जात असत व तिथे राहतही असत. त्याचप्रमाणे मोगल, पठाण या लोकांनी सुद्धा भारतात राज्य करण्याच्या हेतूनेच प्रवेश केला आणि काही काळ राज्यही केले. यावरूनच भारत देश आणि भारतीय संस्कृतीचे त्याही काळात इतर देशातील लोकांना आकर्षण होते.

१९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे स्थलांतराची प्रक्रिया अधिकच गतीशील झालेली पहावयास मिळत आहे. बेकर आणि विल्यम्नस यांच्या मते औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करण्यास आकृष्ट होतात.

औद्योगिकीकरणाला चालना मिळाल्यामुळेच आज आपल्याला मोठमोठ्या महानगरांचे जाळे पसरलेले दिसून येत आहे. २००१ सालाची लोकसंख्या आणि आज २०१५ सालची लोकसंख्या यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे.

स्थलांतर ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. १९६१ साली स्थलांतराचा आकडा हा १४४ मिलियन होता. २००१ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार तो ३०७ मिलियन इतका झाला. २००१ च्या जनगणनेनुसार उपलब्ध आकडेवारीनुसार महाराष्ट्रात स्थलांतराचे प्रमाण सर्वाधिक होते. त्याखालोखाल दिल्ली व नंतर प. बंगालचा नंबर लागतो. इतर कारणांपेक्षाही रोजगारासाठी स्थलांतरित झालेल्या स्थलांतरांची संख्या ही १२.८ मिलियन त्यात ३२.८ ही पुरुष कामगारांची संख्या आहे.

## देशातल्या देशात स्थलांतरित झालेले पुरुष कामगार :

| | | |
|---|---|---|
| १) | खेड्यातून दुसऱ्या खेड्यात | **५३.३ मिलियन** |
| २) | खेड्यातून शहराकडे | **२०.५ मिलियन** |
| ३) | शहरातून खेड्याकडे | **०६.२ मिलियन** |
| ४) | शहरातून शहराकडे | **१४.३ मिलियन** |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की स्थलांतराचा ओघ हा शहराकडेच अधिक दिसून येत आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार आपल्या आंतरराष्ट्रीय सीमा पार करूनही भारतात स्थलांतरित झालेल्या लोकांचे प्रमाण ५.१ मिलियन इतके होते. त्यातही आता मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. शेजारच्या आठ देशातून भारतात स्थलांतरित झालेले लोक आढळून आले आहेत. ३.० मिलियन (बांगलादेश), ०.९ (पाकिस्तान), ०.५ (नेपाळमधून), ०.१ मिलियन हे श्रीलंकेतून आले आहेत. फाळणी आणि त्यानंतर १९७१ साली आलेले बांगलादेशाचे युद्ध ही दोन कारणे त्याला महत्त्वाची ठरली आहेत.

| **Rank** | **State or Union Territory** | **Population (2011 Census)** | **Density (per km$^2$)** | **Sex ratio** |
|---|---|---|---|---|
| 01 | Uttar Pradesh | 199,581,477 | 828 | 908 |
| 02 | Maharashtra | 112,372,972 | 365 | 946 |
| 03 | Bihar | 103,804,637 | 1102 | 916 |
| 04 | West Bengal | 91,347,736 | 1029 | 947 |
| 05 | Andhra Pradesh | 84,665,533 | 308 | 992 |
| 06 | Madhya Pradesh | 72,597,565 | 236 | 930 |
| 07 | Tamil Nadu | 72,138,958 | 555 | 995 |
| 08 | Rajasthan | 68,621,012 | 201 | 926 |
| 09 | Karnataka | 61,130,704 | 319 | 968 |
| 10 | Gujarat | 60,383,628 | 308 | 918 |
| 11 | Odisha | 41,947,358 | 269 | 978 |
| 12 | Kerala | 33,387,677 | 859 | 1,084 |
| 13 | Jharkhand | 32,966,238 | 414 | 947 |
| 14 | Assam | 31,169,272 | 397 | 954 |
| 15 | Punjab | 27,704,236 | 550 | 893 |
| 16 | Haryana | 25,353,081 | 573 | 877 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | Chhattisgarh | 25,540,196 | 189 | 991 |
| 18 | Jammu and Kashmir | 12,548,926 | 56 | 883 |
| 19 | Uttarakhand | 19,116,752 | 189 | 963 |
| 20 | Himachal Pradesh | 6,856,509 | 123 | 974 |
| 21 | Tripura | 3,671,032 | 350 | 961 |
| 22 | Meghalaya | 2,964,007 | 132 | 986 |
| 23 | Manipur | 2,721,756 | 122 | 987 |
| 24 | Nagaland | 1,980,602 | 119 | 931 |
| 25 | Goa | 1,457,723 | 394 | 968 |
| 26 | Arunachal Pradesh | 1,382,611 | 17 | 920 |
| 27 | Mizoram | 1,091,014 | 52 | 975 |
| 28 | Sikkim | 607,688 | 86 | 889 |
| UT1 | Delhi | 16,753,235 | 9,340 | 866 |
| UT2 | Pondicherry | 1,244,464 | 2,598 | 1,038 |
| UT3 | Chandigarh | 1,054,686 | 9,252 | 818 |
| UT4 | Andaman and Nicobar Island | 3,79,944 | 46 | 878 |
| UT5 | Dadra and Nagar Haveli | 342,853 | 698 | 775 |
| UT6 | Daman and Diu | 242,911 | 2,169 | 618 |
| UT7 | Lakshadweep | 6,429 | 2,013 | 946 |
| **Total** | **India** | **1,210,193,422** | **382** | **940** |

आज २०१५ साली भारताची लोकसंख्या १,२८९,६८२, ५१४ (As of 14 July2015 ) एकूण पुरुषांची संख्या ही ६६५,९९२,०५० (६६५ मिलियन २०१५) तर एकूण स्त्रियांची संख्या ही ६२३,६९०,४६३ (६२३ मिलीयन) आहे. स्त्री, पुरुष प्रमाण हे १००० पुरुषांमागे ९४३ स्त्रिया इतके आहे. ० ते २५ वयोगटातील प्रमाण हे ५०% आहे. प्रत्येक मिनिटाला भारतात जन्मदर हा ५१ आहे. एकूण लोकसंख्येपैकी ७२.२% इतके लोक हे ६,३८,००० खेड्यांमध्ये राहतात. आणि

राहिलेले २७.८% हे एकूण ५४८० तालुके आणि शहरी भागात मिळून राहतात. संपूर्ण जगात भारतात निरक्षतेचे प्रमाण हे सर्वाधिक आहे. भारतातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे जगातल्या इतर देशातील लोकसंख्येच्या तुलनेने अधिक आहे. आपल्या इथल्या एका राज्याची लोकसंख्या ही जगातल्या एका देशाची लोकसंख्या असते. (उदा. ब्राझील देशाची लोकसंख्या ही आपल्या उत्तरप्रदेशाच्या राज्याइतकी आहे. (मेक्सिको – महाराष्ट्र) (बिहार–जर्मनी देशातील वाढती लोकसंख्या गरीबी निरक्षरता, लोकांचे वाढते आयुष्यमान, या सर्व कारणांमुळे रोजगारासाठी लोकांना स्थलांतरित व्हावे लागते.

## स्थलांतराची व्याख्या :

मूळ राहण्याचे ठिकाण सोडून व्यक्ति वा समूहाने अन्य ठिकाणी कायमचे वास्तव्यास जाणे याला स्थलांतर ही संज्ञा आहे. स्थलांतर हे ऐच्छिक वा अनैच्छिक असू शकते. कायमस्वरुपी वा ठराविक काळापूरते मर्यादित असू शकते. अधिक चांगल्या उदरनिर्वाहाच्या साधनांचा शोध घेण्यासाठी महापूराचे संकट, दुष्काळाची आपत्ती, विशिष्ट ध्येय गाठण्यासाठी अशा अनेकविध कारणांसाठी स्थलांतर केले जाते. एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात, एका देशातून दुसऱ्या देशात स्थानांतर घडत असते.

मूळ लॅटिन शब्द ' migrure' यावरुन migration ही संज्ञा आलेली आहे. याचा अर्थ निवासस्थानातील बद्दल जिथे उत्पन्नाचे साधन नाही आणि जिथे उत्पन्नाचे साधन विपूल प्रमाणात आहे अशा कमी कडून जास्तीकडे स्थलांतर होत असते.

स्थलांतर हे ग्रामीण भागातून शहराकडे होत असते. स्थलांतराची प्रक्रीया ही अतिशय व्यापक आणि जटील अशी प्रक्रीया आहे, स्थलांतर हे व्यक्तिगत, कुटुंबासहीत संबंधीतासोबत, सामाजिक स्थलांतर होत असते. शहरापेक्षा ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. शहरात जिथे रोजगाराचे प्रमाण अधिक आहे तिथे सर्वाधिक स्थलांतर होताना दिसते.

कामगार आपले मूळ निवास स्थान सोडून दुसऱ्या ठिकाणी जाऊन निवास आणि कामधंदा करतो या प्रक्रियेला स्थलांतर प्रक्रीया म्हणता येऊ शकते. आणि अशा व्यक्तिमत्वाला स्थलांतरित संबोधले जाते. इथे श्रमिकांचा वाहता पुरवठा स्थानिक लोक काम करायला तयार होत नाहीत. अशा ठिकाणी हे स्थलांतरित कामगारच अगदी कमी वेतनावर सुद्धा काम करण्यास तयार होतात.

आपले स्वत:चे मूळ निवास सोडून दुसऱ्या ठिकाणी जाऊन त्या ठिकाणी निवास करणे हे स्थलांतराचे मुख्य लक्षण म्हणता येईल. मात्र शहरातून एका भागातून दुसऱ्या भागात जाऊन निवास करणे या प्रक्रियेला स्थलांतर म्हणता येऊ शकत नाही.

## स्थलांतराचे स्वरुप :

**१) वैयक्तिक स्थलांतर –** रोजगार मिळवण्याच्या दृष्टीने कामगार हा सुरवातीला एकटाच स्थलांतर करत असतो. आणि त्याचा कालावधी हा ६ ते १२ महिन्याचा असतो. मग हा कामगार आपल्या मूळ वतनी परतताना सुद्धा दिसतो.

**२) कुटुंबासोबत स्थलांतर –** काही कामगार सुरुवातीला एकटे आणि नंतर कुटुंबाबरोबर सुद्धा कामाच्या ठिकाणी स्थलांतर करताना दिसतात.

**३) संबंधीतासोबत स्थलांतर –** सुरुवातीला स्थलांतरित आलेल्या नातेवाईकांकडे जाऊन तिथे समायोजन करुन तिथे राहणे आणि रोजगार मिळण्याचा प्रयत्न करणे.

**४) सामाजिक स्थलांतर –** स्थलांतर प्रक्रीयेत सामाजिक स्थलांतराला खूप महत्त्व आहे. या प्रकारात कामगार रोजगार शोधतो. आणि अनेक वर्षे तिथे काम करतो. व तिथेच राहतो. आणि आपली आर्थिक परिस्थिती सुधारतो. स्वत:च्या गरजा पूर्ण करुन सुखी आणि समाधानी राहतो. त्याचबरोबर आपल्या मूळ स्थानी राहणाऱ्या आपल्या लोकांसाठी आर्थिक मदत करुन त्यांचेही जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करतो.

## स्थलांतराचे प्रकार :

**१) अशंकालीन –** अंशकालीन स्थलांतर हे ठराविक कालावधी हंगामापुरते मर्यदित असते. शेतमजुर, महाराष्ट्रातील उसतोडणी कामगार हे ठराविक काळापूरते स्थलांतरित होत असतात. हंगाम/काम संपल्यावर पुन्हा ते आपल्या मूळ गावी परत जातात.

**२) दीर्घकालीन –** या प्रकारात जिथे रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्याच ठिकाणी राहून आपला उदरनिर्वाह करणे. काही दिवसांसाठी परत येणे. व पुन्हा आपल्या कामाच्या ठिकाणी परत येणे याला दीर्घकालीन स्थलांतर असे म्हटले जाते.

**३) कायमस्वरुपी स्थलांतर –** या प्रकारात व्यक्ती आपल्या मूळस्थानातील सर्व मालमत्ता विकून दुसऱ्या ठिकाणी कायमस्वरुपी आपले वास्तव्य करतो. त्याचठिकाणी नोकरी उद्योगधंदा शोधून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. अशा स्वरुपाच्या स्थलांतराला कायम स्वरुपी स्थलांतर असे म्हणतात. भारतात स्थलांतराचे दोन मुख्य प्रवाह आपल्याला पहायला मिळतात.

१. आंतरराज्यीय स्थलांतर आणि २. आंतरराष्ट्रीय स्थलांतर.

आंतरराज्यीय स्थलांतरात भारतातील मुख्य राज्ये त्यातील शहरे, छोटी गावे इथे केलेले स्थलांतर पहायला मिळते. आंतराष्ट्रीय स्थलांतरात एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर केले जाते. आज भारतातूनही परदेशात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याने आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाणही खूप वाढलेले दिसून येत आहे. आंतरराज्यय स्थलांतरात काही फायदे आणि काही वेळ विपरीत परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते.

## स्थलांतराची कारणे :

१) रोजगाराच्या संधीमुळे स्थलांतर होत असते.

२) Pull & Rush Factors २) आर्कषित करणारे व ढकलणारे घटक

३) आकर्षक करणारे घटक (Pull Factors) ऐच्छिक स्थलांतर असते. (Push Factors)(ढकलले जाणारे) हे स्थलांतर अनैच्छिक असते.

४) गरिबी हे सुद्धा स्थलांतराचे प्रमुख कारण आहे.

५) राजकीय घडामोडी सुद्धा स्थलांतराला कारणीभूत ठरतात.

## स्थलंतराचा प्रभाव :

भारतातील काही भागात घरटी एक तरी माणूस हा रोजगारासाठी स्थलांतरित झालेला असतो आणि या स्थलांतराचा परिणाम हा फक्त त्या व्यक्तिवरच नव्हे तर त्याच्या कुटुंबावर, त्या भागावर, समाज आणि अर्थ व्यवस्थेवरही पहायला मिळतो. स्थलांतर आणि गरीबीचाही सहसंबंध आहे. स्थलांतराच्या प्रक्रीयेचा सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक घटकावरही प्रभाव पडत असतो.

स्थलांतराचा प्रभाव हा त्या व्यक्तीवर त्याच्या कुटुंबावर, विशिष्ट विभागावर आणि ठराविक असा प्रदर्शित परिणाम हा देशाच्या आर्थिक बाजूवर व समाजावरही होत असतो आणि हा प्रभाव आंतरराज्यीय तसेच आंतरराष्ट्रीय स्थलांतरामुळे होत असतो.

स्थलांतरित होणाऱ्या कामगाराचे कामाचे स्वरूप, त्याच्या राहण्याची सोय, स्थलांतराचा कालावधी या बाबींचाही विचार केला जातो.

## हंगामी स्थलांतर :

ठराविक कालावधीपुरते काम करणाऱ्या कामगारांमध्ये प्रामुख्याने शेतीव्यवसायात हे कामगार काम करताना दिसतात. हे एक काम संपवून दुसऱ्या कामाकडे वळताना दिसतात. यांचेही राहण्याचे असे निश्चित ठिकाण असत नाही. जिथे काम तिथेच तात्पुरत्या निवासाची सोय करून ते राहतात. स्थलांतरामध्ये अनुसुचित जाती जमातीच्या लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. स्थलांतर एकट्या पुरुषाचे असो किंवा स्त्रीचे, किंवा दोघांचेही बरोबर असो त्या गोष्टीचा सामाजिकतेवर परिणाम होताना दिसून येतो. गृहबांधणी उद्योग, वीटभट्टीवर काम करणारे कामगार किंवा उसतोडणी करणारे कामगार हे कुटुंबासहित कामाच्या ठिकाणी स्थलांतर करतात हे त्या मालकांनाही आर्थिकदृष्ट्या परवडत असते आणि त्या टक्केवारीतही वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

एकट्या महिलांचे स्थलांतर करणाऱ्या महिला या मासेमारी इंडस्ट्रीजमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतर करताना दिसून येत आहेत. तसेच दिल्लीच्या सुखवस्तू कुटुंबातून घरकाम करणाऱ्या स्त्रियांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशातून पुरुष कामगार स्थलांतर करताना दिसतात तर दक्षिणेकडे मात्र महिला मोठ्या प्रमाणात स्थलांतर करताना दिसून येतात. धुळे जिल्ह्यातील (महाराष्ट्र) उसतोडणीसाठी हे मालक स्थानिक लोकांना काम न देता दुसऱ्या राज्यातील लोकांना कामावर ठेवून घेतात. त्यामुळे या कामगारांवर ते चांगला दबदबा ठेवू शकतात. स्थानिक लोकांना इथे काम न मिळाल्यामुळे ते नाईलाजाने शेजारच्या गुजराथ राज्यात कामासाठी स्थलांतर करतात.

केरळात ज्याप्रमाणे मासेमारी उत्पादनाची जशी मक्तेदारी आहे त्याचप्रमाणे काजू आणि रबर इंडस्ट्रीजमध्येही महिला मोठ्या प्रमाणात काम करत असतात. यात स्थलांतरित महिलांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

बिहार उत्तर प्रदेशात सायकल रिक्षा चालवणारे कामगारही अतिशय गरिबीच्या अवस्थेत जीवन जगतात. ते जरी स्वयं–रोजगार करत असले तरी त्यांना खूप हलाखीचे जीवन जगावे लागते.

काही ठिकाणी स्वत: मालक लोक त्यांचे दलाल पाठवून या स्थलांतरित कामगारांना कामावर ठेवून त्यांना काम देत असतात. पंजाबमधील रेल्वे स्टेशनवर असे दलाल या स्थलांतरित कामगारांना काम देताना दिसून येतात. सध्या महाराष्ट्रात पुणे स्टेशनवरही आपल्याला हे चित्र सातत्याने पहायला मिळते. प. बंगालमध्ये बसस्टॅन्डवरच मालक आपल्या कामगारांची निवड करत असतात.

मुकादमाच्या माध्यमातून मिळणारे काम हे त्याच्याच जाती धर्माच्या लोकांना मिळते असे दिसून येते. त्यात प्रामुख्याने शेतीविषयक कामाचे स्वरूप असते. हे चित्र पंजाबात अधिक दिसून येते. कर्नाटकात कॉफी लागवडीसाठी अशाच रीतीने कामगारांची निवड केली जाते. दिल्लीमध्ये कामगारांची निवड केली जाते. मुकादम या कामगारांना त्यांच्या गावीच आधी बोली ठरवून कामाला आणत असतो. काही कामगार हे मित्र किंवा नातेवाईकांच्या माध्यमातूनसुद्धा येतात.

बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातूनच काम मिळते. कामाचे पैसे ठरविणे. कामाचे पैसे चुकते करणे. अशा पद्धतीने ते सुपरवायझरचे कामही ते करत असतात. केरळच्या मासेमारी उद्योगातही कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातूनच कामगारांची नेमणूक केली जाते. दिल्लीमध्ये घरकाम करणाऱ्या स्त्रियांची नेमणूक करणाऱ्या विशिष्ट संस्था आहेत. इथे काम करणाऱ्या स्त्रिया या झारखंडमधल्या आदिवासी पट्ट्यातल्या आहेत. या संस्था या लोकांच्या मिळणाऱ्या वेतनातून ठराविक रक्कम कापून घेतात. यात काही चर्चसुद्धा महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

चेन्नईमध्येच या कामगारांच्या संदर्भात केलेल्या अभ्यासावरून असे लक्षात आले आहे की या लोकांच्या कामाचे तास खूप आणि कामाच्या वेळाही विचित्र असतात. त्याचप्रमाणे या लोकांना कधीही वेळेवर पैसे दिले जात नाहीत. या साऱ्या गोष्टी मालकाच्याच हातात असतात. स्थानिक कामगारांपेक्षा स्थलांतरित कामगारांना कामावर ठेवणे अशा लोकांना जास्त फायदेशीर ठरत असते. स्वत:च्या वर्चस्वाखाली कमी पैशात त्यांच्याकडून काम करून घेता येते. त्याचप्रमाणे मालकांच्या वर्चस्वामुळे या कामगारांना कुठल्याही प्रकारचे सामाजिक संबंध प्रस्थापित करता येऊ शकत नाही.

स्थलांतरित स्त्री कामगारांची अवस्था तर पुरुषांपेक्षाही वाईट असते. त्यांना तर पुरुष कामगारांपेक्षाही कमी पैसे दिले जातात. बांधकाम क्षेत्रात स्त्रिया या आपल्या नवऱ्याला मदतनीस म्हणून अकुशल कामगार या नात्याने काम करत असतात. मासेमारी उद्योगात काम करणाऱ्या स्थलांतरित महिलांची अवस्था तर अतिशय बिकट अशी आहे. या महिलांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांना खूप त्रास दिला जातो. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी कुठल्याच सुविधा नसतात. कधी कधी या महिलांचे लैंगिक शोषणही केले जाते. दलाल /मुकादम/कॉन्ट्रॅक्टर हे लोक कोणत्याही प्रकारचे नियम पाळत नाहीत. कामापूर्वी ते आश्वासने देतात. पण त्यांची पूर्तता होत नाही आणि या लोकांच्या वर्चस्वामुळे स्थलांतरित कामगारांना त्यांच्या मर्जीप्रमाणेच काम करावे लागते. आपले दिवस व्यतीत करावे लागतात.

## स्थलांतरित कामगारांवर होणारा प्रभाव :

स्थलांतराचा कुटुंबावर चांगला आणि वाईट अशा दोन्ही प्रकाराने परिणाम होत असतो. राहण्याच्या बाबतीत विचार केला तर मग ते कोणत्याही ठिकाणी काम करत असू देत ते अतिशय बिकट अशा परिस्थितीत ते राहत असतात. तिथे पाण्याची व्यवस्थासुद्धा नसते. त्याचप्रमाणे शौचालय, इतर कुठल्याही सुविधा त्यांना उपलब्ध होत नाहीत. जे शहरात कामासाठी स्थलांतरित होतात ते सार्वजनिक बागा किंवा फूटपाथवर राहतात किंवा मग कुठल्यातरी झोपडपट्टीत राहून आपले दिवस काढत असतात. अतिशय कठीण अशा परिस्थितीत हे कामगार काम करत असतात. अतिशय अस्वच्छ, गलिच्छ वातावरणात ते राहत असल्याने हे कामगार विविध आजाराने ग्रासलेले असतात. खाणीत, दगडफोड करणारे तसेच बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना

फुफ्फुसाचे आजार मोठ्या प्रमाणात होत असतात. मालकही त्यांच्या आरोग्याकडे कुठल्याही प्रकारची दक्षता घेत नाहीत. कारण या लोकांचे काम आणि वास्तव्यही तात्पुरत्या स्वरूपाचे असते. त्यांच्यासाठी कुठल्याही प्रकारच्या औषधोपचाराची योजना आखलेली नसते. महिलांनाही कामाच्या ठिकाणी कुठल्याही सुविधा मिळत नाहीत. त्यांना बाळंतपणाची रजा सोडा, बाळंतपण झाल्या झाल्या कामावर रुजू व्हावे लागते. जे कामगार फरशीकाम वीटभट्टीवर काम करतात त्यांना अंगदुखी, पक्षघात आणि त्वचेचे रोग होत असतात. यांच्या मुलांनाही कुपोषणामुळे रोगांची सहज लागण होत असते. तसेच या मुलांना शाळा आणि शिक्षणापासूनही वंचित रहावे लागते.

जे कामगार एकटेच स्थलांतरित होतात त्यांच्या कुटुंबावर, विशेषत: पत्नी आणि मुलांवर मानसिक परिणाम होत असतो. घरची सर्व जबाबदारी एकट्या स्त्रीवर येऊन पडते. घराची व मुलांची देखभाल तिला करावी लागते. पतीने पाठविलेल्या पैशातच घराची तजवीज पूर्ण करावी लागते. त्यामुळे तिची मानसिक व शारीरिक दगदग होत असते.

शहरी भागात कामासाठी स्थलांतरित केलेल्या कामगारांमध्ये आता थोडीफार जागरुकता दिसून येत आहे. ते आपापल्या परीने कुटुंब मुलांची विशेष काळजी घेताना दिसून येत आहेत.

## आंतरराष्ट्रीय स्थलांतर :

३ व ४ ऑक्टोबर २०१३ या दिवशी युनायटेड नेशनच्या सर्वसाधारण सभेत आंतरराष्ट्रीय स्थलांतर आणि विकास या संदर्भात विशेष चर्चा घडवून आणण्यात आली होती. ही चर्चा घडवून आणण्यापाठीमागचा मूळ हेतू की त्याद्वारे आंतरराष्ट्रीय स्थलांतरातील घडामोडी व्यवस्थितरीत्या समजून घेता येतील. तसेच स्थलांतरासंदर्भात उपाययोजना करताना या अभ्यासाचा उपयोग होऊ शकेल.

आज जागतिक पातळीवर विचार केला तर २३२ मिलियन एवढे स्थलांतरित लोक हे जगाच्या पाठीवर राहत आहेत.

इ.स.२००० ते २०१० च्या दशकात जेव्हा उदारीकरणाचे वारे वाहू लागले तेव्हा या स्थलांतराच्या प्रक्रियेत सातत्याने वाढ होऊ लागली आणि ती दर वर्षाला ४.६ मिलियन एवढी होती. जेव्हा जागतिक आर्थिक मंदीचा फटका बसला तेव्हा हा दर ३.६ मिलियन इतका खाली

आला. २०१३ मध्ये जागतिक लोकसंख्येच्या ३.२% इतके लोक स्थलांतरित होते. ९० च्या दशकात ही संख्या २.९% इतकी होती.

जागतिक पातळीवर जे लोक रोजगारासाठी स्थलांतर करतात ते प्रामुख्याने खालील दहा देशांमध्ये राहतात. २०१३२ च्या आकडेवारीनुसार सर्वात जास्त युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका इथे सर्वाधिक ४५.८% मिलियन (एकूण जागतिक लोकसंख्येच्या २०%) त्यानंतर रशियन फेडरेशन (११ मिलियन), जर्मनी (९.८ मिलियन), सौदी अरेबिया (९.१ मिलियन), युनायटेड अरब अमीरात (७.८ मिलियन), युनायटेड किंगडम (७.८), फ्रान्स (७.५ मिलियन), कॅनडा (७.३ मिलियन), ऑस्ट्रेलिया (६.५ मिलियन) आणि स्पेन (६.५ मिलियन)

२००० ते २०१३ या कालावधीत स्थलांतराच्या संख्येत वाढ झाली असून आज १६५ देशांमध्ये लोक स्थलांतरित होताना दिसून येत आहेत.

या स्थलांतरामध्ये स्त्रियांचा वाटा हा ४८% आहे. जास्त करून महिला या युरोपात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होतात. (५१.९%) लॅटिन अमेरिका आणि सैबेरिया (५१.६%) उत्तर अमेरिका (५१.२) आणि (oceania) ओशिनिया (५०.२) आफ्रिका (४५.९) आणि आशिया (४१.६). आशियात प्रामुख्याने पुरुष वर्गालाच तेल उत्पादन कंपन्यामधून मोठ्या प्रमाणात मागणी आहे. आंतरराष्ट्रीय स्थलांतर करणाऱ्या लोकांमध्ये शिक्षितांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. भारतातून स्थलांतरित झालेल्यांचे प्रमाण हे २ मिलियन आहे. चीनमधून १.७ मिलियन, फिलिपाईन्समधून (१.४) हे २०१० ते २०११ च्या दरम्यान आलेले जागतिक स्थलांतर आहे. त्यात आता नक्कीच वाढ झालेली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्थलांतरामध्ये भारतात येणारे बाहेर देशातील लोक किंवा भारतातून इतर देशात जाणाऱ्या लोकांचे प्रमाणही वाढलेले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतर करणाऱ्या कामगारांमध्ये कुशल अकुशल किंवा मुकादमामार्फत पाठवले जाणारे कामगार, स्वत:हून परदेशी जाणारे, तंत्रज्ञानात कुशल असणारे कारागीर, व्यापार राजकीय संबंध आणि धार्मिक हेतूंसाठी भारतातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असते. त्यात काळानुसार बदल होत असलेला दिसून येत आहे. अशोक राजाने आपला

शांतीचा संदेश घेऊन एका दूताला संपूर्ण जगात पाठवले होते. जेव्हा ब्रिटिशांचे साम्राज्य होते तेव्हा अकुशल कामगारांना कॉफी लागवड आणि खाणीच्या कामात जुंपले होते. भारतातील अकुशल कामगारांची पहिली तुकडी ही सर्वप्रथम मॉरिशस इथे पाठविण्यात आली. ती ऊस लागवड, रबर आणि खाणीत काम करण्यासाठी या कामगारांना करारबद्ध करण्यात आले होते.

भारतातून अकुशल कामगार हे प्रामुख्याने फीजी, दक्षिण आफ्रिका, मॉरिशस, मलेशिया, सिंगापूर, सिलोन, श्रीलंका, बर्मा इथे कामासाठी हे कामगार स्थलांतरित होत असत.

आता भारतातून युनायटेड किंगडम, युरोप, उत्तर अमेरिका इथेही कामासाठी कामगार स्थलांतरित होत आहेत. ३० मिलियन एवढे भारतीय जगातील विविध देशात स्थलांतरित झालेले दिसून येत आहेत. त्यापैकी २२ मिलियन भारतीय हे श्रीलंका, बर्मा, वेस्टइंडीज, मॉरिशस, मलेशिया इथे स्थलांतरित झालेले आहेत. ५० हजाराहून अधिक युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका, यु.के. आणि कॅनडा इथेही स्थलांतरित होताना दिसून येत आहेत. हे स्थलांतर थोड्या कालावधीसाठी किंवा कायमस्वरूपीसुद्धा असू शकते. आता महिलांचेही परदेशी स्थलांतरित होण्याचे प्रमाण वाढलेले आहे.

१९६० च्या दशकात यु.के.मध्ये स्थलांतरित होण्याचे प्रमाण सर्वाधिक होते. त्यात इंजिनियर, डॉक्टर, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानातील कुशल कारागिरांचा समावेश होता. २००३ साली कॅनडामध्येही मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले दिसून आले. तसेच ऑस्ट्रेलिया, जर्मनी, जपान, मलेशिया, न्यूझीलंड इथेही सुशिक्षित आणि कुशल कामगारांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालेले दिसून आले आहे.

१९७४ च्या दशकात ६०,००० हून अधिक श्रीलंकेतील तामीळ लोकांनी भारतात स्थलांतर केले होते. आधी हे निर्वासित म्हणून राहात होते. एकूण १,२५०००० एवढे तामीळ निर्वासित म्हणून भारतात दाखल झाले. एकूण १९ मिलियन लोक हे श्रीलंकेतून भारतात दाखल झाले. पाकिस्तानातून ३६ मिलियन म्यानमार (११०२९) चायनामधून (८६८५) अफगाणिस्तान – ४७८०, भूतान – ४०२३ हे लोक भारतात वास्तव्य करून आहेत.

१९८० च्या दशकात सर्वाधिक कामगार हे गल्फ देशात गेलेले आढळून आले. २००४–५ या काळात ओमान, सौदी अरेबिया आणि यू.ए.ई. या देशातही स्थलांतरित कामगारांचे प्रमाण वाढलेले दिसून आले. २५ हजाराहून अधिक कामगार हे सिंगापूर इथे तर ११ हजार कामगार हे मलेशियात कामात गुंतलेले आहेत.

२००१ च्या जनगणनेनुसार २.६ मिलियन एवढ्या नेपाळी लोकांनी भारतात स्थलांतर केले आहे. आज नेपाळी स्थलांतरांची संख्या ही डबल झाली आहे. स्थलांतरित नेपाळी प्रामुख्याने आसाम, मेघालय, सिक्कीम, यू.पी., बिहार, प.बंगाल, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश व गुजराथ मध्ये वास्तव्य करून आहेत.

२००६ अखेरपर्यंत एकूण ३,००,००० लोक बांगलादेश, तिबेट आणि श्रीलंकेतून निर्वासित म्हणून भारतात वास्तव्याला होते.

भारताशेजारील देशातून भारतात स्थलांतरित झालेल्या लोकांमध्ये प्रामुख्याने अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, म्यानमार, नेपाळ, पाकिस्तान व श्रीलंका इथून काही कायदेशीर तर काही बेकायदेशीररीत्या स्थलांतरित झालेले आहेत. २००१ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे ६,२६,७१२ लोक भारतात स्थलांतरित झालेली आहेत. त्यापाठीमागे फाळणीचे मोठे कारण आहे. याच काळात बेकायदेशीर स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले आहे.

चकमा आणि जुम्मा आणि इतर बिगरमुस्लीम आदिवासी अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा इथे स्थलांतरित होतात. बांगलादेशात यांना धार्मिक अतिरेकाला सामोरे जावे लागते. त्यामुळे बांगलादेशातील लोक हे भारतात स्थलांतरित होतात. १९५९ पासून तिबेटीयन निर्वासित हे प्रामुख्याने भारतात उत्तर प्रदेश, कर्नाटका, अरुणाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीरमध्ये, ओरिसा, प. बंगाल व सिक्कीम मध्येही स्थलांतरित झालेले आहेत.

अफगाणिस्तान, बर्मा, इराण व कोमालिया आणि सुदान इथूनही भारतात शरणागती घेतलेले स्थलांतरित राहत आहेत.

म्यानमारमधून स्थलांतरित झालेले प्रामुख्याने ख्रिश्चन धर्मीय लोक हे उत्तर पूर्व भागातील मणिपूर आणि मिझोराम राज्यात राहतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर जे असंघटित कामगार परदेशात स्थलांतर करतात. त्या असंघटीत कामगारांना सुद्धा अतिशय हलाखीचे असे जीवन जगावे लागते. मध्य आखाती देशातही भारतातील असंघटित कामगार हे स्थलांतरित झालेले आहेत. त्यात (बूर्ज खलिफा – प्रसिद्ध इमारत दुबई) इथे बांधकाम क्षेत्रात निर्माण केलेल्या कित्येक इमारती या कामगारांनी बांधलेल्या आहेत. या कामगारांनाही अतिशय वाईट अवस्थेत दिवस काढावे लागले आहेत. भारतातील दोन मोठ्या संघापैकी त्यातील काही कामगार हे मर्यादित काळापुरते स्थलांतरित होतात. तर काही जेव्हा कामाची उपलब्धता असेल त्याच वेळेस इथे स्थलांतरित होतात.

मूळ भारतीय असलेले सुमारे ४ मिलियन एवढे कामगार हे आखाती देशात रोजगारासाठी स्थलांतरित होतात. हे कामगार बहारीन कतार आणि पर्शियन गल्फ मॉडर्न आर्किटेक्चर म्हणून बुर्ज खलिफा ही जगातील सर्वात उंच इमारत जिचे उद्‌घाटन जानेवारी २०१० साली झाले. या इमारतीचे व इतर इमारतींच्या बांधाकामात व्यस्त असलेल्या या स्थलांतरीत कामगारांना तासाला २ ते ५ डॉलर पैसे मिळतील असे सांगितले जाते. परंतु वास्तवात तसे काहीच होत नाही. जेव्हा एखादा प्रोजेक्ट संपतो तेव्हा या कामगारांकडे घरी परत येण्याचे पैसे सुद्धा उरत नाहीत. अशी त्यांची अवस्था असते. त्यांना कुठल्याही प्रकारच्या सोईसुविधा किंवा सामाजिक सुरक्षितताही उपलब्ध होत नाही. काही वेळा तर कामगारांना योग्य पगारही दिला जात नाही. त्यांच्या निवासाचे ठिकाणही अतिशय गलिच्छ असते. कामाच्या ठिकाणी सुद्धा त्यांना कुठलीही सुरक्षितता उपलब्ध करुन दिली जात नाही. भारतात त्यांना जे काही पैसे कबूल केलेले असतात त्याच्यापेक्षा खूप कमी पैसे दिले जातात.

अबुधाबी मधे Gigantism नावाचे एका सांस्कृतिक केंद्र उभारण्यात येत आहे. त्यासाठी ८०० मिलियन डॉलर एवढा खर्च त्याला येणार आहे. आणि त्याचा परिसर हा ४,५०,००० स्क्वे.फूट इतका मोठा असणार आहे. या केंद्राच्या बांधकामासाठी भारत, बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ व श्रीलंकेतील स्थलांतरित कामगार काम करत आहे. त्यांना अक्षरशा कामावर जुंपले जात आहे. हे सर्व कामगार अतिशय हलाखीच्या परिस्थितीत राहत आहेत. या कामगारांच्या शोषणाविरोधात मुंबईच्या (चित्र आणि शिल्प) सायना आनंद आणि अशोक सुकुमारन या कलाकारांनी आवाज उठवला आहे. आणि जो सांस्कृतिक हेतू पुढे करुन या इमारतीची निर्मिती

केली जात आहे. मात्र प्रत्यक्षात कामगारांच्या शोषणामुळे त्या पाठीमागचा मूळ हेतूच कुठेतरी हरवून जात आहे.

यातील काही कामगारांना तर भूकमारीची वेळ आली आहें. दुबईला जाण्याचा स्वप्नातच ते कर्जबाजारी झाले आहेत. दुबईत नोकरी करुन पैसे  कमविण्याचे त्यांचे स्वप्न हे स्वप्नवतच राहिले आहे. युनायटेड अमिरात मध्येही स्थलांतरित कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. या कामगारांचे मालक मुकादम आधी त्यांचे पासपोर्टच काढून घेतात. त्यांच्या राहण्याची सोयही अतिशय घाणेरड्या अशा ठिकाणी केली जाते. कामाच्या ठिकाणी पोहचताच त्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येते. व्हीसा साठी जिथे रुपये  २०,०००/- द्यावे लागतात असे कायदा सांगतो. या कामगारांकडून लाखभर रुपये उकळले जातात. या सांस्कृतिक केंद्राच्या कामासाठी एकूण ७५०० कामगार इथे गुंतलेले आहेत. या कामगारांना जसे पैसे कमी दिले जातात त्याचप्रमाणे मालक वा मुकादमाच्या विरुद्ध बोलणाऱ्या कामगारांना वाळवंटातल्या तापत्या उन्हात उभे केले जाते.

दिल्ली येथील लेबर ॲन्ड डेव्हलपमेंट खात्याचे मुख्य अधिकारी परिमल सुधाकर यांनी या बाबतीत बोलताना आपले मत व्यक्त केले की, हा सारा यंत्रणेचा दोष आहे. बहुतेक देशांमध्ये स्थलांतरित कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असते. गल्फ मध्ये ८०% कामगार हे स्थलांतरित असून त्यांना कोणत्याही प्रकारचा हक्क नाही. संबंधित देश किंवा त्या देशातील संबंधित अधिकारी या कामगारांच्या बदल्यात मोठ्या रकमा प्राप्त करतात. यात बिहार उत्तरप्रदेश या राज्याचा समावेश आहे. या राज्यातून मोठ्या प्रमाणावर कामगार हे स्थलांतरित होत असतात. हे सर्व कामगार मध्यस्थांच्या मार्फतच पाठवले जातात. व त्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली जाते.

भारतात INTUC ही एकमेव सर्वात मोठी कामगार संघटना आहे, ही संघटना भारतातील ०.५% एवढ्यात संघटित आणि असंघटित कामगारांच्या संदर्भात विचार करते. २०१० साली सुद्धा सुमारे ९८% भारतीय कामगार हे कुठल्याही संघटनेच्या अधिपत्याखाली नव्हते किंवा या कामगारांचे प्रश्न सोडविणारा कुणीही वाली नाही.

इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस, भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस, इंडियन ट्रेड युनियन, हिंद मजदूर सभा भारतीय मजदूर संघ, या महत्त्वाच्या संघटना अस्तित्वात आहेत पण या संघटनांचे धागेदोरे हे राजकीय लोकांच्या हातात असल्याने याचा फक्त राजकीय फायदा मिळवण्यापुरता या संघटना कार्य करताना दिसतात.

Reasons for migration (during last decade)

Total migrants by last residence (0-9 yrs)... ...... 98.3 million

Reasons

| | |
|---|---|
| Work / Employment | 14.4 million (14.7%) |
| Business | 1.1 million (1.2%) |
| Education | 2.9 million (3.0%) |
| Marriage | 43.1 million (43.8%) |
| Moved after birth | 6.5 million (6.7%) |
| Move with household | 20.6 million (21.0%) |
| Other | 9.5 million (9.7%) |

Data Highlights - Table D1, D2 & D3

Census of India 2001

| Statement 3: Total inter-state migrants by price of birth in major states - INDIA 2001 | | | | |
|---|---|---|---|---|
| **States** | **Total Population** | **Total in-migrants (inter-state & from abroad)** | **% in migrants to total population** | **Share of total migrants.** |
| INDIA | 1,028,610,328 | 48,508,633 | 4.7 | 100.0 |
| Maharashtra | 96,872,627 | 7,954,038 | 8.2 | 16.4 |
| Delhi | 13,850,507 | 5,646,277 | 40.8 | 11.6 |
| West Bengal | 80,176,197 | 5,582,325 | 7.0 | 11.5 |
| Uttar Pradesh | 166,197,921 | 2,972,111 | 1.8 | 6.1 |
| Haryana | 21,144,564 | 2,951,752 | 14.0 | 6.1 |
| Gujrat | 50,671,017 | 2,602,631 | 5.1 | 5.4 |
| Madhya Pradesh | 60,348,023 | 2,305,999 | 3.8 | 4.8 |
| Karnataka | 52,850,562 | 2,152,096 | 4.1 | 4.4 |
| Punjab | 24,358,999 | 2,130,662 | 8.7 | 4.4. |
| Rajasthan | 56,507,188 | 1,845,782 | 3.3 | 3.8 |
| Jharkhand | 26,945,829 | 1,798,037 | 6.7 | 3.7 |
| Bihar | 82,998.509 | 1,794,219 | 2.2 | 3.7 |
| Andhra Pradesh | 76,210,007 | 1,052,165 | 1.4 | 2.2 |
| Chhattisgarh | 20,833,803 | 1.020,337 | 4.9 | 2.1 |
| Rest | 198,638,575 | 6,700,202 | 3.4 | 13.8 |

| **Statement 10 : Migration streams for top ten states for intra-state migration by last residence (duration 0 to 9 years) - INDIA (excludes Union Territories)** | | | | |
|---|---|---|---|---|
| Rank | Rural to Rural | Rural to urban | Urban to rural | Urban to urban |
| 1 | Bihar (3,799,368; 79.9%) | Mizoram (32,555:39.1%) | Goa (48.288;26.7% | TamilNadu (1,001,633:27.4%) |
| 2 | Jharkhand(1,215,941; 75.8%) | Meghalaya (10.823;27.4%) | Kerala (412,772;13.3%) | Mizoram (21,271;25.5%) |
| 3 | Assam (1,127,168; 73.0%) | Nagaland (13,782;26.8%) | Nagaland (6,757; 13.2%) | Goa (33,519;21.9%) |
| 4 | Himachal Pradesh (439,222; 71.8%) | Arunachal Pradesh (31,984; 26.1%) | Sikkim (5,818; 11.8%) | Nagaland (10,447; 20.3%) |
| 5 | Sikkim (35,039; 70.8%) | Gujrat (1,420,541; 25.9%) | Tamil Nadu (420,815; 11.5%) | Maharashtra (2,401,703; 19.2%) |
| 6 | Uttar Pradesh (6,261, 203; 697%) | Tamil Nadu (852,824; 23.3%) | Meghalaya (4,443; 110%) | Punjab (264,685; 15.5%) |
| 7 | Rajasthan (3,285,585; 69.7%) | Haryana (339,483; 21.9%) | Mizoram (7,108; 8.5%) | Karnataka (745,235; 15.3%) |
| 8 | Chhattisgarh (1,360,501; 69.2%) | Maharashtra (2,653,862; 21.2%) | Andhra Pradesh (606,004; 8.4%) | Gujarat (801,593; 14.6%) |
| 9 | Orissa (2,067,885; 67.5%) | Karnataka (1.033,723; 21.2%) | Maharashtra (1,020,0245; 8.2%) | Arunachal Pradesh (15,779; 12.9%) |
| 10 | West Bengal (3,982,608; 66.5%) | Jammu & Kashmir (79,163; 21.1%) | Karnataka (363,542; 7.4%) | Manipur (8,024; 12.5%) |
| Source : Table D2, Census of India 2001 | | | | |

Data Highlights - Table D1, D2 & D3

Census of India 2001

Migration from neighbouring countries

To examine, further, the data on migration based on last residence from neighbouring countries, who in fact constitutes the bulk of the international migration in India, a statement has been

Statement 12: Migrants by last residence from neighbouring countries by duration of residence of residence : INDIA 2001

| Neighbouring Countries | All duration | Less than one year | 1 to 4 yrs | 5 to 9 yrs. | 10 to 19 yrs. | 20 yrs and above | Duration not states |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Total International migration | 5,155,423 | 77,196 | 329,199 | 334,472 | 808,895 | 3,263,184 | 342,477 |
| Total migration from neighbouring countries | 4,918266 | 55,287 | 275,871 | 298,332 | 760,626 | 3,209,550 | 318,600 |
| Afghanistan | 9,194 | 116 | 622 | 4,057 | 3,004 | 885 | 530 |
| Bangladesh | 3,084826 | 12,839 | 95,539 | 171,518 | 535,795 | 2,096,946 | 172,189 |
| Bhutan | 8,337 | 412 | 2,194 | 1,436 | 2,044 | 1,662 | 589 |
| China | 23,721 | 383 | 4,873 | 3,457 | 2,360 | 11,588 | 1,060 |
| Myanmar | 49,086 | 781 | 5,387 | 4,865 | 6,845 | 26,174 | 5,034 |
| Nepal | 596,696 | 36,757 | 137,119 | 89,734 | 128,061 | 160,906 | 44,119 |
| Pakistan | 997,106 | 2,619 | 18,635 | 16,246 | 34,516 | 847,687 | 77,403 |
| Srilanka | 149,300 | 1,380 | 11,502 | 7,019 | 48,001 | 63,722 | 17,676 |

| Migration Profile (Duration 0-9 years) Maharashtra 2001 | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Migrants | Total | | | Rural | | | Urban | | |
| | Persons | Males | Females | Persons | Males | Females | Persons | Males | Females |
| (a) Total Population | 96,878,627 | 50,400,596 | 46478,031 | 55,777,647 | 28,458,677 | 27,318,970 | 41,100,980 | 21,941,919 | 19,159,061 |
| (b) From within the statte | 12,505,916 | 5,029,328 | 7,476,588 | 7,339,414 | 2,585,091 | 4,754,323 | 5,166,502 | 2,444,237 | 2,722,265 |
| (c) Total In-migrants from outside | 3,280,006 | 1,954,810 | 1,325,196 | 669,673 | 359,187 | 310,486 | 2,610,333 | 1,595,623 | 1,014,710 |
| (d) From other states Total | 3,231,612 | 1,922,629 | 1,308,983 | 662,721 | 354,121 | 308,600 | 2,568,891 | 1,568,508 | 1,000,383 |
| Rural | 2,143,586 | 1,331,571 | 812,015 | 537,548 | 284,385 | 253,163 | 1,606,038 | 1,047,186 | 558,852 |
| Urban | 1,021,520 | 553,516 | 468,004 | 113,543 | 63,584 | 49,959 | 907,977 | 489,932 | 418,045 |
| Uttar Pradesh | 921,142 | 639,007 | 282,135 | 64,078 | 47,378 | 16,700 | 857,064 | 591,629 | 265,435 |
| Karnataka | 473,979 | 225,316 | 248,663 | 178,264 | 79,052 | 99,212 | 295,715 | 146,264 | 149,451 |
| Madhya Pradesh | 275,990 | 132,572 | 143,418 | 131,452 | 59,938 | 71,514 | 144,538 | 72,634 | 71,904 |
| Gujarat | 245,968 | 113,930 | 132,038 | 40,217 | 17,570 | 22,647 | 205,751 | 96,360 | 109,391 |
| Bihar | 228,583 | 178,025 | 50,538 | 31,243 | 25,295 | 5,948 | 197,320 | 152,730 | 44,590 |
| Andhra Pradesh | 193,813 | 95,304 | 98,509 | 51,475 | 23,767 | 27,708 | 142,338 | 71,537 | 70,801 |
| Rest | 892,157 | 538,475 | 353,682 | 165,992 | 101,121 | 64,871 | 726,165 | 437,354 | 288,811 |
| (e) From other Countries | 48,394 | 32,181 | 16,213 | 6,952 | 5,066 | 1,886 | 41,442 | 27,115 | 14,327 |
| (f) Total Out Migrants | 896,988 | 393,097 | 503,891 | 450,300 | 186,586 | 263,714 | 423,641 | 198,524 | 230,117 |
| (g) Net migrants (+/-) (Item(d)-(f) | 2,383,018 | 1,561,713 | 821,305 | 219,373 | 172,601 | 46,772 | 2,181,692 | 1,397,099 | 784,593 |

## १.४ भारतातील संघटित व असंघटित कामगार :

भारताच्या आजच्या लोकसंख्येच्या अंदाजे १,०३७ बिलीयन एवढे श्रमिक धरले तर जे कामगार म्हणून ओळखले जातात ते सुमारे ३८.८६% एवढे आहेत. यात दरवर्षी ८ ते ९ मिलियन एवढ्या लोकांची वाढ होताना दिसून येत आहे.

एकूण ४०३ मिलियन एवढी कामगार क्षमता आहे. त्यापैकी २७.८ मिलियन कामगार हे संघटित क्षेत्रात काम करत आहेत. १० ते १२% कामगार हे कायम स्वरूपाच्या तत्त्वावर काम करत आहेत.

संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कायमस्वरूपी नोकरीची हमी व आर्थिक स्थैर्य असते. त्यांना सेवाकाळात हक्काची रजा, प्रॉव्हिडंट फंड इतर सुविधाही उपलब्ध होतात. त्यांना कायद्याचे संरक्षण त्यांच्या हक्काची पायमल्ली होत नाही. नोकरी पश्चात ही त्यांना पेन्शन उपलब्ध असते. एकूणच संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आर्थिक स्थैर्य व सामाजिक सुरक्षितता असते. त्यामुळे समाजात त्यांना मानाचे स्थान असते.

याउलट असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार हे प्रामुख्याने अशिक्षित गरीब व स्थलांतरित असतात. आणि त्यांना कुठल्याही प्रकारच्या नोकरीची हमी नसते. अत्यंत कमी मोबदल्यात त्यांना काम करावे लागते. अत्यंत कमी वेतन व कुठल्याही प्रकारच्या सोई–सुविधा त्यांना पुरविल्या जात नाही. परिस्थिती, गरीबी व बेरोजगारीमुळे ते आहे त्या परिस्थितीशी समायोजन करून घेतात. या क्षेत्रात या कामगारांचे सर्वच बाबतीत आर्थिक, मानसिक व सामाजिक शोषण होतानाही दिसून येते. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांसाठी कोणत्याही प्रकारच्या कायद्याचे पालन केले जात नाही. अत्यंत दयनीय अशा अवस्थेत हे लोक काम करताना दिसत आहेत.

या असंघटित क्षेत्राचे काही महत्त्वाचे पैलु आहेत. या क्षेत्रात काम करण्यासाठी कुणालाही केव्हाही प्रवेश मिळू शकतो. आणि त्याला या क्षेत्रात कुठले ना कुठले काम मिळू शकते आणि त्याला अर्थाजन करता येऊ शकते. इथे मालक आणि कामगार यांच्यातील चांगले सहसंबंध असतीलच असे नाही. यात अगदी रस्त्यावर विक्री करणारे फेरीवाले, बुटपॉलिश करणारे, कचरा गोळा करणारे ते अगदी घरात काम करणारे वेठबिगार कामगार. तसेच लघुउद्योगात काम करणारे कामगार किंवा एखाद्या विशिष्ट प्रकारचे उत्पादन करणाऱ्या छोट्या कंपन्या. या इथे काम करणाऱ्या कामगारांना कामाची हमीही नसते. कामाचे तासही निश्चित नसतात. त्यांना कुठल्याही प्रकारचे

फायदे मिळत नाहीत. किंवा त्यांच्या भविष्याची कुठल्याही प्रकारची तरतूद नसते. या उलट संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे कामाचे ठिकाण हे निश्चित कामाचे तासही निश्चित असतात. आणि इतरही सोईसुविधा आणि फायदेही त्यांना मिळत असतात.

## असंघटित क्षेत्र ही संकल्पना :

(informal income oppotunities and URban employmant in Ghana.)

ब्रिटिश मानववंशशास्त्रज्ञ (किथ हार्ट)

keith Hart यांनी सर्वप्रथम वापरली. या संकल्पनेचे ते जनक आहेत. नागरी भागातील रोजगारात आणि नागरी भागातील लोकांच्या सामाजिक आर्थिक सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणात ही संकल्पना वापरली आणि त्यानंतरच असंघटित क्षेत्रातील काम करणाऱ्या लोकांचा अभ्यास हा फक्त अर्थशास्त्रापुरता मर्यादित राहिला नाही तर समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि नागरी विकास योजनेतही या विषयीचा अभ्यास होऊ लागला.

''ज्या क्षेत्रात कसाबसा जीवन चरितार्थ किंवा उदरनिर्वाहासाठी जे संघर्ष करतात त्या क्षेत्राला उद्देशून सुरुवातीला अनौपचारिक क्षेत्र ही संकल्पना वापरली गेली. १९६९ मधे 'बोक' यांनी सर्वेक्षणात ती उपयोगात आणली.

Dictorary of Sociology यात त्याचा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. मोठ्या प्रमाणावरील उत्पादकता आणि मिळकत यातील फरकावर लक्ष केंद्रित करतात.

संघटित क्षेत्रात नोकरीचे स्थैर्य, उच्चवेतन, अत्युच्च कौशल्य पातळी, आधुनिक तंत्रज्ञान संघटनेचे प्राबल्य आणि सामाजिक सुरक्षितता या गोष्टी येतात.

मात्र असंघटित क्षेत्रात या सर्वच गोष्टींची उणीव असते. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कुठल्याही प्रकारचे स्थैर्य किंवा सामाजिक सुरक्षितता उपलब्ध होत नाही.

वेतनाधारित श्रम या अर्थाने औपचारिक ही संकल्पना एक व्यक्ती संचलित उद्योग, छोटे व्यावसायिक भांडवलाची आवश्यकता आणि काम करणाऱ्या व्यक्ती या व्यवसायात काम करणारे कामगार हे अकुशल किंवा अर्धकुशल असतात. व्यावसायिक शिक्षण फारसे झालेले नसते. या क्षेत्रातील कामगार असंघटित असतात. त्यामुळे मालकांकडून त्यांच्या मागण्या मान्य होतीलच असे नाही.

१९९१ च्या कालावधीत जेव्हा उदारीकरणाचे वारे वाहू लागले. तेव्हा कामगारांच्या मागणीला वाढ झाली आणि त्यामुळे भारतातल्या भारतात कामगारांच्या स्थलांतराचे प्रमाणही वाढले. या स्थलांतरित असंघटित कामागारांना प्रामुख्याने मोठमोठाले गृहप्रकल्प, छोटे लघुउद्योग, मासेमारी, सूतगिरण्या, छोटे लघुउद्योग, शेतमजूर म्हणूनही हे लोक काम करत असतात. काम मीठ उत्पादन आणि जहाज तोडणीच्या व्यवसायात सुमारे ९८% कामगार हे स्थलांतरित व असंघटित असल्याचे दिसून आले आहे.

२००२ साली इंडियन लेबर ऑरगानायझेशन यांनी केलेल्या अभ्यासानुसार असंघटित क्षेत्रात जरी पैसा कमी असला तरी पुरुषांपेक्षा स्त्रियांचे यात वर्चस्व अधिक आहे. तरीही यातही पुरुषांपेक्षा स्त्रियांचा दर्जा हा खालचाच असलेला दिसून येत आहे. पुरुष कामगार या कामात व्यस्त असतात तर महिला या प्रामुख्याने खाद्य पदार्थात गुंतलेल्या असतात. या क्षेत्रातही स्त्री–पुरुष असमानता दिसून येते. असंघटित क्षेत्रातील रोजगारात नेहमीच चढ–उतार दिसून येतो. त्याचा परिणामही कामगारांना भोगावा लागतो.

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना खूप कमी वेतन मिळते. आणि ते वेतनही त्यांना नियमित मिळतेच असे नाही. त्यांच्या कामाचीही कुठल्याही प्रकारची शाश्वती नसते. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांमधे महिलांचा वाटाही खूप मोठा आहे. या क्षेत्रात निश्चित व कायमस्वरूपी काम मिळतेच असे जरी नसले तरी यातून हे कामगार आपली उपजीविका करू शकतील एवढे पैसे त्यांना मिळतात. विकसनशील देशात ६०% महिला या असंघटित क्षेत्रात काम करत आहेत. काही महिला या सेवा कार्यात गुंतलेल्या आहेत. (त्यात घर, लहानमुले यांची देखभाल) काही महिला रस्त्यावर विक्रेत्यांचे काम करतात. झारखंड मधील महिला या बांबूच्या काड्यापासून तयार केलेल्या वस्तू विकून आपला चरितार्थ चालवतात. बांगला देशातील गरीबी संदर्भात जो २०११ मधे अभ्यास करण्यात आला त्यात सांस्कृतिक धार्मिक आणि अशिक्षित या गोष्टीबरोबरच स्वत:च्या कुटुंबासोबत असलेली बांधिलकी याचाही विचार केला गेला आहे.

२०१४ मधे WIEGO यांनी ज्या ज्या ठिकाणी असंघटित क्षेत्रातील कामे कार्यान्वित आहेत. त्या ठिकाणी इथे काम करणाऱ्या कामगारांना सर्व सोईसुविधा मिळतील. अशा पद्धतीची रचनात्मक सुधारणा करावी. त्यात पाणी, शौचायल, रस्त्यावरील दिवे, अखंड वीज, पुरवठा आणि त्यांच्या राहण्याची योग्य सोय केली गेली पाहिजे. त्याच प्रमाणे त्यांच्या हक्काचाही योग्य आदर केला गेला

पाहिजे आणि त्यांच्या स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षिततेबद्दलही योग्य ती पाऊले उचलली गेली पाहिजेत.

असंघटित क्षेत्र हे भारतातील ९०% लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देते. असंघटित क्षेत्रातील कामगार हे गरिबी आणि उपासमारी टाळण्यासाठीच स्थलांतरित होतात. शहरात आणि ग्रामीण भागात जो काही रोजगार दिला जातो. त्यात काही विशेष असा फरक आढळून येत नाही.

## १.५ जगातील भारतातील व गुजराथमधील महत्त्वाची बंदरे

**प्रस्तावना**:– व्यापार वृद्धीच्या दृष्टीने जेव्हा आपण दळणवळणाच्या बाबतीत सागरी वाहतूकीचा विचार करतो तेव्हा भारताला लाभलेला प्रचंड सागरी किनारा व त्यावरील महत्त्वाच्या बंदरातून होणारी आयात निर्यातही लक्षणीय आहे. सुरुवातीला आपण जगातील महत्त्वाची दहा बंदरे पाहू त्यानंतर भारतातील महत्त्वाची बंदरे व गुजराथ राज्यातील महत्त्वाच्या बंदराविषयी माहिती घेऊ. जगातील एकूण दहा महत्त्वाच्या बंदराचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की त्यापैकी सात महत्त्वाची बंदरे ही एकट्या चीनमधे आहेत.

(१) शांघाय, (२) निगोबो ओसूचान, (३) तीनांजीन (४) हाँगकाँग (५) क्वींगहागडो (६) रोटरडॅम क्वीगडो (चायना) (७) गुआनजाऊ (चायना) (८) रोडरडॅम (नीदरलँड) (९) बुआन (साऊथ कोरिया) (१०) सिंगापूर.

## भारतातील महत्त्वाची बंदरे

भारताला एकूण ७५१६ कि. मी. लांबीचा मोठा सागरी किनारा लाभलेला आहे. तो जगातील सर्वात मोठा असा सागरी किनारा म्हणता येईल. या किनारपट्टीवर १३ मोठी महत्त्वाची बंदरे असून १८७ लहान व काही एकमेकांना जोडणारी बंदरे लाभलेली आहेत. महत्त्वाच्या बंदराचे व्यवस्थापन हे केंद्राकडून करण्यात येते. तर लहान बंदराचे व्यवस्थापन त्या त्या राज्याकडून बघितले जाते. बंदराचा विकास हा पब्लिक आणि प्रायव्हेट अशा संयुक्त विद्यमाने करण्यात येतो. २०१४–१५ व पुढील आर्थिक वर्षात व्यवसाय वृद्धीसाठी अनेक उपाययोजना आखलेल्या आहेत. भारतातील कंटेनरचा व्यवसाय हा मुंबईच्या न्हावाशिवा बंदरातून आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातून केला जातो.

७ शीपयार्ड हे केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. २ शीपयार्ड हे राज्यसरकार पहात आहे. २९ बंदराचा व्यवहार हा खाजगी व्यवस्थापनाद्वारे पाहण्यात येतो. १९९० सालापासून सागरी मालवाहतूक भरभराटीला आलेली आहे. विशाखापट्टणम, कोची, कोलकत्ता, चेन्नई आणि कांडला या बंदराचा व्यवसाय अतिशय उल्लेखनीय आहे.

राजीव गांधी टर्मिनल, कोचिन, आणि वालारपट्टनम, टर्मिनल यावर ३२००, कोटी रुपये खर्च करून तीन टप्प्यांमध्ये त्याचा विकास करण्यात येणार असून दक्षिण भारत व सिंगापूर येथील व्यापाराची आदान प्रदान करण्यासाठी ही योजना खूप महत्त्वाकांक्षी ठरणार आहे.

सन २००० मधे (उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे १०२ कंपन्या कार्यान्वित होत्या. या कंपन्यावर शीपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्फत देखरेख ठेवली जाते. या संस्थेकडे स्वतःची अशी ६३९ जहाजे असून त्यात ९१ ऑईल टँकर, ७९ कोरडा माल वाहणारी जहाजे आणि १० रेग्युलर कंटेनर आहेत.

सौराष्ट्रातील पीपावाव हे बंदर एटीएम च्या टर्मिनलच्या माध्यमातून चालवले जाते. त्याचा विकासही AFCINS ने केला आहे.

ओरिसातील धर्मा नावोच बंदर नुकतेच सुरू झाले असून ५ नव्या बंदराची निर्मिती करण्यात येणार आहे.

**भारतीय सागरी किनाऱ्यावर असलेली महत्त्वाची बंदरे**

(१) जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट नवी मुंबई महाराष्ट्र

(२) कोचिन– केरला.

(३) कोलंबो– श्रीलंका

(४) पोर्ट ऑफ चेन्नई– तामिळनाडू

(५) हाल्दिया– पश्चिम बंगाल

(६) काकीनाडा– आंध्रप्रदेश

(७) कृष्णपट्टनम– आंध्रप्रदेश

(८) कांडला – गुजराथ

(९) मुद्रा– गुजराथ

(१०) मंगलोर– कर्नाटका

(११) मच्छलीपटनम– आंध्रप्रदेश

(१२) पोर्ट ऑफ मुंबई– महाराष्ट्र

(१३) प्रदीप– ओरिसा

(१४) विशाखापट्टणम्– आंध्रप्रदेश

(१५) पोर्ट ऑफ कोलकत्ता–पश्चिम बंगाल

(१६) तूतिकोरिन–तामीळनाडू

## गुजराथ राज्यातील महत्त्वाची बंदरे :

भारत देशाच्या सागरी किनाऱ्यावरील राज्यामधे गुजराथ राज्याला १६०० कि.मी. एवढा मोठा सागरी किनारा लाभलेला आहे. कांडला आणि मुद्रा ही गुजराथमधील महत्त्वाची मोठी बंदरे असून एकूण ४२ बंदरे गुजराथ राज्याला लाभलेली आहेत. या बंदराचा विकास व उत्पादनवाढीसाठी गुजराथ सरकारने ५.४.१९८२ रोजी एक स्वायंत संस्था म्हणून गुजराथ मेरी टाईम बोर्डाची स्थापना केली. आणि या सर्व बंदराचे अधिपत्य गुजराथ मेरी टाईम बोर्ड करते. भौगोलिक आणि नैसर्गिक वैविध्यता लाभलेल्या काही गोष्टींमुळे आज इथे बंदराचा विकास करणे खूप सोईचे ठरत आहे. याच गुजराथ राज्यात अलंग आणि साचना ही क्षेत्र जहाज तोडणी केंद्र असून अलंग ने आज जागतिक स्थान प्राप्त केले आहे.

ज्याप्रमाणे या सर्व बंदरामधून मोठ्या प्रमाणात मालाचे आदान प्रदान होते त्याचप्रमाणे जगातील व भारतातील निकामी झालेल्या बोटींचे/जहाजांचे विघटन केले जाते. भारतात अलंग हे एकमेव अत्यंत महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र विकसित झाले आहे. या व्यवसायातून सुद्धा सरकारला मोठ्या प्रमाणात कर उपलब्ध होत आहे. फक्त भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील निकामी झालेली जहाजे अलंग इथे दाखल होतात. त्यासाठी जगातील व भारतातल्या महत्त्वाच्या जहाज तोडणी केंद्राचा (Shipyard) चा आढावाही घेतला आहे.

## १.६ अलंग गावाचा इतिहास :

अलंग हे गाव मनारी नदीच्या तिरावर बसलेले एक छोटे गाव. अलंग आणि मणार ही दोन्ही गावे याच नदीच्या किनाऱ्यावर एकमेकांसमोर वसलेली आहेत. गोहिल राज्याच्या राजवटीत अलंग गावाची निर्मिती झालेली दिसून येत आहे. त्या काळी हे गाव 'हवालगढ' या नावाने ओळखले जात होते. त्या काळात राजपूत लोकही इथे वास्तव्याला होते. मात्र त्यांनी तिथून वेगळे होऊन

राहण्याचे ठरविले तेव्हापासून मणार आणि अलंग ही गावे झाली तेव्हापासून अलंग हे गाव नावारूपाला आले.

अलंग हे गाव समुद्रकिनाऱ्यापासून खूप जवळ असल्याने ते एकेकाळी समुद्रावरील चाचे लोकांचे महत्त्वाचे केंद्र होते. 'मीरात ए अहमदी' या पुस्तकात अलंग गावाचा उल्लेख सौराष्ट्राचे प्रवेशद्वार असा केलेला आढळतो. 'नाना गोपनाथाचे' एक अतिशय प्रसिद्ध असे देऊळ असून तेथील शिवलिंगाची स्थापना परशुरामांनी केल्याची आख्यायिका आहे. मणार पासून एक किलोमीटरवर समुद्रकिनारी हे मंदिर आहे आणि इथे खूप लोक श्रद्धेने येतात. मनारी नदीच्या काठी वसलेले हे एक छोटे गाव समुद्रकिनाऱ्यापासून सात किलोमीटर अंतरावर आहे. इथली काळी आणि सूपीक माती त्यामुळे शेती आणि मासेमारी हे दोनच व्यवसाय प्रामुख्याने होते. याच अलंग गावी आज जगातील एक महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र नावारुपाला आलेले आहे. अलंग हे गाव भावनगर पासून ५० कि.मी. अंतरावर असून रेल्वे व महामार्गाने व्यवस्थितरित्या जोडलेले आहे. अलंग हे गाव तळाजा तालुक्यात येते.

अलंगच्या परिसरात मुख्य दहा गावांचा समावेश आहे. त्यात अलंग, सोसिया, मनार, सथारा, रूधवा, भारापरा, मथावडा, चोपडा, जसपारा आणि मांडवा ही गावे आहेत. अलंग आणि अलंग परिसरातील गावात प्रामुख्याने क्षत्रिय, राजपूत, कोळी, पालेवाल (ब्राह्मण) आणि जातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. आज शीप ब्रेकींग यार्डमुळे येथील गावाचाही चेहरा मोहरा बदलला आहे. आज अलंग गावातही शाळा, बँक पोलीस ठाणे त्याचप्रमाणे दोन उत्कृष्ट हॉटेल्स सुद्धा आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार तेथील लोकसंख्या ही १८४६४ होती ती आज चौपट झालेली आहे. शीप ब्रेकींग यार्डपुर्वी हे लोक प्रामुख्याने शेती, जनावरे पाळणे, मासेमारी, जाळी तयार करणे बोटी बांधणे, अशी कामे करत होती. आज यार्डच्या निर्मितीनंतर हे लोक जहाजातील विविध वस्तू विकतात. वस्तू विक्रीचे स्टॉल अलंग गावात प्रवेश करतानाच लागतात. या स्टॉल्सना हे लोक खाडा म्हणतात. यात खारक आणि पालेवाल जातीच्या लोकांचे वर्चस्व आहे. क्षत्रिय लोक प्रामुख्याने वाहतूक व्यवसायात गुंतलेले आहेत.

याच गावाजवळ मीठीवर्धी हा पॉवर प्लॅन्ट निर्मितीचा प्रकल्प सुरू होत आहे. परंतू येथील स्थानिक लोकांचा त्याला मोठा विरोध आहे. कारण ज्या जमिनीवर हा प्लॅन्ट उभारला जात आहे तिथे

मोठ्या प्रमाणावर इथल्या सुप्रसिद्ध केसर आंब्याचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे स्थानिक लोकांचा विरोध आहे.




**त्रातज भावनगर महामार्गावरील अलंग शीपयार्डाकडे प्रवेश करताना**




**अलंग शीपयार्डातील सर्वसामान्यांचे वाहतुकीचे साधन**

## १.७ अलंग–सोसिओ–रिसायकलींग शीपयार्डाची निर्मिती

१९७८ साली एक उद्योग म्हणून जहाज तोडणी व्यवसायाला मान्यता देण्यात आली. 'दी मेटल ट्रेड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' या भारतीय सरकारी कंपनीने परदेशातील निकामी जहाजे आयात करण्यास सुरुवात केली आणि जहाज तोडणी व्यवसायाच्या विकासासाठी निधी उभारण्याचे ठरविण्यात आले.




**अलंग शीप रिसायकलींग यार्डाचे प्रवेशद्वार**

सप्टेंबर १९८१ साली जहाज तोडणी करणारे व्यवसायिक आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने सौराष्ट्रातील विविध सागरी किनाऱ्यांचा अभ्यास दौरा केला. व शेवटी सागरी किनाऱ्यावर वसलेल्या अलंग या गावाची निवड करण्यात आली. अलंग गावाची निवड करण्यापाठीमागचा हेतू हाच होता की अलंग गावाला (गळ्यातील हाराप्रमाणे Neckless type) लाभलेला किनारा. इथे समुद्रात भरतीच्या वेळी उंच लाटा आल्या तरी सागरी किनाऱ्यापासून अलंग गाव आतील बाजूस असल्याने त्याला आपोआपच नैसर्गिक सुरक्षितता लाभल्याने हा किनारा अतिशय स्थिर आहे व भरतीच्या वेळी बोटी आत खेचून घेणे व तोडण्याचे कामही व्यवस्थितरित्या करता येते. जहाज किनाऱ्यावर आणणे व जहाज तोडणी या दोन्ही गोष्टी अतिशय

पूरक ठरत असल्यामुळे अलंग या गावाचीच निवड करण्यात आली आहे. या उद्योगाच्या विकासासाठी सुरुवातीचा निघी म्हणून २५० कोटी रुपये देण्यात आले.

१३ फेब्रुवारी १९८३ रोजी अलंग येथे MVKOTA TENJONG हे पहिले निकामी जहाज बंदरात दाखल झाले. अलंग–सोसियो ही दोन्ही ठिकाणे जहाज तोडणीसाठी सज्ज झाली दोन्ही गावांचा मिळून १५ कि. मी. परिसरात सुमारे १६० प्लॉटस आज जहाज तोडणीच्या कामात व्यस्त आहेत.

## १.८ जगातील व भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्र (Shipyards)

२० व्या शतकात जहाज तोडण्याचा व्यवसाय हा प्रामुख्याने विकसित देशातच अस्तित्वात होता. परंतु आता मात्र विकसनशील देशात जहाज तोडणीचे काम होताना दिसत आहे.

**जगातील महत्त्वाचे (Shipyards) जहाज तोडणी केंद्र**

१) भारत– अलंग

२) पाकिस्तान– गडानी

३) बांग्लादेश– चितगाव

४) तुर्की– अलीआगा

५) चीन– चांगीजंग व जीयानजींग

### भारतातील महत्त्वाचे (Shipyards) जहाज तोडणी केंद्र

१) भारतात– अलंग व साचना (गुजराथ)

२) दारूखाना– मुंबई (महाराष्ट्र)

३) ताद्री व मॅपे (कर्नाटका)

४) बेपोरे (केरला)

५) विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश)

६) वेलिकोन व तुतिकोरिन– (तामीळनाडू)

भारतात इतरत्र जरी ही जहाज तोडणी केंद्र असली तरी सुद्धा अलंग हे सर्वात महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र म्हणून ओळखले जाते.

## गडानी शीप ब्रेकींग यार्ड : (पाकिस्तान)

पाकिस्तानातील गडानी येथे जगातील महत्त्वाचे  असे तिसऱ्या नंबरचे जहाज तोडणी केंद्र अस्तित्वात आहे. १९८० मध्ये गडानी हे जगातील एक अत्यंत महत्त्वाचे असे जहाज तोडणी केंद्र म्हणून ओळखले जात होते. त्यावेळेला तिथे ३० हजार कामगार काम करत होते. जेव्हा पासून अलंग आणि बांगला देशातील चितगांव जहाज तोडणी केंद्र कार्यान्वित झाली तेव्हापासून या जहाज तोडणीपासून केंद्रावर  स्पर्धेमुळे फरक पडला आहे.

२००९ –२010 साली इथे १०७ जहाज तोडण्यात आली १ मिलियन टन एवढे स्टीलचे उत्पादन दरवर्षी मिळत असे.

सध्या१२५ जहाजे तोडण्याची क्षमता आहे. आणि सर्वांचे मिळून १,000,000 टन एवढे आहे. परंतु कामाच्या स्फुर्ती बाबत याचा नंबर  अव्वल आहे. गडानी येथे ३५00 एलटीडी टनाचे जहाज ३0 ते ४५ दिवसात तोडले जाते. तर अलंग आणि बांगला देश येथे एवढ्याच क्षमतेच्या जहाजाला तोडायला सहा महिने लागतात. इथेही कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते. ते दिवसाला ४ डॉलर मिळवतात.

१९४७ साल स्वातंत्र्य मिळाल्यावर या उद्योगाला सुरुवात झाली. परंतु म्हणावी तशी अद्यावत यंत्रणा आजही इथे उपलब्ध नाही. यार्डात रस्तेही बरोबर नाही. कामगारांच्या सुरक्षिततेविषयी वा त्यांच्या औषधोपचारसाठी सुरक्षिततेविषयी वा त्यांच्या औषधोपचारासाठी कुठलीही यंत्रणा अस्तित्वात नाही. १९६९ ते १९८३ हा काळ या उद्योगधंद्यासाठी सुवर्णयुग होता असे म्हटले जाते.

पाकिस्तान सरकारने या उद्योगावरील १५% ड्युटीवरुन १0% ड्युटी केली. आणि या उद्योगाला भरभराटी मिळेल यासाठी प्रयत्न केले. आज इथे, एकूण ६000 कामगार काम करत आहेत.

## चितगांव शीप ब्रेकींग यार्ड : (बांगला देश)

चितगांव शीप ब्रेकींग यार्ड हे फौजादरहात इथे १८ कि.मी. परीसरात व्यापलेले असून हे सीताकूंड येथील समूद्र किनारी २0 कि.मी. अंतरावर बसलेले आहे.

१९६० साली मोठ्या त्सुनामी नंतर एक ग्रीक जहाज M.D. Alpine हे सीता कुंडच्या किनारी पोहचले. परंतु १९६५ पर्यंत हे जहाज तोडता आले नाही. १९६५ साली मात्र चितगांव स्टील हाऊस ने हे जहाज ताब्यात घेतले. आणि या जहाजाची तोडणी करण्यात आली. त्याला बऱ्याच वर्षांचा कालावधी लागला परंतु या गोष्टीमुळेच चितगांव शीप ब्रेकींग यार्डाचा उदय झाला.

१९८० ते १९९० च्या काळात येथील कामाने वेग घेतला, चितगांव शीपयार्डाचा नंबर जगात दुसऱ्या स्थानावर आहे. २०१२ मध्ये या शीपयार्डाची स्थिती थोडी कमकुवत झाली. वास्तविक एके काळी हे शीपयार्ड पर्यटकांचे आकर्षण ठरले होते. परंतु सुरक्षेच्या बाबतीत कुठल्याही उपाययोजना नसल्याने इथे कोणी येत नव्हते. तसेच आठवड्याला एका तरी कामगाराचा इथे मृत्यू होत असे. त्यामुळे या शीपयार्डातबद्दल एवढा चांगला नावलौकिकही नव्हता. कामगारांना कुठल्याही प्रकारची सुरक्षितता नव्हती की पैशाचे पाठबळ होते.

## जीआनजींग शीप यार्ड : (चीन)

वार्षिक उत्पादन – 1,800,0000 tones. Types of Recycling leading A 1/ flot certification - ISO 9001, ISO - D14000, OHAAS - 18001.

आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेल्या पट्ट्यामध्ये चीनमध्ये जीआनजींग हे शीपयार्ड अस्तित्वात आहे. इथे सर्व प्रकारच्या दळणवळणाच्या सोई उपलब्ध आहेत. १९९८ साली या शीपयार्डाचा उदय झाला. 1,500,000 sqm. एवढ्या मोठ्या परिसरात हा शीपयार्ड असून 8000 s.q.meter बांधकाम असलेला हा शीपयार्ड आहे. इथे 1200 कामगार काम करतात. त्यापैकी 280 कामगार हे व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाशी कार्यान्वित आहेत. एका वेळी इथे 11 जहाजे तोडण्यात येतात. अशी अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित आहे. चीन मधले हे सर्वात मोठे जहाज तोडणी केंद्र आहे. आणि पर्यावरणाचे सर्व कायद्याचे तंतोतंत पालन करणारे यार्ड आहे. ते आंतरराष्ट्रीय शीप रिसायकलींग असोसिएशनचे सदस्य आहेत. नेदरलँड, जर्मनी डेन्मार्क, यु.एस., यु.के., फ्रान्स, जपान, कोरिया आणि हाँगकाँग येथील जहाज मालकांसोबत त्यांनी आपले संबंध सुधारलेले आहेत. या रीतीने देशातील आणि देशाबाहेरील लोकांबरोबर सहसंबंध सुधारुन या व्यवसायाला उज्वल भवितव्य देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

## १.९ अलंग शीपयार्डातील स्थलांतरीत कामगार :

अलंग रिसायकलींग शीपयार्डात प्रामुख्याने स्थलांतरीत कामगार काम करत आहेत. हे कामगार उत्तरप्रदेश, प.बंगाल, बिहार, झारखंड ओरिसा या प्रमुख राज्यातले आहेत. इतर राज्यातील कामगारांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या एकूण कामगारांची संख्या ही ३० हजारांच्या घरात आहे. कामगारांमध्ये ९०% कामगार हे पुरुष आहेत. ते २० ते ५० या वयोगटातील आहेत. या स्थलांतरीत कामगारांचे आर्थिक मानसिक व शारीरिक स्तरावर मोठ्या प्रमाणात शोषण होताना दिसून येत आहे.

पर्यावरणात सातत्याने होत जाणारे बदल, शेतीला उपलब्ध न होणारे पाणी व रोजगारीचे कुठलेच साधन उपलब्ध नसल्याने हे कामगार आपल्या मूळ वतनापासून स्थलांतरित होऊन इथे कामाला येत आहेत. गरिबी व बेरोजगारी हेच स्थलांतरापाठीमागचे प्रमुख कारण आहे. या कामगारांचे जीवन अतिशय धकाधकीचे अस्थिर अनिश्चित व अनारोग्याकारक आहे. मालक–कामगारांचे संबंध म्हणावेत तसे निकोप नाहीत. अतिशय जोखीम असलेली कामे या लोकांच्या वाट्याला येतात. हे कामगार बाटलीवाला, मालपाणी, जोडीवाला, गॅसकटर, हेल्पर अशा अस्थायी स्वरुपाची कामे करतात. प्रतवारी प्रमाणे १५० ते ४५० रुपयांची मजूरी दिली जाते. महिन्याचा पगार एकदम दिला जातो पण पैसे केव्हा मिळतील याची शाश्वती नाही.

## १.१० गुजराथ मेरी टाईम बोर्ड :

या निमसरकारी संस्थेमार्फत अलंग रिसायकलींग शीपयार्डाचा कारभार सांभाळला जातो. गुजराथ मेरीटाईम बोर्डातर्फे शीपब्रेकर्स व्यावसायिकांना प्लॉटचे वाटप करणे. शेड वीज पाणीपूरवठा या सुविधा पुरविणे. संस्थेमार्फत या स्थलांतरित कामगारांना जहाज तोडणी कामासंदर्भातले व सुरक्षिततेच्या संदर्भातले प्रशिक्षण दिले जाते. प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावरच हे कामगार जहाज तोडणीच्या कामासाठी योग्य ठरतात. १९९० सालापूर्वी ही संस्थाच सुरुवातीला निकामी जहाजांची खरेदी करून ती उद्योजकांना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर विकत असे. १९९० नंतर खुल्या जागतिकीकरणामुळे जहाज तोडणी करणारे व्यावसायिक स्वत:च जहाजांची खरेदी करू लागले. या बोर्डामार्फतच शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांनाही काही मूलभूत सेवा देण्यासाठी काही योजना आखण्यात आल्या आहेत. अलंग शीपयार्डाला जागतिक केंद्राचा दर्जा देण्यासाठी जपान आणि गुजराथ सरकार या दोघांमधे एक समझोता करार करण्यात आला आहे.

अलंग येथील जहाज तोडणी केंद्रातून गुजराथ सरकारला मोठ्या प्रमाणावर कर उपलब्ध होत आहे. या व्यवसायाची वार्षिक उलाढाल ही २५ बिलीयन एवढी असून त्यातील ७ बिलीयन एवढे उत्पन्न हे गुजराथ मेरीटाईम बोर्डाला मिळते.

## १.११ अलंग शीप ब्रेकर्स असोसिएशन :

जहाज तोडणी उद्योगाची भरभराट व्हावी या हेतूने या संस्थेची स्थापना करण्यात आली. २८ ऑगस्ट १९८३ रोजी श्री. आर. एल. कलाथिया यांनी या संस्थेची स्थापना केली. जी आज शीप ब्रेकर्स असोसिएशन या नावाने ओळखली जात आहे. श्री. आर. एल. कथालिया हे एकमेव संस्थापक सदस्य असून त्यांनी फक्त संघटनेतील सदस्याच्या उत्कर्षाचा विचार केला नाही तर या उद्योगाला जागतिक दर्जा प्राप्त व्हावा अलंग शीपयार्ड संपूर्ण जगात महत्त्वाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी ते सदैव प्रयत्नशील होते.

शीप ब्रेकर्स असोसिएशनचे श्री. जीवराज पटेल हे अध्यक्ष असून त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाखाली नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शीपयार्डाचे वातावरण कसे प्रदुषणमुक्त आणि सुरक्षित राहिल याकडे त्यांचे विशेष लक्ष आहे. भविष्यात अलंग शीपयार्ड हे एकमेव सर्वात मोठे आणि सुरक्षित असे शीपयार्ड ओळखले जाईल असे जीवराज पटेल यांचे स्वप्न आहे.

अलंग येथे सुमारे १८० प्लॉटस् असून यातल्या फक्त चार प्लॉटस्चा उल्लेख करावा लागेल. त्यात लीला शीप रिसायकलींग, प्रिया ब्लू इंडस्ट्रीज, कलथीया, शीप ब्रेकर्स आणि श्रीराम व्हेसल स्कॅपींग या चार कंपन्यांनी प्रदुषणासंदर्भातील जे नियम आखून दिलेले आहेत. त्याच्या जवळपास या चार कंपन्या पोहचलेल्या आहेत.

या चारही प्लॉटस मधे सर्व प्रकारच्या योग्य त्या सोईसुविधा करून घेतलेल्या आहेत. ड्रेनेज पाण्याचे पंप, अवजड आणि निकामी कचऱ्याचे योग्य रितीने निर्मूलन करणे त्यांच्या कामगारांना योग्य रितीचे सुरक्षित कपडे, साधने व इतर सुविधाही पुरविल्या आहेत. जहाज बांधणी नियमनाचे संचालक (External Trada orgnization) यांच्या मते या चार कंपन्या नियमानुसार कार्य करत आहेत.

कारण निकामी जहाजातून मिळणारे ॲसबेस्टॉस हे सुद्धा जवळच्या बाजारात विकताना दिसून येत आहे. वास्तविकता गुजराथ मेरी टाईम बोर्डाने यात विशेष लक्ष घालण्याची गरज आहे. या

ॲसबेस्टॉस मुळे फक्त इथे यार्डात काम करणाऱ्या कामगारांवरच विपरित परिणाम होतो असे नाही तर त्याचा आजूबाजूच्या राहणाऱ्या लोकांवरही त्रास होतो.

क्रेनची योग्य हाताळणी करण्यासंबंधीचे एका प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला असोसिएशनचे सदस्य व कामगारांनी उत्स्फुत असा प्रतिसाद दिला होता.

माजी अध्यक्ष श्री. आर. एल. कलथिया, श्री. एच. के. आगरवाल, श्री. व्ही. के. गुप्ता, त्याचप्रमाणे असोसिएशनने संस्थापकीय सदस्य श्री. शिवलाल जेरमभाई दायावाला, श्री. पवनकुमार जैन आणि श्री. जीवराम पटेल यांच्या उपस्थितीत अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्डाचे ३० वर्षे पूर्ण केल्याबद्दल अलंग–ए– ग्रीन–रिन– इनकारनेशन, या नियतकालीकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी पूर्वाध्यक्षांनी मागील आठवणींना उजाळा देऊन पुढील भवितव्यासंबंधी मार्गदर्शन केले.

अलंग शीप ब्रेकींग यार्डाला जपानच्या शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. या शिष्टमंडळात एकूण १४ सदस्य होते. यात जपान सरकारचे अधिकारी, जपानी शीप ओनर्स असोसिएशनचे सदस्य आणि जपानी कामगार संघटनेचे पदाधिकारी होते. विविध गोष्टींवर या शिष्टमंडळाने आणि शीप बेकर्स असोसिएशनच्या सदस्यांनी विचार विनियम केले.

**आमची ध्येये :**

१) सदस्यांचे हक्क अबाधित राखणे

२) सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचा प्रयत्न करणे.

३) कामगारांच्या चांगल्या कामासाठी वेळोवेळी कार्यशाळांचे आयोजन करणे.

४) विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे.

५) शीपयार्डातील काम हे पर्यावरणाचे संरक्षण करून केले जाईल, यासाठी प्रयत्न करणे.

६) सदस्यांना योग्य माहिती वेळोवेळी अवगत करून देणे.

७) सुरक्षा आणि पर्यावरणाच्या दृष्टीने शीपयार्डात सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असणे.

## शीप ब्रेकर्स असोसिएशनची कार्यकारिणी

**President**
**Shri jivaejbhai Patel**
**Vice President**
**Shri Rameshbhai Mendapara**
**Vice President**
**Shri. V.B. Tayal**
**Hon. Treasure**
**Shri Kapurbhia Bamsal**
**Hon secreter**
**Shri Nitinbhai Kankaniya**
**Hon Jt. Searetary**
**Shri Hareshbhai Parmar**
**Hon Jt Secretrary**
**Shri Ramesh Aggarwal**
**Hon. Jt. Secretary**
**Shri Sulkesh Aggarwal**

**Contant Us Office**
**206 Turning Point**
**2nd Floor waghawadi Road.**
**Bhavnagar- 364002**
**Gujarat**

## १.१२ Recycling/Advantage and Disadvantage

निकामी झालेल्या वस्तूवर पुर्नप्रक्रीया करून उपलब्ध झालेल्या कच्च्या मालापासून पुन्हा नव्या वस्तूंची निर्मिती करणे. व त्या वापरात आणणे. काच, पेपर, लोखंड, प्लॉस्टिक या निकामी झालेल्या वस्तूंवर पुर्नप्रक्रिया करून त्या वस्तू पुन्हा वापरात आणता येतात.

रिसायकलींग चे फायदे आणि तोटे

१) पुर्नप्रक्रियेमुळे लोखंड, काच, पेपर आणि प्लॉस्टिक यांचे पुर्नउत्पादन करता येते.

२) त्यामुळे रोजगाराला चालना मिळून आर्थिक बाजूही भक्कम होते.

३) नैसर्गिक साधन सामुग्रीचा वापर केला जातो.

४) लोकांमधे पर्यावरणात्मक दृष्टीकोन जागा होतो.

५) वैज्ञानिक पद्धतीने वस्तूवर पुन्हा प्रक्रीया करून पुर्नःउत्पादन करता येते.

६) शासनाला सुद्धा काही महत्त्वाचे प्रकल्प हाती घेता येतात. पर्यावरणीय समतोल साधून त्याची अंमलबजावणी करणे सोपे जाते.

७) ज्या गोष्टी प्रक्रिया करून पुर्नवापरासाठी उपयोगात आणल्या जातात त्यावस्तूंवर भरलेला (Rv.) टॅक्सही परत मिळू शकतो.

८) एखाद्या गोष्टीचे नव्याने उत्पादन करण्यापेक्षा पुर्नःप्रक्रिया करून निर्मित केलेल्या वस्तूला इंधनही कमी प्रमाणात लाभते. त्यामुळे नैसर्गिक वस्तूची तेवढी बचत होते.

९) पृथ्वीवरील मनुष्य आणि प्राणीमात्राचे सुद्धा संरक्षण केले जाते.

### तोटे

१) निकामी वस्तूवर केल्या जाणाऱ्या प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या प्रदुषणाचा इतर गोष्टीवर विपरित परिणाम होत असतो.

२) पुर्नःप्रक्रियेचे व्यवस्थापन योग्य नसेल तर त्यात नुकसानही सोसावे लागते.

३) या पासून उत्पन्न होणारा रोजगार हा कमी दर्जाचा आहे. कचऱ्याचे विघटन करणे त्यातील विषारी वायूंचा मेंदूवर' गंभीर असा परिणाम होऊ शकतो. त्यावेळी असा कचरा एकतर जमिनीत पुरावा लागतो किंवा जाळावा लागतो. त्यासाठी वेळ आणि श्रमही भरपूर लागतात.

४) ज्या ठिकाणी निकामी वस्तूवर प्रक्रिया केली जाते तिथे रोजच्या रोज कचऱ्याचे ढीग येऊन पडतात. त्याची व्यवस्थित देखभाल घेतली न गेल्यामुळे तेथील वातावरण आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. कचऱ्यातील विषारी घटक पाण्यात वा खतात मिसळले गेल्यास त्याचा परिणाम हा धान्यावर होऊ शकतो. या विषारी वायुमुळे लिचाटे नावाचे विष तयार होते आणि ते जर पाण्यात मिसळले तर त्याचा लोकांच्या आरोग्यावरही विपरित परिणाम होतो.

५) स्वच्छता आणि दळणवळण या दोन गोष्टींचा पेपर पुर्नप्रक्रीयेवर मोठा परिणाम होताना दिसत आहे. ही खूप खर्चिक बाब आहे. कागद पांढरा शुभ्र करण्यासाठी ब्लीचिंग प्रक्रिया करावी लागते. ब्लीचिंग प्रक्रियेचा शरीरावर परिणाम होत असतो.

६) प्लॉस्टिकचे विघटनही व्यवस्थितरीत्या करावे लागते. सगळ्या प्रकारचे प्लॉस्टिक एकत्रित करून प्लॉस्टिकवर प्रक्रिया करता येत नाही.

७) निकामी गोष्टींवर प्रक्रिया आणि पुर्न:उत्पादन या गोष्टींचा पर्यावरणीय दृष्टीकोनातून होणारा उपयोग याबाबत अजूनही सामाजिक जाणीव निर्माण झालेली नाही. पण जोपर्यंत ही जाणीव निर्माण होत नाही तोपर्यंत मानवापासून पर्यावरणाला किती प्रकाराने धोका उत्पन्न होत आहे. या गोष्टी जेव्हा समजून येतील तेव्हा निकामी वस्तूंवर होणारी प्रक्रिया आणि पुर्न:वापर या बाबतीत किंचीत महत्त्व प्राप्त होऊ शकेल.

८) निकामी वस्तूंवर केलेल्या पुर्न:प्रक्रियेचा पर्यावरणावर वाईट परिणाम होतो. धातू आणि काचा या गोष्टी पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय घातक आहेत. त्यासाठी नवनवीन झाडे लावण्याचा उपक्रमही आता हाती घेतलेला आहे.

## १.१३ अलंग शीपयार्डमुळे अलंग व अलंग परिसरातील गावाचा झालेला आर्थिक सामाजिक बदल :

अलंग शीपयार्डच्या निर्मितीमुळे अलंग गावाचा तर कायापालट झालाच. पण त्याचबरोबर आजूबाजूच्या खेडेगावातील लोकांच्या जीवनात सुद्धा हळूहळू बदल घडून आलेला दिसत आहे. त्यामुळे जवळच असलेल्या भावनगर शहराशी सुद्धा इथल्या लोकांची मोठ्या प्रमाणावर आवर–जावर सुरू झाली आहे.

अलंग शेजारील खेडी त्यात मुख्यत्वे नारी, -- सिदकर, अकावडा, आदेवाडा, वार्तेज, फुलसर. चित्रा या गावांचाही हळूहळू कायापालट होत गेला आणि ही सारी गावे (BADA) भावनगर एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटी च्या अधिपत्याखाली आणली गेली.

अलंग शीपयार्डामुळे सागरी किनारी वसलेले अलंग आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरातील खेड्यावर सुद्धा खूपच प्रभाव पडलेला दिसून येत आहे.

अलंग शीपयार्डात काम करणारे सर्वच कामगार हे स्थलांतरीत असून ते आता इथल्या स्थानिक लोकांच्याही सानिध्यात आलेले आहेत. या स्थलांतरीत लोकांना स्थानिक लोकांपुढे कायम दबूनच रहावे लागते.

इथल्या स्थानिक लोकांमध्ये ब्राह्मण, वाणी, दरबार पटेल, कोळी आणि इतर अनुसूचित जाती जमातीचे लोक शीपयार्डात आपले वेगवेगळे उद्योग चालवत आहेत. स्थानिक लोक प्रामुख्याने चहाचे दुकान, पानाचा गल्ला, दुकान तसेच मोबाईल शॉप पण चालत आहेत. दरबार लोक हे प्रामुख्याने वाहतूक उद्योगात गुंतलेले आहेत. जैन, वाणी लोक हे दलाल आणि केमिकल उत्पादनात गुंतलेले आहेत. इंजिनियरींगचे सुट्टे भाग, पेंटस्, ल्युब्रिकेटिंग ऑईल, इलेक्ट्रिकल वायर, केबल, त्याचबरोबर जुन्या मालसामानाच्या व्यवहारात हे लोक गुंतलेले आहेत.

जहाजातील स्क्रॅप माल त्याचबरोबर फर्निचर व इतर गृहपयोगी वस्तूंची विक्री अशी एकूण ३५० दुकाने अलंग गावात प्रवेश करतानाच थाटलेली आहेत. अलंग गावातील लोकच ही दुकाने चालवत आहेत. पालेवाल आणि खारक या दोन्ही जातीच्या लोकांचे यात वर्चस्व आहे.

पटेल हे प्रामुख्याने रोलिंग मील्स चालवत आहेत तसेच ऑक्सिजन युनिटही तेच पाहत आहेत. ज्याची शीपयार्डातला खूपच गरज आहे. कोळी लोक हे अवजड कामात गुंतलेले आहेत. लोहार, सुतार हे कुशल कारागिर म्हणून शीपयार्डात काम करत आहेत.

अलंग शीपयार्ड सुरू होण्यापूवी या लोकांचे जीवन अतिशय साचेबंद असे होते. त्यांचे राहणीमान अतिशय रुढीग्रस्त होते. अलंग शीपयार्डाच्या निर्मितीमुळे या लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आलेला आहे. दळणवळणाच्या साधनात वाढ झाली आहे. त्यांनी आपला पारंपारिक व्यवसाय सोडून त्यांपेक्षा अधिक पैसे मिळवून देणाऱ्या उद्योगधंद्याकडे आता आपली पाऊले उचलली आहेत.

त्यांचे सामाजिक जीवन व त्यांची जीवनशैली सुद्धा आता बदललेली आहे. आपली जुनी घरे पाडून त्यांनी आता पक्की सिमेंटची घरे बांधलेली आहेत. शहरातील लोकांप्रमाणेच ते आता सर्व भौतिक सुखसोईचा अवलंब करत आहे. आधुनिक जीवनशैली या लोकांनी अंगिकारली आहे. गावातील ५०% लोक आता जवळपासच्या गावात किंवा भावनगरला जायला आता मोटरसायकलचा वापर करत आहेत.

आता या लोकांचा सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनही बदललेला आहे. हा घडून आलेला बदल त्यांच्या दैनंदिन जीवनात सुद्धा दिसून येत आहे.

अलंग शीपयार्डमुळे अलंग गावाबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील गावावर व जवळच असणाऱ्या भावनगर शहरावरही खूप मोठा परिणाम झालेला आहे. कुशल–अकुशल कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.

जहाज तोडणी उद्योगामुळे इतरही संबंधित लघुउद्योगांना चालना मिळालेली आहे. त्यात–री रोलिंग मिल्स, रिफायनरी मिल्स, लाकूड उद्योगावर आधारित उद्योगधंदे, एल.पी. जी. प्लॅन्टस, री–रोलींग मिल्स मधे स्क्रॅप मालाचा वापर केला जातो त्यामुळे भावनगर आणि सिहोर तसेच चित्रा या ठिकाणी सुमारे १६० रोलिंग मिल्स तयार झालेल्या आहेत. अलंग ते बुधेल या रस्त्यावर १३० ऑक्सिजन प्लॅन्टसही तयार झाले आहेत. या उद्योगामुळे सुमारे २५ ते ३० हजार लोकांना कामधंदा मिळालेला आहे. स्क्रॅप मधील उच्च प्रतीचे स्टील हे पंजाब मधे पाठविण्यात येते. मंडी गोविंदगढ आणि इतर गावातील लोकांनी आपली ऑफिसे भावनगर मधे उघडली आहेत. आणि यार्डातील स्क्रॅप मालाचा ते उठाव करत आहेत.

तोडलेल्या जहाजातून अंदाजे ३४ हजार टन स्टील उपलब्ध होते. परंतु कामगारांना मात्र खूपच थोडे पैसे मजुरी म्हणून दिले जातात.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात (१९८४ ते २०११) सालापर्यंत एकूण १७३ कामगार हे मृत्युमुखी पडलेले आहेत. अंगावर अवजड सामान पडून किंवा आग लागून तसेच जहाजातील ऑईल अंगावर सांडूनही अपघात झालेले आहेत. त्यातील ज्वालाग्राही पदार्थामुळे आग लागते आणि कामगारांचा मृत्यु होतो.

२०१२ साली जगात एकूण १००० जहाजे तोडण्यात आली. त्यापैकी ५२७ जहाजे ही भारतात तोडली गेली. त्यानंतर बांगलादेश, पाकिस्तान आणि चीनचा नंबर लागतो. युरोपातील जहाज मालक आपली जहाजे दक्षिण आशियाई देशामध्येच तोडायला पाठवतात. त्यासाठी बऱ्याच नियमांची पूर्तता करावी लागते. पण या निकामी जहाजातून मिळणारे स्टील खूप महत्त्वाचे आहे. जहाज तोडणाऱ्या कंपन्या एका टनाला ४०० डॉलर इतका भाव देतात आणि चांगल्या प्रतीचे स्टील हे पुर्नवापरासाठी उपयोगात आणता येते. फक्त स्टीलच नव्हे तर जहाजातील इतरही उपयुक्त वस्तू इथे विकल्या जातात.

तरीही आता जहाज तोडणी करताना खूपशा महत्त्वाच्या गोष्टींची पूर्णपणे काळजी घेतली जात आहे. निकामी जहाजातील अत्यंत धोकादायक असा घटक म्हणजे ॲसबेस्टॉस. त्याचेही विघटन आता व्यवस्थितरीतीने करण्यात येते. मशीनमधील ऑईल विशिष्ट टँकमध्ये साठविण्यात येते. त्याचप्रमाणे संदेश वहनाच्या सर्व यंत्रणा व्यवस्थितरीत्या हाताळण्यात येतात.

अलंग शीपयार्डात जहाज तोडणी करण्याकरिता कायमस्वरूपी बंधारा बांधला जावा अशी योजना जपानी संशोधकांनी मांडलेली आहे. परंतु इथे प्रत्येक वेगवेगळ्या प्लॉटधारकाला प्लॉट हा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे इथे सुविधा करून कशा घ्यायच्या आणि त्याची पूर्तता कशी करायची हा सुद्धा मोठा प्रश्न निर्माण होतो. तरीही अलंग शीपयार्डातील काही प्लॉटधारक हे बेसल अधिवेशनात मांडलेल्या सूचनांची नियमांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यात श्रीराम, प्रिया ब्ल्यू यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. 'श्रीराम' या प्लॉटचे मालक चेतन पटेल यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्रही मिळालेले आहे.

ज्या जहाज मालकांना आपली निकामी जहाजे तोडण्यासाठी भारतात पाठवायची आहेत त्या कंपन्यांनी सर्वात आधी या निकामी जहाजात कुठल्याही प्रकारचा विषारी वायू उत्पन्न होणार नाही. आरोग्य तसेच पर्यावरणाची कुठल्याही प्रकारची हानी होणार नाही, प्रदूषण होणार नाही या सर्व बाबींची पूर्तता करून तसे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावरच ते जहाज तोडणीसाठी पाठवावे. परंतु त्या देशातून हे जहाज भारतात पोहोचण्यासाठी इंधन आणि वंगणाचीसुद्धा तेवढीच गरज भासते. त्यामुळे बेसल अधिवेशनात ज्याप्रमाणे जहाज तोडणी करण्याकरिता विशिष्ट अशा नियमांची नियमावली तयार करून ती प्रत्येक देशातील जहाज तोडणी करणाऱ्या व्यावसायिकांनी त्या

नियमांची अंमलबजावणी करावी अशी सूचना केलेली आहे. त्याच धर्तीवर युरोपियन कमिशननेसुद्धा काही क्लिष्ट नियम या व्यावसायिकांवर लादण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र या नियमांचा जोरदारपणे विरोध केला जात आहे.

(चीन) जहाज बांधणी उद्योगात चीनचे स्थान हे प्रथम क्रमांकावर आहे. परंतु चीनसुद्धा जहाज तोडणी व्यवसायात जोरदारपणे शिरकाव करत आहे आणि त्यासाठी चीन देशाने यात मोठी गुंतवणूक केली आहे. परंतु चीनमधील स्टीलचा भाव कमी झाल्यामुळे आज आम्हाला खूप झगडावे लागत आहे. आज हा व्यवसाय पिवळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर हलविला आहे. जिथे मोठे धक्के आणि अत्याधुनिक क्रेन्स आहेत. औद्योगिक क्षेत्राच्या पडीक जागेचे रूपांतर आता चांगल्या शीपयार्डात केलेले आहे. जहाजातील सर्व माल व्यवस्थित आणि पद्धतशीर रीतीने वेगळा केला जातो. जेव्हा आरोग्याला धोकादायक असा निकामी कचरा जेव्हा जहाजातून वेगळा केला जातो तेव्हा कामगार सर्व सुरक्षेचे नियम पाळतात. सर्व योग्य ती दक्षता घेतात. सुरक्षा कोट गॅस माक्स लावून काम करतात.

युरोपियन लोकांना निकामी जहाजांच्या कचऱ्यातून लवकर मुक्त व्हायचे आहे व आपल्या देशातील कचरा हा भारतात आणून टाकण्यासाठी हे लोक बनावटी झेंड्याचा वापर करतात. युरोपियन मालकीची सर्वाधिक जहाजे ही अलंग इथे तोडण्यासाठी येतात. ब्रुसेलला असलेल्या एका संस्थेने ही गोष्ट उजेडात आणली आहे. (Besal Convention International anti dumping) ही संस्था विकसित देशातील टाकाऊ माल हा विकसनशील देशाकडे पाठविण्यास प्रतिबंध करते. दुसऱ्या बाजूला विकसनशील देश या निकामी जहाजाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक नफा मिळवतात. लाखो टन स्टीलचे उत्पादन मिळते. त्याचबरोबर किंमती फर्निचर आणि हजारो लोकांना रोजगारही मिळतो. मात्र सुरक्षा आणि पर्यावरण हे मुद्दे मात्र आहे तिथेच राहतात. युरोपियन देशातील एकूण ३८० जहाजे ही दक्षिण आशियातील चार देशातील जहाज तोडणी केंद्रात तोडण्यात आली. या ३८० जहाजांपैकी २४० जहाजे ही भारतात तोडण्यात आली. त्यापैकी १९९ जहाजे ही बनावटी खोटे झेंडे लावून समुद्रातून यात्रा करत होती. मात्र कुठल्याही जहाजाची ओळख ही आंतरराष्ट्रीय मेरीटाईम ऑर्गनायझेशनच्या नोंदणी क्रमांकाद्वारे कळू शकते.

प्रदूषण नियंत्रण, स्फोटकविरहीत व गुजराथ मेरी टाईप बोर्ड या तिन्हींचे प्रमाणपत्र सादर झाल्यावरच जहाज तोडण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र सादर होते. याच गोष्टीबरोबर आता कामगारांच्या सुरक्षेबद्दलही मोठ्या प्रमाणात आवाज उठवला जात आहे.

## १.१४ साहित्याचा आढावा (Review of literature)

**प्रस्तावना**:– अलंग रिसायकलींग शीपयार्ड येथील स्थलांतरित कामगारांचे शोषण: एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयीचा जेव्हा अभ्यास करत आहोत. तेव्हा आपणास 'स्थलांतरीत कामगार' आणि शोषण या संकल्पनाचा सामान्य दृष्टीकोनातून आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. याविषयी कोणकोणत्या समाजशास्त्रीय अभ्यासकांनी कशा प्रकारचे विचार मांडले आहेत त्या विषयीचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. सुरुवातीला आपण सामान्य विधान पाहू आणि त्यानंतर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या विषयी मांडलेल्या विचारांचा अभ्यास करू या.

### जनरल सामान्य विधान (General Statement)

(१) भारतात आपल्याला प्रामुख्याने संघटित आणि असंघटित अशा दोन प्रकारचे कामगार अस्तित्वात असलेले दिसून येतात.

**संघटित कामगार** :– संघटित कामगारांच्या मागे विशिष्ट अशी एक यंत्रणा कार्यान्वित असते. ज्या व्यवस्थेमुळे कामगारांना सर्व प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध होतात. या कामगारांना वेळेवर मिळणारे वेतन. या कामगारांना कामाच्या निमित्ताने स्थलांतर जरी करावे लागले तरी सुद्धा त्यांच्या कामाची त्यांना पूर्णपणे शाश्वती असते. त्यांना वेळेवर मिळणारे वेतन, रजा, बोनस, नुकसान भरपाईचा मोबदला अशा सर्व गोष्टी या कामगारांना उपलब्ध होतात. तसेच त्यांच्या हक्काचे व हिताची जोपासणी करणारे कायदे आणि कायमस्वरूपी नोकरीची हमी त्यामुळे संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना एक सामाजिक सुरक्षितता व आर्थिक स्थैर्यामुळे त्यांना समाजात त्यांचे स्वत:चे एक वेगळे अस्तित्व त्यांना प्राप्त होते.

**असंघटित कामगार**:– या उलट असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार मुळातच अशिक्षित, गरीब व निम्न वर्गातील असतात. आपल्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी, रोजगारासाठी ज्या ठिकाणी काम उपलब्ध असेल त्या ठिकाणी त्यांना काम करण्यासाठी स्थलांतरित व्हावे लागते. या लोकांच्या स्थलांतरापाठीमागे बेकारी आणि गरिबी हीच प्रमुख कारणे असतात. त्याचप्रमाणे ते

ज्या ठिकाणी काम करण्यासाठी स्थलांतरित होतात. तिथे त्यांना कामाची पूर्णपणे शाश्वती असतेच असे नाही. या कामगारांना कुठल्याही प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध होत नाहीत. मिळेल त्या ठिकाणी आणि मिळेल ते काम त्यांना करावे लागते त्यांच्या कामाची त्यांच्या वेतनाची कुठल्याही प्रकारची हमी नसते. यांच्या गरिबीचा असहाय्यतेचा फायदा भांडवलदार घेतात. आणि या कामगारांचे शोषण करतात. या कामगारांना कुठल्याही प्रकारच्या कायद्याचे संरक्षण नसते. त्यामुळे त्यांना कुठल्याही प्रकारची सामाजिक सुरक्षितता मिळत नाही.

**समाजशास्त्रीय अभ्यास दृष्टीकोन** :– जेव्हा आपण असंघटित कामगारांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करतो तेव्हा आपल्याला सामाजिक विचारवंत आणि साम्यवादाचे पुरस्कर्ते कार्ल मार्क्स यांची प्रकर्षाने आठवण होते. आपल्या 'दास कॅपिटल' या ग्रंथात त्यांनी जे विचार नमूद केले आहेत ते अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यांनी 'ऐतिहासिक भौतिकवाद' आणि 'श्रममूल्याचा सिद्धान्त' या दोन्ही सिद्धान्ताच्या द्वारे भांडवलशाही समाजरचनेत कामगारांचे शोषण कसे केले जाते आणि शोषणामुळे क्रांतिला समाज कसा तयार होतो हे दाखविले आहे. समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' असे दोन वर्ग अस्तित्वात असतात.

'आहे रे' वर्गाकडून 'नाही रे' वर्गाचे शोषण केले जाते हे त्यांनी दाखवून दिले आहे. वर्गनिहाय समाज हे मार्क्सचे स्वप्न तसेच राहिलेले आहे. कारण आजही समाजात मालक वर्गाकडून कामगारांचे शोषण होताना दिसून येत आहे.

उपयोगाची वा जीवनाची साधने ही मानवी श्रमातून निर्माण होतात. वस्तूमधे जे मूल्य निर्माण होते ते कामगारांच्या श्रमशक्तीमुळेच आपल्या श्रमांनी कामगार सर्व मूल्ये निर्माण करतात. परंतु सर्व मूल्ये त्यांच्या हाती येत नाहीत. त्यातला काही अल्प भागच त्यांच्या हाती येतो. उत्पादन साधनावरील मालकीमुळे भांडवलदारांना अधिक फायदा होतो. वाढीव उत्पादनामुळे भांडवलदार वर्ग हा अधिक श्रीमंत व गरीब बनतो. कामगार वर्ग आणि भांडवलदार यांच्यातील दरी वाढतच जाते आणि कामगारांची स्थिती दयनीय होत असते. (मराठी विश्वकोष खंड १३ पृष्ठ ३७८ ते ३८२)

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या स्थलांतरित कामगार आणि मालक वर्ग यांच्यातील ही दरी आपल्याला स्पष्टपणे पहायला मिळते. आजही ते कामगार कोणत्या दयनीय अवस्थेत काम करत आहेत हेही आपल्याला स्पष्टपणे दिसून येत आहे.

**अतिरिक्त श्रम मूल्यांचा सिद्धान्त** :– अतिरिक्त श्रममूल्यांच्या सिद्धान्ताद्वारे मार्क्सने हे दाखवून दिले आहे की आपल्या उत्पादनाचा खर्च कमी करण्याकडे भांडवलदाराचे लक्ष असते. कामाची गती आणि तास यात वाढ केली जाते. पण कामगारांना मजुरी मात्र तेवढीच दिली जाते. याने उत्पादनात वाढ होते. नफा वाढतो. पण कामगारांच्या मजूरीत कुठल्याही प्रकारची वाढ होत नाही. आणि हा झालेला नफा म्हणजेच कामगारांचे शोषण आणि पिळवणूक असते. हा नफा म्हणजेच अतिरिक्त श्रममूल्य असते.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांचे कामाचे तासच मूळात अधिक आहेत. सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत या कामगारांना काम करावे लागते. त्यामुळे या कामगारांना कमी वेतन देऊन त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात काम करवून घेतले जाते. त्यामुळे त्यांच्या अतिरिक्त श्रमाचा इथे कुठल्याही प्रकारे विचार होताना दिसून येत नाही तसेच आधी मूळातच मिळणारे वेतन कमी त्यात जादा तासाच्या कामाचे पैसेही तासाप्रमाणे अर्धे दिले जातात. त्यामुळे या कामगारांच्या श्रमांचा परिपूर्ण उपयोग होऊनही त्यांच्या श्रमाचे कुठल्याही रीतीने चीज होताना दिसून येत नाही उलट या कामगारांचे या ना त्या प्रकारे मोठ्या प्रमाणात शोषण होतानाच दिसून येत आहे.

**मॅक्स वेबर :–**

मॅक्स वेबर या विचारवंताने आपल्या आर्थिक क्रियेच्या संज्ञेतून हे सांगितले आहे की, ''आर्थिक क्रिया या संज्ञेचा अर्थ म्हणजे शांततामय क्रिया शांततामय क्रियेमुळे समाजातील अपप्रवृत्तींना फाटा देता येतो. तसेच उपयोगितेचे नियम चांगल्या प्रकारे अमलात येवू शकतात. आर्थिक क्रियेतूनच आर्थिक कार्यक्रमांचा उदय होतो. आर्थिक कार्यक्रम हे आधुनिक समाजाचे लक्षण आहे. यातून रोजगाराच्या संधी निर्माण होतात. आर्थिक क्रियेच्या सहाय्याने लोकांच्या आवश्यक गरजा पूर्ण झाल्या तर समाजातील प्रश्न आपोआपच सुटतात.''

नोकरशाहीच्या संदर्भात विवेचन करताना मॅक्स वेबर यांनी सांगितले आहे की, ''नोकरशाहीत पैशाच्या जोरावर सत्ता गाजविण्याची प्रवृत्ती वाढते. त्याचप्रमाणे मानवी कल्याण करणारे सामाजिक सुधारणावादी कायदे मंजूर करण्यास नोकरशाहीत अडथळा निर्माण होतो. तरीही मानवी हक्काचे जतन करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे कारण मानवी हक्कच आपल्याला खरे जीवन जगण्याची व जीवनाचा विकास करण्याची संधी देतात. समाजवाद म्हणजे काल्पनिकतेकडून वास्तविकतेकडे

वाटचाल करण्याचा एक मार्ग आहे. राजकीय समाजशास्त्राचा विचार करता आपणास असे लक्षात येते की आर्थिक क्षेत्र आणि राजकीय क्षेत्र हे परस्पर संबंधित असतात. सुयोग्य कार्यप्रणालीसाठी ज्याप्रमाणे सत्तेची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे अधिकार आणि अधिकारांची योग्य अमंलबजावणी करण्यासाठी एका नेटक्या व्यवस्थापनाची गरज असते. नुसती सत्ता आणि अधिकार असून उपयोग होत नाही. कारण सत्तेचा आणि अधिकाराचा गैरवापर झाला तर त्याचे दुष्परिणाम हे संपूर्ण समाजालाच भोगावे लागतात.

**जान ब्रेमन :–**

जान ब्रेमन यांनी आपल्या 'फूटलूझ लेबर' या पुस्तकाच्या माध्यमातून गुजराथ राज्यातील दक्षिण गुजराथमधील असंघटित कामगारांच्या संदर्भात अभ्यास करून आपले विचार मांडलेले आहेत. जान ब्रेमन यांनी शेतमजूर, दगडफोडणारे कामगार, उस तोडणी कामगार, हिऱ्याला पैलू पाडणारे हीरे कारागीर रस्तेबांधणी, इमारत बांधणी, वीटभट्टी व मीठ कामगारांच्या संदर्भात आपले विचार मांडले आहेत. या सर्व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अतिशय हलाखीचे जीवन जगावे लागते. त्यामुळे हे कामगार खेड्याकडून शहराकडे, आकृष्ट होतात. या कामगारांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण होते. हे असंघटित कामगार हे निम्न स्तरातील व अनुसूचित जाती जमातील असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**स्मीता पंजीआर व श्रीवास्तव**

स्मीता पंजीआर यांनीही आपल्या (Locked Homes and empty schools) या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी हे दाखवून दिले आहे की स्थलांतरित कामगार हे अनुसूचित जाती जमातीतले असतात. ते गरीब व अशिक्षित असतात. छोटे–छोटे लघुउद्योग, इंडस्ट्रीज. शेती व शेतीला पूरक असणारे व्यवसाय मीठ कामगार, दगड फोडणारे कामगार, उस तोडणी कामगार हे स्थलांतरित असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. श्रीवास्तव यांनीही याच संदर्भात विवेचन केले आहे.

स्मीता पंजीआर यांनी स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या जीवनावर कसा परिणाम होतो हे दाखवून दिले आहे. त्यांनी परिस्थितीमुळे शाळेकडे पाठ फिरवून आईवडिलांबरोबरच कामाला जुंपले जाते. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना वंचिताचे जीवन जगावे लागते.

दगड फोडणारे कामगार (Stone Quarry Workers) रॉबिन त्रिभुवन जयश्री पाटील)

खाणीतील दगड फोडणाऱ्या स्थलांतरित कामगारांचा अभ्यास रॉबिन त्रिभूवन आणि जयश्री पाटील यांनी केला असून त्यांनी केलेल्या विवेचनानुसार या कामगारांनाही स्थलांतरित व्हावे लागते. कामगारांनाही कोणत्याही प्रकारचे कायम स्वरूपाचे काम वा वेतनाची हमी नसते. त्यामुळे या कामगारांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण होताना दिसून येते. सामाजिक वा आर्थिक सुरक्षाही या कामगारांना लाभत नाही.

रॉबिन त्रिभूवन आणि जयश्री खर्चे यांनी वीटभट्टी कामगार आणि उस तोडणी कामगारांच्या मुलांच्या जीवनावर होणारा परिणाम (बालकामगार व त्यांचे हक्क) दाखविताना त्यांनी एका प्रतिकृतीचा (Model) चा आधार घेतलेला आहे.

या प्रतिकृतीत त्यांनी Pull and push factors च्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांमध्ये (१) गरिबी २) अल्पभूधारक ३) आर्थिक विवंचना, (४) खायला पुरेसे अन्न नाही. (५) बेरोजगारी (६) कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध नाही. (७) अस्थायी स्वरूपाचे निवास (८) अकुशल कामगार (९) अशिक्षित (१०) सामाजिक व आर्थिक असुरक्षितता या सर्व घटकांमुळे या कामगारांना स्थलांतरित व्हावे लागते. या साऱ्या गोष्टींचा परिणाम या कामगारांच्या मुलांच्या जीवनावर होत असतो. आठवड्याला मिळणारे वेतन, उचल मजुरीची हमी यामुळे हे कामगार स्थलांतरासाठी आकर्षिले जातात. मीठ कामगारांचे शोषण (एम.फिल अप्रकाशित प्रबंध)

रॉबिन त्रिभूवन आणि सदाशिव शेंडे यांनी गुजराथ राज्यातील सुरेंद्रनगर जिल्ह्यातील 'खाराघोडा' या गावातील मीठ कामगारांचा अभ्यास करतानाही असे लक्षात आले आहे की, या कामगारांनाही मीठ उत्पादनासाठी आठ महिने रणात स्थलांतरित व्हावे लागते.

मीठ उत्पादनासाठी आधी हे कामगार व्यापाऱ्याकडून उचल घेतात. व्यापारी जो भाव सांगेल त्याच भावाला व्यापाऱ्याला मीठ विकावे लागते. मीठ उत्पादन करताना कुठल्याही प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध होत नाहीत. पिण्याचे पाणी सुद्धा पंधरा दिवसांनी एकदा टँकरद्वारे उपलब्ध होते. सतत मीठाशी संपर्क त्यामुळे हातापायांना जखमा, डोळ्यांना इजा होतात. हजारो टन मीठाचे उत्पादन करूनही या कामगारांना वेठबिगारीचे जीवन जगावे लागते.

## औद्योगिक समाजशास्त्र :

मानवाला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, जीवनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक क्रिया खूप महत्त्वाच्या आहेत. अर्थार्जनासाठी मानवाला वारंवार स्थलांतर करावे लागते. आजही

असंघटित कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत असून त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागते. कर्जबाजारीपणामुळे हे लोक वेठबिगारीच्या विळख्यात फसत जातात. वेठबिगारी ही तर असंघटित कामगारांची मोठी समस्या आहे. शेतमजूर, मीठ कामगार, दगड फोडणारे कामगार, वीटभट्टीवरील कामगार, डिर्टर्जन्ट, कार्पेट तयार करणारे कामगार.

इतर छोट्या छोट्या उद्योगामधून काम करणारे कामगारही वेठबिगारीचे जीवन जगताना दिसून येतात. व त्या कामगारांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण होत असते

## Review of literature :

**Chromic Poverty Research Centre** य़ा संस्थेने केलेल्या अभ्यासावरून (Report) असे दिसून येते की अतिशय ग्रामीण भागातूनही रोजगारासाठी कामगार स्थलांतर करत असतात. ते ज्या ठिकाणी म्हणून काम करत असतात तिथे त्यांना अतिशय गलिच्छ अशा वातावरणात धोकादायक आणि अगदी हलक्या प्रतीचे काम त्यांना करायला लागते. अनुसुचित जाती, जमातीची लोकच खूप गरीब असतात. काही लोक तर अगदी दारिद्र्यरेषेखाली आपले जीवन व्यतित करत असतात. बिहारमधील मुस्लिम जातीचे लोक खूपच गरीब असल्याचे दिसून आले आहे.

कोरापूर, बोलागिर, कालाहंदी हे सगळ्यात गरीबी असलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यातील लोक रोजगार मिळवण्यासाठी शेजारच्या राज्यात जातात. शेजारच्या राज्यात हे लोक वीटभट्टी, घरबांधणीची कामे करतात. ९०% लोक हे वीटभट्टीवर काम करायला म्हणून स्थलांतरित होतात. या स्थलांतरित लोकांमध्ये ६०.५०% हे पुरुष आणि ३९.४४% या महिला आहेत आणि १४ वर्षाखालील मुलेही कामासाठी स्थलांतरित होतात.

आंध्र प्रदेशातील भटक्या विमुक्त जमाती ज्या जंगल विभागात येतात त्यापैकी महेबुब नगरमधील लोक हे रोजगारासाठी मुंबईला स्थलांतर करतात तर अनंतपूर जिल्ह्यातील लोक हे बंगलोरला स्थलांतर करतात.

मध्य प्रदेशातील जंगल भागात राहणारे आदिवासी लोकही रोजगारासाठी आसपासच्या गावांमध्ये स्थलांतर करतात.

जान ब्रेमन यांनी केलेल्या अभ्यासानुसार महाराष्ट्रातील ऊसतोडणी करणारे कामगार हे गुजराथ राज्यात स्थलांतर करत असतात. त्यांचे कामाचे तासही अधिक असतात आणि अतिशय वाईट अशा अवस्थेत हे लोक काम करत असतात. हे स्थलांतरित कामगार वेठबिगाराप्रमाणेच जीवन जगताना दिसून येतात. हे कामगार उचल घेतात. घेतलेली उचल फेडण्यासाठी अतिशय काबाडकष्ट करतात. त्यांना कुठल्याही प्रकारचे वैयक्तिक स्वातंत्र्य नसते. सगळेच काम हे अवैध असते आणि तिथे कुठल्याही कायद्याचे पालन केले जात नाही. काम करताना घातपाताची शक्यताही अधिक असते. या कामगारांना आजारपणातही नाईलाजाने काम करावे लागते. स्त्री कामगारांचे लैंगिक शोषणही केले जाते. १९९० च्या उदारीकरणानंतर स्थलांतराचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसून आले आहे.

रमीझ अब्बास आणि दिव्या वर्मा यांनी केलेल्या अभ्यासानुसार बिहार आणि उत्तर प्रदेशातील स्थलांतरित कामगारांचे कलकत्ता येथे सायकल रिक्षा चालवण्यात त्यांचे वर्चस्व असल्याचे दिसून आले आहे. अगदी दहा जणातील दोन जण तर हे स्थलांतर केलेले असतात.

स्थलांतरला जशी गरीबी, बेरोजगारी ही महत्त्वाची कारणे आहेत त्याचप्रमाणे विवाहामुळेही मोठ्या प्रमाणात स्थलांतर होताना दिसून येत आहे. मात्र पुरुष वर्ग हा मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या निमित्तानेच स्थलांतरित होताना दिसून येत आहे. मग स्थलांतर हे दीर्घ कालाचे किंवा विशिष्ट मर्यादित स्वरूपाचे वा काही हंगामी कारणाच्या निमित्ताने होताना दिसून येते.

या स्थलांतरित कामगारांना राहण्याच्या प्रश्नाबरोबरच तिथली भाषा संस्कृती या गोष्टीशी सुद्धा समायोजन करून घ्यावे लागते. या लोकांना स्थानिक लोकांच्या त्रासाबरोबरच राजकीय दबावालासुद्धा सामोरे जावे लागते.

आज भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी (१,२१ बिलीयन) त्यापैकी ६९% लोक हे आजही खेड्यात राहत आहेत. (२०११ च्या जनगणनेनुसार) दिल्ली, मुंबई, कलकत्ता ही जगातल्या दहा शहरांमध्ये या शहरांची गणना केली जाते आणि भारतातील शहरांची वाढही दिवसेंदिवस होत चाललेली दिसून येत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे खेडेगावात उपलब्ध न होणारा रोजगार. त्यामुळे खेड्याकडून शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होताना दिसून येत आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार २०१० मध्ये २९.८% हे दारिद्र्यरेषेखाली आपले जीवन जगत होते आणि

३३.८% हे ग्रामीण दारिद्र्यरेषेखाली जगत असल्याचा अहवाल हा जागतिक बँकेने दिला आहे. त्यातही अशिक्षित–सुशिक्षिताची दरी. खेड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि आणि रोजगाराच्या संधीचा अभाव यामुळेच कामगारांच्या स्थलांतर प्रक्रियेला गती मिळत असल्याचे दिसून येत आहे.

महिलांच्या स्थलांतरापाठीमागे विवाह हे महत्त्वाचे कारण आहे. एकूण लोकसंख्येच्या अंदाजे १९ ते २0% कामगार हे खूप लांबच्या ठिकाणी म्हणजे भारतातल्या भारतात पण दूर लांबच्या राज्यात स्थलांतर करतात असे दिसून आले आहे आणि त्यापाठीमागे महत्त्वाचे कारण म्हणजे रोजगारासाठी हेच असते आणि जो एक सर्व्हे करण्यात आला त्यात असे दिसून आले की स्थलांतरित होणारा पुरुष कामगार हे प्रामुख्याने १६ ते ४0 वयोगटातील असून ते थोड्या कालावधीसाठी, विशिष्ट कालावधी किंवा कायमस्वरुपीसुद्धा स्थलांतर केलेले असते. अगदी कमीतकमी ६0 दिवस व जास्तीत जास्त वर्षभरासाठी हे स्थलांतर करतात.

प्रामुख्याने उत्तर प्रदेश (१८.६%) आणि बिहार (११.१%) एकूण लोकसंख्येच्या (२0११ जनगणनेनुसार) एवढी लोक ही इथल्या खेड्यांमध्ये वास्तव्य करून आहेत आणि या राज्यातून मोठ्या प्रमाणात आंतरराज्यीय स्थलांतर होताना दिसून येत आहे. उत्तर प्रदेशातून स्थलांतरित होणारे कामगार हे महाराष्ट्र, दिल्ली, प. बंगाल, हरियाणा आणि गुजराथ इथे स्थलांतरित होताना दिसतात आणि इतर राज्यातील कामगार हे दिल्ली आणि पश्चिम बंगालमध्ये जातात. त्याचप्रमाणे राजस्थान, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ, उत्तराखंड, ओरिसा या राज्यातूनही मोठ्या प्रमाणात स्थलांतर होताना दिसून येत आहे.

मुंबई, दिल्ली आणि कलकत्ता ही तीन प्रमुख शहरे आहेत जिथे मोठ्या प्रमाणावर आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार हे स्थलांतर करत असतात. इतर राज्यातील लोकांनाही ही शहरे सामावून घेतात. काही दुष्काळग्रस्त भागामुळे स्थलांतरित होत असतात. त्यात आंध्र प्रदेश, कर्नाटका व महाराष्ट्रातील कामगारांचा समावेश असतो. या राज्यातील कामगार हे वीटभट्टी, गृहप्रकल्प, टाईल्सचा कारखाना, धान्य कापणी अशा विविध प्रकारच्या कामामध्ये व्यस्त असतात. पण एका पाहणी अभ्यासानुसार असे दिसून आले आहे की ९0% कामगार हे बांधणी क्षेत्रात गुंतलेले दिसून येतात. काही ठराविक नेमाने स्थलांतरित होणारे कामगार हे शेतीच्या

कामामध्येसुद्धा काम करताना दिसून येतात. प. बंगालमध्ये भात कापणी तर गुजराथ मध्ये ऊस तोडणी करताना दिसून येतात. या मध्येही सगळीकडे पुरुषांचेच वर्चस्व असल्याचे दिसून येते. २०११ च्या स्थलांतरित कामगाराची एकूण राज्य विभाग संख्या संकलित करण्यात आली असली तरी सुद्धा ती अजून प्रकाशित केलेली नाही. त्यामुळे २००१ ची संकलित माहिती उपलब्ध होत आहे. माहिती संकलित करतानाही बरेच अडथळे निर्माण होत आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हे (NSS) यांनी संकलीत केलेल्या माहितीनुसार १५ मिलियन कामगार हे थोड्या कालावधीकरिता स्थलांतर करतात तर काहींच्या मतानुसार ही संख्या १०० मिलियनच्या घरात जाते. (100 million)

जन्मदाखला हा जसा महत्त्वाचा पुरावा समजला जातो त्याचप्रमाणे रेशनकार्ड, मतदार नोंदणी कार्ड पण त्या बाबतीत प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पद्धतीचे नियम लावले जातात. त्यामुळे सगळीकडे एकसूत्रता नसल्याने स्थलांतरित कामगारांची माहिती संकलित करताना अडथळा येतो.

भारतात काही बालकांचा जन्म हा घरात, खेड्यात किंवा एखाद्या मागासलेल्या ठिकाणी होतो. जिथे दवाखाना किंवा हॉस्पिटल जिथे जन्माचा दाखला दिला जातो अशी कोणत्याच प्रकारची यंत्रणा नसते. एकूणच भारतात जन्म नोंदणीचा दर हा ३४.७% इतका आहे. उत्तर प्रदेश, बिहारमधून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. त्यामुळे तिथला जन्मदर हा ६.५% आणि १.६% इतका आहे. याचाच अर्थ काही स्थलांतरित कामगारांकडे आपल्याविषयीची योग्य ती माहितीही उपलब्ध नसते.

सरकारने नुकतीच आधार कार्ड ही योजना सुरू केली आहे आणि त्या कार्डावरील १६ आकडी नंबर ही त्या त्या प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक ओळख म्हणून त्याचा उपयोग हा जनगणनेसाठी होऊ शकेल अशी धारणा आहे. मात्र रेशनकार्ड आणि जन्मदाखला हे विशेष महत्त्वाचे पुरावे समजले जातात. रेशनकार्डावर कुटुंबप्रमुख आणि कुटुंबातील इतर सदस्यांची सविस्तर माहिती उपलब्ध होऊ शकते.

त्याचप्रमाणे टेलिफोन बिल, बँकेचे पासबुक या गोष्टीही पुरावा म्हणून ग्राह्य धरल्या जातात.

स्थलांतरित कामगारांच्या मूळ वतनातील रेशनकार्डावरील नाव कमी करणे किंवा ज्या ठिकाणी हे कामगार काम करतात त्या ठिकाणी नवीन रेशऩकार्ड देणे तितके सहजशक्य होत नाही.

मंहाराष्ट्र – ५, ६५ ४०० internal migration in India (दिल्ली – ४,३५८,५००), गुजराथ (२,०७७,८००) गुजराथमध्ये सर्वाधिक अधिक स्थलांतरित कामगार पहायला मिळतात. खूप कमी गुजराथी लोक कामासाठी गुजराथमधून बाहेर पडतात.

उत्तर प्रदेश – ८,५२४,१००

बिहार – ४,८१२,३००

४१% स्थलांतरित कामगार हे उत्तर प्रदेशातून महाराष्ट्रात येतात. मुंबई, दिल्ली, पंजाब ही ठिकाणेही आहेत. गुजराथचा नंबर नंतर लागतो.

**(Social inclussion of internal migrants in India. 2011 Census प्रमाणे)**

गुजराथ जिल्ह्यातील सुरत इथे मोठ्या प्रमाणात स्थलांतरित कामगार येतात. त्याचबरोबर अलंग रिसायकलिंग शीपयार्डातही सुमारे ३० हजाराहून अधिक स्थलांतरित कामगार हे जहाज तोडणीच्या कामात व्यस्त आहेत. सुरत इथे हे स्थलांतरित कामगार हे सूत गिरण्यांमधून मोठ्या प्रमाणावर काम करत आहेत. या स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वक्तव्य केले आहे आणि या उत्तर प्रदेशातील स्थलांतरित कामगारांबद्दल त्यांनी दयाही दाखविली होती आणि हे कामगार आपल्या उत्तर प्रदेशातच रोजगाराच्या संधी का शोधत नाहीत या प्रश्नाला प्रतिउत्तरही देण्यात आले आहे की अंबानी आणि अडानी हे जर भारतातल्या कुठल्याही गावात जाऊन व्यापार करू शकतात मग उत्तर प्रदेशातील स्थलांतरित कामगार गुजराथमध्ये येऊन काम करू लागले तर त्यात वावगे वाटण्याचे कारण काय.

२०१२ मध्ये भारतात अंदाजे ४८७ मिलियन कामगार म्हणून नोंद झालेली दिसून येत आहे. त्यात आता नक्कीच वाढ झालेली आहे. चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. चीन ७९५ मिलियन, भारत ४८७ मिलियन, युनायटेड स्टेटस् १५४ मिलियन)

भारतात मोठ्या प्रमाणात असंघटित क्षेत्रात कामगार काम करताना दिसून येत आहेत. यात अगदी घरातील छोटी दुकाने, रस्त्यावरील विक्रेते यात आपल्याला लहान मुलांचाही समावेश आहे. त्यात हस्तकलेपासून तयार केलेल्या वस्तूची निर्मिती करणारे छोटे छोटे कारखाने त्यातही या कामगारांचा समावेश असतो. काही मुले फरशी कामातही व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

भारतीय श्रम मंत्र्यांनी २००८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार यांनी या असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची चार विभागात वर्गवारी केली होती. कोणत्या उद्योगात हे काम करत आहेत, तेथील त्यांचे कामाचे स्वरूप काय आहे, त्याची प्रतवारी आणि त्यांना मिळणारी सेवा कशी आहे.

या कामगारांमध्ये छोटे शेतकरी, भूमीहीन शेतकरी, पीक कापणारे, मासेमारी करणारे त्याचप्रमाणे पशुपालनाची कामे करणारे, बीडी वळणारे कामगार, लेबल आणि पॅकिंग करणारे कामगार, बांधकाम क्षेत्रात काम करणारे कामगार, वीणकाम करणारे, हिऱ्याला पैलू पाडणारे, मीठ कामगार, वीटभट्टीवर काम करणारे कामगार, दगड फोडणारे त्याचप्रमाणे जहाजांची तोडणी त्याचप्रमाणे लाकडाच्या वखारीत काम करणारे, तेलाच्या कारखान्यात (Oil Mills) मध्ये काम करणारे या सर्वांचा समावेश होतो.

त्याचप्रमाणे शेतात काम करणारे शेतमजूर, वेठबिगार यात काही कामगार हे नुसतेच काम करतात तर काही कराराने बांधलेले असतात.

याचबरोबर दारु तयार करणारे, कचरा गोळा करणारे, अवजड सामान उचलणारे, माल चढविणे आणि उतरविण्याचे काम करणारे या सर्वांचा समावेश ही असंघटित कामगारांमध्ये समावेश होतो. त्याचप्रमाणे सेवा देणारे कामगार ज्यात आया, घरकाम करणाऱ्या महिला, न्हावी, भाजी आणि फळ विक्रेते, पेपर विक्रेते, फुटपाथवरील विक्रेते आणि फुटकळ विक्री करणारे या सर्व लोकांचा समावेश होतो.

असंघटित क्षेत्रात उत्पादन कमी त्यामुळे वेतनही कमी मिळते.

## ओरिसा स्थलांतर

भारतात ३० मिलियन कामगार हे विशिष्ट काळापुरते स्थलांतर करणारे लोक आहेत. त्यापैकी २.५% वाटा हा ओरिसाचा प्रत्येक दुसऱ्या दिवशी स्थलांतरित कामगारांचे शोषण त्यांच्यावर अन्याय झाल्याच्या बातम्या आपण वर्तमानपत्रातून वाचतच असतो.

अन्न सुरक्षा कायद्याखाली ओरिसातील गरीबातील गरीब लोकांना धान्य पुरविण्याची योजना आखली गेली आहे. त्यात ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब कामगार वर्गाचा समावेश आहे. १९९७ साली दारिद्य रेषेखालील गरीब लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. (NFSA) ही योजना फेब्रुवारी महिन्यात सुरू झाली. ही योजना ऑगस्ट २०१७ पर्यंत चालू राहील. स्थलांतरित झालेले लोक या योजनेत आपले नाव नोंदणी करण्यासाठी परत येतात.

## स्थलांतरित कामगारांना मतदानाचा हक्क :

१३ जानेवारी २०१४ रोजी सुप्रिम कोर्टाने अनिवासी भारतीयांना मतदानाचा हक्क दिला आहे. स्थलांतरित कामगारांची संख्याही खूप मोठ्या प्रमाणात आहे. पोलीस, सैन्य दलातील लोक, इलेक्शन ड्युटीवर असणारे लोक यांना पोस्टाद्वारे मतदानाचा हक्क बजावता येतो. मात्र या स्थलांतरित कामगारांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

## वेठबिगारी :

ओरिसा राज्यातून जे कामगार स्थलांतरित होतात त्या कामगारांना वेठबिगारीचे जीवनही जगावे लागते. १३ वर्षाचा सुशांत कुंभार हा ओरिसातील बोलागिर जिल्ह्यातील एक मुलगा ज्याचे खेळण्या बागडण्याचे दिवस त्या वयात त्याला वेठबिगारी करावी लागत होती. जानेवारी महिन्यात त्याच्या मालकाने त्याच्या डाव्या हाताला दुखापत केली होती. तो कर्नाटक राज्यात वीटभट्टीवर काम करत होता. या मुलाचे आई वडीलसुद्धा मजबुरीने इथे काम करत होते. वर्तमानपत्रातही या बाबतीत खूप चर्चा झाली होती. ओरिसा मानवी हक्क समितीने या मुलाला ५० हजार रुपयांची मदत मिळवून दिली होती. मुलाच्या आईवडिलांनी आपला मुलगा अपंग झाल्यामुळे त्याला सरकारने योग्य ते औषधपाणी व एखादी नोकरीही द्यावी अशी विनंती केली आहे. Bonded labour abolition Act या संदर्भातली जी कागदपत्रे सरकारने व संबंधित खात्यातील अधिकाऱ्यांनी

उपलब्ध करून न दिल्याने या लोकांना हक्काचे पैसेही मिळू शकलेले नाहीत. तरीही त्यांनी आशावाद सोडलेला नाही.

ओरिसातून मध्यस्थी लोकांच्या मार्फत सुमारे १ लाखाहून अधिक लोक इतर राज्यात कामासाठी पाठविण्यात आले आहेत. ३४४४ एजंटामार्फत सुमारे १,१९,००१ इतके कामगार दुसऱ्या राज्यात कामासाठी पाठविण्यात आले आहेत. आंध्र प्रदेश, तेलंगाणा, तामिळनाडू आणि कर्नाटकात हे कामगार पाठवले जातात. बोलागिर व खुर्दा जिल्ह्यातूनही जे अधिकृत एजंट नाहीत त्यांच्यामार्फतही जबरदस्तीने या लोकांचे स्थलांतर केले जाते आणि ज्या ठिकाणी या लोकांना कामासाठी पाठविले जाते तिथे त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोईसुविधा इथे उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. १५९ अनधिकृत एजंटावर फौजदारी गुन्हाही नोंदविण्यात आला आहे.

राज्य सरकारने ३०४६ एजंटांना परवानगी दिली आहे. त्यांनी सुमारे १ लाख १८ हजार ४५१ कामगारांना दुसऱ्या राज्यात कामासाठी पाठविले आहे. २४२ कामगारांनी कामाच्या ठिकाणी आपला अमानुष छळ झाल्याच्या तक्रारीही नोंदविल्या आहेत.

या संदर्भात पार्लमेंट सदस्यांनी आंध्र प्रदेशातील वीटभट्टीच्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटून आंध्रातील अधिकाऱ्यांच्या बरोबर चर्चा केली आणि या कामगारांना योग्य वेतन व चांगल्या सोईसुविधा पुरविण्यासंदर्भात सक्ती केली. सुमारे ५३८ वेठबिगार कामगारांना परत ओरिसात परत आणण्यात आले. एकूण ५७ केसेस नोंदविण्यात आल्या आहेत. बोलगिरि, नौपाडा, कालाहंडी, बारगर, सोनेपूर आणि संबलपूर या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणावर कामगार स्थलांतरित होत असतात. या स्थलांतरित कामगारांना अतिशय अमानवी अशी वागणूक दिली जाते. त्यांच्या निवासाची योग्य व्यवस्था नसते की त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचीही कुठल्याच प्रकारची सोय नसते तरीही राज्य सरकार या कामगारांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची दक्षता घेत नाही. या लोकांच्या बाबतीत योग्य ती माहितीही संकलीत केली जात नाही.

महात्मा गांधी नॅशनल रुरल रोजगार हमी योजनेअंतर्गतही कुठल्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. १०० दिवस रोजगार ही योजना फक्त मागासवर्गीय भागातच राबविण्यात येते.

स्थलांतरित कामगारांची मोठी संख्या सुरतमध्ये असून ती एक मोठी वोट बँक आहे. हे स्थलांतरित कामगार टेक्सटाईल आणि पॉवर लूम इंडस्ट्रीजमध्ये काम करताना दिसून येत आहेत. राजकीय पुढारी निवडणुकानंतर या लोकांना पूर्णपणे विसरून जातात. हे निम्न स्तरातील गरीब, दलित, आदिवासी, अनुसुचित जाती जमातीचे लोकच स्थलांतरित कामगार म्हणून काम करत असतात.

**बालमजूर :**

२००१ च्या जनगणनेनुसार भारतात सुमारे १२.६ मिलियन एवढे बालकामगार काम करताना आढळून आले. ५ ते १४ वयोगटातील ही मुले होती. ६०% मुले ही असंघटित क्षेत्रात काम करताना आढळली. गरीबी, शाळेचा अभाव, अर्थाजनाचा अभाव या गोष्टी बालमजुरीला कारणीभूत ठरतात. आजही समाजात चोरीछुपीने बालमजुराकडून काम करवून घेतले जाते. पण गरीबी आणि परिस्थितीपुढे विवशता येते आणि हे बालकामगार काम करताना दिसतात.

मात्र आता भारतीय दंडविधान कलम २४ अंतर्गत बालमजुरी प्रतिबंध कायद्यानुसार बालमजुरीवर पूर्णतः बंदी घालण्यात आलेली आहे.

गुजराथ राज्यात प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, झारखंड राज्यातले कामगार स्थलांतरित होताना दिसतात. हे लोक इथे रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरित होतात तर गुजराथमधील स्थानिक लोकांनी केलेले स्थलांतरापाठीमागे गुजराथमधील हिंदु–मुस्लिम दंगली कारणीभूत ठरलेल्या आहेत. गोधरा हत्याकांडानंतर हे स्थलांतराचे प्रमाण वाढलेले आहे. या स्थलांतर करणाऱ्या लोकांमध्ये मुस्लीम तरुणांचे प्रमाण अधिक आहे. जे शेजारच्या राज्यातील राजस्थानमध्ये जाऊन स्थलांतरित होत आहेत व अहमदाबाद दिल्ली हायवेवर ते स्वतःचा धाबा चालवत आहेत. हे स्थलांतरित झालेले युवक प्रामुख्याने बनासकाठा, साबरकाठा, पाटण आणि मेहसाणा जिल्ह्यातले आहेत.

केरळातसुद्धा मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होणाऱ्या कामगारांच्या संख्येत गेल्या दहा वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. (4.8 million) येणारे कामगार हे प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रात काम करायला येतात. स्थलांतरित होणाऱ्या कामगारांमध्ये ७५% कामगार हे प्रामुख्याने

प. बंगाल, बिहार, आसाम, उत्तर प्रदेश व ओरिसामधून येतात. (Domestic migrant labour in Kerala)

केरळात दरवर्षी सुमारे २.३५ लाख कामगार इथे रोजगारासाठी स्थलांतरित होतात. या कामगारांमध्ये १८ ते ३५ वयोगटातील युवक वर्गच जास्त असतो. हे कामगार एकटेच इथे कामाला येतात अशी माहिती केरळचे कामगार मंत्री यांनी राज्यसभेला दिली. (Dr. Narayana C. S. व्यंकटेश्वरन, M.P.Joseph (Domestic Migrant labour in Kerala) यांनी हा अभ्यास केलेला आहे.

या अभ्यासाच्या माहितीनुसार दिवसाला ३०० रुपये प्रमाणे मजुरी घेणारे कामगार हे ७०% आहेत. याशिवाय हे कामगार हॉटेल, रेस्टॉरंट, मॅन्युफॅक्चरिंग कंपन्या त्याचप्रमाणे शेतीतही हे कामगार काम करतात. आठ ते दहा तास हे लोक इथे प्रामाणिकपणाने काम करतात.

इतर राज्यांपेक्षा केरळ राज्यात या स्थलांतरित कामगारांना थोडे जास्त वेतन व वेळेत पैसे चुकते केले जातात. मात्र या कामगारांनाही एका एका छोट्या खोलीत आठ ते दहा जणांना एकत्र रहावे लागते. पाणी व शौचालयाची व्यवस्था नसते. ज्या ठिकाणी काम चालू आहे त्याच्या जवळच हे लोक राहत असतात. या कामगारांनाही सोईसुविधा देण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत व या कामगारांचीसुद्धा एकत्रित नोंद ठेवली गेली पाहिजे. अशा सूचनाही अभ्यासकांनी केल्या आहेत.

## १.१५ प्रस्तावना समस्या सूत्रण :

संशोधनाची सुरुवात ही वैज्ञानिक पद्धतीप्रमाणेच विषयाच्या निवडीपासून होते. सर्वप्रथम संशोधकाला कोणत्या विषयाच्या संदर्भात संशोधन करायचे आहे हे निश्चित करावे लागते. संशोधकाने आपल्या अध्ययन विषयाची निवड अतिशय काळजीपूर्वक केली पाहिजे. विषयाची किंवा त्याच्या विवक्षित पैलुची निवड म्हणजे समस्या सूत्रण होय. विषयाची निवड करणे ही सामाजिक संशोधनाची अतिशय कठीण पायरी आहे.

## समस्या सुत्रण– संशोधन Statement of the Problem

स्थलांतरित असंघटित कामगारांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध होत नाहीत, मिळेल तिथे आणि मिळेल ते काम करण्यासाठी त्यांना स्थलांतरित व्हावे लागते. त्यांच्या कामाची वा वेतनाची हमी नसते. त्यांना कुठल्याही प्रकारचे आर्थिक स्थैर्य वा सामाजिक सुरक्षितता नसते. या स्थलांतरित असंघटित कामगारांच्या वर्गीकरणामधे प्रामुख्याने शेतमजूर,

वीटभट्टी कामगार, मीठ कामगार, उस तोडणी कामगार, हिऱ्याला पैलू पाडणारे हिरे कारागिर, रस्ते बांधणी, इमारत बांधणी, डिटर्जन्ट, प्लॉस्टिक उद्योग व छोट्या छोट्या इंडस्ट्रीजमधे काम करणारे कामगार या वर्गीकरणातील सर्व कामगारांना या सर्व अडचणींना सामोरे जावे लागले.

वरील वर्गीकरणातील कामगारांप्रमाणेच गुजराथ राज्यातील भावनगर येथील अलंग रिसायकलींग शीपयार्डात जे स्थलांतरीत कामगार काम करत आहेत. त्यांनाही अत्यंत कष्टाचे व जोखीमपूर्ण काम करावे लागत आहे. त्यांना कुठल्याही प्रकारच्या सेवा सुविधा किंवा त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तताही इथे होत नाही. ते अतिशय हलाखीचे जीवन जगत असतात. त्यांना ज्या ज्या संघर्षाला अडीअडचणीला सामोरे जावे लागते त्या सर्व गोष्टींचा शोध घेण्याचा त्या सर्व समस्यांचे संशोधन करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला जाणार आहे.

अलंग शीपयार्डात काम करणारे हे असंगठित स्थलांतरित कामगार प्रामुख्याने मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, नेपाळ, झारखंड, पं. बंगाल नेपाळ, आंध्रप्रदेश, तामीळनाडू, राजस्थान व महाराष्ट्रातील आहे. उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, झारखंड या राज्यातील कामगारांचे प्रमाण अधिक आहे व इतर राज्यातील लोकांचे प्रमाण खूप कमी आहे या सर्व कामगारांना कोणकोणत्या वर्चस्ववादी प्रवृत्तींचा सामना करावा लागतो. कामगारा–कामगारांमधील सहसंबंध कसे आहेत या बाबतीतही सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे सर्व कामगार आपल्या मूळ स्थानापासून रोजगारासाठी आपल्या कुटुंबापासून मुलाबाळापासून दूर आलेले असतात. या दुराव्याचा एकूणच या कामगारांच्या जीवनावर कसा परिणाम होतो याचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## १.१६ संशोधनाची उद्दिष्टे

(१) अलंग शीपयार्डातील स्थलांतरीत कामगारांच्या बदलत्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

(२) स्थलांतरापाठीमागच्या मूळ सामाजिक कारणांचा शोध घेणे.

(३) मालक/कंत्राटदार/दलाल यांच्याकडून या कामगारांचे शोषण कशा स्वरूपात केले जाते याचा अभ्यास करणे.

(४) जहाज तोडणीच्या अतिशय जोखीमपूर्ण कामाचा असुरक्षित पर्यावरणाचा कामगारांच्या आरोग्यावर होणारा परिणाम जाणून घेणे.

(५) अलंग शीपयार्डातील कामगारांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक व मूलभूत गरजांपासून कसे वंचित ठेवले जाते या गोष्टींचा अभ्यास करणे.

(६) या असंघटित कामगारांसाठी तेथील शीपयार्डाचे व्यवस्थापन शासन व सामाजिक संस्थाकडून कशा प्रकारे सहकार्य केले जाते हे जाणून घेणे.

(७) या कामगारांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी शासनाला उपाययोजना सुचविणे.

## १.१७ गृहितके

**प्रस्तावना:–**

सामाजिक संशोधन प्रक्रियेत जो विषय संशोधकाने अभ्यासासाठी निवडला आहे, त्याचा प्रचंड असा आवाका असल्याने आपल्या समस्यासुत्रणाचे एक संभाव्य उत्तर म्हणून संशोधकाला गृहित धरून चालावे लागते. त्यालाच गृहितकृत्य असे म्हणता येईल. गृहितके ही संशोधकाला दिशादर्शक व मार्गदर्शक ठरतात. गृहितकावरून संशोधनानंतर निवडलेले विधान चूक की बरोबर हे पडताळता येते. परंतू ते चूक की बरोबर हे पडताळता येते. परंतू ते चूक की बरोबर हे सांगता येत नाही. कारण ते संभाव्य धरलेले असते.

अर्थ:– संशोधनात नेमकेपणा आणण्यासाठी नेमक्या पैलुचा संशोधकाने केलेला विचार म्हणजे गृहितकृत्य होय.

व्याख्या:– (१) सी.टी. कुरीअन यांच्या मते, ''निरीक्षण अभ्यास विषयातील संभाव्य स्पष्टीकरण म्हणजेच गृहितकृत्य होय. (२) बोगार्डस:– परीक्षण केल्या जाणाऱ्या विधानांना गृहितकृत्य असे म्हणतात. (३) पॉलीन यंग यांच्या मते, कार्यवाहक गृहितकृत्य हा एक केंद्रिय कार्यवाहक विचार असून तो संशोधनाचा आधार असतो. (४) स्मार्ट यांच्या मते, ''अगोदरच ज्ञात असलेल्या तथ्यांच्या संबंधाचे स्पष्टीकरण करणारा नियम म्हणजे गृहितकृत्य होय.

अलंग रिसायकलींग शीपयार्डाला समक्ष भेट दिली. पायलेट स्टडी नंतर दोन–तीन वेळा भेट दिल्यानंतर जे निरीक्षण अवलोकन केले तसेच या विषयासंदर्भात जनरल, रिपोर्ट विविध समाजशास्त्रीय साहित्याचा आढावा घेतला. या विषयाचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींना भेटून या विषयाच्या संदर्भात माहिती जाणून घेतली आणि त्यानंतरच खालील गृहितके मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(१) गरीबी, कर्जबाजारीपणा, भूमिहीन व बेरोजगारी हे ढकलणारे (push factors) आणि खर्ची, उचल रोजगाराची हमी, भौतिक सुख–सोयी हे खेचणारे (pull factors) हे घटक असंघटित कामगारांच्या स्थलांतरासाठी कारणीभूत ठरतात. (२) अलंग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे जीवन व दैनंदिन कामकाज हे मालक/ठेकेदार कंत्राटदार यांच्या मार्फत नियंत्रित केले जाते.

## १.१८ संशोधन विषयाचे महत्त्व

### संशोधनाचे महत्त्व

**प्रस्तावना :–** हा समग्र अभ्यास कारण्यापाठीमागचा मूळ उद्देश हाच आहे की, शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांना आजही ज्या विपरीत परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आजही त्यांचे ज्या प्रकारे शोषण केले जात आहे ते शोषण थांबविण्यासाठी या कामगारांच्या बाजूने उभे राहून त्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देणारी एखादी तरी कामगार संघटना इथे कार्यरत व्हावी, गुजराथ मेरी टाईम बोर्ड, शीप ब्रेकर्स व कामगार या तिघांमधेही सुसंवाद प्रस्थापित व्हावा. असा या संशोधनापाठीमागचा मुख्य उद्देश आहे.

या अभ्यासामुळे शासनाकडूनही काही योग्य अशा उपाययोजनांची अमंलबजावणी होऊ शकेल या अभ्यासामुळे शासनाला स्थलांतरित कामगारांची अवस्था कशी आहे हे समजू शकेल.

## विषयाचे महत्त्व (Significance of the study)

भारतातील एक अत्यंत महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र म्हणून आज अलंग या गावाची ओळख झालेली आहे. एकेकाळी फक्त शेती आणि मासेमारी एवढ्याच उद्योगाच्या कक्षा असलेल्या अलंग गावाचा आज चेहरा मोहराच बदललेला आहे. १९८३ साली पासून इथे जहाज तोडणीला सुरुवात झाली असून या उद्योगामुळे आजूबाजूच्या परिसरातही विविध प्रकारच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. तेथील लोकांचा आर्थिक व सामाजिकही आमुलाग्र असा बदल घडून आलेला दिसत आहे.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे सर्वच कामगार हे स्थलांतरित आहेत व ते प्रामुख्याने उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, नेपाळ, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, राजस्थान व महाराष्ट्रातील आहेत. या स्थलांतरित कामगारांची संख्या सुमारे ३०,००० च्या घरात आहेत.

आपण काही ठराविक कालावधी साठी व विशिष्ट कामासाठी स्थलांतर करणारे कामगार पाहतो त्यात शेतमजूर, इमारत बांधकाम, मीठ कामगार, हिऱ्याला पैलु पाडणारे हिरे कामगार, सूत गिरणीत काम करणारे वीटभट्टी व उसतोडणी कामगार हे सुद्धा स्थलांतर करतात. परंतु यांचे स्थलांतर हे विशिष्ट काम व विशिष्ट कालावधी पुरते मर्यादित असते. तसेच हे सर्व कामगार आपल्या कुटुंबासोबत कामाच्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. मात्र अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगार हे बहुतांशी पुरुषच आहेत आणि ते सर्व जण एकटेच कामासाठी आपल्या कुटुंबाना मागे ठेवून रोजगारासाठीइथे स्थलांतरित होत असतात आज काही अंशी आपल्या कुटुंबासोबत ही अलंग इथे येणाऱ्या कामगारांचे प्रमाण आहे. पण ते अतिशय नगण्य असे आहे. प्रामुख्याने २५ ते ५५ या वयोगटातील पुरुष वर्गच इथे आपल्याला काम करताना दिसूत येत आहे. त्यामुळे या अभ्यासाचे वेगळेपण दिसून येत आहे.

असंगठित व स्थलांतरित कामगारांचे सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आपल्याला शोषण होताना दिसून येते. अलंग इथे काम करणाऱ्या कामगारांना अतिशय कष्टप्रद व अत्यंत धोकादायक परिस्थितीत काम करावे लागते. या कामगारांना म्हणाव्या तश्या कुठल्याच सुविधा पुरविल्या जात नाहीत. सतत मुकादमाच्या दबावाखाली या कामगारांना काम करावे लागते. या परराज्यात परिस्थितीवशतमुळे इथे स्थलांतरित होताना दिसून येत आहेत. आपल्या कुटुंबापासून हे कामगार बराच कालावधी दूर राहतात. मानवाच्या मूलभूत गरजापैकी शारिरीक गरज ही एक महत्त्वाची गोष्ट असून ते आपल्या नैतिक गरजेला कसे सामोरे जातात. सर्व समान वयोगटातील पुरुष एकत्र राहत असल्याने त्यांच्यात काही अनैतिक संबंध प्रस्थापित होतात किंवा ते वेश्यावृत्तीकडे वळतात का हे शोधण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे.

या विषयाचा आढावा घेताना लक्षात आले की पीएच.डी प्रबंधासाठी हाविषय कुणी निवडलेला नाही. डॉ. सुमनबेन चौधरी यांनी जो विषय सादर केला आहे. तो अलंग रिसायकलींग शीपयार्डामुळे आजूबाजूच्या परिसरावर झालेला प्रभाव त्यांनी आपल्या शोधनिबंधातून दाखवलेला आहे. डॉ. विद्युत जोशी (अहमदाबाद) पटेला द मधील श्री. मोदी व श्री. मिश्रा यांनी यु. जी. सी. च्या मार्फत या कामगारांच्या संदर्भात रिपोर्ट सादर केलेले आहेत.

इतर सर्व असंघटित कामगारांप्रमाणेच शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांमधे स्थलांतर आणि शोषण हे समान सुत्र आहे. यांच्याही कामाचे स्वरुप अतिशय जोखमीचे धोक्याचे व अनिश्चित

आहे. जॉन ब्रेमन व इतर सर्व सामाजिक अभ्यासकांनी इतर सर्व असंघटित स्थलांतरित कामगारांचा अभ्यास केला असून यात उस तोडणी कामगार, वीटभटी, दगड फोडणारे, शेतमजूर, रस्तेबांधणी, इमारतबांधणी, मोठ कामगार, बालकामगारांचा अभ्यास केलेला आहे. परंतु अलंग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचा अभ्यास केलेला नाही. त्यामुळे या अभ्यासाचे वेगळेपण आहे. त्यासाठीच मी या विषयाची निवड केली आहे. त्या विषयाला अनुसरून पुस्तकाचे वाचन रिपोर्ट संदर्भग्रंथ वाचून या विषयाची वास्तविकता मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.१९ संशोधनाच्या मर्यादा

**प्रस्तावना** :– कोणतीही गोष्ट हाती घेतली की, ती पूर्णत्वास नेईपर्यंत आपणास नेहमीच वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जावे लागते. पण आलेल्या अनुभवातूनच आपल्याला खूप काही शिकायला मिळते. येणाऱ्या अडचणींवर मात करतच आपण यातून मार्ग काढत असतो आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहचत असतो. समाजशास्त्रात संशोधनाला खूप महत्त्व आहे. आपण संशोधनासाठी जो विषय निवडलेला आहे. तो निवडताना आपण हे संशोधन अगदी सहजपणे पूर्ण करू असे वाटत असले तरी जेव्हा आपण प्रत्यक्षात कामाला सुरुवात करतो तेव्हा त्या संशोधनाच्या मर्यादा आपल्याला जाणवून येतात आणि संशोधनाचे कामही कठीण असल्याचे आपल्या लक्षात येते. पण त्यातूनही आपण योग्य तो मार्ग काढून संशोधन पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे शोषण : एक समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे. अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे सर्वच कामगार हे प्रामुख्याने बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश, पं. बंगाल, झारखंड या राज्यातून येतात. या लोकांच्या शोषणा संदर्भात संशोधन करणे एक आव्हानच होते. अलंग रिसायकलींग शीपयार्ड हे गुजराथ राज्यातील भावनगर शहरापासून ५0 कि. मी. अंतरावर स्थित आहे. त्यामुळे या शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलाखती व एकूणच समग्र अभ्यास करण्यासाठी किमान चार ते पाच वेळा प्रत्यक्ष जागेवर जाऊन भेट देणे अपेक्षित होते.

अलंग शीपयार्डपर्यंत जाणे एक वेळ सोपे होते. परंतु अलंग रिसायकलींग शीपयार्ड हे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे तिथे नवख्या माणसाला सहजासहजी प्रवेश मिळणे शक्य होत नाही. त्यासाठी आधी पूर्व परवानगी घ्यावी लागते. अन्यथा यार्डात काम करणारे वा स्थानिक लोकांची ओळख असणे खूप गरजेचे आहे. पूर्व परवानगीसाठी अहमदाबाद येथील गुजराथ मेरी

टाईम बोर्डाशी आपल्याला पत्रव्यवहार करावा लागतो. पूर्व–परवानगी शिवाय आपण तिथे कुठल्याही प्रकारचे फोटो काढू शकत नाही रेकॉर्डिंग करू शकत नाही. या साऱ्या सूचना अलंग रिसायकलींग शीपयार्डाच्या मुख्य ऑफिसमध्ये लिहिलेल्या आहेत. कारण जहाज तोडणीचे अत्यंत जोखीमपूर्ण असे काम प्रत्येक प्लॉटवर चालू असते. आणि प्रत्येक प्लॉट मधे सुमारे १०० ते १५० कामगार वेगवेगळी कामे करत असतात. या कामगारांना अतिशय कष्टप्रद आणि जोखीमपूर्ण वातावरणात काम करावे लागते. काम करताना सुरक्षेचे सर्वनियम पाळले जातातच असे नाही. तरीही अशा जोखीमपूर्ण अवस्थेत इथले कामगार काम करत असतात आणि ही सत्य परिस्थिती बाहेर जाऊ नये यासाठी सर्वांचाच आटापिटा सुरू असतो. त्यामुळे इथे शीपयार्डात नव्या माणसांवर इथल्या अधिकाऱ्यांचा वचक असतो. त्यामुळे इथे काम करणाऱ्या कामगारांशी बातचीत करणे तसे सहज सोपे काम नव्हते.

दुसरी गोष्ट सुरुवातीला हे कामगारही मुलाखती द्यायला तयार होत नाही त्यांच्या मनातही साशंकता असते. त्यामुळे इथल्या स्थानिक लोकांना मध्यस्थी करून या कामगारांपर्यंत पोहचणे शक्य होते. एकदा त्यांचा विश्वास बसला की मग मात्र ते सारे काही मोकळेपणाने बोलायला तयार होतात.

अलंग रिसायकलींग शीपयार्ड हे गुजराथ राज्यात आल्यामुळे संशोधकाला तेथील स्थानिक गुजराथी भाषा थोडीफार समजणे व बोलता येणे अपेक्षित आहे. कारण आपण तिथल्या स्थानिक लोकांशी त्यांच्या भाषेतच संवाद साधल्याने थोडा आपलेपणा निर्माण होतो. आणि मग आपला नेमका काय उद्देश आहे हे त्यांना समजावून सांगितले असता हे स्थानिक लोकही आपल्याला या कामगारांच्या प्लॉटपर्यंत किंवा ते ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी घेऊन त्यांच्याशी बातचीत करण्यास सहकार्य करतात.

स्थानिक लोकांशी गुजराथी भाषेत संपर्क साधायचा आणि या कामगारांशी संपर्काची एकमेव भाषा म्हणजे हिंदी त्यामुळे कामगारांशी बोलताना मात्र हिंदीतून बोलावे लागते.

त्याचप्रमाणे वेळ आणि पैसा या जशा महत्त्वाच्या मर्यादा आहेत त्याचप्रमाणे या कामगारांशी बातचीत करताना त्यांच्याही वेळापासून त्यांच्या कामात कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी लागते. त्यांच्या जेवणाच्या सुट्टीचा एक तास व चहाच्या सुट्टीच्या अर्धा तासात हे कामगार भेटतात. त्या मिळालेल्या वेळेचा उपयोग करून घ्यावा लागतो. कारण या कामगारांची कामाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत असते. रात्री काम केल्याने ते

खूप थकलेले असतात त्यामुळे त्यांच्याशी तेव्हा बोलणे शक्य होत नाही. तशातही काही कामगार खूप मनमोकळे पणाने आपल्या समस्या मांडत असतात. परंतू त्या व्यक्त करताना त्यांनाही मर्यादा या येतातच.

रविवार जरी सुट्टीचा दिवस असला तरी कामगार आपल्या राहिलेल्या आठवड्याभराच्या कामांना व विश्रांतीला प्राधान्य देतात. संध्याकाळी आठवड्यभराचे सामान भरायला भाजीपाला आणायला त्यांना जायचे असते. त्यामुळे रविवारी आपल्या दृष्टीने कामगार उपलब्ध असले तरी सुद्धा ते विश्रांतीला अधिक महत्त्व देतात.

रात्रीच्या वेळी शीपयार्डात थांबणे तसे धोकादायक आहे. एक तर प्रतिबंधित एरीया शिवाय ज्या ठिकाणी हे कामगार राहतात त्या ठिकाणी लाईटसुद्धा नसल्याने खूप अंधार असतो. रात्रीच्या वेळी स्थानिक गुंडाचा सुद्धा सिसेमेरा सुरू असतो. अशा परिस्थितीत कोणताही बिकट प्रसंग उदभवू शकतो. त्यामुळे रात्रीच्या वेळी इथे थांबता येऊ शकत नाही. ही पण एक मोठी मर्यादा संशोधन करताना येते.

कामगारा–कामगारांतील सहसंबंध मुकादम, मालक यांच्यातील सहसंबंधही या कामगारांच्या बातचीतीतून उलगडत जातात. त्यामुळे सत्य परिस्थिती एखाद्या कामगाराला आपल्या पुढे मांडायची असते परंतु इथेही दबावतंत्राच्या प्रभावामुळे तो कामगारही सत्य परिस्थिती मांडता मांडता अचानक थांबून जातो. त्यामुळे अशाही बाबींमुळे माहिती संकलीत करताना मर्यादा येतात.

छायाचित्रे घेतानाही मर्यादा येतात. परंतू स्थानिक लोकांना बरोबर घेतले असता हे काम थोडे आणखीन सोपे होते. तेथील फॅमिली प्लॉनिंग तसेच एडस् प्रोजेक्ट, वर काम करणारे अधिकारी या कामगारांच्या मुलाखती घेण्यात आपल्याला खूप सहकार्य करतात. त्यामुळे माहिती संकलीत करणे शक्य होते.

शीप ब्रेकर्स यांची ऑफिसे ही भावनगर इथेच थाटलेली आहेत. ते संध्याकाळी चारच्या पुढे अलंगच्या प्लॉटवर येतात. त्यांच्याशी मुलाखतीच्या पूर्वनियोजित वेळा ठरवून जरी आपण गेलो तरी ते त्या वेळा पाळतीलच असे होत नाही. काही समक्ष भेटूनही आपण आता कामात खूप व्यस्त आहोत असे सांगून मुलाखती देण्याचे टाळतात. एकंदरीत काही अधिकारी थोडेफार तरी बोलतात. पण एकंदरीत सगळ्यांची टाळण्याचीच वृत्ती अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे या

लोकांच्याही बाजू समजून घेण्यास थोड्याफार अडचणी या येतातच. त्यामुळे ह्या विषयाची व्याप्ती जशी अथांग आहे त्याचप्रमाणे त्याला मर्यादाही अनेक आहेत. हे ही तितकेच महत्त्वाचे आहे

## समारोप :

पहिल्या प्रकरणात अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्डाची निर्मिती व त्या पाठीमागची भूमिका आपण जाणून घेतली. अलंग गावाचा इतिहास शीपयार्डाच्या निर्मिती पूर्वी आणि शीपयार्डाच्या निर्मिती नंतर एकूणच अलंग गावावर त्याचा पडलेला प्रभाव आणि एकूणच या शीपयार्डाच्या निर्मितीमुळे अलंग शीपयार्डाच्या निर्मितीमुळे अलंग शीपयार्डाच्या आजूबाजूच्या परिसरातील खेडे–गावांचा झालेला बदल त्यामुळे भावनगर शहराचा झालेला विकास. त्यामुळे इथे कामासाठी येणारा स्थलांतरित कामगार त्यांच्याविषयी सुद्धा सखोल माहिती घेता आली. जगातील भारतातील व गुजराथ राज्यातील बंदराबरोबरच जगातील व भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्रे या विषयी माहिती घेता आली. त्याचप्रमाणे गुजराथ मेरी टाईम बोर्ड व अलंग रिसायकलींग शीप ब्रेकर्स असोसिएशन यांची सुद्धा महत्त्वाची भूमिका जाणून घेता आली. जहाजातील उपलब्ध झालेल्या मालाचा पुर्नवापर त्यामुळे रिसायकलींगचे फायदे तोटे जाणून घेता आले. जनरल व समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या विषयीचा सखोल अभ्यास केल्याने गृहितकांची निर्मिती करता आली. तसेच संशोधनाची समस्या, संशोधनाचे महत्त्व व संशोधन करताना येणाऱ्या मर्यादाही प्रत्यक्षपणे अनुभवता आल्या. अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्ड या पहिल्या प्रकरणात आपण ही सारी माहिती पाहिलेली आहे. आता दुसऱ्या प्रकरणात आपण संशोधन पद्धतीच्या संदर्भात विवेचन पहाणार आहोत.

## संदर्भ सूची :


1) Breman Jan. 1994, wage hunters and catherrs search for work in urban and rural economy of south gujarat. oxford university press, New Delhi.

2) Breman Jan, 1996, Footloose labour, Cambridge University press.

3) Breman Jan. Das arvind 2000 Down and out labouring undar global captializam.

4) Biswaroop 2015 migrant labours in urban areas for social studies surat.

5) D. P. Saxena (1977), migration in India, popular Prakashan Mumbai.

6) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड ३ रा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

7) Ghanshyam shah (1990), migrant labour in india center for social studies surat.

8) डॉ. बी.आर. जोशी, समाजशास्त्र मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

9) Jhabvala Renna & subrmeinam the unorganised sector work, security and social protection SAGE Publication, New Delhi.

10) डॉ. दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

11) प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, २०१३,

12) Kothari and visaria-1984 Rural Urban migration in Gujart in Analisis of census Delta.

13) S.P. Institute of eco. & Sociology Reserech Ahmedbad.

14) Dr. W. N. Salve Reports on Labour rights and Labour Standards for migrant labour in India.

15) M.S.A. Rao 1986

16) डॉ. नीलम ताटके, समाजकार्य कोश २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

17) Studies in migration Internal and International migration in India.

118) Madam G.R. 2009, Indian Social Problems, Allied Publisher mumbai.

11) Ram Aahuja 2007 Social Problems in India Rawat Publication. Jaipur.

12) Ram awtar 1971, Lectures on labour problems and social welfare in India.

13) Ram Aahuja 2007, social problems in India Rawat Publication Jaipur.\

14) Sreenivasuil N.S. 2008, Human rights; many sides to coin. regal publisher new Delhi.

15) Smita panjour 2007, Locked homer empty school, Zubben , New Delhi.

16) T.K. PANDA & P. MAHAPATRA 1997 Report on working and living condition of oriya migrant labours.

17) T.N. Bhogiwal 1965, Labour problems in India, Kitabghar, Kanpur.

18) Tribhwan Robin, Jayshree Patil 2009 Stone quarry workers, Discovery Publishing house, New Delhi,

19) Tribhuwan Robin & Karche Jayshree Child labour and right issue. Astudy of migrant labour, Discovery Publishing house, New Delhi

21) मराठी विश्वकोश खंड १३ (२०००)

22) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ ला व २ डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७)

23) गुरुनाथ नाडगोंडे (२०००) कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे २.

24) सामाजिक विचार प्रवाह, प्रा. पी. के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर.

25) गणपति शंकर १९८२, मंथन कर्णकृष्ण भाग– १,

26) गोरे एम. एस. १९७८, शहरीकरण व कौटुंबिक परिवर्तन.

27) कौशिक आर शुक्ल, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, सरदार पटेल, युनिर्व्हसिटी.

28) डॉ. सुमनबेन चौधरी, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध भावनगर, युनिर्व्हसिटी.

## Internet Webside

1) www.gmb.ports.org

2) www. asain academic

3) www.industiral union.org

4) www. shipbraking platform.org

5) www.lucion marnine.com

## प्रकरण २ रे

# संशोधन पद्धती

२.१. प्रस्तावना (संशोधन)

२.२ संशोधन

२.३ अभ्यास क्षेत्रनिवड

२.४ माहिती संकलन

२.५ नमुना निवड

२.६ वर्गीकरण आणि विश्लेषण

२.७ सैधांतिक दृष्टिकोन

२.८ अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा

२.९ प्रकरणे

# प्रकरण २ रे

# संशोधन पद्धती

**२.१ प्रस्तावना :–** अलंग रिसायकलींग शीपयार्ड येथील स्थलांतरित कामगारांचे शोषण. एक समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे आपल्याला स्थलांतर व शोषण या संकल्पनांवर विशेष भर द्यायचा आहे. वास्तविकता स्थलांतर ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. आणि अगदी प्राचीन काळापासून ते अगदी आजच्या संगणक युगापर्यंत ही प्रक्रिया अविरतपणे चालू आहे. आपण या संशोधनात स्थलांतरित कामगार यांच्या विषयी विवेचन करणार आहोत. आता भारत देशात आपल्याला संघटित व असंघटित असे दोन प्रकारचे कामगार पहायला मिळतात. यात संघटित कामगारांना सर्व प्रकारच्या सोई सुविधा व त्यांना कायद्याचे संरक्षण असते. मात्र असंघटित कामगारांचे भवितव्य चांगले नसते. या कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असते. आणि रोजगार मिळवण्यासाठी हे कामगार स्थलांतर करत असतात. मग हे स्थलांतर हंगामी वा कायमस्वरुपी असू शकते. ऐच्छिक वा अनैच्छिक सुद्धा असू शकते. कुटुंबासोबत वा एकटे सुद्धा असू शकते. अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगार हे एकटेच स्थलांतर करतात. गरीबी व बेरोजगारी मुळे या कामगारांना स्थलांतर करावे लागते. फक्त आंतरराज्यीयच नाही तर अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतर करणाऱ्या कामगारांचे शोषण होतच असते. या कामगारांना सामाजिक सुरक्षितता वा स्थैर्य असतेच असे नाही. आणि या साऱ्या पाठीमागचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न आपण या संशोधनाद्वारे करणार आहोत. या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

## २.२ संशोधन

इंग्रजी भाषेत संशोधनाला 'Research' म्हणतात. 'Research' म्हणजेच पुनःपुनः शोध घेणे. नवीन तत्त्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे किंवा तथ्यांच्या परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय. समाजशास्त्राच्या अभ्यासात संशोधन प्रक्रियेला खूप महत्त्वाचे स्थान आहे. या संशोधनाच्या माध्यमातून जो विषय संशोधनासाठी निवडला आहे त्या विषयाच्या अभ्यास करणाऱ्या विषयांना सामाजिक शास्त्र असे संबोधले जाते. यात समाज, अर्थ, राज्य, मानसशास्त्र या विषयांचा समावेश होतो.

**अर्थ :–** कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरीता किंवा कोणत्याही नवीन घटनांचा शोध घेणे. विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पद्धतीचा उपयोग करणे हा संशोधनाचा अर्थ आहे.

**व्याख्या :–**

(१) जे डब्ल्यू बेस्ट यांच्या मते, ''खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध आकारबद्ध, सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे.

(२) लेहमन आणि म्युरी यांच्या मते, ''संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळवण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न होय.''

(३) न्यू सेन्च्यूरी शब्दकोशानुसार ''एखाद्या विषयाचा काळजीपूर्वक शोध घेणे म्हणजे संशोधन होय. नवीन तत्व अगर नवीन बाब शोधून काढण्यासाठी सातत्याने काळजीपूर्वक केलेली चिकित्सा म्हणजे संशोधन होय.''

(४) बोगार्डस यांच्या मते, ''एकत्रित राहणाऱ्या लोकांच्या जीवनातील क्रियाशील अंर्तभूत प्रक्रियांचे संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय.

(५) सी. ए. मोऊर यांच्या मते, ''सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्ती करता करण्यात आलेल्या व्यवस्थित संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात.

वरील व्याख्यावरून हे लक्षात येते. की सामाजिक जीवनाच्या विविध पैलुंच्या संदर्भात अध्ययन करण्याची एक योजना आहे. सामाजिक संशोधन हे तार्किक आणि क्रमबद्ध पद्धतीवर निर्भर आहे. आणि या पद्धतीद्वारे जीवन व घटनांच्या संदर्भात शोध घेतला जातो.

## २.३ अभ्यास क्षेत्र निवड

संशोधकाने शोधनिबंधासाठी 'अलंग' रिसायकलींग शीपयार्ड येथील स्थलांतरित कामगारांचे शोषण : एक समाजशास्त्रीय अभ्यास अशी विषयाची निवड केली आहे. त्यासाठी संशोधकाने अभ्यासासाठी अलंग' या गावाची निवड केली आहे. अलंग–सोसियो रिसायकलींग शीपयार्ड हे गुजराथ राज्यातील भावनगर जिल्ह्यातील तळाजा तालुक्यात येते. अलंग शीपयार्डात संपूर्ण भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील निकामी झालेल्या जहाजांची तोडणी केली जाते. या कामासाठी बिहार, झारखंड, ओरिसा, पं. बंगाल व उत्तरप्रदेश या गरीब आणि अप्रगत राज्यातून स्थलांतरित कामगार कामाला येतात. भावनगर हे सर्वात

जवळचे रेल्वेस्टेशन व विमानतळ आहे. विविध महामार्गांनी सुद्धा अलंग रिसायकलींग शीपयार्ड व्यवस्थितरित्या जोडलेले आहे.

## एकूण कामगारांची निवड (Target Population)

या अभ्यासासाठी एकूण ३०० स्थलांतरित कामगारांच्या मुलाखती घेतल्या त्यात पाचही राज्यातील प्रत्येकी ६० कामगारांशी बातचित करून अनुसूची भरून घेतली. अलंग शीपयार्डाचा समग्राचा अभ्यास करणे मर्यादेच्या पलिकडचे आहे. त्यामुळे यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने या कामगारांची माहिती संकलीत केली आहे.




**कामगारांना समुपदेशन करताना डॉ. सुमनबेन चौधरी**



कामगारांची सद्य परिस्थिती जाणून घेताना संशोधक
मुलाखती, अनुसूची, निरीक्षण व अवलोकनाचे फोटो












KOLD TIME













एका ज्येष्ठ अनुभवी कामगाराचे मनोगत जाणून घेताना








श्रीराम
वस्त्रालय



## २.४ माहिती संकलन (Collection of Data)

संशोधकाने या विषयाच्या संदर्भात माहिती संकलीत करताना प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले आहे.

प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून प्रश्नावली, मुलाखत, निरिक्षण, अनुसूची चर्चा, गटचर्चा, व्यष्टी अध्ययन, या माध्यमातून माहिती संकलीत केली आहे. दुय्यम स्त्रोताद्वारे विविध जर्नल रिपोर्ट, वर्तमानपत्रे, पुस्तके, संदर्भग्रंथ, त्याचबरोबर पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध विविध संस्था व इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलत केली आहे.

### संशोधनाची साधने

(१) मुलाखती (२) के. स्टडी, (३) निरीक्षण (४) चर्चा गट चर्चा, (५) छायाचित्रे, (६) प्रत्यक्ष सहभाग.

## २.५ नमुना निवड (डॉ. सुनील मायी, संशोधन पद्धती : पृष्ठ क्र. ७२,७३)

प्रस्ताविक:– जेव्हा एखाद्या निवडलेल्या विषयाचा समग्र अभ्यास करणे संशोधकाला शक्य होत नाही तेव्हा तो नमुना निवड पद्धतीचा आधार घेतो. नमुना निवड पद्धतीवरूनही समष्टी सामान्य स्वरुपाचे निष्कर्ष काढता येतात. संशोधनात नेहमीच नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जातो. सामाजिक शास्त्रात ए. एल. बाऊले हे नमुना निवड पद्धतीचे जनक मानले जातात. बाऊले यांनी नमुना निवड करून नमुन्याच्या

अभ्यासावरून काही निष्कर्ष काढले व त्यांनी ते स्पष्टपणे दाखवून दिले की नमुना पद्धतीमुळे वेळ, श्रम आणि पैशाची बचत होते. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रतिनिधिक एककाची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

व्याख्या:–

(१) गुड आणि हॅट यांच्या मते, ''नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे.'' (२) पॉलिन यंग यांच्या मते, ''ज्या समग्रातून नमूना निवडलेला असतो त्या समग्राचे लहान चित्र म्हणजे नमूना होय. (३) संशोधकाने अभ्यासासाठी (Random Sampaling) यादृच्छिक नमुना निवड पद्धतीची निवड केली आहे. यात समग्रातील प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी असते.

एकूण पाच राज्यातील कामगारांच्या प्रत्येकी ६० प्रमाणे ३०० कामगारांच्या मूलाखती घेतल्या आहेत. त्यात कामगारांच्या माहितीविषयीच्या महत्त्वाच्या सर्व गोष्टींचा अवलंब केला आहे.

## २.६ वर्गीकरण/विश्लेषण तथ्य सादरीकरण

संकलीत केलेल्या माहितीचे योग्य रीतीने वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले. त्यात गुणात्मक आणि संख्यात्मक या दोन्ही गोष्टीवर भर देण्यात आला. संख्यात्मक विश्लेषण साठी एक्सेल सॉफ्टवेअरचा उपयोग करून विविध टेबल आलेख तयार करून कामगारांच्या वास्तविक जीवनाचे यथार्थ दर्शन त्याद्वारे दाखविले आहे. तसेच संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण हे वर्णनात्मक पद्धतीने दर्शविण्यात आले आहे.

## २. ७ सैद्धांतिक दृष्टीकोन

प्रस्तावना :– प्रत्येक संशोधनाचा उद्देश व ज्ञानाची वृद्धी करणे हा असतो. संशोधन हे ज्ञानवृद्धी करण्याचे एक साधन आहे. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून आपण सामाजिक जीवन त्यात घडणाऱ्या घटना व त्यातील तथ्ये व समस्यांच्या संदर्भात ज्ञान प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करत असतो. आणि समाज हा गतीशील असल्याने त्यात सातत्याने बदल हा होतच असतो. त्यामुळे त्यातील उपलब्ध होणारी तथ्ये ही कधीही स्थिर किंवा शाश्वत नसतात. त्यामुळे समाजात ज्या ज्या प्रमाणात बदल घडून येते त्या त्या प्रमाणात ही तथ्ये ही परिवर्तीत होत असतात. त्यामुळेच जुन्या तथ्यांचे पुर्नपरीक्षण करुन सामाजिक घटनांच्या सहभागातील आपले ज्ञान हे प्रगतीशील करणे हा संशोधनाचा एक महत्त्वपूर्ण असा सैद्धांतिक दृष्टीकोन आहे. सामाजिक (सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे पृ. ३८) घटनांचे वस्तूनिष्ठ विश्लेषर सामाजिक संशोधनद्वारे केले जाते. त्यामुळे समाज आणि सामाजिक जीवनाच्या संबंधात ज्ञानाची वृद्धी

होते. आणि वस्तूनिष्ठ  ज्ञानाच्या आधारावर नवीन सिद्धांत मांडले जातात. हे सिद्धांत समाज जीवनाच्या संदर्भात असल्यामुळे अशा सिद्धांताचा उपयोग मानव समाजाचे अज्ञान दूर करणे व त्याची प्रगती करण्याच्या संदर्भात केले जातो.

अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरीत कामगारांचे शोषण: एक समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधनाचा विषय असल्याने या संदर्भात 'स्थलांतर' आणि 'शोषण' या संकल्पनाव अधिक भर दिल्यामुळे त्याला अनुषंगूनच असलेल्या सैद्धांतिक दृष्टीकोनाचे आधार इथे घेतलेला आहे.

१) कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, रॉबर्ट मर्टन, फ्रेडरिक एंगल्स, अबटॅ, अॅयोनितो ग्रमची, हर्बट स्पेन्सर य विचारवंतांच्या सैद्धांतिक दृष्टीकोनाचा आधार इथे घेतलेला आहे.

Relative Deprivation theory - समाजातील उपेक्षित वर्गाच्या संदर्भाने सापेक्ष वंचिताचा सिद्धांत मांडण्यात आला आहे. सामाजिक गतीशीलता, सामाजिक संघर्ष. या संदर्भात रॉबर्ट मर्टन आणि रेन्सीमन यांनी सामाजिक गतिशिलतेच्या (social mobility) अनुषंगाने सापेक्ष वंचिततेच्या सिद्धांताचे विश्लेषण केले ाआहे.

कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स,  अबर्ले (abrle) यांनी सामाजिक संघर्षाच्या अनुषंगाने सापेक्षा वंचिता सिद्धांताची मिमांसा केली आहे. भौतिक स्थिती दर्जा, वर्तन सापेक्ष आणि वस्तूनिष्ठ यातील नकारात्मक भेद म्हणजे सापेक्षा वंतितता होय.

सुप्रसिद्ध विचारवंत गुई यांनी सापेक्ष वंचितता सिद्धांताचे आर्थिक, राजकीय व सामाजिक दर्जा या दृष्टिकोनातून महत्त्वाकांक्षा वंचितते आधारे विश्लेषण केले. याचाच अर्थ जेव्हा लोकांमध्ये आपण काही गोष्टीपासून वंचित आहोत आपणासी इतरांप्रमाणे योग्य व्यवहार केला जात नाही अशी भावना जेव्हा निर्माण होते तेव्हा ते सामाजिक चळवळ निर्माण करतात. भारतातील सामाजिक चळवळींच्या उदयाचा विचार केला तर सापेक्ष वंचितता हा घटक सर्वात प्रबळ ठरतो.

अॅटोनिमो ग्रामची याने सुद्धा सबर्ल्टन सिद्धांत मांडला त्यात त्याने अभिजन अणि वंचित असे दोन समोर ठेवून चिंतन केले.

हर्बट स्पेन्सर या विचारवंताने इथे पृथ्वीतलावर प्रत्येकाला संघर्ष हा करावाच लागतो हे त्याने स्पष्ट करुन दाखवले आहे.

## मॅक्स वेबरचा स्तरीकरणाचा सिद्धांत :

मॅक्स वेबरनेही आर्थिक घटकाला स्तरीकरणात महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्याने स्तरीकरणाचा आर्थिक आयामाच्या व्यतिरिक्त शक्ती आणि प्रतिष्ठा हे दोन घटकही सामाजिक स्तरीकरण प्रक्रियेच्या अनुषंगाने महत्त्वाचे मानले व सामाजिक स्तरीकरणच सामाजिक संघर्षाला जन्म देते. याचबरोबरच त्यांनी दुरुस्त्या महत्त्वाच्या गोष्टी विचारात घेतल्या, त्यांच्या मते, आर्थिक विषमता ही वर्गाना जन्म देते. संघर्षा पाठीमागे आर्थिक शोषण हे कारणही महत्त्वाचे ठरते.

## सिमेलचे आर्थिक व सामाजिक संबंधीचे विचार :

जॉर्ज सिमेल यांनी आपले आर्थिक सामाजिक संबंधा विषयीचे विचार आपल्या The 'phil0sophy of money' या ग्रंथात म्हटले आहे की पैशाच्या व्यवहारासंबंधीच्या ज्ञानावरुन सुद्धा जीवनाचे सर्वांगीण ज्ञान व जीवनाचा अर्थ कळू शकतो. या ग्रंथात त्याने पैशाचा तात्विक दृष्टीने विचार केलेला आहे पण त्यामागील समाजशास्त्रीय चिंतनही मांडलेले आहे. सिमेलच्या मते वस्तूविनिमयापेक्षा पैशाच्या व्यवहारांचा अर्थव्यवस्थेच्या समाजावर दूरगामी परिणाम होतो. पैशामुळे व्यापार दळणवळण अधिक समृद्ध व सुकर होतात. आर्थिक व्यवहार हे आजच्या समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. आर्थिक व्यवहारामुळे सामाजिक आंतरक्रिया अधिक सक्रीय व कार्यक्षम होतात. आर्थिक विनिमयामुळे सामाजिक संबंधातही दृढता येते. व्यापारी – ग्राहक, मालक –कामगार व अशा प्रकारच्या दुपदरी व्यवहारातील लोकांमध्ये अनामिक संबंध निर्माण होतात. व्यक्ती–व्यक्तींचे निर्माण होणारे हे संबंध अवैयक्तिक स्वरुपाचे असतात. हेच आधुनिक समाजाचे महत्त्वाचे लक्षण असून त्यामुळे लहान लहान सामाजिक गट वा समूहाकडून संपूर्ण समाजाकडे वाटचाल करणे शक्य होते.

(डॉ. बी. आर. जोशी समाजशास्त्र मानवशास्त्र २००८, पृष्ठ –७०१)

या वरील सर्व सिद्धांतातील महत्त्वाच्या बाजू या अलंग येथील स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात लागू होत आहेत. ज्या प्रमाणे समाजात आहे आणि नाह रे असे दोन वर्ग अस्तित्वात असतात. आणि आहे रे वर्गाकडून नाही रे वर्गाचे कायमच शोषण होत असते हे कार्ल मार्क्स ने दाखवून दिले आहे. या इथेही परिस्थिती काही वेगळी नाही. आज इथेही मालक वर्गाकडून या कामगार वर्गाचे शोषण होताना दिसून येत आहे. कार्ल मार्क्स यांनी मांडलेला श्रममूल्याचा सिद्धांत तो सुद्धा या कामगारांच्या बाबतीत तंतोतंत लागू होताना दिसून येत आहे. हर्बट स्पेन्सर च्या मतानुसार इथे प्रत्येकाला संघर्ष हा करावाच

लागतो त्या विचारानुसार हे कामगारही आपल्या जीवनासाठी सातत्याने संघर्ष करताना दिसून येत आहेत. ग्रामसी ने अभिजन आणि वंचित असे दोन गट डोळ्यापुढे ठेवून आपले विचार मांडले आहेत. अभिजन हे श्रेष्ठत्वाकडे तर वंचित हे कनिष्ठाचे जीवन जगत  असतात आणि या कामगारांचा संदर्भाला हा विचार लागू होत आहे. म्हणून या विचारवंतांच्या सैद्धांतिक दृष्टिकोनाचा आधार इथे घेतलेला आहे.

संकलीत केलेली माहिती एकूण सहा प्रकरणातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरणे

१) अलंग सोसियो रिसायकलींग शीपयार्ड

२) संशोधन पद्धती

३) गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स असोसिएशन कार्यप्रणाली

४) अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे मूलभूत प्रश्न.

५) स्थलांतरित कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षितता.

६) समरी अनुमान व निष्कर्ष अहवाल.

## २.८ अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा :

अलंग रिसायकलींग शीपयार्ड हे महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र म्हणून ओळखले जाते. पुर्नवापराच्या (Recycling)प्रक्रियेमुळे निकामी जहाजातून हजारो टन स्टीलचे उत्पादन मिळते. ‘अलंग शीपयार्ड’ हे प्रतिबंधित विभाग म्हणून जाहीर केलेला आहे. तिथे परवानगी शिवाय कोणतीही गोष्ट करणे शक्य नाही. त्यामुळे खूप बंधने आहेत. रात्रीच्या वेळी शीपयार्डात थांबणे तसे धोकादायक आहे. जशी या अभ्यासाची व्याप्ती ही भरपूर आहे तशाच मर्यादाही खूप आहेत.

संकलीत केलेली माहिती एकूण सहा प्रकरणातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरणे

१) प्रस्तावना व विषय प्रवेश

२) संशोधन पद्धती

३) गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स असोसिएशन कार्यप्रणाली

४) अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे मूलभूत प्रश्न.

५) स्थलांतरित कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षितता.

६) समरी अनुमान व निष्कर्ष अहवाल.

**संदर्भ सूची :-**


१) डॉ. पु.ल. भांडारकर , १९९९

सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ चौथी आवृती.

२) डॉ. प्रदीप आगलावे

संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन नागपूर.

३) डॉ. सुनिल मायी, संशोधन पद्धती

डायमंड पब्लिकेशन, शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

## प्रकरण ३ रे

## गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स असोसिएशन कार्यप्रणाली

३.१ प्रस्तावना

३.२ परिशिष्ट अ

१) गुजराथ मेरी टाईम बोर्डाविषयी

गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे कॅप्टन एस.सी. चड्ढा यांचे मनोगत


# गुजराथ मेरी टाईम बोर्ड

गुजराथ मेरी टाईम बोर्ड

सेक्टर 10 - A एअर फोर्स स्टेशनच्या समोर

गांधीनगर 382010 गुजराथ

गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे पोर्ट ऑफिसर कॅप्टन श्री. एस. सी. चड्डा साहेब यांनी अलंग रिसायकलींग शीपयार्डाविषयी व बोर्डामार्फत चालविले जाणारे विविध उपक्रम तसेच यार्डात काम करणारे कामगार यांच्या सुरक्षिततेविषयी घेतली जाणारी काळजी या संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले.



गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे कॅप्टन एस.सी. चड्डा

**गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे पोर्ट ऑफिसर कॅप्टन श्री. एस. सी. चड्डा साहेब यांनी अलंग रिसायकलींग शीपयार्डाविषयी व बोर्डामार्फत चालविले जाणारे विविध उपक्रम तसेच यार्डात काम करणारे कामगार यांच्या सुरक्षिततेविषयी घेतली जाणारी काळजी या संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले.**

अलंग सोसिया रिसायकलींग शीपयार्डाचे पोर्ट ऑफिसर श्री. चड्डा साहेब गेल्या चार वर्षापासून आपला पदभार सांभाळून आहेत. त्यांच्या अतिशय व्यस्त अशा कामकाजातूनही त्यांनी एकूणच गुजराथ मेरी टाईम बोर्ड, अलंग शीप ब्रेकींग यार्ड, या यार्डात काम करणारे स्थलांतरित कामगार व या कामगारांच्या सुरक्षेसंदर्भात घेतल्या जाणाऱ्या उपाययोजना व गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी त्यांनी माहिती दिली.

सुरुवातीला बोलतानाच त्यांनी गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या स्थापनेविषयी बोलताना सांगितले की गुजराथ राज्याला लाभलेला विपुल असा १६०० कि.मी.चा सागरी किनारा लाभला आहे आणि गुजराथच्या या सागरी किनाऱ्यावर एकूण ४१ बंदरे लाभलेली आहेत. कांडला हे सर्वात मोठे बंदर आहे. ४१ बंदरामधील ११ बंदरे ही मध्यम स्वरूपाची तर २९ बंदरे ही छोट्या स्वरूपाची आहेत आणि या सर्व बंदराची देखभाल गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत केली जाते.

लहान आणि मध्यम स्वरूपाच्या बंदराच्या माध्यमातून ८.५% इतकी राज्याच्या मालाची वाहतूक केली जाते. पोरबंदर बंदरातून माशांची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. आता अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने मालाची आयात निर्यात ही १६ मिलीयन टनावरून २४ मिलियन टनावर पोहोचलेली आहे. सौराष्ट्रातील कच्छ येथे सिमेंट निर्यातीचा मोठा प्रकल्प उभारण्यात येणार आहे आणि त्यातून आंतरराज्यीय तसेच आंतरराष्ट्रीय सिमेंटची आयात निर्यातही मोठ्या प्रमाणावर केली जाणार आहे. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्राला लागणाऱ्या कच्च्या मालाची निर्यातही करण्याचा मोठा मानस आहे.

पीपावाव हे एकमेव असे बंदर आहे की जिथे जहाज नांगरणे अतिशय सहजरीत्या होऊ शकत आहे. त्यासाठी या बंदराचा विकास केला जात असून सौराष्ट्र विभागातले हे एकमेव असे आधुनिक बंदर म्हणून ओळखले जाईल. .सागरी किनारा आणि या विपुल सागरी किनाऱ्यांचा जलवाहतूक व मालवाहतुकीच्या दृष्टिकोनातून कशा प्रकारे विकास करता येऊ शकतो व त्याद्वारे

राज्याचा आर्थिक विकासही कशा रीतीने होऊ शकेल या दृष्टीने खूप विचारविनिमय करण्यात आला. या सर्व नैसर्गिक साधन संपत्तीचा कशा रीतीने उपयोग करता येऊ शकेल त्या दृष्टिकोनातून अभ्यासही करण्यात आला. कांडला आणि मुद्रा ही गुजराथ राज्यातील महत्त्वाची मोठी बंदरे असून याशिवाय एकूण लहान व मध्यम स्वरूपाची अशी ४२ बंदरे गुजराथ राज्याला लाभलेली आहेत. या सर्व बंदराचा विकास व उत्पादनवाढीसाठी गुजराथ सरकारने ५.४.१९८२ रोजी एक स्वायत्त संस्था म्हणून गुजराथ मेरी टाईम बोर्डाची स्थापना केली. फक्त कांडला बंदराची जबाबदारी केंद्र सरकार पाहते. मात्र इतर सर्व बंदराची अधिपत्य गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत केले जाते. भौगोलिक आणि नैसर्गिक वैविध्यता लाभलेल्या काही गोष्टींमुळे आज इथे बंदराचा विकास करणे खूप सोईचे ठरत आहे.

जहाज बांधणी उद्योगातही गुजराथ राज्याचा मोठा वाटा असून आज एकूण नऊ शीप बिल्डींग यार्डस कार्यान्वित असून अजूनही आठ शीप बिल्डिंग यार्डस लवकरच कार्यान्वित होणार आहेत. आज जे शीप बिल्डींग यार्डस कार्यान्वित आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत

| **नाव** | **स्थळ** |
|---|---|
| **१) ए.बी.जी. शीपयार्ड लि.** | **मगदाला – सुरत** |
| **२) ए.बी.जी.शीपयार्ड लि.** | **जागेश्वर, दहेज** |
| **३) एल ॲन्ड टी** | **हजीरा** |
| **४) शॉफ्ट शीपयार्ड प्रा. लि.** | **कलादरा व्हिलेज** |
| **५) पीपाबाब शीपयार्ड लि.** | **पीपाबाब** |
| **६) मोडेस्ट इन्फ्रास्ट्रक्टर लि.** | **ओल्ड पोर्ट, भावनगर** |
| **७) वाडिया बोट बिल्डर्स** | **बीलीमोरा** |
| **८) ॲलकॉक ॲराडाऊन (गुजराथ) लि.** | **ओल्ड पोर्ट भावनगर** |
| **९) ॲलकॉक ॲशडाऊन (गुजराथ) लि.** | **चांच, पीपाबाबजवळ** |

पोर्ट ऑफिसर चड्डा साहेब यांनी एकूणच गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या स्थापनेविषयी जशी माहिती दिली त्याचप्रमाणे पुढे बोलताना त्यांनी हे सुद्धा सांगितले की ज्याप्रमाणे मालवाहतुकी व प्रवासी वाहतुकीसाठी नव्या जहाजांची जरुरी आहे त्याचप्रमाणे निकामी झालेल्या जुन्या जहाजांचे

विघटन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पूर्वी निकामी जहाजांची तोडणी ही पूर्वेकडील प्रगत देशांमध्येच होत होती. मात्र १९८० नंतर निकामी जहाजांची तोडणी ही विकसित देशांकडून विकसनशील देशांकडे हस्तांतरित झाली आणि आज भारतात अलंग हे एक अत्यंत महत्त्वाचे असे जहाज तोडणी केंद्र म्हणून विकसित झाले आहे. गुजराथ मेरी टाईम बोर्डाची जेव्हा स्थापना झाली त्यानंतरच्या पहिल्या दोन वर्षाच्या काळात अलंग शीप ब्रेकींग यार्डात जास्तीत जास्त दोन ते चार जहाजे तोडणीसाठी उपलब्ध होत होती. परंतु आज याच अलंग शीप ब्रेकींग यार्डात वर्षाला ३०० ते ३५० जहाजे तोडली जातात. आज गुजराथ राज्यात अलंग आणि साचना ही दोन जरी जहाज तोडणी केंद्र असली तरी सुद्धा अलंगला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. या व्यवसायातून गुजराथ सरकारला मोठ्या प्रमाणात कर उपलब्ध होत आहे. आज अलंग शीप ब्रेकींग यार्डात फक्त भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील निकामी झालेली जहाजे तोडण्यासाठी दाखल होतात.

सुरुवातीच्या काळात अलंग शीप ब्रेकींग यार्डाची परिस्थिती खूपच वेगळी होती. परंतु आज अलंगचे चित्र पूर्णपणे बदललेले आहे. आज सगळ्याच दृष्टिकोनातून सुधारणा होत आहेत आणि आता सर्वच नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. आज पर्यावरण आणि कामगारांच्या सुरक्षेसंदर्भात मोठ्या प्रमाणात लक्ष दिले जात आहे.

कामगारांच्या सुरक्षेसंदर्भात बोलताना श्री. चड्डा साहेब यांनी सांगितले की आज अलंग रिसायकलींग शीप यार्डामुळे सुमारे ३० ते ३५ हजार कामगारांना प्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे आणि इथे कामासाठी येणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित आणि परराज्यातील आहेत. त्यात प्रामुख्याने बिहार, झारखंड, ओरिसा, प.बंगाल व उत्तर प्रदेश या राज्याचा समावेश आहे. इतर राज्यातूनही इथे कामासाठी कामगार इथे येतात. परंतु त्याचे प्रमाण अतिशय अल्प आहे. सुरुवातीच्या काळात या कामगारांना कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण किंवा सुरक्षेसंदर्भात एवढी जागरुकता नव्हती. त्यामुळे अपघातही होत असत. परंतु आता अलंग शीपयार्डात कामाला येणाऱ्या प्रत्येक कामगाराला गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षण वर्गाला उपस्थित रहावेच लागते. या कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे प्रशिक्षण सेंटर उभारण्यात आले आहे.




**गुजरात मेरीटाईम बोर्डाचे प्रशिक्षण केंद्र**




**नव्याने आलेल्या कामगारांना प्रशिक्षण देताना मेरीटाईम बोर्डाचे अधिकारी**

या प्रशिक्षण सेंटरमध्ये आम्ही नव्याने येणाऱ्या कामगारांना जहाज तोडणीचे काम करायला जाण्यापूर्वी सगळ्याच गोष्टींची जाणीव करून देतो.

काम करताना जहाजावर कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी घ्यायची. वैयक्तिक सुरक्षेला सुद्धा अधिक प्राधान्य दिले जाते. त्यासाठी कामाच्या ठिकाणी कोणकोणत्या सुरक्षा साधनांचा वापर करावयाचा या सगळ्या गोष्टी आमचा अधिकारी वर्ग प्रशिक्षणाच्या दरम्यान समजावून सांगतात. आता या गोष्टी आम्ही त्यांना फक्त भाषणातून समजावून सांगत नाही तर त्यासाठी तयार केलेल्या चलचित्रांच्या माध्यमातून समजावून सांगतो. अलंगमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या कामगारांकडून आम्ही एक सविस्तर फॉर्म त्यांच्याकडून भरून घेतो. त्यात त्यांची संपूर्ण वैयक्तिक माहितीची नोंद ठेवली जाते. या तीन दिवसाच्या प्रशिक्षणात त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत व्हावा. गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे पदाधिकारी व कामासाठी येणारे कामगार यांच्यामध्ये विचारांचे आदानप्रदान व्हावे. इथे येणारे बहुतांशी कामगार हे अशिक्षित वा कमी शिकलेले असतात. त्यामुळे त्यांना एक प्रकारची उमेद देण्यासाठीच या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. जहाजावर काम करताना कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात व त्या अडचणी दूर करून सुरक्षा आणि कामाचे नियोजन या गोष्टीकडे विशेष करून लक्ष दिले जाते. कामाबरोबरच कामगारांच्या सुरक्षेबाबतही काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. या सगळ्या गोष्टींची जाणीव आम्ही या कामगारांना या प्रशिक्षणाच्या संदर्भात करून देतो. इथे येणारे बहुतांशी कामगार हे आपल्या कुटुंबांना आपल्या मूळ गावी ठेवून इथे एकटे येतात. त्यामुळे या कामगारांना कामाच्या ठिकाणी जशी वैयक्तिक सुरक्षा बाळगली पाहिजे याची जाणीव आम्ही करून देतो. त्याचप्रमाणे वैयक्तिक आरोग्य, स्वच्छता आणि यौन संबंधांविषयी जागरुकता ठेवण्यासाठी आम्ही फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या एड्स प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचेही आम्ही समुपदेशन या कामगारांना करत असतो.

तीन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कामगारांना गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत एक प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व एक ओळखपत्र दिले जाते.


OBTAIN FROM :
K. RAMDAS & CO.
BHAVNAGAR
MUSTER CARD
Name of the Factory
Address
Name of the Worker
Monthly pay
Month
Date Present Adv. Sign. Date Present Adv. Sign.
TOTAL PAY
ADVANCE
BALANCE
RECEIVER'S SIGNATURE
OR
THUMB IMPRESSION
GUJARAT MARITIME BOARD
SHIP RECYCLING YARD
SAFETY TRAINING AND WELFARE COMPLEX,ALANG.
BASIC SAFETY TRAINING FOR ALL
CERTIFICATE
This is to certify that
Shri TIWARI TARUNKUMAR GAUTAM
has participated in the above
Training Programme held from
19/04/2010 to 21/04/2010 & successfully
completed it as per the subjects
mentioned overleaf.
Regd No.:40714
DUPLICATE
DIRECTOR
*CERTIFICATE VALID FOR 2 YEAR
TRAINING & WELFARE COMPLEX, ALANG. GUJARAT (INDIA)


भारत सरकार
निवासी पहचान पत्र
Government of India
RESIDENT IDENTITY CARD
सत्यमेव जयते
Identity Number
2402 8198 6001 7838
जन्म तिथि
Date of Birth
01-06-1986
जन्मस्थान (जिला)
Place of Birth (District)
BHAVNAGAR
Valid up to
11-06-2022
जारी करने का स्थान
Place of Issue
TALAJA
लिंग
Sex
M
Name
ગોહીલ અશોકસિંહ નટુભા
GOHIL ASHOKSINH NATUBHA
माता / पिता का नाम Mother's / Father's Name
નટુભા
GOHIL NATUBHA LAXMANSINH
ईएसआईसी
चिंता से मुक्ति
कर्मचारी राज्य
बीमा निगम
पंचदीप भवन, सी.आई.जी. मार्ग,
नई दिल्ली-110 002
ESIC
Employees' State
Insurance Corporation
Panchdeep Bhawan, C.I.G. Marg,
New Delhi-110 002
IP No:3710579609
Name: ASHOKSINH GOHIL
D.O.B: 24-02-1982
Address:
VILLAGE:-JASPARA,,
TAL:-TALAJA,,
DIST:-BHAVNAGAR.

हे प्रमाणपत्र व ओळखपत्राच्या आधारावरच या कामगारांना प्लॉटवर काम उपलब्ध होते. ओळखपत्राशिवाय कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम मिळू शकत नाही. त्यामुळे या कामगारांना हे तीन दिवसांचे प्रशिक्षण व ओळखपत्र प्राप्त करणे अतिशय महत्त्वाचे आहे. या ओळखपत्रामुळे या कामगारालाही एक प्रकारचे अस्तित्व प्राप्त होते व या कामगाराची संपूर्ण माहितीही संकलित केली जाते. ही या पाठीमागची महत्त्वाची भूमिका आहे आणि हे तीन दिवसाचे प्रशिक्षण जे दिले जाते ते पूर्णतः निशुल्क असते. आम्ही कामगारांकडून कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारत नाही. ही सर्व जबाबदारी गुजराथ मेरी टाईम बोर्डच घेते.

गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे शीप ब्रेकर्सना प्लॉटचे वाटप, शीपयार्डातील रस्ते, वीज, पाणी या सर्व सुविधा गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या मार्फतच पुरविण्यात येतात. प्लॉटच्या आकारानुसारच शीप ब्रेकर्स यांच्याकडून पैशाची आकारणी केली जाते व काही भाडेही आकारले जाते. ५ वर्षाच्या करारानुसार हे प्लॉट शीप ब्रेकर्सना दिले जातात आणि मग त्या त्या प्लॉटवर शीप ब्रेकर्स जहाज तोडणीच्या कामाला सुरुवात करतात. गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स या दोन्ही संस्थांमध्ये चांगला समन्वय आहे. व्यवसाय वृद्धी बरोबरच कामगारांच्या सुरक्षेकडेही आम्ही अधिक लक्ष देतो. दर महिन्याला शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे पदाधिकारी व सुरक्षा अधिकारी यांची एक संयुक्तिक मिटींग घेतली जाते. यात कोणकोणत्या अडचणी आहेत त्या समजावून घेतल्या जातात. आणि त्या दृष्टिकोनातून पाऊलेही उचलण्यात येतात. कोणतेही निकामी जहाज तोडायला सुरुवात करण्यापूर्वी शीप ब्रेकर्सना या खालील संबंधित खात्याशी संपर्क साधून ना हरकतीचे प्रमाणपत्र मिळवावे लागते आणि त्या नंतर जहाज तोडणी करण्यासाठी परवानगी दिली जाते. ती संबंधित खाती खालीलप्रमाणे –

1) Gujarat Maritime Board
2) Gujarat Pollution Control Board
3) Explosive Department (for Tankers only)
4) Custom
5) Atomic Energy and Research Board

ही वरील संबंधित खाती या निकामी जहाजाची सगळ्याच दृष्टिकोनातून कसून तपासणी करतात. संबंधित खात्यांकडून योग्य अहवाल प्राप्त झाल्यावरच मग गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावरच ते जहाज प्लॉटला तोडण्यासाठी लावता येऊ शकते.

कामावर जाण्यापूर्वी कामगाराने त्याची वैयक्तिक सुरक्षा साधने नीट व्यवस्थित घातलेली आहेत का नाहीत याची खात्री प्रत्येक प्लॉटवरील सुरक्षा अधिकारी पाहून घेतात आणि मगच प्लॉटवरील जहाजाच्या तोडणीच्या कामाला सुरुवात केली जाते. हाँगकाँग येथे झालेल्या बेसल कन्व्हेन्शनमध्ये जे काही नियम आखून देण्यात आले आहेत त्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियमांचे तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न केला जातो. अजूनही त्यात खूप सुधारणा करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

काही वेळा एखादी दुर्घटना पण घडते. पण आज त्याच जबाबदारी प्लॉटधारक घेतात. कामगारांना औषधपाणी दिले जाते. प्राणघातक अपघात होऊ नये त्यासाठई खूप दक्षता बाळगली जाते. पण तरीही अशी दुर्दैवी घटना घडलीच तर त्या कामगाराच्या कुटुंबियांना योग्य ती नुकसानभरपाई दिली जाते. आज त्या बाबतीत सर्व त्या खबरदाऱ्या घेतल्या जातात. आज कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये यासाठी विशेष जागरुकता बाळगली जाते आणि त्या दृष्टिकोनातून आमची दर महिन्याला आवर्जून बैठक होत असल्याचेही श्री. चड्ढा साहेब यांनी सांगितले.

या कामगारांना मोफत औषधोपचार मिळावेत यासाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फतच रेड क्रॉस हॉस्पिटल चालविण्यात येते. जिथे या कामगारांना औषधे उपलब्ध होतात. त्याचप्रमाणे अजूनही एक हॉस्पिटल चालविण्यात येते. त्याचबरोबर प्रायव्हेट प्रॅक्टीस करणारे डॉक्टरही इथे उपलब्ध आहेत. परंतु रेडक्रॉस हॉस्पिटलमध्ये या कामगारांना सर्व प्रकारची औषधे उपलब्ध होऊ शकतात.

गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे आयोजिल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी सांगताना श्री. चड्ढा साहेब यांनी सांगितले की इथे कामासाठी येणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित आहेत. आपल्या कुटुंबासोबत इथे येणाऱ्या कामगारांची संख्या तशी कमी आहे. परंतु जे कामगार आपल्या कुटुंबासोबत इथे वास्तव्य करून त्यांच्या मुलांसाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत प्राथमिक स्तरावरचे शिक्षण देणारी एक शाळाही चालविण्यात येते. या शाळेत शिकणाऱ्या मुलांना खाऊ, पुस्तके व ड्रेस पुरविण्याचे कामही गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत केले जाते.

येथील कामगारांसाठी विविध प्रकारच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन करून त्यांची तपासणी केली जाते. त्यांना योग्य ते औषधोपचार केले जातात. त्याचप्रमाणे अलंग शीपयार्डात काम करणारे कामगार खूपच धोक्याचे आणि जोखमीचे काम करत असतात. प्रत्येकाच्या कामाचे स्वरूप वेगवेगळे आहे. त्या कामाच्या स्वरूपाच्यानुसार या कामगारांचे शारीरिक व मानसिक मनोबल योग्य व उत्तम रहावे यासाठी त्या दृष्टिकोनातूनसुद्धा कामगारांची शारीरिक तपासणी केली जाते.

मूळातच हे कामगार गरीब राज्यातून व गरीबी व बेरोजगारीमुळे इथे स्थलांतरित झालेले असतात. घरातील सदस्यांची संख्या सुद्धा जास्त असते व त्यासाठी आम्ही त्यांना मर्यादित कुटुंबाचे महत्त्व समजावून मर्यादित कुटुंबामुळे कुटुंबाचे स्वास्थ्य व आर्थिक नियोजन कसे चांगल्या पद्धतीने होऊ शकते यासाठी मार्गदर्शन करून आम्ही त्यांना फॅमिली प्लॅनिंगसाठी प्रवृत्त करतो. तसेच इथे असलेल्या कुटुंबातील लहान मुलांसाठी विविध प्रकारचे लसीकरणही शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध करून देतो.



**कामगारांचे समुपदेशन करताना फॅमीली प्लॅनिंग असोसिएशनच्या एडस् प्रकल्पाचे अधिकारी**


त्याचप्रमाणे वेळोवेळी रक्तदान शिबिरांचे आयोजन करतो. कामगारांचे शारीरिक, मानसिक व लैंगिक आरोग्यसुद्धा चांगले रहावे यासाठी गुप्तरोग प्रशिक्षण, एडस जनजागृती, त्याविषयीचे समुपदेशनही आम्ही करतो. तसेच कामगारांना तणावविरहित जीवन जगता यावे यासाठी तणावनिवारणाचे शिबीरही आयोजित करतो.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे दोन दिवस आम्ही मोठ्या उत्साहाने साजरे करतो. त्या दिवशी विविध स्पर्धा, खेळ लहान मुलांना खाऊचे वाटप करतो आणि आम्हाला जमेल तशी सामाजिक संस्थांना मदतही करतो. व्यवसाय वृद्धीबरोबरच कामगारांची सुरक्षा हेच आमचे मुख्य ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे इथे काम करणाऱ्या कामगारांसाठी जो गृहप्रकल्प उभारला जात आहे तो लवकरच पूर्णत्वास येईल. सध्या तरी १००० कामगारांना इथे सामावून घेता येईल. ज्या कामगारांना ही घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत त्यांच्याकडून आम्ही महिन्याला नाममात्र शुल्क आकारणी करणार आहोत. कारण कोणतीही गोष्ट फुकट मिळाली की त्याची किंमत राहत नाही. अशा रीतीने हळूहळू अलंग शीपयार्डाचाही कायापालट होऊ शकेल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

# अलंग शीप ब्रेकींग यार्ड

# जिल्हा भावनगर, गुजरात राज्य


I N D I A
Bay of
Bengal
GUJARAT STATE



अलंग  बंदरात प्रवेश करताना






अलंग येथे दाखल झालेले निकामी जहाज




जहाजाची तोडणी सुरु असताना



तुटलेल्या जहाजाच्या शेजारी नव्याने दाखल झालेले निकामी जहाज




مرقاب
MIRQAB


ANDROS WARRIOR







**अखरेच्या टप्प्यावर पोहोचलेल कंटेनर जहाजाची तोडणी**

| ક્રમ | વર્ષ | જહાજની સંખ્યા | વર્ષાન્તે જહાજની સંખ્યા | મેટ્રીક ટનમાં ભંગાર | વર્ષાન્તે મેટ્રીક ટનમાં ભંગાર |
|---|---|---|---|---|---|
| ૦૧ | ૧૯૮૨-૮૩ | ૦૫ | ૦૫ | ૨૪,૭૧૬ | ૨૪,૭૧૬ |
| ૦૨ | ૧૯૮૩-૮૪ | ૫૧ | ૫૬ | ૨,૫૯,૩૮૭ | ૨,૮૪,૧૦૩ |
| ૦૩ | ૧૯૮૪-૮૫ | ૪૨ | ૯૮ | ૨,૨૮,૨૩૭ | ૫,૧૨,૩૪૦ |
| ૦૪ | ૧૯૮૫-૮૬ | ૮૪ | ૧૮૨ | ૫,૧૬,૬૦૨ | ૧૦,૨૮,૯૪૨ |
| ૦૫ | ૧૯૮૬-૮૭ | ૬૧ | ૨૪૩ | ૩,૯૫,૧૩૯ | ૧૪,૨૪,૦૮૧ |
| ૦૬ | ૧૯૮૭-૮૮ | ૩૮ | ૨૮૧ | ૨,૪૪,૭૭૬ | ૧૬,૬૮,૮૫૭ |
| ૦૭ | ૧૯૮૮-૮૯ | ૪૮ | ૩૨૯ | ૨,૫૩,૯૯૧ | ૧૯,૨૨,૮૪૮ |
| ૦૮ | ૧૯૮૯-૯૦ | ૮૨ | ૪૧૧ | ૪,૫૧,૨૪૩ | ૨૩,૭૪,૦૯૧ |
| ૦૯ | ૧૯૯૦-૯૧ | ૮૬ | ૪૯૭ | ૫,૭૭,૧૨૪ | ૨૯,૫૧,૨૧૫ |
| ૧૦ | ૧૯૯૧-૯૨ | ૧૦૪ | ૬૦૧ | ૫,૬૩,૫૬૮ | ૩૫,૧૪,૭૮૩ |
| ૧૧ | ૧૯૯૨-૯૩ | ૧૩૭ | ૭૩૮ | ૯,૪૨,૬૦૧ | ૪૪,૫૭,૩૮૪ |
| ૧૨ | ૧૯૯૩-૯૪ | ૧૭૫ | ૯૧૩ | ૧૨,૫૬,૦૭૭ | ૫૭,૧૩,૪૬૧ |
| ૧૩ | ૧૯૯૪-૯૫ | ૩૦૧ | ૧૨૧૪ | ૨૧,૭૩,૨૪૯ | ૭૮,૮૬,૭૧૦ |
| ૧૪ | ૧૯૯૫-૯૬ | ૧૮૩ | ૧૩૯૭ | ૧૨,૫૨,૮૦૯ | ૯૧,૩૯,૫૧૯ |
| ૧૫ | ૧૯૯૬-૯૭ | ૩૪૮ | ૧૭૪૫ | ૨૬,૩૫,૮૩૦ | ૧,૧૭,૭૫,૩૪૯ |
| ૧૬ | ૧૯૯૭-૯૮ | ૩૪૭ | ૨૦૯૨ | ૨૪,૫૨,૧૦૯ | ૧,૪૨,૨૭,૩૬૮ |
| ૧૭ | ૧૯૯૮-૯૯ | ૩૬૧ | ૨૪૫૩ | ૩૦,૩૭,૮૮૨ | ૧,૭૨,૬૫,૨૫૦ |
| ૧૮ | ૧૯૯૯-૦૦ | ૨૯૬ | ૨૭૪૯ | ૨૭,૫૨,૪૦૪ | ૧,૯૫,૧૬,૪૪૭ |
| ૧૯ | ૨૦૦૦-૦૧ | ૨૯૫ | ૩૦૪૪ | ૧૯,૩૪,૮૨૫ | ૨,૧૪,૫૧,૨૭૨ |
| ૨૦ | ૨૦૦૧-૦૨ | ૩૩૩ | ૩૩૭૭ | ૨૭,૨૭,૨૨૩ | ૨,૪૧,૭૯,૦૦૭ |
| ૨૧ | ૨૦૦૨-૦૩ | ૩૦૦ | ૩૬૭૭ | ૨૪,૨૪,૫૨૨ | ૨,૬૫,૯૯,૭૩૧ |
| ૨૨ | ૨૦૦૩-૦૪ | ૨૯૪ | ૩૯૭૧ | ૧૯,૮૬,૧૨૧ | ૨,૮૫,૮૫,૮૫૨ |
| ૨૩ | ૨૦૦૪-૦૫ | ૧૯૬ | ૪૧૬૭ | ૯,૩૮,૯૭૫ | ૨,૯૫,૨૪,૮૨૮ |
| ૨૪ | ૨૦૦૫-૦૬ | ૧૦૧ | ૪૨૬૮ | ૪,૮૦,૩૬૧ | ૩,૦૦,૦૫,૧૮૯ |
| ૨૫ | ૨૦૦૬-૦૭ | ૧૩૬ | ૪૪૦૪ | ૭,૬૦,૮૦૦ | ૩,૦૭,૬૫,૯૮૯ |
| ૨૬ | ૨૦૦૭-૦૮ | ૧૩૬ | ૪૫૪૦ | ૬,૪૩,૪૩૭ | ૩,૧૪,૦૯,૪૨૬ |
| ૨૭ | ૨૦૦૮-૦૯ | ૨૬૪ | ૪૮૦૪ | ૧૯,૪૫,૫૪૦ | ૩,૩૩,૫૪,૯૬૬ |
| ૨૮ | ૨૦૦૯-૧૦ | ૩૪૮ | ૫૧૫૨ | ૨૯,૫૭,૨૨૫ | ૩,૬૩,૧૨,૧૯૧ |
| ૨૯ | ૨૦૧૦-૧૧ | ૩૫૭ | ૫૫૦૯ | ૨૮,૧૬,૨૩૧ | ૩૯,૧૨,૨૮,૪૨૨ |
| ૩૦ | ૨૦૧૧-૧૨ | ૪૧૫ | ૫૯૨૪ | ૩૮,૫૬,૦૭૨ | ૩૯,૫૦,૮૪,૪૯૪ |
| ૩૧ | ૨૦૧૨-૧૩ | ૩૪૨ | ૬૨૬૬ | ૩૩,૧૦,૨૪૪ | ૩૯,૮૩,૯૪,૭૩૮ |
| ૩૨ | ૨૦૧૩-૧૪ | ૨૪૯ | ૬૫૧૫ | ૨૫,૩૧,૦૦૦ | ૪૦,૦૯,૨૫,૭૩૮ |
| ૩૩ | ૨૦૧૪-૧૫ | ૨૨૭ | ૬૭૪૨ | ૨૦,૯૪,૩૬૦ | ૪૦,૩૦,૨૦,૦૯૮ |

(તા. ૧૨-૨-૨૦૧૫ની સ્થિતિ અનુસાર)

अलंग शीप यार्डात तोडण्यात आलेल्या जहाजांची संख्या दर्शवणारी तालिका

अलंग शीप ब्रेकींग यार्डाविषयी आपण या आधीच सविस्तर माहिती पाहिलेली आहे. त्यात अलंग गावाचा इतिहास, अलंग शीप ब्रेकींग यार्डाची निर्मिती तसेच अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे आजूबाजूच्या परिसरावर झालेला आर्थिक व सामाजिक बदल ही आपण पाहिलेला आहे. अलंग शीप ब्रेकींग यार्डाचा सर्व कारभार हा गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फत पाहिला जातो. अलंग शीप ब्रेकींग यार्डाविषयी खूपसे नकारात्मक लिखाण यापूर्वी प्रसिद्धीमाध्यमातून जरी पुढे आलेले असले तरी सुद्धा आज या अलंग शीप ब्रेकींग यार्डामध्ये खूपशा सुधारणाही होत आहेत. त्या सुधारणांकडेही आपल्याला सकारात्मक दृष्टिकोनातून पहावे लागणार आहे. स्थलांतरित कामगारांचे शोषण पूर्णपणे थांबले आहे असे विधान करणेही चुकीचे ठरेल. परंतु आज कामगारांची सुरक्षा याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. आज नियमांचे काटेकोर पालन केले जात आहे. तरीही अजूनही शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोर्ड व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद घडण्याची नितांत आवश्यकता आहे. आज अलंग शीप ब्रेकींग यार्डाने २५ वर्षे पूर्ण केलेली आहेत. आज प्रत्यक्षपणे ३० हजाराहून अधिक कामगारांना रोजगार व अप्रत्यक्षपणे सुमारे लाखो लोकांना या शीपयार्डामुळे रोजगार मिळालेला आहे आणि आजूबाजूच्या परिसराचाही कायापालट झालेला आहे. तेव्हा याही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

अलंग शीप रिसायकलींग इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वतीने Alang - A Green Re-incarnetion हे संस्थेचे (E-Magazine) मासिकही प्रकाशित करण्यात येते. त्या मासिकातील अंकात प्रकाशित झालेल्या महत्त्वाच्या घटनांच्या आलेखाचा समावेश इथे पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

२) अलंग रिसायकलींग असोसिएशनविषयी

३) ब्ल्यू लेडी जहाज रोमांचकारी प्रवास.

## ३.३ परिशिष्ट ब

स्थलांतरीत कामगारांच्या मुलाखतींचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण

तालिंकाची याद

१) बिहार

२) झारखंड

३) ओरिसा

४) पश्चिम बंगाल

५) उत्तर प्रदेश

३.४ विषयाला अनुसरुन विशेष व्यक्तीच्या मुलाखतींचा गोषवारा

१) डॉ. विद्युत जोशी – निरमा युनिर्व्हसिटी गुजराथ राज्य

२) डॉ. सुमनबेन चौधरी – माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख भावनगर युनिर्व्हसिटी, गुजराथ

३) शीप ब्रेकर्स

१) त्रिवेणी शीप ब्रेकर्स श्री. कनाकिया

२) चिंतन कलाथिया

३) हरिष परमार (सह सेक्रेटरी)

४) देबेन जागड

५) विनोद मकवाणा – फॅमिली प्लॅनींग असोसिएशन एडस् प्रकल्प अधिकारी

६) व्यावसायिक

१) रामसिंग शर्मा

२) जितेंद्र मकवाना

७) सुरक्षा अधिकारी

१) श्री. बरैय्या

२) श्री. मकवाणा

८) अलंग रिसायकलींग वर्कर्स असोसिएशन चे उपाध्यक्ष श्री. राम पटेल व सेक्रेटरी यांचे मनोगत

९) मुकादम

१) **मोहसीन शेख (पश्चिम बंगाल)**

२) **छोटेलाल महंतो (ओरिसा)**

## ३.५ समारोप

## प्रकरण ३ रे

# परिशिष्ट (ब)

**प्रस्तावना :**

जेव्हा आपण संघटित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा संशोधनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करतो तेव्हा आपल्याला हे लक्षात येते की संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना सर्व सोई सुविधा, योग्य आणि वेळेवर मिळणारे वेतन, हक्काच्या रजा, बोनस आर्थिक स्थैर्याबरोबरच कायद्याचे संरक्षण व सामाजिक सुरक्षितता या सर्व प्रकारच्या सोई सुविधा त्यांना उपलब्ध असतात. (उदा. टाटा मोटर्स व कॅडबरी या उद्योग समूहात काम करणारे संघटित कामगार) याउलट असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना या कुठल्याच प्रकारच्या सुविधा त्यांना उपलब्ध होत नाहीत. (उदा. उस तोडणी कामगार, मोठमोठ्या गृहप्रकल्पावर काम करणारे कामगार, शेतमजूर, वीटभट्टी कामगार, रस्तेबांधणी करणारे, सूतगिरण्यात काम करणारे, हिऱ्याला पैलु पाडणारे, हिरे कारागिर, अतिशय लहान खाजगी उद्योगात काम करणारे कामगार इ.) या असंघटित क्षेत्रातील कामगारांना उपजिवेकीसाठी मिळेल तेथे मिळेल त्या ठिकाणी स्थलांतरित व्हावे लागते. यातील काही कामगारांच्या कामाचे स्वरूप तर हंगामी स्वरुपाचे असते. त्यानंतर त्यांच्या पुढे रोजगारीचा प्रश्न हा उभाच असतो. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना, कुठल्याच प्रकारच्या सुविधा त्यांना उपलब्ध होत नाहीत. ते सगळ्याच बाबतीत वंचित राहत असल्याचे दिसून येत आहे.

गुजराथ राज्यातील भावनगर जिल्ह्यातील अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगारही प्रामुख्याने स्थलांतरित आणि असंघटित आहेत. या शीपयार्डातही त्यांच्या हिताचे रक्षण करणारी अशी कोणतीही संघटना त्यांच्या पाठीशी उभी नाही. अलंग रिसायकलींग शीपयार्डात कामासाठी

स्थलांतरित होणारे हे कामगार प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, झारखंड व पश्चिम बंगाल या प्रमुख राज्यातून इथे आलेले आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व नेपाळ येथूनही इथे कामासाठी कामगार स्थलांतरित झालेले आहेत. मात्र या राज्यातील कामगारांची संख्या अतिशय कमी आहे. नेपाळ येथून स्थलांतरित झालेले लोक प्रामुख्याने रखवालदारीचेच काम करत आहे. गुजराथ राज्यातील सुरत शहरात उत्तर प्रदेशातील स्थलांतरीत कामगार सर्वाधिक आहेत. हे कामगार सुतगिरण्यांमधे काम करत आहेत. गरीबी आणि बेरोजगारी हीच स्थलांतरापाठीमागची प्रमुख कारणे आहेत. अलंग रिसायकलींग शीपयार्डात अंदाजे ३० हजार स्थलांतरित कामगार काम करत आहेत. ही संख्या कमी जास्तही होते. कारण कधी कधी निकामी जहाजे उपलब्ध झाली नाही तर या कामगारांना बसून दिवस काढावे लागतात. अशा वेळी हे कामगार आपल्या मूळ गावी जाणे पसंत करतात. बहुतांशी पावसाळ्यात हे लोक गावी जातात. वर्षातून दोनदा तरी हे लोक गावी जातात. या कामगारांचा समग्र अभ्यास करण्यासाठी अनुसूची तयार केली. व त्यानुसार ३०० कामगारांच्या, प्रत्यक्ष मुलाखती घेऊन अनुसूची भरून घेतली त्याद्वारे त्यांचा कौटुंबिक शैक्षणिक आर्थिक व सामाजिक स्तर जाणून घेतला. अलंग शीपयार्डातील त्यांच्या कामाचे स्वरूप त्यांना मिळणारे वेतन, त्यांची स्थलांतराची कारणे, कामाच्या ठिकाणी मिळाणाऱ्या सुविधा व सुरक्षा, त्यांच्या राहण्याचे ठिकाण तिथे मिळणाऱ्या सुविधा, त्यांचा आहार व्यसने व औषधोपचार या बाबतीतही जाणून घेतले. या कामगारांच्या अनुपस्थितीत कुटुंबाची जबाबदारी कोण घेतो व महिन्याला ते घरी किती पैसे पाठवतात या गोष्टीही जाणून घेतल्या आहेत. तसेच हे सर्व कामगार स्थलांतरित असल्यामुळे या कामगारांना स्थानिक लोक कशी वागणूक देतात हे ही जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संकलित केलेल्या माहितीच्या आधारे या कामगारांचे वास्तविक जीवन समजून घेण्यासाठी संख्यात्मक दृष्ट्या सारणी तयार करून त्याचे टक्केवारी मधे प्रमाण काढलेले आहे. या विविध घटकांचे क्रमानुसार त्यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. सर्वांगिण माहितीच्या आधारावर संख्यात्मक तर्कसंगत निष्कर्ष येण्यास मदत झाली आहे. या सर्व माहितीचे विश्लेषणात्मक विवेचन प्रस्तूत प्रकरणात सादर केले आहे.

या विश्लेषणात ओरिसा बिहार पश्चिम बंगला उत्तर प्रदेश व झारखंड अशा या पाच राज्यातील ६० कामगारांप्रमाणे एकूण ३०० कामगारांच्या मुलाखती घेऊन त्यांचे विवेचन केले आहे त्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे. त्यासाठी खालील प्रमाणे महत्त्वाच्या घटकांची तक्तासूची व त्यांचे विश्लेषण व इतर घटकांचे वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण केले आहे.

## परिशीष्ट अ

**London to host Ship Recycling Conference 2015 :**

United Kingdom : This year's Ship Recycling Conference will be held from 16-17 June in the UK capital of London.

The event will provide a platform to exchange and discuss strategies to both improve safety and maximise profit in today's evolving industry. 'Delegates will receive the most up-to-date information on regulatory changes and commercial processes at our only annual conference on ship recycling in Europe,' notes the organiser Informa Maritime Events.

----------

स्थलांतरित झालेल्या कामगारांचे शोषण कशा रीतीने केले जाते या संदर्भातील काही रिपोर्ट सादर झाले तर काही वृत्तपत्रातून आलेल्या बातम्यांचा आढावाही या संदर्भात घेतलेला आहे. यात स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर केलेल्या कामगारांचा समावेश आहे.

शोषणात फक्त पुरुष कामगारांचाच समावेश असतो असे नाही तर स्त्रिया आणि लहान मुलांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. अलंग रिसायकलिंग शीपयार्डात काम करणारे कामगार हे पुरुषच आहेत. ते २५ ते ५० वयोगटातील आहेत. परंतु आपण एकंदरीत शोषणासंदर्भातला विचार लक्षात घेतला असता आपल्याला यात स्त्रिया आणि लहान मुलांचेही शोषण मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येत आहे.

## 'ब्ल्यू लेडीचा' शेवटचा प्रवास :

'ब्ल्यू लेडीचा' या महाकाय प्रवासी जहाजाच्या निमित्ताने अलंग शीप यार्डात मोठा विवाह निर्माण झाला होता. या संदर्भात पर्यावरण च्या संदर्भात कामकाज करणारे तज्ञ आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध दर्शविला होता. प्रकरण अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत गेले होते.

याच ‘ब्ल्यू लेडी’ जहाजाच्या अंतिम प्रवासाची ही रोमांचक कहाणी. आणि ‘ब्ल्यू लेडी’ च्या अंतिम प्रवासाला जो विरोध झाला तो आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर दर्शविण्यात आला होता.

यात पर्यावरणाच्या लोकांनी खूप महत्त्वाची भूमिका बजावली होती. काही व्यापारी संघटना व मानव अधिकार जपणाऱ्या लोकांनी सुद्धा यात सहभाग घेतलेला होता.

आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्यांनी विरोध केला होता त्यात जागतिक पातळीवर पर्यावरणाच्या संदर्भात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, त्याचप्रमाणे त्यात ग्रीन पीस बरोबरच ‘बॅन’ (Basel Action Network) बेसल संस्थेचा मूळ उद्देश हाच आहे की निकामी जहाजातील अतिशय आरोग्याला धोकादायक असा प्रदुषणमुक्त कचरा हा विकसित देशातून विकसनशिल देशात पाठवला जातो. त्यापासून तिथल्या पर्यावरणाबरोबरच तिथल्या लोकांच्या आरोग्यावर खूप घातक परिणाम होऊ शकतो. त्यासाठी या संस्थानी मुख्य विरोध दर्शविला होता.

राष्ट्रीय स्तरावर भारतात पर्यावरणाच्या संदर्भात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते त्याच प्रमाणे कॉर्पोरेट आणि मानवाधिकार जपणारे कायदा तज्ञ या लोकांचा सहभाग होता. तसेच संशोधन करणारे चळवळ करणारे स्वयं समाजसेवक गोपाल कृष्णा, मधूमीता दत्ता, वकील भूषण ओक्षा व कॉलिन गोनसाल्वीस या सर्वांनी या ‘ब्ल्यू लेडी’ च्या संदर्भात सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या याचिके संदर्भात न्याय मिळविण्यासाठी एकत्रितपणे काम करत होते.

आणि स्थानिक पातळीवर अलंग सोसियो शीप रिसायकलिंग ॲन्ड जनरल वर्कस असोसिएशन जी कामगारांच्या हितासंबंधात काम करण्याचा प्रयत्न करत आहे, स्थानिक पातळीवर ही संस्था काम करण्याचा प्रयत्न करते. परंतु तिला म्हणावे तितके यश प्राप्त होत नाही. अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांच्या होणाऱ्या शोषणा संदर्भात त्याच प्रमाणे ‘ब्ल्यू लेडी’ च्या अंतिम प्रवासाच्या विवादासंदर्भात प्रसार माध्यमातून सुद्धा बरीच चर्चा प्रसिद्ध झाली होती. मात्र बेसल अधिवेशन 2002; IMO, 2003 ILO - 2003 च्या सातत्याच्या प्रयत्नाने कामगारांच्या वेतन आणि सुरक्षेच्या संदर्भात योग्य अशी पावले उचलण्यास सुरुवात झाली.

## 'ब्ल्यू लेडीचा' रोमांचक इतिहास :

एसएस फ्रान्स या जहाजाची निर्मिती १९६० साली फ्रेंच लाईन  या कंपनीने केली होती. त्या काळात निर्मिती केलेली सर्वात लांब व सर्वात मोठी अशी ही प्रवासी बोट होती. तिचे एकूण वजन ४५००० टन होते. तिची लांबी ३१६ मीटर लांब व ३४ मीटर त्याची रुंदी होती. या जहाजाला एकूण १६ मजले आणि १४०० खोल्या होत्या.

१९७९ साली ती Norwegian क्रुस लाईन ला विकण्यात आली. जी (Star Cruise ltd -SCL) संबंधित कंपनी होती. त्यांनतर तिचे एसएस नॉर्वे असे नामकरण करण्यात आले आणि त्यानंतर ती जगातील अतिशय आकर्षित करणारी प्रभाव पाडणारी अशी प्रवासी वाहतूक करणारी एकमेव बोट होती. २००३ साली या प्रवासी जहाजाला गंभीर स्वरुपाचा अपघात झाला. बॉयलर च्या विस्फोटामुळे या प्रवासी जहाजाला मीयामी इथे नुकसान पोहोचले होते. त्यानंतर तिला जर्मनीमध्ये दुरुस्तीसाठी घेऊन जाण्याचे ठरविण्यात आले.२००४ मधे या संदर्भात सर्व सखोल असा अभ्यास करण्यात आला आणि परंतु या जहाजाची दुरुस्ती करणे त्या दुरुस्तीसाठी सुमारे १७ मिलियन युरो इतका खर्च अपेक्षित होता. त्यामुळे २००५ मधे या जहाजाने जर्मनी सोडले.

पुढे या जहाजाच्या कंपनीने हे निकामी जहाज विकण्याचा निर्णय घेतला परंतु या जहाजातील विघटन न होणारा असा निकामी कचरा खूप असल्याने त्याला बेसल ची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु बेसल कडून तश्या प्रकारची परवानगी मिळणे शक्य नसल्याने या जहाजान अवैध रित्या प्रवास करुन २००८ साली मलेशिया गाठले आणि हे जहाज बांगला देशात भंगार म्हणून तोडून टाकण्याचे ठरविण्यात आले मात्र BElA या संस्थेने त्याला जोरदार विरोध दर्शविला (BELA Bangladesh environmental lawyers association) त्यामुळे तिथे जे हे जहाज विकण्याची प्रक्रीया पूर्णत्वाला आली होती ती अवैध ठरविण्यात आली. त्यामुळे नॉर्वे ने तिथून प्रमाण करुन २००६ मधे दुबई गाठली. आरि तिथल्या अधिकाऱ्यांना हे जहा दुरुस्तीसाठी आणल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर या कंपनीने ते जहाज (Bermuda) to the liberian (Shell) company  ला विकण्यात आले. त्यानंतर लगेच एक महिन्यातच या कंपनीने हे जहाज भारतीय शीप ब्रेकींग कंपनी (हरियाना) स्टील डीमॉलिशशन प्रा. लिमिटेड) ला विकले. या कंपनीने सुद्धा

हे जहाज प्रिया ब्ल्यू इंडस्ट्रीज या कंपनीला लेगच हस्तांतरण केले आणि तिचे नाव 'ब्ल्यू लेडी' ठेवण्यात आले. (१५ मिलियन डॉलर इतकी त्या जहाजाची किंमत होती(

मात्र २००६ ला या जहाजाला भारतीय सागरी हद्दीत प्रवे करण्यापासून प्रतिबंध करण्यात आला. समाजसेवक गोपालकृष्ण यांनी सुप्रिम कोर्टात दाखल केलेल्या याचिकेमुळे हा प्रतिबंध करण्यात आला होता. मात्र मानवतेच्या दृष्टीकोनातून या जहाजाला अलंग जवळील पीपावाव येथे नांगर टाकण्याची परवानगी देण्यात आली. (मात्र २००६ सालीच कोणत्याही परवानगीशिवाय हे जहाज अलंक बंदरात दाखल झाले.) आरि ११ सप्टेंबर (३ऑगस्ट २००६)

२००७ साली सुप्रिम कोर्टाच्या अंतिम आदेशानुसार या जहाजाला तोडण्याची परवानगी देण्यात आली. या जहाजातील प्रचंड धोकादायक व आरोग्याला घातक अशा गोष्टीमुळे वास्तविकता या जहाजाच्या तोडणीला पूर्णत: विरोध करण्यात आला होता. मात्र यात मानवतेचा दृष्टीकोन पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी हा विरोध दर्शविण्यात आला होता. परंतु सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचा सर्वांनी मान ठेवला आहे. तरी सुद्धा हा झालेला निर्णय योग्य होता असे म्हणता येणार नाही.

शीप ब्रेकर्स यांच्या मते या जहाजाच्या तोडणीमुळे १००० एक लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे रोजगार मिळणार आहे. तसेच त्यातून उपलब्ध होणारे स्टील याचाही विचार केला गेला पाहिजे असा शीप ब्रेकर्स लोकांचा विचार होता.

मार्च २००७ साली भगवंतसिह हुलभा गोहिल हे सोसियाचे सरपंच यांनी आजुबाजूच्या गावातील १२ सरपंच या गावातील लोकांच्या वतीने जहाज तोडणीच्या विरोधाच्या संदर्भात याचिका दाखल केली होती. त्याच्या मतानुसार जहाज तोडणीमुळे जहाजातील विविध प्रकारची तेले वंगण आणि निकामी कचरा हा समुहात जशाच्या तसाच समुद्रात फेकला जातो त्यामुळे इथल्या मासेमारीच्या धंद्यावर खूप मोठा विपरित परिणाम होत आहे. त्याच प्रमाणे इथल्या पाण्याचा स्त्रोत इथे घेतल्या जाणाऱ्या पिकावर सुद्धा विकरित परिणाम झालेला दिसून येत अहे. सरपंच गोहिल यांनी आपल्या मुलाखतीत हे कष्ट केले आहे की आम्हाला शीप ब्रेकींग व्यवसाय बंद करायचा नाहीये पण हा व्यवसाय करणऱ्यांनी त्यातील कचऱ्याचे योग्य विघटन करावे, जेणे करुन आमच्या व्यवसायालाही कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही.

सुप्रिम कोर्टाने 'ब्ल्यू लेडीच्या' संदर्भात अंतिम निर्णय हा ११ सप्टेंबर २००७ रोजी दिला. व या निर्णयात कोर्टाने आपली बाजू अशा रितीने मांडली की या जहाजातील विघटन न होणारा कचरा ही जरी बाजू असली तरी सुद्धा या जहाजातून मिळणारे ४१००० टन स्टील आणि ७०० ते ९०० लोकांना मिळणारा रोजगार ही हा निर्णय घेण्या पाठीमागची महत्त्वाची भूमिका होती. आणि कोणताही विकास होताना काही मनाविरुद्ध होणाऱ्या गोष्टींचा स्वीकारही करावा लागतो. असे (TEC) (Technical Expert Committee) या समितीच्या सदस्यांनी मत व्यक्त केले.

जागतिक उदारीकरणाच्या प्रवाहात अलंग शीप ब्रेकींग रिसायकलींग यार्डात यापुढे काही सुधारणा होतील किंवा होणार नाहीत आणि सामाजिक आणि राजकिय वैचारिक चळवळी या चालूच राहतील परंतु सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा आदर करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

## परिशिष्ट ब

### स्थलांतरीत कामगारांच्या मुलाखतींचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण

**तक्तासूची**

(१) जिल्हा निहाय कामगार
(२) वयोगट
(३) स्थलांतराचे कारण
(४) अलंग येथे कुणाच्या माध्यमातून आले.
(५) कामाचे स्वरूप
(६) मिळणारे वेतन
(७) किती वर्षांपासून काम करत आहेत.
(८) अपघाताचे प्रमाण
(९) आहार
(१०) व्यसने
(११) औषधे कुठे घेतात
(१२) स्थानिक लोक कशी वागणूक देतात.
अशा विविध तक्त्यानुसार माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

**बिहार** **तक्ता क्र. १**

## जिल्हा निहाय कामगार

| अनु. क्र. | जिल्हा | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गया | ०७ | ११.६६ |
| २) | बाराबंकी | ०५ | ०८.३३ |
| ३) | मलईटोला | ११ | १८.३३ |
| ४) | छपरा | ११ | १८.३३ |
| ५) | कटिहार | ०५ | ०८.३३ |
| ६) | चंपारण | ०५ | ०८.३३ |
| ७) | | | |
| ८) | हतवा | ११ | १८.३३ |
| ९) | जयजीर | ०२ | ३.३३ |
| ९) | कुलबुल | ०१ | ०१.६६ |
| १०) | बंजारी | ०२ | ०३.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९६% |

बिहार हे सुद्धा अतिशय गरीब राज्य म्हणून ओळखले जाते. इथेही विकास नाही उद्योगधंदे नसल्याने इथल्या लोकांना रोजीरोटीसाठी स्थलांतरित व्हावे लागते. तक्ता क्र. १ नुसार आपल्याला बिहार राज्यातील विविध जिल्ह्यातून इथे अलंग रिसायकलींग शीपयार्डात रोजगारासाठी स्थलांतरित झालेले कामगार पहायला मिळत आहेत. एकूण १० जिल्ह्यातून हे कामगार इथे कामासाठी आले आहेत. मलईटोला छपरा आणि हतवा या तिनही जिल्ह्यातून प्रत्येकी ११ कामगार कामाला आले आहेत. त्यापाठोपाठ गया जिल्ह्यातून सात कामगार तसेच कटिहार चंपारण आणि बाराबंकी या तिनही जिल्ह्यातून प्रत्येकी ५/५ कामगार इथे कामाला आहेत. त्यापाठोपाठ जयजीर आणि बंजारी तालुक्यातून प्रत्येकी दोन–दोन कामगार कामाला

आले आहेत आणि कुलबुल जिल्ह्यातून फक्त एकच कामगार इथे कामाला आहे. जिल्हा निहाय कामगारांची एकूण सरासरी शेकडा ही ९९.९६% टक्के एवढी आहे.

**बिहार** **तक्ता क्र. २**

**वयोगट**

| **अनु. क्र.** | **वयोगट** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | २० ते ३० | १८ | ३0.00% |
| २) | ३१ ते ४० | १४ | २३.३३% |
| ३) | ४१ ते ५० | १८ | ३0.00% |
| ४) | ५१ ते ६० | १० | १६.६६% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९%** |

तक्ता क्र. २ वरून आपल्याला असे लक्षात येते की २० ते ६० वयोगटातील कामगार आज इथे काम करत आहेत. त्यात २० ते ३० वयोगटातील (१८ –३०%) २) ३१ ते ४० वयोगटातील कामगार हे १४ आहेत. (१४– २३.३३%) ४१ ते ५० वयोगटातील कामगार हे एकूण १८ आहेत. १८–३०%) तर ५१ ते ६० या वयोगटातील एकूण १० कामगार इथे काम करत आहेत. (१०– १६.६६%) त्यामुळे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% टक्के इतके आहे.

**शैक्षणिक पात्रता:–** या कामगारांची शैक्षणिक पात्रता जाणून घेताना संशोधकाला प्रकर्षाने हे जाणवले की इथे अशिक्षित कुणी नाही तसेच उच्चपदवीधर कुणी नाही मात्र प्राथमिक शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या २३ आहे. (२३–३८.३३%)

माध्यमिक शिक्षण घेतलेले एकूण ७ कामगार आहेत. (७–११.६६%) तर उच्च माध्यमिक ते पदवीधर असलेल्या कामगारांची संख्या ३० च्या घरात आहे. (३०–५०%) त्यामुळे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके असल्याचे दिसून येत आहे.

**भाषा :–** बिहार राज्यात प्रामुख्याने हिंदी भोजपूरी खडीबोली व बिहारी या भाषा बोलल्या जातात. त्यामुळे खडीबोली व हिंदी भाषा बोलणाऱ्या कामगारांचे प्रमाण अधिक आहे. हिंदी भाषा बोलणारे कामगार १६ आहेत. (१६–२६.६६%) खडी बोली बोलणारे एकूण १५ जण आहेत. (१५–२५%) तर बिहारी भाषा बोलणारे १४ जण आहेत. (१४–२३–६६%) भोजपूरी बोलणारे १० कामगार आहेत. (१०–१६.६६%) हिंदी व इंग्रजी समजणारे ५ कामगार आहेत. (५–०८.३३%) त्यामुळे भाषेचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९३% इतके आहे.

## वैवाहिक स्थिती :

बिहार राज्यातून कामासाठी आलेले हे कामगार विवाहित आहे. विवाहित असलेल्यांची संख्या सर्वाधिक आहे. ती ५८ आहे. (५८–९६.६६%) तर अविवाहितांची संख्या फक्त २ आहे. (२–३.३३%) कामगारांमधे घटस्फोटीत कुणीही नाही असे निदर्शनास आले आहे. एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**कुटुंबातील एकूण सदस्य** : अलंग इथे हे कामगार एकटेच कामाला आलेले आहेत. तरीही त्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्येचा आढावा आपल्याला इथे घ्यावा लागत आहे. कारण कुटुंबाच्या पालन पोषणासाठीच हे कामगार कामासाठी इथे स्थलांतरित झालेले आहेत. बिहार राज्यातील या कामगारांच्या कुटुंबात १ ते ५ सदस्य संख्या असलेल्या कामगारांची संख्या ही २१ आहे. (२१–३५%) तर ६ ते ८ सदस्य संख्या असलेले कामगार हे एकूण ३३ आहेत. (३३–५५.००%) आणि ८ ते १५ सदस्य संख्या असलेले कामगार हे एकूण ६ आहेत. (६–१०.००%) यावरून असे लक्षात येते की ६ ते ८ सदस्य संख्या असलेले कामगार सर्वाधिक आहेत. एकूण टक्केवारीचे प्रमाण हे पूर्ण १००% आहे.

**बिहार** **तक्ता क्र. ३**

**स्थलांतराचे कारण**

| अनु. क्र. | कारण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रोजगारासाठी | २३ | ३८.३३% |
| २) | गरीबी | २७ | ४५.००% |
| ३) | गरीबी+बेकारी | १० | १६.६६% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

अतिशय गरिबी आणि रोजगाराचे इतर कुठलेच साधन नसल्याने या कामगारांना कामासाठी परप्रांतात स्थलांतरित व्हावे लागते. बिहार राज्यही अतिशय गरीब राज्य म्हणून ओळखले जात असल्याने या राज्यातून अतिशय गरीबीमुळे जे कामगार स्थलांतरित झाले आहेत. त्यांची संख्या अधिक आहे. ती २७ आहे. (२७–४५%) तर रोजगारासाठी म्हणून आलेले कामगार २३ आहेत. २३ (४५%) तर गरीबी आणि बेकारी अशा दोन्ही बाजूंनी गांजलेले एकूण १० कामगार इथे शीपयार्डात कामासाठी आले आहेत. (१०–१६.६६%) यावरून स्थलांतराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके असल्याचे दिसून येत आहे.

**बिहार** **तक्ता क्र. ४**

## कुणाच्या माध्यमातून आले

| अनु. क्र. | माध्यम | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ओळखीचे लोक | ५४ | ९०.०० |
| २) | भाऊ | ०२ | ०३.३३ |
| ३) | मामा | ०१ | ०१.६६ |
| ४) | कंपनीकडून | ०१ | ०१.६६ |
| ५) | स्वत:आले | ०२ | ०३.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

तक्ता क्र. ४ च्या आकडेवारीवरून हे लक्षात येते की अलंग शीपयार्डात मोठ्या प्रमाणात कामगार हे ओळखीच्या लोकांच्या माध्यमातून इथे आलेले आहेत आणि ओळखीच्या माध्यमातून आलेल्या कामगारांची संख्या ही एकूण ५४ आहे. (५४–९०%) भाऊ व मामाच्या माध्यमातून १,२ जण आले आहेत. कंपनीच्या मार्फत एक कामगार तर स्वत:हून इथे कामासाठी आलेल्या कामगारांची संख्या २ आहे. (२–३.३३%) एकूण शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

## कामाचे स्वरुप

| अनु. क्र. | स्वरूप | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गॅसकटर | २५ | ४१.६६% |
| २) | क्रेन ऑपरेटर | ०६ | १०.००% |
| ३) | क्रेन हेल्पर | ०५ | ०८.३३% |
| ४) | जोडीवाला | १४ | २३.३३% |
| ५) | मास्टर मुकादम | ०१ | ०१.६६% |
| ६) | बिगारी | ०७ | ११.६६% |
| ७) | हॉटेल | ०१ | ०१.६६% |
| ८) | कपडेधुणे | ०१ | ०१.६६% |
| | एकूण | ६० | ९९.९६% |

तक्ता क्र. ५ वरून अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांच्या विविध कामांचे स्वरुप जाणून घेता येते आहे. बिहार राज्यातील कामगारांमधे गॅसकटर आणि जोडीवालाचे काम करणारे कामगार अधिक आहेत. गॅसकटरचे काम करणारे कामगार हे २५ आहेत. (२५–४१.६६%) तर जोडीवाला १४ कामगार आहेत. १४ (२३.३३%) त्याखालोखाल बिगारी काम करणारे ७ कामगार (७–११.६६%), क्रेन ऑपरेटर, ६ (६–१०%) क्रेन हेल्पर, ५ कामगार आहेत. (५–८.३३%) आणि मास्टर मुकादम १, हॉटेल चालवणारा १ व कपडे धुण्याचे काम करणारा १ कामगार आहे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९६% इतके आहे.

## यालंग शीप यार्डातील कामगारांच्या कामाचे स्वरुप दर्शविणारी छायचित्रे














مرقاب
MIRQAB


U
A



**जहाजाची कापणी करण्यासाठी वापरण्यात येणारे गॅसचे सिलेंदर**

**बिहार** **तक्ता क्र. ६**

**मिळणारे वेतन**

| **अनु. क्र.** | **वेतन** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | ५ ते ८ हजार | २४ | ४0.00% |
| २) | ९ ते १२ हजार | ३४ | ५६.६६% |
| ३) | १३ ते १५ हजार | 0२ | 0३.३३ |
| | एकूण | ६0 | ९९.९९% |

तक्ता क्र. ६ च्या माहितीनुसार या कामगारांना मिळणारे वेतन हे ५ ते १५ च्या हजाराच्या घरातील आहे. महिना पूर्ण भरल्यानंतर १५ दिवसांनी वेतन दिले जाते. पाच ते आठ हजार वेतन मिळणाऱ्या कामगारांची संख्या ही २४ आहे. (२४–४०%) ९ ते १२ हजार वेतन मिळणारे कामगार हे एकूण ३४ आहेत. तर १३ ते १५ हजार वेतन मिळणारे कामगार फक्त दोन आहेत. (२–३.३३%) इथे गॅसकटर व क्रेन ऑपरेटरचे काम करणाऱ्या कामगारांना सर्वाधिक वेतन मिळते. वेतनाचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९ % आहे.

## कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा:–

बिहार राज्यातील कामगारांनी या संदर्भात बोलताना सांगितले की ज्या प्लॅटवर ते काम करतात तिथे कुठल्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याचे सांगितले त्यामुळे सुविधा न मिळण्याचे सरासरी शेकडा प्रमाण हे १००% आहे.

## निवास व्यवस्था:– मिळणाऱ्या सुविधा

या कामगारांना आपल्या निवासाची व्यवस्था स्वत:ची स्वत:लाच करावी लागते. त्यामुळे कामगार इथे स्वत: झोपडीवजा घर बांधून राहतात. अथवा १०० रुपये वा २०० रुपये भाडे देऊन एका खोलीत ८ ने १० जण राहतात. १०० रुपये भाडे देऊन राहणाऱ्या कामगारांची संख्या ३५ आहे. (३५–५८.३३%) २०० रुपये भाडे देऊन राहणारे कामगार १२ जण आहेत. (१२–२०%) तर झोपडीवजा बांधलेल्या घरात राहणारे एकूण १३ जण आहेत. १३(२१.६६%) इतके आहे. सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

आपल्या निवासाच्या ठिकाणी या कामगारांना कुठल्याही मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. पाणी विकत घेणाऱ्या कामगारांची संख्या ही ४५ आहे. (४५–७५%) तर पाणी आणि वीज हे दोन्हीही विकत घेणारे कामगार हे १५ आहेत. (१५–२५%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे १००% पूर्ण आहे.

**बिहार** **तक्ता क्र. ७**

### किती वर्षापासून काम करता

| अनु. क्र. | वर्षे | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | सुरुवातीपासून | ०४ | ०६.६६% |
| २) | १ ते ५ | १५ | २५.००% |
| ३) | ६ ते १० | २९ | ४८.३३% |
| ४) | ११ ते २० | १२ | २०.००% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

अलंग शीपयार्डाची निर्मिती झाल्यापासून इथे काम करणारे कामगार आहेत आणि हे तक्ता क्र. ७ च्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. सुरुवातीपासून काम करणाऱ्या कामगारांची संख्या ४ आहे. (४–६.६६%) ६ ते १० वर्षे काम करणारे कामगार अधिक म्हणजे २९ आहेत. २९(४८.३३%) पंधरा वर्षे ते वीस काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही १२ आहे (१२–२०%) तर १ ते ५ वर्षे काम करणारे कामगार १५ आहेत. १५–२५%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९ आहे.

**बिहार** **तक्ता क्र. ८**

### अपघाताचे प्रमाण

| अनु. क्र. | प्रमाण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | किरकोळ अपघात | ५० | ८३.३३ |
| २) | गंभीर अपघात | ८ | १३.३३ |
| ३) | प्राणघातक अपघात | ०२ | ३.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९९ |

अतिशय धोकादायक आणि कष्टप्रद असे कामाचे स्वरूप असणाऱ्या ठिकाणी अपघात होणे ही साहजिक बाब आहे. संदर्भात संशोधकाने कामगारांशी बातचीत केली असता असे लक्षात आले की आज प्राणघातक अपघाताचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. कारण आज सुरक्षेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यामुळे प्राणघातक अपघात होण्याचे प्रमाण हे २(सहा महिन्यातून क्वचित) आहे. (२– ३.३३%) गंभीर अपघातही महिन्यातून ८ होत असतात. ८ (१३.३३%) आहे. मात्र किरकोळ अपघात हे दररोज ही मोठ्या प्रमाणावर घडत असतात. (किरकोळ अपघातात कापणे, खरचटणे, भाजणे) अशा प्रकारचे अपघाताचे प्रमाण हे ५० इतक `आहे. (५०–८३.३३%) सरासरी हे शेकडा प्रमाण ९९.९९% इतके आहे.

**आहार**:– आहाराच्या बाबतीत या कामगारांशी चर्चा केली असता शाकाहार व मासांहार असा दोन्ही प्रकारचा आहार करणारे कामगार आहे. शाकाहाराचे प्रमाण अधिक आहे. दररोजच्या जेवणात दाल चावल हेच प्रमुख अन्न असल्याचे या कामगारांनी सांगितले. मासांहार व कधीतरी केला जातो.

**बिहार** **तक्ता क्र. ९**

**व्यसने**

| **अनु. क्र.** | **व्यसन** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | तंबाखूजन्य पदार्थ | २७ | ४५ |
| २) | सिगारेट | २७ | ४५ |
| ३) | बीडी | ०३ | ०५ |
| ४) | दारू | ०३ | ०५ |
| | एकूण | ६० | १००% |

तक्ता क्र. ९ मधील आकडेवारीवरून असे लक्षात येते की तंबाखूजन्य पदार्थ आणि सिगारेट ओढणाऱ्या कामगारांची संख्या ही समसमान आहे. २७–२७.

(२७–४५%) बीडी पिणारे कामगार ३ आहेत. (३–०५) व दारू पिणारे कामगारही ३ आहेत. (३–०५%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे १००% आहे. बहुतांशी सर्वच कामगार थोड्या प्रमाणात दारू पितात. पण ते सांगत नाहीत.

**बिहार** **तक्ता क्र. १०**

**कामगारांना होणारे आजार**

| अनु. क्र. | आजार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | वरचेवर ताप खोकला | १० | १६.६६% |
| २) | श्वसनसंस्थेशी निगडीत | १६ | २६.६६% |
| ३) | त्वचा रोग | १२ | २०.००% |
| ४) | पचनसंस्थेशी निगडीत | १४ | २३.३३% |
| ५) | कायमस्वरूपी आजार | ०८ | १३.३३% |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

सतत तापमान प्रदुषण अशा अवस्थेत काम करताना त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असतो. तेव्हा या कामगारांना होणाऱ्या आजारा संदर्भात माहिती घेताना असे लक्षात आले की श्वसनसंस्थेशी निगडीत असलेल्या आजाराचे प्रमाण अधिक असून अशा कामगारांची संख्या १६ आहे. (१६–२६.६६%) पचन संस्थेशी निगडीत असलेल्या आजाराची निगडीत कामगारांची संख्या १४ आहे. १४ (२३.३३%) त्वचारोगाचे प्रमाण १२ आहे. १२–२०%) वरचेवर ताप

खोकला होण्याचे  प्रमाण असणारे कामगार हे १० आहेत. (१०–१६.६६%) आणि कायमस्वरूपी आजार असणाऱ्या कामगारांची संख्या ही आठ आहे. (८–१३.३३%) आजाराचे सरासरी एकूण शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

**बिहार** **तक्ता क्र. ११**

**औषधे कुठे घेता**

| **अनु. क्र.** | **औषधे** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | रेडक्रॉस | ४० | ६६.६६% |
| २) | खाजगी दवाखाना | ०५ | ०८.३३ |
| ३) | दवाखाना | १५ | २५.००% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

आजारी पडल्यावर आपण औषधे कुठे घेता या संदर्भात संशोधकाने विचारणा केली असता ४० कामगारांनी आपण अलंग इथल्या रेडक्रॉस दवाखान्यात औषधे घेत असल्याचे सांगितले. (४०–६६.६६%) अलंग येथील खाजगी दवाखान्यात औषधे घेणाऱ्या कामगारांची संख्या ५ आहे. (५–८.३३%) त्याचप्रमाणे एकूण १५ कामगार हे तळाजा येथील खाजगी दवाखान्यात औषधे घेत असल्याचे सांगितले. सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**पिढीजात व्यवसाय** : या कामगारांना त्यांच्या पिढीजात व्यवसायाबद्दल संशोधकाने विचारले असता बहुतांशी कामगारांनी आपला पीढीजात व्यवसाय शेती असल्याचे सांगितले. परंतु पाण्याचा अभाव आणि पावसाची अनिश्चितता त्यामुळे शेतीवर सुद्धा कुटुंबाचा गुजारा होत नाही. पीढीजात व्यवसाय शेती असणारे कामगार हे ३९ आहेत (३९–६५.००%) तर इतर मेहनत, मजदूरी करणारे कामगार हे २० आहेत. (२०–३३.३३%) व रखवालदारीचा पीढीजात व्यवसाय असणारा एकच कामगार आहे. (१–१.६६) शेकडा सरासरी प्रमाण हे ९९.९९% आहे.

**वार्षिक उत्पन्न :** या कामगारांचे एकूण वार्षिक उत्पन्न किती या बाबतीत असे समजले की पाच ते दहा हजार वार्षिक उत्पन्न असणारे एकूण ३८ कामगार आहेत (३८–६३.३३) बारा ते पंधरा हजार वार्षिक उत्पन्न असणारे कामगार एकूण ३ आहेत. (३–०५.००%) गरजेपुरते उत्पन्न मिळवणारे १५ जण आहेत. (१५–२५%) आणि खूपच कमी उत्पन्न असणाऱ्या कामगारांची संख्या ४ आहे. (०४–६.६६%) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**गावी पाठवले जाणारे पैसे** – आपल्या कुटुंबाला हे कामगार गावी ठेवून आल्यामुळे दर महिन्याला एक ठराविक रक्कम हे कामगार आपल्या घरी पाठवत असतात. त्यात १ ते ३ हजाररुपये पाठविणाऱ्यांची संख्या १० ते ४ ते ६ हजार रुपये पाठविणाऱ्यांची संख्या ही ४७ आहे. एकही पैसा घरी न पाठविणाऱ्या कामगारांची संख्या ३ आहे. त्याची एकूण टक्केवारी ही ९९.९९% इतकी आहे.

**बिहार** **तक्ता क्र. १२**

**स्थानिक लोक कशी वागणूक देतात**

| **अनु. क्र.** | **वागणूक** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | चांगली | ०४ | ०६.६६% |
| २) | ठीक ठीक | ४६ | ७६.६६% |
| ३) | चांगली वागणूक देत नाहीत | ०५ | ०८.३३% |
| ४) | तुच्छतेने वागवतात | ०५ | ०८.३३% |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

इथे काम करणारे सर्व कामगार स्थलांतरीत आहेत. स्थानिक लोकांबरोबर राहताना त्यांना खूप समायोजन करावे लागते. स्थानिक लोक या कामगारांबरोबर कसा व्यवहार करतात त्याचे निदर्शन

आपल्याला तक्ता क्र. १२ मधून होत आहे. कामगारांना ठीक ठीक वागणूक देण्याचे प्रमाण हे ४६ आहे. ४६–७६.६६%) चारच कामगार स्थानिक लोक चांगली वागणूक देत असल्याचा निर्वाळा देत आहेत. चांगली वागणूक देत नाहीत आणि तुच्छतेने वागवतात असे सांगणारे कामगार प्रमाण आहेत. (५–८.३३% ) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. १**

**जिल्हानिहाय कामगार**

| अनु क्र. | जिल्हा | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | हजारीबाग | १५ | २५.०० |
| २) | चतरा | १५ | २५.०० |
| ३) | धनबाद | १५ | २५.०० |
| ४) | जमतारा | १० | १६.६६ |
| ५) | धुमका | ०५ | ०८.३३ |
| | | | २ |
| एकूण | | ६० | ९७.९९ |

झारखंड हेसुद्धा भारतातील एक गरीब राज्य म्हणूनच ओळखले जाते. झारखंड येथूनही गुजराथ राज्यातील अलंग रिसायकलिंग शीप ब्रेकींग यार्डात रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांची संख्याही अधिक आहे. तक्ता क्र. १ नुसार झारखंड राज्यातूनही हजारीबाग, चतरा, धनबाद, जमतारा व धुमका या जिल्ह्यातूनही गुजराथ राज्यात रोजगारासाठी स्थलांतरित होणारे कामगार आहेत. यात हजारीबाग चतरा धनबाद येथून प्रत्येकी १५ कामगार (१५–२५%) आलेले आहेत व जमतारा जिल्ह्यातून दहा (१० – १६.६०%) व धुमका या जिल्ह्यातून ०५ कामगार आले आहेत (०५–०८.३३%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९७.९९% असल्याचे दिसून येत आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. २**

**वयोगट**

| **अनु. क्र.** | **वयोगट** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | २० ते ३० | २५ | ४१.६६ |
| २ | ३१ ते ४० | १४ | २३.३३ |
| ३ | ४१ ते ५० | १५ | २५.०० |
| ४ | ५१ ते ६० | ०६ | १०.०० |
| | | २ | |
| एकूण | | ६० | ९९.९९ |

तक्ता क्र. २ वरून आपल्याला असे दिसून येते झारखंड राज्यातून इथे कामाला आलेल्यापैकी २० ते ३० वयोगटातील कामगारांचे प्रमाण अधिक आहे. त्यांची संख्या २५ आहे. (२५–४१.६६) तर सर्वात कमी वयोगटातील सदस्य हे ५१ ते ६० वयोगटातले असून त्यांची संख्या ही ६ आहे. (६–१०.००%) ३१ ते ४० वयोगटातील सदस्यांची संख्या ही १४ आहे (१४–२३.३३%) आणि ४१ ते ५० वयोगटातील कामगारांची संख्या ही १५ आहे. (१५–२५%) त्यामुळे कामगारांच्या वयोगटाचे सरासरी एकूण शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके असल्याचे दिसून येत आहे.

**शैक्षणिक पात्रता :**

झारखंड राज्यातून आलेल्या कामगारांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. या अशिक्षितांची संख्या एकूण ४४ आहे. त्यामुळे या अशिक्षित कामगारांचे सरासरी शेकडा प्रमाण हे ७३.३३% इतके आहे तर ६ कामगार हे प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहेत. (६–१०%) तर व उच्च माध्यमिक व कॉलेजची पहिले वर्ष पूर्ण केलेले एकूण १० जण आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ९६.६६% इतकेआहे. या कामगारांचे शिक्षणाचे सरासरी प्रमाण हे ९९.९९% आहे.

**भाषा :**

झारखंड राज्यात प्रामुख्याने हिंदी भाषेचे प्रभुत्व आहे. आता हिंदीबरोबर थोडीफार इंग्रजी भाषाही बोलली जाते. मात्र हिंदी भाषेचेच इथे प्रभुत्व आहे. अलंग इथे काम करणारे कामगार प्रामुख्याने

सर्वच्या सर्व हिंदी भाषेचाच उपयोग जास्त करतात. यात हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ही सुमारे ५४ च्या घरात आहे. ९0% लोक हे हिंदी व थोडीफार इंग्रजी समजू व बोलू शकतात. त्यामुळे भाषेचे सरासरी शेकडा प्रमाण हे १00% आहे.

**वैवाहिक स्थिती :**

झारखंड राज्यातून इथे कामाला आलेल्या कामगारांच्या वैवाहिक स्थितीविषयी जाणून घेताना समजले की हे एकूण ६0 कामगारांपैकी सुमारे ५६ कामगार हे विवाहित आहेत. ५६ (९३.३३%) आणि फक्त ४ कामगार हे अविवाहित असल्याचे दिसून आले आहे. ४ कामगार अविवाहित (४–६.६) त्यामुळे झारखंड येथील कामगारांच्या वैवाहिक स्थितीचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९३% इतके असल्याचे दिसून येत आहे.

**कुटुंबातील सदस्य संख्या :**

आपल्या कुटुंबांना मूळ वतनी ठेवून हे कामगार इथे कामाला येतात. या कामगारांच्या कुटुंबातील सदस्य संख्येचा विचार करता इथे असे दिसून येत आहे की या कामगारांच्या कुटुंबात एकूण आठ सदस्य संख्या असलेल्या कामगारांची संख्या ही ४४ आहे. (४४ – ७३.३३) तर कुटुंबात एकूण ५ सदस्य असलेले कामगार हे १0 असल्याचे दिसून आले आहे. (१0 – १६.६६%) आणि सहा कामगारांच्या कुटुंबातील सदस्य संख्या ही फक्त ४ आहे. (६–१0%). सदस्य संख्येचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ३**

**स्थलांतरापाठीमागचे कारण**

| अनु क्र. | कारण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गरिबी | ४0 | ६६.६६ |
| २) | बेरोजगारी | १0 | १६.६६ |
| ३) | कुठलाच कामधंदा मिळत नाही | १0 | १६.६६ |
| | एकूण | ६0 | ९९.९८% |

झारखंड हे राज्य खूपच गरीबी असलेले राज्य त्यामुळे गरीबी या कारणामुळे स्थलांतर करणाऱ्या कामगारांचे प्रमाण हे अधिक आहे. ते एकूण ४० आहे. ४० म्हणजे (४०–६६.६६%) बेरोजगारीच्या कामगारांचे प्रमाण हे १० आहे व कोणताच कामधंदा मिळत नसणारे कामगारही एकूण १० आहेत. त्यामुळे इथे स्थलांतर करणाऱ्या कामगारांची मुख्य कारणे ही गरीबी व बेरोजगारीच आहेत व यांचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ४**

## अलंगला कुणाच्या माध्यमातून आले

| अनु. क्र. | माध्यम | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | मुकादम | २४ | ४०% |
| २) | ओळखीचे लोक | १४ | २३.३३ |
| ३) | नातेवाईक | २२ | ३६.३३ |
| एकूण | | ६० | ९९.९६ |

तक्ता क्र. ४ वरून आपल्याला असे दिसून येते की मुकादमाच्या माध्यमातून अलंग येथे कामाला आलेले कामगार हे २४ आहेत. (२४–४०%) ओळखीच्या माध्यमातून आलेले हे १४ जण आहेत. १४ (२३.३३%) व नातेवाईकांनी इथे कामाला बोलावून घेतलेल्या कामगारांची संख्या ही २२ आहे. (२२–३६.३३%) हे सरासरी शेकडा प्रमाण ९९.६६% इतके आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ५**

## कामाचे स्वरुप

| अनु. क्र. | प्रकार | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गॅस कटर | ३ | ५% |
| २) | जोडीवाला | २२ | ३६.६६% |
| ३) | लोडिंग | ३० | ५०.००% |
| ४) | हेल्पर | ०५ | ०८.३३% |
| एकूण | | ६० | ९९.९९% |

तक्ता क्र. ५ च्या आकडेवारीवरून आपणास असे दिसून येत आहे की इथे झारखंड मधून आलेले कामगार हे लोडिंग आणि जोडीवाला या कामात जास्त दिसून येत आहेत आणि गॅसकटर व हेल्पर यांची संख्या आपल्याला खूप कमी दिसून येत आहे. गॅसकटर ३–(३–५%), जोडीवाला २२ (२२–३६.६६%) लोडिंग (३०–५०.००%) आणि हेल्पर ५ (५ – ८.३३%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण ९९.९९% इतके दिसून येत आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ६**

## मिळणारे वेतन

| अनु. क्र. | वेतन | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | सहा हजार | ५ | ८.३३ |
| २) | बारा हजार | ३ | ५.०० |
| ३) | दहा हजार | २२ | ३६.६६ |
| ४) | तेरा हजार | ३० | ५०.०० |
| | | ६० | ९९.९९ |

तक्ता क्र. ६ मधील माहितीनुसार आपल्याला हे दिसून येते की झारखंडमधील कामगार हे प्रामुख्याने लोडिंग व जोडीवाला याच कामात माहीर आहेत. त्यामुळे तेरा हजार रुपये वेतन घेणाऱ्या कामगारांची संख्या ३० आहे. ३० (३०–५०%). बारा हजार वेतन घेणारे फक्त ३ जण आहेत. ३ (३–५%) दहा हजार रुपये वेतन घेणारे एकूण २२ कामगार आहेत. त्यामुळे वेतनाचे शेकडा सरासरी प्रमाण हे ९९.९९ इतके आहे.

**कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा –**

झारखंड राज्यातील काम करणाऱ्या या कामगारांशी बातचीत करताना संशोधकाला असे दिसून आले की इथे काम करणाऱ्या या कामगारांना खूपच कमी सुविधा मिळत असल्याचे दिसून आले. सुमारे ५४ लोकांनी कोणत्याही सुविधा मिळत नसल्याचे सांगितले. (५४–९०%) आणि फक्त ६ कामगारांनीच थोड्याफार सुविधा मिळत असल्याचे कबूल केले. (६–१०%). त्यामुळे सुविधांचे सरासरी शेकडा प्रमाण हे १००% आहे.

**निवास व्यवस्था व मिळणाऱ्या सुविधा –**

झारखंड येथून अलंग इथे कामाला आलेल्या या कामगारांना निवासाची व्यवस्था ही आपली आपल्यालाच करून घ्यावी लागते. मूळातच हे गरीब राज्यातून आलेले हे कामगार भाड्याच्या घरात राहू शकत नाहीत. त्यामुळे हे स्वत:नीच उभारलेल्या झोपडीवजा घरातच राहतात.


एकूण ५४ कामगार हे अशा झोपडीवजा घरात राहतात. ३ कामगार १०० रुपये भाड्याच्या खोलीत राहतात व ३ कामगार आपल्या नातेवाईकासोबतच राहतात. त्यामुळे या कामगारांच्या निवासाच्या सरासरीचे प्रमाण हे १००% असल्याचे दिसून येत आहे. (५४%–९०%) (३–५%) (३–५%) निवासाच्या ठिकाणी या कामगारांना कुठल्याही मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. पिण्याचे पाणी लाईट शौचालय अशा कुठल्याही प्रकारची सुविधा या कामगारांना उपलब्ध होत नाही.



त्यांच्या घरांचे दर्शन घडविणारे हे छायाचित्र




प्लॉटच्या समोरील एक दृश्य



अशा झोपडीवजा घरात हे कामगार राहतात



पत्र्या आणि लाकडाच्या साहाय्याने बनवलेल्या या झोपड्या



गरीबीचे दर्शन घडविणोर हे छायाचित्र





**झारखंड** **तक्ता क्र. ७**

**किती वर्षापासून काम करता**

| **अनु क्र.** | **वर्षे** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | १५ | २५% |
| २ | १५ ते २० | १५ | २५% |
| ३ | २० वर्षाहून अधिक | ३० | ५०% |

तक्ता क्र. ७ वरून आपल्याला असे दिसून येते की इथे २० वर्षाहून अधिक काळ काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही ३० आहे. तर १५ ते २० वर्षे काम करणाऱ्या कामगारांची संख्या १५ व १ ते १० वर्षे काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही सुद्धा १५ असल्याचे दिसून येत आहे. (३०–५०%) (१५–२५%) (१५–२५%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे १००% आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ८**

**अपघाताचे प्रमाण**

| **अनु. क्र.** | **स्वरूप** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | किरकोळ | ५० | ८३.३३ |
| २ | गंभीर | ०८ | १३.३३ |
| ३ | प्राणघातक | ०२ | ०३.३३ |
| एकूण | | ६० | ९९.९९ |

अलंग शीपयार्डात काम करणारे कामगार अतिशय जोखमीचे व अतिशय कष्टप्रद वातावरणात काम करत असतात. त्यामुळे इथे छोटे मोठे अपघात घडतच असतात. परंतु आता सुरक्षा व्यवस्था पाळली जात असल्याने आता प्राणघातक अपघाताचे प्रमाण खूप कमी झाले आहे. आता प्राणघातक अपघाताचे प्रमाण हे २ आहे. (२:३.३३%) गंभीर अपघाताचे प्रमाण आठ आहे. (८–

१३.३३%) आणि किरकोळ स्वरूपाच्या अपघाताचे मात्र ५० इतके होत असतात. (५०-८३.३३%). त्यामुळे अपघाताचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**आहार -**

आहाराच्या बाबतीत या कामगारांशी चर्चा केली असता असे दिसून येत आहे की बहुतांशी कामगार हे शाकाहारी आहेत. मांसाहारी करणारे कामगार हे फक्त २ जणच आहेत व ५८ जण हे शाकाहारीच आहेत. (५८-९६.६६%) व २ जण मांसाहारी (२-३.३३) आहेत. या लोकांच्या कामाच्या वेळा ७ ते ७ असल्याने हे लोक दररोज फक्त दाल-चावल खाणेच पसंद करतात. फक्त रविवारी वेगळे जेवण केले जाते. आहाराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. ९**

**व्यसने**

| **अनु. क्र.** | **व्यसने** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | तंबाखू, सिगारेट | २० | ३३.३३% |
| २) | सिगारेट | १० | १६.६६% |
| ३) | तंबाखू | १० | १६.६६% |
| ४) | दारु, तंबाखू, सिगारेट | २० | ३३.३३% |
| एकूण | | ६० | ९९.९८% |

तक्ता क्र. ९ वरून आपणास असे दिसून येते की खूप अंग मेहनतीचे काम करणारे हे कामगार एक तर एकटेच असतात. त्यामुळे ते व्यसनाच्या आधीन गेलेले असतात. यात तंबाखू, सिगारेट व्यसन असलेले कामगार एकूण २० (२०-३३.३३%) व दारु, तंबाखू व सिगारेट असणारे कामगार ही २० आहेत. (२०-३३.३३%) व तंबाखू आणि सिगारेट पिणारे कामगार हे एकूण दहा दहा जण आहेत. (१०-१६.६६%) व्यसनाचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. १०**

## कामगारांना होणारे आजार

| अनु. क्र. | आजार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | वरचेवर ताप, खोकला | २५ | ४१.६६ |
| २) | पचनसंस्था आजार | १० | १६.६६ |
| ३) | त्वचा रोग | ०५ | ०८.३३ |
| ४) | श्वसनाचे आजार | १५ | २५.०० |
| ५) | कायमस्वरुपी आजार | ०५ | ०८.३३ |
| एकूण | | | ९९.९८ |

अतिशय कष्टप्रद काम करणारे कामगार व सतत आग व धुराशी संपर्क व अतिशय अस्वच्छ अशा परिसरात हे कामगार राहतात. त्यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. यात वरचेवर ताप खोकला होणारे कामगार हे २५ आहेत. (२५–४१.६६) पचनसंस्थेचे आजार असणारे कामगार हे १० आहेत. (१० – १६.६६%) आहेत. त्वचा रोग व कायम स्वरूपाचे आजार असणारे कामगार हे ५ आहेत. (५–८.३३) तर श्वसनाचे आजार असणारे एकूण १५ कामगार आहेत. (१५–२५%) कामगारांच्या होणाऱ्या आजाराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहेत.

**झारखंड** **तक्ता क्र. ११**

## औषध कुठे घेता

| अनु. क्र. | प्रकार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रेडक्रॉस | ५० | ८३.३३ |
| २) | रेडक्रॉस खाजगी | ०५ | ०८.३३ |
| ३) | खाजगी | ०५ | ०८.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९९ |

अलंग शीपयार्डात काम करणारे कामगार हे प्रामुख्याने रेडक्रॉस दवाखान्यातूनच प्रामुख्याने औषधोपचार करत असतात. रेडक्रॉस दवाखान्यातून औषधे घेणारे एकूण ५० कामगार आहेत. (५०–८३.३३) तर रेडक्रॉस व खाजगी दवाखान्यातून औषधे घेणाऱ्या कामगारांची संख्या ही (५–८.३३%) व खाजगी दवाखान्यातून औषध घेणारे कामगार हे ५ आहेत (५–८.३३%). औषध घेण्याचे सरासरी प्रमाण हे ९९.९९% आहे.

## पिढीजात व्यवसाय –

झारखंड येथील कामगारांचा पिढीजात व्यवसाय हा थोडीफार शेती व मोलमजुरी करण्याचाच आहे. कारण हे कामगार खूप गरीब आणि अतिशय निर्जन अशा भागात असल्याने इथे उद्योगधंद्याची वानवा आहे. त्यामुळे इथे मोलमजुरी करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही.

शेती असणारे कामगार हे १० जणच आहेत. (१०–१६.६६) आणि ५० कामगार हे मोलमजुरीच त्यांचा पिढीजात व्यवसाय असल्याचे नमूद करतात. (५०–८३.३३) त्यामुळे पिढीजात व्यवसायाचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% असल्याचे दिसून येत आहे.

## वार्षिक उत्पन्न –

मूळातच हे कामगार मोलमजुरी करून आपला चरितार्थ चालवत असल्याने या लोकांचे वार्षिक उत्पन्न हे गरजेपुरतेच असल्याचे दिसून आले आहे. बहुतांशी सर्वच कामगार गरीब परिस्थितीतून आल्याने त्यांचे वार्षिक उत्पन्न फारसे नसल्याचे त्यांनी नमूद केले. सर्वच कामगारांनी गरजेपुरते उत्पन्न कसेबसे मिळत असल्यानेच आम्हाला स्थलांतर करावे लागते. एकूण ६० ही कामगारांचे वार्षिक उत्पन्न हे गरजेपुरते आहे. त्यामुळे वार्षिक उत्पन्नाचे सरासरी प्रमाण हे १00% असल्याचे दिसून येते.

## गावी पाठवले जाणारे पैसे –

अलंग येथे कामाला आलेले हे कामगार आपल्या कुटुंबियांसाठी दर महिन्याला ठराविक रक्कम घरी पाठवतात. त्यात ३ ते ४ हजार पाठवणारे कामगारांची संख्या ४० आहे व पाच हजार

पाठविणारे १० जण आहेत आणि दहा जण ६ हजार रुपये पाठवणारे आहेत. (४०–६६.६६%) (१०–१६.६६%) (१०–१६.६६%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण ९९.९८% आहे.

**झारखंड** **तक्ता क्र. १२**

**स्थानिक लोक कशी वागणूक देता**

| अनु. क्र. | वागणूक | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ठीक ठीक | ५२ | ८६.६६% |
| २) | थोडी चांगली | ०८ | १३.३३% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

या स्थलांतरित कामगारांना इथे जीवन जगताना खूपच समायोजन करावे लागते. सतत त्यांना एका अनामिक भीती व दडपणाखाली वावरावे लागते. या संदर्भात स्थानिक लोक ठीक वागणूक देतात असे सांगणारे ५२ कामगार तर चांगली वागणूक मिळते असे सांगणारे आठ कामगार होते. ५२ (५२–८६.६६) व ८ (१३.३३) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. १**

**जिल्हा निहाय कामगार**

| **अनु. क्र.** | **जिल्हा** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | गंजाम | ३४ | ५६.०६ |
| २) | जाजापूर | १० | १६.०६ |
| ३) | सुंदरगढ | ०७ | ११.०६ |
| ४) | संबलपूर | ०९ | १५.०० |
| | एकूण | ६० | ९८.१८% |

तक्ता क्र. १ नुसार जिल्हा निहाय कामगारांची माहिती आपल्याला इथे मिळत आहे. इथे ओरिसा राज्यातून एकूण चार जिल्ह्यातून हे कामगार इथे कामाला आलेले आहेत. त्यात गंजाम मधून सर्वाधिक (३६–५६.०६%) जाजापूर येथून (१०–१६.०६%) सुंदरगढ येथून (७–११.०६%) तर संबळपूर येथून (९–१५%) कामगार आलेले दिसून येत आहेत. जिल्हा निहाय कामगारांची एकूण सरासरी शेकडा ही ९८.१८% इतकी आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. १**

**वयोगट**

| **अनु. क्र.** | **वयोगट** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | २० ते ३५ | १९ | ३१.६६ |
| २) | ३६ ते ४५ | २८ | ४६.६६ |
| ३) | ४६ ते ६५ | १३ | २१.६६ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९८** |

तक्ता क्र. २ नुसार सर्वेक्षण केलेल्या ६० उत्तरदात्यांपैकी २० ते ३५ वयोगटातील एकूण १९, ३६ ते ४५ वयोगटातील एकूण २८ तर ४६ ते ६५ वयोगटातील एकूण १३ कामगार आहेत. म्हणजे इथे काम करणाऱ्या कामगारांमध्ये २० ते ६५ वयोगटातील कामगार काम करताना दिसून येत आहेत. त्यानुसार शेकडा प्रमाण हे ९९.९८% असल्याचे दिसून येत आहे.

**शैक्षणिक पात्रता**

या कामगारांची शैक्षणिक पात्रता जाणून घेताना संशोधकाला असे दिसून आले की कामगारांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण सर्वाधिक असून ते एकूण (४३–७१.६६%) इतके आहे. प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. ते ७–११.६६% इतके तर निरक्षर कामगारांचे प्रमाण हे (१०–१६.६६) असे असल्याचे दिसून येते.

ओरिसा राज्यातील हे कामगार असल्याने तेथील स्थानिक उरीया भाषा बोलणारे कामगार हे ३० आहेत. ३०–५०%) तसेच उरीया+ हिंदी भाषा जाणणारे कामगार हे एकूण २६ आहेत. (२६–४३.३३%) तर उरीया+ हिंदी+इंग्रजी भाषा जाणणारे एकूण चार कामगार आहेत. एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९३% इतके आहे.

**वैवाहिक स्थिती:–** ६० संख्येपैकी एकूण ५२ कामगार (५२–८६.६६%) अविवाहित ८ कामगार (८–१३.३३%) आहेत. घटस्फोटीत कुणीही नाही. सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे. या कामगारांचा या कामगारांच्या कुटुंबातील एकूण सदस्या संख्येचा विचार करता ० ते १ या गटात ८ कामगार आहेत. (८–१३.३३%) २ ते ४ सदस्य असलेल्या कामगारांची संख्या ही १८ आहे. (१८–३६%) आहे तर ५ ते ९ सदस्य असलेल्या सदस्यांची संख्या ही ३४ आहे. (३४–५६.६६%) अशी आहे. अधिक कुटुंबसदस्य असलेल्या कामगारांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे. एकूण टक्केवारीचे प्रमाण हे ९९.९९% आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. ३**

**स्थलांतराचे कारण**

| **अनु. क्र.** | **कारण** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | गरीबी+बेरोजगारी | १६ | २६.६६ |
| २) | गरिबी | १६ | २६.६६ |
| ३) | कुटुंबाच्या पोषणासाठी | २८ | ४६.६६ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९८%** |

स्थलांतराच्या संदर्भात माहिती घेताना संशोधकाला असे आढळून आले की ज्या राज्यातून हे कामगार इथे कामासाठी स्थलांतरीत झाले आहेत तिथे अतिशय गरिबी व रोजगाराचे कुठलेच साधन उपलब्ध नसल्याने त्यांना इथे स्थलांतरित व्हावे लागले आहे. यात गरीबी+ बेरोजगारी असणारे कामगार (१६–२६.६६%) नुसती गरिबी असणारे एकूण १६ आहेत.

(१६–२६.६६%) मात्र कुटुंबाच्या पोषणासाठी स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांची संख्या अधिक आहे. ती २८ आहे. (२८–४६.६६%) स्थलांतराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% असल्याचे दिसून आले.

**ओरिसा** **तक्ता क्र. ४**

**कुणाच्या माध्यमातून आले**

| **अनु. क्र.** | **माध्यम** | **एकूण संख्या** | **शेकडा** |
|---|---|---|---|
| १) | गावातील लोक | २८ | ४६.६६ |
| २) | नातेवाईक | २८ | ४६.६६ |
| ३) | मुकादम | ०४ | ०६.६६ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९८%** |

तक्ता क्र. ४ च्या आकडेवारीवरून हे लक्षात येते की अलंग शीपयार्डात काम करण्यासाठी बहुतांशी कामगार हे नातेवाईक व गावातील लोकांनी कामाला बोलावून घेतल्यामुळे इथे कामाला आल्याचे दिसून येते. ती एकूण संख्या ५६ आहे. तर मुकादमाच्या माध्यमातून आलेल्या कामगारांची संख्या फक्त ४ आहे. एकूण शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. ५**

**कामाचे स्वरुप**

| **अनु. क्र.** | **स्वरूप** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | लोडिंग | २५ | ४१.६६ |
| २) | गॅसकटर | १४ | २३.३३ |
| ३) | क्रेन ऑपरेटर | ०५ | ०८.३३ |
| ४) | मालपाणी | ०२ | ०३.३३ |
| ५) | तेल काढणे | ०३ | ०५.०० |
| ६) | जोडीदार | ०२ | ०३.३३ |
| ७) | बिगारी | ०८ | १३.३३ |
| ८) | रखवालदार | ०१ | ०१.६६ |
| | एकूण | ६० | ९९.९७ |

अलंग शीपयार्डात प्रामुख्याने निकामी जहाजे तोडण्याचे खूपच जोखमीचे व अतिशय कष्टप्रद असे काम हे कामगार करत असतात. तक्ता क्र. ९ पाहता त्यांच्या कामाचे स्वरूप व वर्गीकरण आपल्याला समजून येते. ओरिसाच्या कामगारांचे वैशिष्ट्य हे की हे कामगार लोडिंग अन् लोडिंग काम करण्यात त्यांचे प्रावीण्य आहे. त्यामुळे इथे लोडिंग–अन लोडिंग करण्यामधे या कामगारांची संख्या अधिक म्हणजे २५ आहे. (२५–४१.६६) त्यानंतर गॅसकटर (१४–२३.३३) क्रेन ऑपरेटर (०५–०८.३३), मालपाणी (०२–०३.३३) तेल काढणेचे काम (०३–०५.००) जोडीदार (२–

३.३३%) बिगारी (८–१३.३३%), रखवालदार (१–१.६६%) सर्वात कमी संख्या ही रखवालदाराची आहे. एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९७% आहे.




**अलंग शीप यार्डातील प्लॉट क्र. २९**



सकाळी लगबगीने कामावर जाणारे कामागर



प्लॉटवर जहाजतोडीचे काम सुरु असतानाचे छायाचित्र









कामाच्या ठिकाणीच आपला डबा खाणारा वृद्ध कामगार







ढाब्यावर चहा व डबा खाणारे कामगार

**ओरिसा** **तक्ता क्र. ६**

**मिळणारे वेतन**

| अनु. क्र. | वयोगट | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १००० ते ६००० | ०८ | १३.३३ |
| २) | ७००० ते ९००० | २३ | ३८.३३ |
| ३) | १०,००० ते १२,०००० | २७ | ४५.०० |
| ४) | १२,००० पुढे | ०२ | ०३.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

तक्ता क्र. १० च्या माहितीनुसार या कामगारांना मिळणारे वेतन हे ६ ते १२ हजारांच्या घरात आहे. संपूर्ण महिना भरल्यानंतर हजेरीचे कार्ड मुकादमाकडे जमा करावे लागते. त्यानंतर १५ दिवसांनी या कामगारांना वेतन मिळते. कुठल्याही प्रकारची उचल दिली जात नाही. ज्या दिवशी काम कराल त्याच दिवसाचे पैसे अशा तत्त्वावरच त्यांना वेतन मिळते. अडीअडचणींच्या वेळी कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत दिली जात नाही.

१) १ ते ६ हजार वेतन मिळणारे कामगार (८–१३.३३%) २) ७००० ते ९००० वेतन मिळणाऱ्या कामगारांची संख्या २३–३८.३३%) आहे. १० ते १२ हजार वेतन मिळणाऱ्या कामगारांची संख्या ही २७–४५.००%) आहे. १२ हजारापुढे वेतन घेणारे कामगार हे दोनच आहेत. २–३.३३%) सर्वाधिक कमी वेतन हे गॅसकटर व क्रेन ऑपरेटर यांना मिळते. एकूण शेकडा प्रमाण ९९.९९% आहे.

## कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा:–

ज्या प्लॉटवर हे कामगार जहाज तोडणीचे काम करतात त्या ठिकाणी या कामगारांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत योग्य ती काळजी घेतली जातेच असे नाही. कारण कधी ड्रेस मिळाला तर

बुट नाही तर कधी चश्मा नाही. अशी अवस्था असल्याचे कामगारांनी सांगितले. काही ठिकाणी याचे पैसेही त्यांच्याच पगारातून कापले जातात. कुठल्याही प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात नसल्याचे मत प्रामुख्याने कामगारांनी व्यक्त केले. सुविधा मिळत नाही असे सांगणाऱ्या कामगारांची संख्या ५४ आहे. (५४–९०%) थोड्या सुविधा मिळतात असे सांगणाऱ्यांची संख्या ही २ आहे. (२–३.३३%) व विशेष सुविधा नाही असे सांगणारे कामगार हे ४–०६.६६%) आहे. एकंदरीत सुविधा न मिळणाऱ्या कामगारांची संख्याच अधिक आहे. एकूण शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

## निवास स्थान व मिळणाऱ्या सुविधा:–

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या या स्थलांतरित कामगारांना निवासाची व्यवस्था स्वत:ची स्वत:लाच करावी लागत आहे. ती जबाबदारी मालक घेत नाही. त्यामुळे आपल्या काम चालू असलेल्या प्लॉटसमोरच हे कामगार स्वत:च बांधलेल्या झोपडीवजा घरात राहतात. काही कामगार हे १०० रुपये, तर काही कामगार २०० रुपये (प्रति माणशी) भाडे देऊन एकाच खोलीत ७ ते ८ जण एकत्र राहतात. झोपडीवजा बांधलेल्या घरात राहणाऱ्या कामगारांची संख्या ३० आहे. ३०–५०%) भाड्याने १०० रुपये देऊन राहणारे कामगार हे १५ आहेत. (१५–२५%) २०० रुपये भाडे देऊन राहणारे कामगार हे ९ आहेत. (९–१५%) तर आपल्या नातेवाईकासोबत राहणारे कामगार हे ६ आहेत. (६–१०%) एकूण टक्केवारी ही १००% पूर्ण आहे.

इथे राहणाऱ्या कामगारांना निवासाच्या ठिकाणी कुठल्याच प्रकारच्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या कामगारांना पाणी, वीज, शौचालय, गटारे सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अतिशय दयनीय अवस्था आहे. अशाही परिस्थितीत हे कामगार इथे राहत आहेत. पिण्याचे पाणीही प्रती ३० रुपये बॅरल प्रमाणे विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसलेल्या कामगारांची संख्या ६० आहे. त्यामुळे टक्केवारी पुर्णपणे १००% आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. ७**

**किती वर्षापासून काम करतात**

| **अनु. क्र.** | **वर्षे** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | ० ते १ | ०२ | ०३.३३ |
| २) | २ ते ६ | १४ | २३.३३ |
| ३) | ७ ते १५ | ४० | ६६.६६ |
| ४) | १६ ते २५ | ०४ | ०६.६६ |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

अलंग येथे कामाला सुरुवात करून १६ ते २५ वर्षे काम करणाऱ्या कामगारांची संख्या ४ आहे. (४–०६.६६%) , ७ ते १५ वर्षे पुर्ण करणारे कामगार हे ४० आहेत. ४०.६६.६६%) तर २ ते ६ वर्षे पूर्ण करणारे कामगार पुर्ण करणारे कामगार हे १६ जण आहेत. (१४–२३.३३%) तसेच एखादे वर्ष पुर्ण करणारे कामगार २ आहेत. २–३.३३%) २५ वर्षांपासून काम करणारे कामगारही अजूनही काहीही विशेष बदल झाला नसल्याचे सांगतात. आम्ही १६ रुपयांपासून कामाला सुरुवात केली. आज २५० ते ३०० रुपये झाले आहेत. व रविवारची एक सुट्टी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. पण सुट्टीच्या दिवसांचे पैसे मिळत नाहीत.

**ओरिसा** **तक्ता क्र. ८**

**अपघताचे प्रमाण**

| **अनु. क्र.** | **प्रमाण** | **एकूण संख्या** | **शेकडा** |
|---|---|---|---|
| १) | किरकोळ अपघात | ४८ | ८०.००% |
| २) | गंभीर अपघात | १० | १६.६६% |
| ३) | प्राणघातक | २ | ३.३३% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

जहाज तोडणीचे काम अतिशय धोकादायक तसेच खूप कष्टप्रद आहे. इथे अपघात होण्याची शक्यता अधिक असते. तरीही पूर्वीपेक्षा सुरक्षिततेच्या बाबतीत अधिक दक्षता पाळली जात आहे. त्यामुळे प्राणघातक अपघाताचे प्रमाण आता खूप कमी झाले आहे. गंभीर स्वरुपाचे अपघात होतात. पण त्याचेही प्रमाण थोड आहे. किरकोळ अपघात मात्र रोजच्या रोज होतच असतात. त्यात भाजणे, कापणे अवजड सामान पायावर पडणे अशा स्वरुपाचे अपघात होत असतात.

## ओरिसा:- आहार

आहाराच्या बाबतीत या कामगारांशी चर्चा केली असता असे लक्षात आले की शाकाहारी आणि मासांहारी असे दोन्ही प्रकारचे आहार हे कामगार घेतात. मासांहार हा सुट्टीच्या दिवशी केला जातो. इतर दिवशी सकाळी ७ ते संध्याकाळी ७ अशा कामाच्या वेळा असल्याने फक्त दाल-भात व बटाट्याची भाजी हाच आमचा मुख्य आहार असल्याचे कामगारांनी सांगितले. सकाळी कामाला जाण्यापूर्वीच दाल भात तयार करून ठेवला जातो. एक वाजता जेवणाची सुट्टी होते. तेव्हा दाल भात भाजी असे जेवण एकत्रितरित्याच केले जाते. या कामगारांमधेही शाकाहारी लोकांचे प्रमाण हे ५० आहे. तर मासांहारी आहार घेणारे कामगार हे १० आहेत.



**अन्न शिजवताना काम करणारा कारागीर**



नफा ना तोटा या तत्वावर हॉटेल चालवणो कामगार



**ओरिसा** **तक्ता क्र. ९**

**व्यसने**

| अनु. क्र. | व्यसन | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | सिगारेट | ३७ | ६१.६६% |
| २) | तंबाखू-सिगारेट | ११ | १८.३३% |
| ३) | गुटखा | ०७ | ११.६६% |
| ४) | दारू | ०५ | ०८.३३ |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

तक्ता क्र. ९ मधील आकडेवारीनुसार आपणास असे लक्षात येते की, अतिशय कष्टप्रद अशी कामे करणाऱ्या या कामगारांना सिगारेट-तंबाखू, गुटखा आणि दारूचे व्यसन असल्याचे आपल्याला दिसून येत आहे. कुटुंबापासून दूर राहत असल्याने वेश्यावृत्ती तसेच समलैंगिक संबंध ठेवणारे कामगार असल्याचेही निदर्शनास आले आहे. मात्र ते प्रमाण कमी आहे. गुजराथ सारख्या राज्यात जिथे दारूबंदी आहे तिथेही हे सर्व कामगार दारू पितात. काही तर दबाके दारू पिते है।

इथे एक पाऊच ५0 रुपयाला मिळतो. ही माहिती संशोधकाला कामगारांनीच दिली. सिगारेट व्यसन असणारे कामगार हे (३७-६१.६६%) , तंबाखू सिगारेट (११-१८-३३%), गुटखा-(७-११.६६%) दारू पिणारे कामगार (५-८.३३%) वास्तविकता दारू पिणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. पण कबूल करणारे थोडे आहेत.

**ओरिसा** **तक्ता क्र. १०**

## कामगारांना होणारे आजार

| अनु. क्र. | आजार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | वरचेवर ताप/खोकला | १० | १६.६६% |
| २) | श्वसन संस्थेशी निगडीत | २० | ३३.३३% |
| ३) | त्वचा रोग | १२ | २०.००% |
| ४) | पचनसंस्थेशी निगडीत | १० | १६.६६% |
| ५) | कायमस्वरूपी आजार | ०८ | १३.३३% |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

या कामगारांना होणाऱ्या आजारा संदर्भात माहिती घेताना असे दिसून आले. की वरचेवर ताप खोकला असणारे कामगार (१०–१६.६६%) श्वसन संस्थेशी निगडीत असलेले कामगार (२०–३३.३३%) त्वचारोग (१२–२०%) पचनसंस्थेशी निगडीत (१०–१६.६६) कायमस्वरूपी आजार असलेले कामगार (८–१३.३३%) असल्याचे दिसून आले. कामगारांच्या आजाराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% असल्याचे दिसून आले.

**ओरिसा** **तक्ता क्र. ११**

## औषध कुठे घेता

| अनु. क्र. | औषधे | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रेडक्रॉस | ६० | १००% |
| २) | खाजगी | -- | -- |
| | एकूण | ६० | १००% |

आजारी पडल्यावर आपण औषधे कुठे घेता या संदर्भात संशोधकाने विचारणा केली असता बहुतांशी सर्व कामगारांनी आपण अलंग येथे असलेल्या रेडक्रॉस दवाखान्यातच औषधे घेत असल्याचे सांगितले. आणि ते वरील तक्त्यातील आकडेवारीतूनही स्पष्ट होत आहे. ६० ही कामगार हे रेडक्रॉस दवाखान्यातूनच औषधे घेत असल्याने टक्केवारीही पूर्णपणे १००% होत आहे.

**पीढीजात व्यवसाय** :– हे कामगार आपले मूळ वतन सोडून आपल्या कुटुंबाला गावी ठेवून इथे रोजगारासाठी स्थलांतरित झाले आहे. या कामगारांना त्यांच्या पीढीजात व्यवसायाविषयी विचारले असता असे समजले की बहुतांशी कामगारांची गावी शेती आहे. पण शेतीचे उत्पन्नही तुटपुंजे आहे. त्यामुळे त्यांना रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागते. पीढीजात शेतीचा व्यवसाय करणारे कामगार हे सुमारे (४६–७६.६६%) आहेत. पीढीजात मजदूरी करणारे ११–१८.३३) तर पीढीजात न्हाव्याचा धंदा करणारे ३ कामगार आहेत. (३–५.00% अशा रितीने टक्केवारी ही ९९.९९% दिसून आली आहे.

**वार्षिक उत्पन्न** : एकूण वार्षिक उत्पन्नाची माहिती घेताना संशोधकाला हे समजून आले की १ ते ५००० उत्पन्न असलेले कामगार (१–१.६६%) सहा ते दहा हजार उत्पन्न असलेल्यांची संख्या (४०–६.६६%) गरजेपुरते उत्पन्न मिळणाऱ्यांची संख्या (१८–३0%) आणि ११ ते १५ हजार उत्पन्न असणाऱ्या कामगारांची संख्या ही १ आहे. (१–१.६६%)

**गावी पाठवले जाणारे पैसे** :–

सर्वच कामगार आपली कुटुंबे ही गावी ठेवून आलेली आहेत. त्यामुळे बहुतांशी सर्व कामगार हे आपल्या कुटुंबाच्या चरितार्थासाठी ठराविक रक्कम दर महिन्याला घरी पाठवतात. त्यात १ ते ३ हजार महिना पाठविणाऱ्यांची संख्या (१४–२३.३३%) चार ते सहा हजार पाठविणाऱ्यांची संख्या (४६–७६.६६%) आहे. एकूण टक्केवारी ही ९९.९९% आहे.

**ओरिसा** **तक्ता क्र. १२**

**स्थानिक लोक कशी वागणूक देतात**

| अनु. क्र. | वागणूक | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ठीक ठीक | ५६ | ९३.३३% |
| २) | चांगली | ०४ | ०६.६६% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे सगळेच कामगार हे स्थलांतरित परप्रांतीय आहेत. त्यामुळे इथल्या स्थानिक लोकांबरोबर रहाताना थोड्या धास्तीच्या वातावरणातच त्यांना रहावे लागते. स्थानिक लोक आपल्याला कशी वागणूक देतात. या संदर्भात बोलताना कामगारांनी संशोधकाला सांगितले की, ५६ कामगारांनी आपल्याला ठीक ठीक वागणूक देतात असे सांगितले तर फक्त चारच कामगारांनी स्थानिक लोक चांगली वागणूक देत असल्याचे सांगितले हे वरील तक्त्यावरूनही स्पष्ट होत आहे. (५६–९३.३३) (४–०६.६६%) एकूण टक्केवारी ही ९९.९९% असल्याचे दिसून येत आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. १**

**जिल्हा निहाय कामगार**

| अनु. क्र. | जिल्हा | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | बिरहूम | ३७ | ६१.६६% |
| २) | हासरा (मालदा) | २० | ३३.३३% |
| ३) | कुचबिहार | ०२ | ०३.३३% |
| ४) | मिदनापूर | ०१ | ०१.६६% |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

पश्चिम बंगालमधेही गरीबी असल्याने येथूनही रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर लोक स्थलांतरित होत असतात. प. बंगाल येथून अलंग रिसायकलींग शीपयार्ड येथेही कामसाठी कामगार स्थलांतरीत झाल्याचे तक्ता क्र. १ मधून स्पष्ट होत आहे. सर्वाधिक कामगार हे बिरहूम जिल्ह्यातून आले आहेत त्याचे प्रमाण हे ३७ आहे. (३७–६१.६६%) त्याच्या नंतर हासरा (मालदा) जिल्ह्यातून २० कामगार हे इथे आलेले आहेत. (२०–३३.३३%) आणि कूचबिहार जिल्ह्यातून २ व मिदनापूर येथून १ कामगार आलेला आहे. (२–३.३३%) (१–१.६६%). पं. बंगाल मधील कामगारांचे स्थलांतराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. २**

**वयोगट**

| **अनु. क्र.** | **वय** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | १८ ते २५ | १५ | २५.00% |
| २) | २६ ते ४५ | ३२ | ५३.३३% |
| ३) | ४६ ते ५८ | १३ | २१.६६% |
| | एकूण | ६0 | ९९.९९% |

पं. बंगाल येथून अलंग शिपयार्डात काम करणारे कामगार हे १८ ते ५८ वयोगटातील आहे. १८ ते २५ वयोगटातील कामगार हे एकूण १५ आहेत. (१५–२५%) २६ ते ४५ वयोगटातील कामगार एकूण ३२ आहेत. (३२–५३.३३%) आणि ४६ ते ५८ या वयोगटातील कामगार हे एकूण १३ (१३–२१.६६%) आहेत. तक्ता क्र. २ वरून आपल्याला हे लक्षात येते की, २६ ते ४५ वयोगटातील कामगार इथे मोठ्या प्रमाणावर काम कामगार इथे मोठ्या प्रमाणावर काम करताना दिसून येत आहे.

**शैक्षणिक पात्रता :–** प. बंगाल मधील या स्थलांतरित कामगारांच्या शैक्षणिक पात्रतेविषयी जाणून घेताना असे दिसून आले की, प्राथमिक शिक्षण पूर्ण करणारे १३ कामगार आहेत. (१३–२१.६६%) माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले १५ आहेत. (१५–२५%) उच्चमाध्यमिक ते पदवीधर झालेल्या कामगारांचे संख्या अधिक आहे. आणि ते एकूण २७ कामगार आहेत. (२७–४५%) अशिक्षित कामगारांची संख्या ५ आहे. (५–०८.३३%) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**भाषा:–** पं. बंगाल मधून इथे कामासाठी आलेल्या कामगारांची मूळ भाषा बंगाली आहे. पण आता हे कामगारही हिंदी भाषा बोलू शकतात. काहींना इंग्रजींचे सुद्धा जुजबी ज्ञान आहे. बंगाली व हिंदी भाषा जाणारे एकूण ४५ कामगार आहेत. (४५–७५%) व बंगाली, हिंदी व इंग्रजी जाणणारे एकूण १५ जण आहेत. (१५–२५%) भाषेचे सरासरी शेकडा प्रमाण हे पूर्ण १००% आहे.

या कामगारांच्या वैवाहिक स्थिती बाबत जाणून घेता असे लक्षात आले. आपण यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा वापर केला आहे आणि त्यासाठी प्रत्येक राज्यातील ६० कामगार हे ग्राह्य धरले आहेत. या ६० कामगार विवाहबद्ध असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सरासरी शेकडा प्रमाण पूर्णपणे १००% आहे.

या कामगारांच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्येचा विचार करता असे चित्र पुढे आले की, कुटुंबातील सदस्यसंख्या १ ते ६ असलेले कामगार हे एकूण २५ आहेत. (२५–४१.६६), ७ ते १० सदस्य असलेले कामगार हे एकूण ३० आहेत. (३०–५०%) तर ११ ते १५ सदस्य असलेल्यांची संख्या ३ आहे. (३–०५.००%) आणि १६ ते २० सदस्य असलेल्या कामगारांची संख्या २ आहे. यावरून १६ ते २० हे सर्वाधिक आणि १ ते ६ ते कमी प्रमाण असल्याचे दिसून येत आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ३**

## स्थलांतरापाठीमागचे कारण

| अनु. क्र. | कारण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गरीबी | ३४ | ५६.६६% |
| २) | रोजगारासाठी | २५ | ४१.६६% |
| ३) | कुटुंबाच्या पोषणासाठी | ०१ | ०१.६६% |
| | एकूण | ६० | ९९.९८% |

तक्ता क्र. ३ वरून आपणास असे स्पष्ट होते की पं. बंगाल मधूनही जे कामगार स्थलांतरित होतात त्या पाठीमागेही गरिबी, रोजगारी आणि कुटुंबाचे पालनपोषण ही महत्त्वाची कारणे दिसून येत आहेत. गरीबी मूळ स्थलांतरित झालेले कामगार हे एकूण ३४ आहेत. (३४–५६.६६%) रोजगार मिळवण्यासाठी २५ कामगारांची स्थलांतर केले आहे. (२५–४१.६६%) कुटुंबाच्या पोषणासाठी १ कामगार आलेला आहे. (१–१.६६%) स्थलांतराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ४**

## अलंगला कुणाच्या माध्यमातून आले.

| अनु. क्र. | माध्यम | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | भावाबरोबर | ०३ | ०५.००% |
| २) | नातेवाईक | ०२ | ०३.३३% |
| ३) | मुकादम | १० | १६.६६% |
| ४) | ओळखीचे | ४५ | ७५.००% |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

तक्ता क्र. ४ वरून आपल्याला हे लक्षात येते की, अलंग शीपयार्डात काम करण्यासाठी हे कामगार कुणाच्या माध्यमातून आले तर ओळखीच्या लोकांच्या माध्यमातून इथे कामाला आलेल्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. ते एकूण ४५ आहे. (४५–७५%) मुकादमाच्या माध्यमातून आलेल्या कामगारांची संख्या १० आहे. (१०–१६.६६%) भावाबरोबर आलेले कामगार हे आहेत. (३–५%) नातेवाईकासोबत आलेले २ कामगार आहेत. (२–३.३३%) स्थलांतराचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ५**

**कामाचे स्वरुप**

| **अनु. क्र.** | **कामाचे स्वरुप** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | गॅसकटर | २१ | ३५.००% |
| २) | जोडीवाला | १४ | २३.३३% |
| ३) | बिगारी | १५ | २५.००% |
| ४) | मालपाणी | ०४ | ०६.६६% |
| ५) | मुकादम | ०३ | ०५.००% |
| ६) | हेल्पर | ०२ | ०३.३३% |
| ७) | लेथ मशिन चालविणे | ०१ | ०१.६६% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९८%** |

तक्ता क्र. ५ वरून इथे काम करणाऱ्या कामगारांच्या कामाचे स्वरूप आपल्याला लक्षात येत आहे. यात गॅसकटरचे काम करणारे सर्वाधिक म्हणजे २१ कामगार आहेत. (२१–३५.००%) त्याखालोखाल जोडीवालाचे काम करणारे एकूण १४ कामगार आहेत. (१४–२३.३३%) बिगारी

काम करणारे १५ कामगार आहेत. (१५–२५.००%) मालपाणी काम करणारे हे एकूण चार कामगार आहेत. (४–६.६६%) मुकादमाची जबाबदारी निभावणारे एकूण ३ जण आहेत. (३–५%) तसेच हेल्परचे काम करणारे कामगार २ आहेत. (२–३.३३%) व लेथ मशिन चालवणारा कामगार १ आहे. (१–०१.६६%) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ६**

**मिळणारे वेतन**

| अनु. क्र. | वेतन | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ५ ते ७ हजार | ०३ | ०.५% |
| २) | ८ ते १० हजार | ३३ | ५५.००% |
| ३) | ११ ते १५ हजार | २२ | ३६.६६% |
| ४) | १६ ते २५ हजार | ०२ | ०३.३३% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९%** |

तक्ता क्र. ६ वरून आपल्याला हे लक्षात येते की या कामगारांना महिन्याला वेतन किती मिळते. ५ ते ७ हजार वेतन घेणारे कामगार हे ३ आहेत. (३–००.५%) ८ ते १० हजार वेतन घेणारे कामगार हे एकूण ३३ आहेत ही संख्या जास्त आहे. (३३–५५%) ११ ते १५ हजार वेतन घेणारे कामगार हे २२ आहेत. (२२–३६.६६%) आणि १६ ते २५ हजार वेतन घेणारे कामगार हे दोन आहेत. (२–३.३३%) वेतनाचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके असल्याचे दिसून येत आहे.

## कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा

पं. बंगाल मधून आलेले हे कामगार एकाच ठराविक प्लॉटवर अनेक वर्षे काम करत आहेत. इथे काम करताना या कामगारांची विशेष देखभाल घेतली जात आहे. जहाज तोडण्यास थोडा उशीर

झाला तरी चालेल पण कामगारांच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष दिले जात आहे. या कामगारांना सर्व प्रकारच्या सुविधा व सुरक्षा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

## निवास व्यवस्था व मिळणाऱ्या सुविधा

या कामगारांना मालकाकडूनच निवासाची व्यवस्था पुरविण्यात आलेली आहे. ज्या प्लॉटवर काम चालू आहे. त्याच प्लॉटच्या पाठीमागे या लोकांच्या राहणाऱ्या निवासाची सोय केलेली आहे. पाणी वीज शौचालय याही सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे अलंग मधील हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल.




**कामगारांसाठी सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु हे शौचालय १० वाजेपर्यंत उघडत नाही.**

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ७**

## किती वर्षापासून काम करता

| अनु. क्र. | वय | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १ ते ४ | ०९ | १५.०० |
| २) | ५ ते १० | २८ | ४६.६६ |
| ३) | ११ ते १५ | १९ | ३१.६६ |
| ४) | १६ ते २० | ०४ | ०६.६६ |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

तकता क्र. ७ मधील आकडेवारी वरुन हे दिसून येते आहे की अलंग शीपयार्डात हे कामगार किती वर्षापासून काम करत आहेत. यात १ ते ४ वर्षे काम पूर्ण केलेले एकूण ९ कामगार आहेत (९–१५%) तर ५ ते १० वर्षापासून काम करणारे एकूण २८ कामगार आहेत (२८–४६.६६%) ११ ते १५ वर्षापासून काम करणारे एकूण १९ कामगार आहेत. (१९–३१.६६%) तर १६ ते २० वर्षापासून काम करणारे एकूण ०४ कामगार आहेत. (४–६.६६) वर्षाचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% असल्याचे दिसून येत आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ८**

## अपघाताचे प्रमाण

| अनु. क्र. | प्रमाण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | किरकोळ अपघात | ३५ | ५८.३३ |
| २) | अपघाताचे प्रमाणे खुप कमी (गंभीर प्राणघातक) | २५ | ४१.६६ |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

पं बंगाल येथील कामगार ज्या प्लॉटवर काम करतात तिथे सुरक्षतेचे नियम व्यवस्थित काटेकोरपणे पाळले जात असल्याने या कामगारांनी  गंभीर व प्राणघातक अपघात होण्याचे प्रमार खूपच कमी असल्याचे सागितले. एकूण २५ कामगारांनी या बाबतीत मत व्यक्त केले.

(२५–४१.६६%) तर प्लॉटवर काम करताना किरकोळ स्वरूपाचे अपघात होत असल्याची कबुली ३५ कामगारांनी दिली. (३५–५८.३३%) त्यामुळे अपघाताचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% असल्याचे दिसून येत आहे.

आहार – या कामगारांच्या आहारासंदर्भात जाणून घेताना असे दिसून आले की हे सर्व जण पश्चिम बंगाल मधून आलेले कामगार आहेत. आणि सर्वच्या सर्व जण मुस्लीम धर्माचे अनुयायी आहेत. त्यामुळे सर्वच कामगारांचा आहार हा प्रामुख्याने मांसाहार आहे. त्यात हे पश्चिम बंगालचे असल्याने या लोकांचा आहार भात आणि मासे याला सर्वाधिक प्राधान्य आहे. इतर दिवशी हे लोकही दाल–चावल खातात. मात्र सुटीच्या दिवशी हे लोक मासे मटण चिकन आपल्या आवडीप्रमाणे मांसाहार करतात.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ९**

**व्यसने**

| **अनु. क्र.** | **व्यसने** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | कोणतेही नाही | ४० | ६६.६६ |
| २) | मावा | १० | १६.६६ |
| ३) | सिगारेट | १० | १६.६६ |
| | एकूण | ६० | ९९.९८ |

प. बंगाल येथील शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांची एकूण व्यसना संदर्भात चर्चा केली असता असे लक्षात आले की यात काम करणारे बहुतांशी कामगार हे युवक वर्गातले असल्याने या युवक कामगारांमध्ये कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याचे प्रकर्षाने जाणवले. या व्यसन नसलेल्या कामगारांची संख्या ही ४० आहे. (४०–६६.६६%) तर मावा आणि सिगारेटचे व्यसन असणारे दहा दहा आहेत (१०–१६.६६) व्यसनाचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% असल्याचे दिसून येत आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. १०**

**आजाराचे स्वरुप**

| अनु. क्र. | स्वरूप | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | वरचेवर ताप खोकला | १४ | २३.३३ |
| २) | श्वसन संस्थेशी निगडीत | १२ | २०.०० |
| ३) | त्वचा रोग | १६ | २६.६६ |
| ४) | पचन संस्थेशी निगडीत | १५ | २५.०० |
| ५) | कायम स्वरुपी (मधुमेह/रक्तदाब/हृदयविकार) | ०३ | ०५.०० |
| | एकूण | ६० | ९९.९९% |

या कामगारांचे व्यसनाचे प्रमाण जरी कमी असले तरी प्रदुषण, वातावरण पावसाळ्यात, निर्माण होणारे डास प्रचंड असल्यामुळे वरचेवर ताप व खोकला, होणाऱ्या कामगारांचे प्रमाण हे १४ आहे. (१४–२३.३३%) त्वचा रोग होणारे कामगार हे १६ आहेत (१६–२६.६६%), श्वसन संस्थेची निगडीत (१२ आहेत (१६–२६.६६%) पचन संस्थेचे आजार असणारे कामगार हे १५ आहेत.

(१५–२५%) तर कायमस्वरुपी आजार असणारे कामगार हे ३ आहेत (३.५%) आजाराचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९%

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. ११**

**औषध कुठे घेता**

| **अनु. क्र.** | **औषधे** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | रेडक्रॉस | ४८ | ८0.00% |
| २) | रेडक्रॉस व खाजगी | १२ | २0.00 |
| | एकूण | ६0 | १00% |

हे कामगार आजारी पडल्यावर औषधे कुठे घेता या विषयी जाणून घेताना अभ्यासकाला असे दिसून आले की हे कामगार अलंग येथे असलेल्या रेडक्रॉस दवाखान्यातून औषधे घेत असल्याचे सांगितलेल्या कामगारांची संख्या ही ४८ आहे. (४८–८0%) तर रेडक्रॉस व खाजगी औषधे घेणारे एकूण १२ कामगार आहेत. (१२–२0%) त्यामुळे औषधाचे सरासरी शेकडा प्रमाण हे पूर्णपणे १00% असल्याने तक्ता क्र.११ वरून सूचित होत आहे.

**पीढीजात व्यसाय –** या कामगारांना त्यांच्या पीढीजात व्यवसायाविषयी विचारले असता सर्वाधिक कामगारांची शेती व मजूरी हे पीढीजात व्यवसाय असल्याचे सांगितले. शेतीचा व्यवसाय असणारे एकूण २३ कामगार आहेत. २३(३८.३३%) शेती व बरोबरीने मजूरी करणारे असा पीढीजात व्यवसाय असणारे एकूर २४ कामगार आहेत (२५–४0%) नुसती मजूरी करणारे ९ कामगार आहेत. (९–१५%) शेती व मासेमारी असा ज्यांचा व्यवसाय आहे ते १ आहेत १–६६%) तर मिस्त्रीचा व्यवसाय करणारे (३–0५%) ३ जण आहे. पीढीजात व्यवसायाची सरासरी शेकडा ही ९९.९९% इतकी आहे.

**वार्षीक उत्पन्न –** पीढीजात व्यवसायातून या कामगारांना किती उत्पन्न मिळते हे जाणून घेतले असता असे दिसून आले की १0 हजार ज्यांचे वार्षिक उत्पन्न आहे अशा कामगारांची संख्या २५

आहे. (२५–४१.६६%) ११ ते २० हजार उत्पन्न असणाऱ्यांची संख्या ही २६ आहे (२६–९३.३३%) तर गरजेपुरते उत्पन्न घेणारे कामगार हे ९ आहेत. (९–१५%) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**गावी पाठवले जाणारे पैसे :–** इथे काम करणारा प्रत्येक कामगार हा आपल्या कुवतीनुसार दर महिन्याला ठराविक रक्कम आपल्या कुटुंबासाठी पाठवतच असता. पं. बंगाल मधील कामगार सुद्धा दर महिना पैसे पाठवतात. त्यात ६ ते ८ हजार रुपये पाठविणाऱ्यांची संख्या ही सुमारे ४९ आहे. (४८–८०%) आणि पाच हजार पाठविणारे ९ आहेत (९–१५%) तर दहा हजार पाठविणारे ०३ आहेत (३–५%) एकूण सरासरी शेकडा ही १००% आहे.

**पश्चिम बंगाल** **तक्ता क्र. १२**

**स्थानिक लोक कशी वागणूक देतात**

| **अनु. क्र.** | **वागणूक** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | ठीक ठीक | ४८ | ८०% |
| २) | काही चांगले काही वाईट | १२ | २०% |
| | एकूण | ६० | १००% |

परराज्यातून इथे स्थलांतरित झालेल्या या कामगारांना इथल्या स्थानिक लोकांशी मिळते जुळते घ्यावेत लागते. परंतु स्थानिक लोक या कामगारांबरोबर इतक चांगले वागत नसल्याचेच निदर्शनास आले आहे. त्या संदर्भात कामगारांनीच सांगितले की स्थानिक लोक आपल्याला ठीक ठीक वागणूक देतात त्याचे प्रमाण ४८ आहे (४८–८०%) तर काही चांगले काही वाईट वागणूक देतात असे सांगणारे कामगार एकूण १२ आहेत हे तक्ता क्र. १२ वरुन स्पष्ट होत आहे. सरासरी शेकडा प्रमाण हे पूर्णपणे १००% आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. १**

**जिल्हा निहाय कामगार**

| अनु क्र. | जिल्हा | कामगार संख्या | ०0% प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | देवरिया | १४ | २३.३३ |
| २) | गोरखपूर | २२ | ३६.६६ |
| ३) | कुशीनगर | १० | १६.६६ |
| ४) | महाराजगंज | ०९ | १५.०० |
| ५) | बलरामपूर | ०२ | ०३.३३ |
| ६) | संत कबीर नगर | ०१ | ०१.६६ |
| ७) | गोंडा | ०१ | ०१.६६ |
| ८) | अजीजनगर | ०१ | ०१.६६ |
| | **एकूण** | **६०** | **१००.००%** |

उत्तरप्रदेश हे राज्य सुद्धा भारतातील मोठे राज्य असून या राज्यातही स्थलांतरित होणाऱ्या कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. या राज्यातून गुजराथ राज्यात सूरत शहरात स्थलांतरित होणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तक्त क्र. १ मधील ज्या विविध जिल्ह्यातून कामगार रोजगारासाठी स्थलांतरित होत आहे. हे सर्व कामगार या जिल्ह्यातून अलंग रिसायकलिंग शीवयार्डातील कामासाठी स्थलांतरित झालेले आहेत. गोरखपूर जिल्ह्यातून सर्वाधिक म्हणजे २२ कामगार आले आहेत. (२२–३६.६६%) तर सर्वात कमी प्रमाण हे संतकबीर नगर, गोंडा व अजीज नगर येथून प्रत्येकी एक एक कामगार इथे कामाला आले आहेत. (१–०१.६६%) त्या नंतर बलरामपूर येथून आलेल्या कामगारांची संख्या ही (२) आहे. (२–३.३३%) देवरिया जिल्ह्यातून १४ (१४–२३.३३%) कुशीनगर येथून १० (१६.६६%) तर महाराज गंज येथून एकूण ९ कामगारांचा समावेश आहे. (९–१५.००%) त्यामुळे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९६% इतके आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. २**

**वयोगट**

| अनु क्र. | | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | २० ते ३० | १८ | ३०.०० |
| २) | ३१ ते ४० | २५ | ४१.६६ |
| ३) | ४१ ते ५० | ११ | १८.३३ |
| ४) | ५१ ते ६० | ०६ | १०.०० |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९%** |

तक्ता क्र. २ वरुन आप्ल्याला असे दिसून येते की उत्तर प्रदेशातून इथे कामाला आलेले कामगार हे २० ते ६० वयोगटातील आहेत. ३१ ते ४० वयोगटातील कामगारांचे प्रमाण अधिक आहे. त्याची संख्या २५ आहे (२५–४१.६६%) तर सर्वात कमी वयोगटातील कामगार हे ५१ ते ६० वयोगटातील आहेत. ती संख्या ६ आहे. (६–१०%) २० ते ३० वयोगटातील कामगार हे एकूण १८ आहेत. (१८–३०%) कामगार हे एकूण १८ आहेत. (१८–३०%) आहे आणि ४१ ते ५० वयोगटातील कामगार हे ११ आहेत (११–१८.३३%) त्यामुळे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके असल्याचे दिसून येते.

**शैक्षणीक पात्रता :** उत्तर प्रदेशातून अलंग येथे काम करणाऱ्या कामगारांची शैक्षणिक पात्रता जाणून घेताना संशोधकाला असे जाणवले की या राज्यातील अशिक्षित लोकांचे प्रमाण इतर राज्यापेक्षा थोडे अधिक आहे. अशिक्षित कामगारांचे प्रमाण हे १५ आहे. (१५–२५.००%) माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्यांचे प्रमाण हे २४ आहे. (२४–४०.००%) प्राथमिक शिक्षण घेतलेले १० कामगार असल्याचे दिसून आले. (१०–१०.६६) उच्च माध्यकि एकूण ५ जण आहेत (५–०८.३३%) शिक्षणाचे एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

भाषा – उत्तर प्रदेशात प्रामुख्याने हिंदी भाषेचे प्रभूत्व आहे. त्याचबरोबर या भाषाही इथे बोलल्या जातात. इथे काम करणाऱ्या कामगारांमध्ये हिंदी व भोजपूरी भाषा बोलणाऱ्यांची संख्या

२८ आहे. (२८–४६.७७%) तर हिंदी भाषिक २५ आहेत. (२५–४१.६६%) हिंदी गुजराथी व इंग्रजी समजणारा १, (१–१.६६) हिंदी भोजपूरी गुजराथी समजणारा १ कामगार – (१–१.६६%) हिंदी इंग्रजी व संस्कृत समजणारा एक कामगार आहे. (१–१.६६) हिंदी भोजपूरी पंजाबी व मराठी भाषा जाणणारा कामगारही एक आहे. (१–१.६६%) हिंदी व इंग्रजी समजणारे दोन कामगार आहेत. (२–३..३३%) भाषेचे सरासरी शेकडा प्रमाण हे १००% टक्के आहे.

**वैवाहिक स्थिती –** या कामगारांची वैवाहिक स्थिती जाणून घेताना असे दिसून आले की एकूण ५८ कामगार हे विवाहित आहेत. व दोन कामगारांचे घटस्फोट झाल्याचे दिसून आले. (५८–९६.00%), (२–0३.३३%) यावरुन सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.३३% असल्याचे दिसून येत आहे.

## कुटुंबातील एकूण सदस्य संख्या –

आपल्या कुटुंबाना गावी, ठेवून हे कामगार इथे कामाला आले आहेत. त्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्याचा विचार करता या कामगारांच्या कुटुंबात १ ते ४ सदस्य संख्या असलेले एकूण १६ कामगार आहेत. १६ (१६–२६.६६%) तर कुटुंबातील सदस्य संख्या ५ ते १० असलेल्यांची कामगारांची संख्या ही ४४ आहे. कुटुंबातील सदस्य संख्या जास्त असलेले कामगार हे अधिक असल्याचे दिसून येत आहे. सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.३३% टक्के आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ३**

**स्थलांरापाठीमागचे कारण**

| अनु क्र. | कारण | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | गरीबी + बेरोजगारी | 0४ | 0६.६६ |
| २) | बेरोजगारी | ४४ | ७३.३३ |
| ३) | कुठलच कामधंदा नाही (दुष्काळ पाणी नाही) | १२ | २0.00 |
| | **एकूण** | **६0** | **९९.९९** |

उत्तरप्रदेशातूनही अनेक लोकांना रोजगार  मिळण्यासाठी स्थलांतरित व्हावे लागते. उत्तर प्रदेशातून स्थलांतरित होणाऱ्या कामगारांचे प्रमाण अधिक आहे व ते गुजराथ राज्यातील सुरत येथे मोठ्या प्रमाणावर येतात. तक्ता क्रमांक ३ कामगार हे अलंग शीप यार्डात काम करण्यासाठी स्थलांतरित आलेले आहेत. स्थलांतरापाठीमागे गरीबी आणि बेरोजगारी हीच प्रमुख कारणे असल्याचे दिसून येत आहे. उत्तर प्रदेश मोठे राज्य असले तरी सुद्धा तिथे बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. वरील तक्त्यानुसार सुमारे ४४ कामगार हे बेरोजगारी मुळे स्थलांतरित आलेले आहेत. (४४–७३.३३%) कुठलाच कामधंदा नाही दुष्काळ त्यामुळे स्थलांतरित झालेले कामगार हे १२ आहेत. (१२–२०%) तर गरीबी गरिबी आणि बेरोजगारी मुळे स्थलांतर करणारे एकूण चार कामगार आहेत. स्थलांतराचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ४**

**अलंगला कुणाच्या माध्यमातून आले**

| **अनु क्र.** | **माध्यम** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | नातेवाईक | ०६ | १०.०० |
| २) | गावातील लोक | १९ | ३१.६६ |
| ३) | ओळखीच्या लोकांकडून | १८ | ३०.०० |
| ४) | काका/वडील/भाऊ | १७ | २८.३३ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९** |

तक्त्या क्र. ४ वरुन आपणास असे लक्षात येते की उत्तर प्रदेशातून अलंग येथे कामासाठी आलेले हे कामगार हे प्रामुख्याने नातेवाईक, ओळखीचे वा गावातील लोकांनी बोलावून घेतल्याने इथे कामाला आले आहेत. गावातील लोकांनी बोलावून घेतलेले एकूण १९ कामगार आहेत. (१९–३१.६६%) ओळखीच्या लोकांच्या माध्यमातून आलेले १८ कामगार आहेत. (१८–(३०%)

आपले नातेवाईक त्यात काका, वडील, भाऊ यांच्या माध्यमातून आलेले एकूण १७ जण आहेत. (१७–२८.३३%) आणि दूरच्या नातेवाईकांच्या माध्यमातून आलेले ६ जण आहेत. (६–१0%) हे सरासरी शेकडा प्रमाण ९९.९९% आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ५**

**कामाचे स्वरुप**

| **अनु क्र.** | **प्रकार** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १) | गॅसकटर | २५ | ४१.६६ |
| २) | जोडीवाला | ११ | १३.३३ |
| ३) | मुकादम | 0२ | 0३.३३ |
| ४) | सुपरवायझर | 0१ | 0१.६६ |
| ५) | मालपाणी | 0६ | १0.00 |
| ६) | हेल्पर | 0१ | 0१.६६ |
| ७) | बिगारी | 0७ | ११.६६ |
| ८) | फिटर | 0२ | 0३.३३ |
| ९) | वेल्डर | 0२ | 0३.३३ |
| १0) | मार्केटिंग | 0१ | 0१.६६ |
| ११) | क्रेम ऑपरेटर | 0२ | 0३.३३ |
| | **एकूण** | **६0** | **१00.00%** |

उत्तर प्रदेशातून इथे कामाला आलेल्या लोकांमध्ये गॅसकटर चे काम करणाऱ्या कामगारांची संख्या अधिक असल्याचे तक्ता क्र. ५ वरुन आपल्याला दिसून येत आहे. गॅसकटर २५ जण आहेत. (२५–४१.६६%) त्यानंतर जोडीवालाचे काम करणारे कामगार हे एकूण ११ जण आहेत. (११–१८.३३%) मालपाणी आणि बिगारी हे काम करणाऱ्या कामगारांची संख्या समान आहे. ती ७ आहे. (७–११.६६) मुकादमाचे काम करणारे दोन कामगार आहेत. (२–३.३३%) फीटर

वेल्डर व क्रेन ऑपरेटर हे प्रत्येकी दोन दोन आहेत (२–३.३३) सुपरवायझर एक (१–१.६६) मार्केटिंग १ (१–१.६६) व हेल्परचे काम करणारा एक कामगार आहे. उत्तर प्रदेशातील बहुतांशी कामगार हे गॅसकटर व जोडीवाला या कामामध्ये प्रवीण असल्याचे दिसून येत आहे. एकूण सरासरी शेकहा प्रमाण हे ९९.९५% टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ६**

**मिळणारे वेतन**

| अनु क्र. | वेतन (रुपयात) | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १५० ते २००<br>४ to ६००० | २४ | ४०.०० |
| २) | २५० ते ३००<br>१० to १२००० | ३० | ५०.०० |
| ३) | ३५० ते ४००<br>१३ to १५००० | ०२ | ०३.३३ |
| ४) | ४५० ते ५०० | ०४ | ०६.६६ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९** |

तक्ता क्र. ६ मधील माहितीनुसार या कामगारांना मिळणारे महिन्याचे वेतन हे सहा हजार ते १५ हजाराच्या घरातील आहे. सहा हजार वेतन मिळणारे एकूण २४ कामगार आहेत. (२४–४०%) ७ ते ९ हजार महिना वेतन मिळणाऱ्या कामगारांची संख्या ही ३० आहे (३०–५०%) १० ते १२ हजार मिळणारे कामगार दोन आहे. (२–३.३३%) आणि तेरा ते पंधरा हजार मिळणाऱ्या कामगारांची संख्या ४ (४–६.६६%) आहे. शेकडा सरासरी प्रमाण हे ९९.९९% आहे.

कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा

उत्तर प्रदेशातील काम करणाऱ्या या कामगारांना संशोधकाने मिळणाऱ्या सुविधांच्या संदर्भात विचारले असता असे लक्षात आले की फक्त १० कामगारांनी थोड्या सुविधा (बुट, चष्मा, ड्रेस) मिळत असल्याचे सांगितले. (१०–१६.६६%) तर ५० कामगारांनी आपल्याला कुठल्याच

प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात नसल्याचे सांगितले (५०–८३.३३%) सुविधा न मिळण्याचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**निवास व्यवस्था व मिळणाऱ्या सुविधा**

अलंग येथे कामासाठी आलेल्या कामगारांना आपल्या निवासाची व्यवस्था स्वत:चीच स्वत:ला करावी लागते. त्यामुळे कामगार प्लॉटरील उपलब्ध सामानातूनच झोपडीवजा घर बांधून इथे राहतात. इथे झोपडीवजा बांधलेल्या घरात शहणाऱ्या कामगारांची संख्या ही ४६ आहे. (४६–७६.६६%) तसेच २०० ते ३०० रुपये भाडे देऊन एका खोलीत एकत्र राहणारे कामगार हे ११ आहेत. (११–१८.३३%) स्वत:च्या घरात राहणारे तीन कामगार आहेत. (डागडुजी करुन बांधलेले घर (३–०५.००%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

या निवासाच्या ठिकाणी या कामगारांना कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. जे कामगार भाडे देऊन एकत्रितरित्या राहतात त्यांनाही पाणी विकत घ्यावे लागते. ते प्रति बॅरल ३० रुपयाला पडते. स्वत:च्या घरात राहणाऱ्या लोकांनाही लाईटचे मीटर मिळत नाही. त्यांना स्थानिक लोकांच्याकडून वीज व पाणीही विकत घ्यावे लागते. झोपडीवजा घरात राहणाऱ्या कामगारांना कुठल्याच सुविधा स्वच्छता नसते. अतिशय गलिच्छ अशा वातावरण त्यांना रहावे लागते.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ८**

**अपघाताचे प्रमाण**

| अनु क्र. | स्वरुप | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | किरकोळ (दिवसातून) | ४६ | ७६.६६ |
| २) | गंभीर (आठवड्यातून) | १२ | २०.०० |
| ३) | प्राणघातक (कधीतरी) क्वचीत (कालावधी सांगता येत नाही) | ०२ | ०३.३३ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९** |

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ७**

**किती वर्षापासून काम करता**

| अनु क्र. | वर्षे | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १ ते १० | ३६ | ६०.०० |
| २) | १५ ते २० | १६ | २६.६६ |
| ३) | २१ ते ३० | ०२ | ०३.३३ |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९** |

**तक्ता क्र. ७ वरुन**

आपल्या असे निदर्शनास येते की अलंग रिसायकलींग शीवयार्डात काम करणारे कामगार हे १० ते ३० वर्षापासून इथे काम करत आहेत. १ ते १० वर्षे काम करणारे कामगार हे एकूण ३६ आहेत. ( ३६–६०%) तर १५ ते २० वर्षापासून काम करणारे कामगार हे १६ आहेत. (१६–२६.६६%) तर २५ वर्षे पूर्ण केलेले कामगार हे आठ आहेत. (८–१३.३३%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

अलंग शिपयार्डात काम करणारे कामगार हे अतिशय जोखमीचे काम करत असतात. त्यामुळे इथे छोटे मोठे अपघात हे घडतच असतात. परंतु आता सुरक्षा व्यवस्था अतिशय काटेकोरपणे वापरली जात असल्याने आता प्राणघातक अपघाताचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. त्याचे प्रमाण हे २ आहे. (२ –३.३३%) गंभीर अपघाताचे प्रमाण हे १२ आहे. (१२–२०%) तर किरकोळ अपघाताचे प्रमाण अधिक आहे. ते एकूण ४६ इतके आहे. (४६–७६.६६%) सरासरी अपघाताचे शेकडा प्रमाण हे ९९.९९% आहे.

**आहार :** आहाराच्या बाबतीत या कामगारांशी चर्चा केली असता शाकाहार आणि मांसाहार हे दोन्हीही सम प्रमाणात असल्याचे दिसून आले. परंतु इथे काम करणारे बहुतांशी कामगार हे दररोज दाल–चावल खाणेच पसंद करतात. कारण ७ ते ७ अशा कामाच्या वेळा असल्याने या कामगारांना दाल–चावल तयार करणे सोपे जाते. फक्त रविवारी मासांहार करण्याचे प्रमाण अधिक आहे.

## व्यसने

| अनु क्र. | स्वरुप | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | तंबाखू, सिगरेट, दारु | १९ | ३१.६६% |
| २) | सिगरेट, दारु | १४ | २३.३३% |
| ३) | तंबाखू सिगरेट | १६ | २६.६६% |
| ४) | तंबाखू दारु | ११ | १८.३३% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९८%** |

तक्ता क्र. ९ वरुन आपणास असे दिसून येते की खूप अंग मेहनतीचे काम करणाऱ्या या कामगारांना तंबाखू सिगरेट व दारुचेही व्यसन आहे. त्यात तिन्ही व्यसने असणारे १९ कामगार आहेत. (१९–३१.६६%) सिगरेट व दारुचे व्यसन असणारे १४ कामगार आहेत (१४–२३.३३%) तंबाखू सिगरेट चे व्यवसन असणारे १६ आहेत (१६–२६.६६%) व तंबाखू सिगरेट चे व्यसन असणारे १६ आहेत. (१६–२६.६६%) व तंबाखू दारुचे व्यसन असणारे ११ जण आहेत. (११–१८.३३%) व्यसनांचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. १०**

## कामगारांना होणारे आजार

| अनु क्र. | आजार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | वरचेवर ताप खोकला | १२ | २०% |
| २) | त्वचा रोग | ११ | १८.३३% |
| ३) | श्वसनाचे आजार | २३ | ३८.३३% |
| ४) | पचनसंस्थेशी निगडीत | ०८ | १३.३३% |
| ५) | कायमस्वरुपी आजार | ०६ | १०.००% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९%** |

अतिशय कष्टप्रद आणि प्रदुषण, तापमान या सर्व गोष्टीचा या कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होतो. आणि त्यांना आजारालाही सामोरे जावे लागते. श्वसनाचे आजार असणारे कामगार हे सर्वाधिक असून त्याचे प्रमाण हे २३ आहे. (२३–३८.३३%) त्याखालोखाल वरचेवर ताप खोकला होणारे कामगार हे १२ आहेत. (१२–२०%) त्वचा रोगाचे प्रमाण असणारे (११–१८.३३%) आहेत. पचनसंस्थेचे आजार असणारे हे आठ आहेत. (८–१३.३३%) तर कायमस्वरुपी असणारे कामगार हे सहा आहेत.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. ११**

## औषध कुठे घेता

| अनु क्र. | प्रकार | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रेडक्रॉस | ४८ | ८०.००% |
| २) | रेडक्रॉस व खाजगी | १२ | २०.००% |
| | **एकूण** | **६०** | **१००.००%** |

कामगार आजारा पडल्यावर ते कुठे औषधोपचार घेतात, या संदर्भात माहिती घेताना संशोधकाला हे दिसून आले की बहुतांशी कामगार हे अलंग शीवयार्डातील रेडक्रॉस दवाखान्यातच प्रामुख्याने औषधे घेतात. परंतु काही कामगार हे रेडक्रॉस दवाखान्याबरोबरच अलंग, येथील खाजगी दवाखान्यातीही उपचार घेतात. रेडक्रॉस दवाखान्यात औषधे घेणाऱ्या कामगारांची संख्या ही ४८ आहे.

(४८ – ८0%) तर रेडक्रॉस व खाजगी दवाखान्यात औषधे घेणाऱ्यांची संख्या ही १२ आहे (१२ – २0%) त्यामुळे औषधाचे सरासरी शेकडा प्रमाण हे १00% पूर्ण आहे.

पीढीजात व्यवसाय : या कामगारांचा पीढीजात व्यवसायाबद्दल विचारणा केली असता असे दिसून आले की एकूण ५३ कामगारांचा मूळ पीढीजात व्यवसाय हा शेती आहे. परंतु कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ त्यामुळे नुसते शेतीवर निर्भर राहून चालत नाही. शेती मूळ व्यवसाय असणारे कामगार हे ५३ आहेत.

(५३ – ८८.३३%) शेती व न्हावी अशा दोन्ही प्रकारचे व्यवसाय असणारे एकूण ३ जण आहेत. (३ – ५.00%) तर शेती व कुंभार आणि माळी व्यवसाय असणारे प्रत्येक एक एक जण आहेत. (१ – १.६६%) तर पीढीजात मजूरी करणारे दोन कामगार आहेत. (२ – ३.६६%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९८% इतके आहे.

**वार्षिक उत्पन्न –** या सर्व कामगारांचे वार्षिक उत्पन्न तसे फार नाही. काहींचे उत्पन्न तसे फार नाही. काहींचे उत्पन्न हे अगदी गरजेपुरते इतके आहे आणि ती संख्या १६ इतके आहे. (१६– २६.३३%) १ ते १0 हजार वार्षिक उत्पन्न उत्पन्न असणाऱ्यांची संख्या ही ४२ आहे. (४२– ७0%) आणि ११ ते १५ हजार वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कामगारांची संख्या ही २ आहे (२– ३.३३%) वार्षिक उत्पन्नाचे सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

## गावी पाठवले जाणारे पैसे

हे कामगार आपल्या कुटुंबाना गावी ठेवून इथे कामाला एकटे येतात तेव्हा आपल्या कुटुंबासाठी ते दरमहीना ठराविक रक्कम आपल्या गावी पाठवतात. त्यात ४ त ६ हजार रुपये घरी पाठविणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे आणि ती ४२ आहे. (४२–७0%) आठ कामगार तीन

हजार रुपयेच पाठवतात. (८–१३.३३%) तर दहा कामगार हे ७ हजार रुपये पाठवतात. (७–१६.६६%) सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

**उत्तर प्रदेश** **तक्ता क्र. १२**

**स्थानिक लोक कशी वागणूक देतात**

| अनु क्र. | वागणूक | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ठीक ठीक | ५२ | ८६.६६% |
| २) | थोडी चांगली | ०८ | १३.३३% |
| | **एकूण** | **६०** | **९९.९९%** |

हे कामगार स्थलांतरित असल्याने इथे काम करताना त्यांना स्थानिक लोकांशी समायोजन करुन रहावे लागते. या लोकांना स्थानिक लोक ठीक ठीकच वागणूक देतात. हे तक्ता क्र. १२ वरुन स्पष्ट होत आहे. ठीक ठीक वागणूक मिळते सांगणाऱ्या कामगारांची संख्या ही ५२ आहे (५२–८६.६६%) आणि थोडी चांगली वागणूक मिळते सांगणारे कामगार आठ आहेत. (८–१३.३३%) एकूण सरासरी शेकडा प्रमाण हे ९९.९९% इतके आहे.

## परिशिष्ट ब

## गुणात्मक विश्लेषण :–

प्रस्तावना:– अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगार या लोकांशी प्रत्यक्ष मुलाखती घेऊन दोन्ही अनुसूचिच्या माध्यमातून या लोकांची पूर्णपणे माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आणि या संकलित केलेल्या माहितीचे गुणात्मक आणि संख्यात्मक विश्लेषण ही केले आहे. तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारेच महत्त्वाच्या घटकांना घेऊन विविध तक्ते तयार केले आणि या माहितीला दुजोरा देण्यासाठी त्यांचे संख्यात्मक विश्लेषणही केले आहे. संख्यात्मक विश्लेषणाच्या माध्यमातून त्यांच्या बद्दल जी माहिती संकलीत केली त्याच्या टक्केवारीचे प्रमाणही दर्शविले आहे. त्यातूनही काही मुद्याचे विश्लेषण हे गुणात्मक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

वास्तविकता अलंगशिप ब्रेकींग यार्डात काम करणारे हे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित आहेत. ते प्रामुख्याने बिहार, ओरिसा व प. बंगाल झारखंड, उत्तर प्रदेश या गरीब राज्यातून आलेले आहेत. या कामगारांशी बोलताना प्रकर्षाने हे जाणवले की ते ज्या प्रदेशात राहतात. तिथे रोजगार मिळणे खूपच कठीण आहे. त्यामुळे आम्ही एवढ्या दूर तडफडत येण्याचे कारण म्हणजे आमच्या इथे रोजगार नाही आणि जरी काम मिळाले तरी अगदी तुटपुंजे वेतन हातावर टिकवतात. निदान इथे दोन वेळचे जेवून २०–३० रुपये हाताशी तरी राहतात. इथेही आमची अवस्था खूप चांगली आहे. असे नाही परंतु आम्हाला इथे थोडेफार तरी पैसे पहायला मिळतात. आमच्या गावाकडे तशी कोणतीच संधी उपलब्ध होत नाहीत. गावाकडे फक्त दोनच वर्ग आम्हाला पहायला मिळतात. एकतर मरमर काम करूनही उपाशी राहणारा मजूर आणि नाही तर एकदम श्रीमंत मालक. ही दरी कधीच भरून निघणार नाही. कारण आमच्या इथले शासनकर्तेही कोणताही विकास करण्यास तयार नाही. ना दळणवळणाची सुविधा चांगली ना काही उद्योगधंदे शेती आहे तर पावसाची अनिश्चितता आहे. आता उत्तर प्रदेश, बिहार राज्यात गंगा नदीचे खोरे आहे. पण कधी कधी याच नदीचा प्रकोप भयंकर होतो. त्यामुळे शेती असूनही काही उपयोग होत नाही कधी ओला दुष्काळ तर कधी सुका त्यामुळे गरीबीत खितपत पडण्यापेक्षा इथे येऊन चार पैसे कमवून त्यातील थोडे फार तरी आपल्या कुटुंबियांकरीता पाठविता येतात. या आशेनेच आम्ही रोजगारासाठी स्थलांतरित होत असतो.

आज अलंग शीपयार्डात सुमारे ३० हजार कामगार काम करत आहेत. मात्र आपल्या एवढ्या मोठ्या कामगारांची एखादी युनियन संघटना का अस्तित्वात नाही जी तुमच्या हक्काचे रक्षण करेल आणि तुम्हाला योग्य तो न्याय मिळवून देईल. या प्रश्नाच्या बाबतीत बोलताना कामगारांनी सांगितले की अलंग इथे कामगारांचे हित पाहणारी संघटना स्थापन होणे आणि स्थापन झाली तरी ती कार्यान्वित होणे खूपच गरजेचे आहे. कारण इथे काम करणाऱ्या कामगारांमध्ये एकजुटी नाही आणि जरी कामगारांमधील एखादा कामगार कामगारांच्या हक्काविषयी बोलू लागला कामगारांमधे जनजागृती करण्याचा प्रयत्न करू लागला तर एकतर त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. सांगून जर त्याने ऐकले नाही तर त्याला अशा रीतीने संपवून टाकले जाते की त्या गोष्टीचा कुणालाच काही पत्ता लागत नाही. अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांमधे

प्रामुख्याने युवकांचे प्रमाण अधिक आहे. त्यातही बहुसंख्य हे विवाहित आहेत. यात (२८ ते ४५) वयोगटातील कामगारांचा समावेश आहे. जो आपल्या कुटुंबाला आपल्या मूळ गावीच ठेवून आलेले आहेत. तेव्हा जशा मानवाच्या अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजा आहेत त्याचप्रमाणे शरीरधर्माच्या सुद्धा काही गरजा आहेत तेव्हा या कामगारांना या बाबतीत विचारले असता त्यांनी सांगितले की आम्ही शीपयार्डाच्या बाहेर तर जात नाही. पण इथे फळविक्री इतर गोष्टी विकण्याच्या निमित्ताने येणाऱ्या स्त्रियांच इथे धंदा करतात. त्यांच्याकडेच काही कामगार जात असतात. त्याचप्रमाणे काही जण समलैंगिक संबंध ठेवूनही आपली इच्छापूर्ती करतात. त्यावरून इथे असे लक्षात आले की इथेही समलैंगिक संबंध प्रस्थापित होताना दिसून येत आहेत. त्याचे प्रमाण जरी कमी असले तरी सुद्धा त्यांची कारणे या कामगारांनी दिली आहे. त्याचाच परिणाम किंवा वेश्यावृत्तीमुळे ही इथे कामगारांमधे एडसचे काही रुग्ण आढळून आले आहेत. आणि त्यासाठी एड्स नियगण प्रोजेक्ट इथे अलंग शीपयार्डात राबविण्यात येत आहे आणि कामगारांमधे जागृती करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

आपल्या गावापासून दूर आपल्या कुटुंबापासून दूर असल्याने या कामगारांमधे एकटेपणा तुटलेपणाची भावना निर्माण झालेली दिसून येत आहे. अतिशय कठोर परिश्रम त्याचबरोबर स्थानिक लोकांशी सतत समायोजन करून कायम पडत्याची भूमिका घेऊन जीवन जगणे त्यामुळे या साऱ्या गोष्टीचा विसर पडण्यासाठी ते दारूचाही आधार घेतात याही गोष्टी स्पष्ट होत आहेत. वास्तविकता गुजराथ राज्यात दारूबंदी आहे. परंतु या कामगारांनी सोगितलेल्या माहितीवरून असे लक्षात आले की, बहुतांशी सगळेच कामगार (अंदाजे ९०% धरू या) हे दबाके दारू पिते है. कारण इतके कष्टाचे काम केल्यावर दारू पिल्याशिवाय यांना शांत झोपच लागणार नाही आणि दारू पिली नाही तर ते उद्या कामावरही जाऊ शकणार नाहीत अशी त्यांची अवस्था असते. त्यामुळे दारू पिणाऱ्या कामगारांचे प्रमाण अधिक आहे. पण कबूली देणारे फारच थोडे आहेत.

अलंग शीप ब्रेकिंग यार्डात काम करणाऱ्या कामगारांचा धर्म आणि जात या संदर्भातही माहिती घेतली असता असे दिसून आले की इथे काम करणाऱ्या कामगारांमधे हिंदू आणि मुस्लीम धर्माचे लोक एकत्रितपणे काम करताना दिसून येत आहेत. त्यात हिंदू धर्माचे कामगार अधिक असल्याचे दिसून आले आहे. इतर धर्मीयांचे कामगार इथे आढळले नाही जातीच्या संदर्भात तशी स्पष्ट

माहिती मिळू शकली नाही. परंतु उच्च वा कनिष्ठ जातीचा कामगार असो. प्रत्येकाची मुख्य नाळ ही गरिबी आणि बेरोजगारीशी जोडलेली दिसून आली आणि त्यामुळेच ते इथे इतक्या दुर स्थलांतरित होऊन काम करत आहेत.

हिंदू आणि मुस्लीम दोघेही कामगार आपापले सण उत्साहाने साजरे करत आहेत तरीही दिवाळी होळी हे सण इथे मोठ्या उत्साहात साजरे करतात.

### ३.४ विषयाला अनुसरुन विशेष व्यक्तींच्या मुलाखतींच गोषवारा



**विद्यमान डॉ. विद्युत जोशी**

डॉ. विद्युत जोशी एक अत्यंत अभ्यासू विद्यमान व सदैव सर्वांना सहकार्य करणारे असे उमदे व्यक्तिमत्व. अलंग रिसायकलिंग शीप यार्डाच्या निर्मितीपासून ते आज या शीपयार्डातील एकूण ३० वर्ष पूर्ण झाली आहेत. या शीपयार्डामुळे आजूबाजूच्या गावावर तेथील लोकांच्या जीवनात कसा सामाजिक आर्थिक बदल झाला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने कसा परिणाम झाला आहे या संदर्भातील एक संशोधन अभ्यास डॉ. विद्यूत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या संशोधन अभ्यास गटात प्रा. निलाबेन ओझा, अर्थशास्त्र विभाग प्रमुख भावनगर युनिर्व्हसिटी, डॉ. सुमनबेन चौधरी समाजशास्त्र विभाग प्रमुख भावनगर युनिर्व्हसिटी भावनगर त्याच बरोबर भारती जे.मेहता मीशा व्ही. व्यास, जीगर जे भट, विनोद एम आम्रचोली या सदस्यांचा समावेश होता. आणि या प्रकल्पाचे सह–सहकारी श्री. हिरेन व्ही. मेहता आणि जगदीश जे.गणात्रा होते. एकूणच त्यांनी केलेल्या संशोधनाविषयी व त्या संदर्भात सूचविलेल्या सूचना या विषयी त्यांची मते जाणून घेतली आहेत.


गल्फ ऑफ खंभात (Gulf of Combey) च्या सागरी किनाऱ्यावर बसलेल्या अलंग या गावाचीच निवड करण्यापाठीमागचा उद्देश विहित करताना डॉ. जोशी यांनी सांगितले की या गावाला (neckless shaped) निसर्गताच लाभलेला गळ्यातील हाराप्रमाणे लाभलेला किनारा ज्यामुळे इथे जहाज तोडणी करणे अतिशय सुलभ होऊ शकते आणि उंच लाटाच्या मुळे जहाजे या किनाऱ्यावर आणणेही सोपे जाते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अलंगाच्या या सागरी किनाऱ्याला कुठल्याही प्रकारे सुनामीचा धोका नाही. त्यामुळेच अलंग गावाची निवड करण्यात आली आहे.

१९८१ साली काही शीप ब्रेकर्स व्यावसायीक हे गुजराथ च्या दौऱ्यावर आले. आणि त्यांनी गुजराथ राज्यातील सागर किनारी असलेल्या अलंग गावाची निवड केली. आणि या यार्डाच्या निर्मितीसाठी २५ कोटी रुपये बाजूल ठेवण्यात आले. त्यांनतर कलकत्ता येथूनही काही सदस्य हे गुजराथच्या दौऱ्यावर आले आणि मग त्यांनी अलंग या गावीच शीपयार्डाची निर्मिती करण्याचे ठरविले, आणि त्याचे सर्व काम गुजराथ मेरी टाईम बोर्डावर सोपविण्यात आले. त्यांनी या शीपयार्डाची निर्मिती करताना दोन योजना आखल्या, पहिल्या योजनेनुसार त्यात अलंग शीपयार्डातील प्लॉट निर्मिती, रस्ते, इलेक्ट्रीसीटी, दळणवळण, संदेशवाहन या पहिल्या योजनेत आखण्यात आली. तर दुसऱ्या योजनेअंतर्गत जेटी, गॅसपाईपलाईन, आणि कामगारांच्या साठी घरांची योजना ही दुसऱ्या योजनेत मांडण्यात आली, आज अलंग शीपयार्डने जागतिक स्थान पटकावलेले आहे. आज एकूण १६० हून अधिक प्लॉट इथे कार्यान्वित आहेत.

१९८३ साली पहिले निकामी जहाज हे अलंग इथे तोडण्यात आले. दुसऱ्या जागतिक युद्धामुळे निकामी झालेल्या युद्धनौका त्या निकामी जहाजांची दुरुस्ती करणे अतिशय अवघड अशी गोष्ट असल्याने ती तोडून टाकणेच जास्त संयुक्तिक ठरते त्यामुळे या जहाज तोडणी उद्योगाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाल्याचेही डॉ. जोशी यांनी सांगितले.

१९८३ साली सुरु झालेले शीपयार्ड सुरुवातीला जहाज तोडणीचे प्रमाण थोडे होते. कामगारही थोडे होते आणि सुरुवातीला तर मनुष्याबळाच्या सहाय्यानेच सारे काम केले जाते असे. त्यावेळी सुरक्षेच्या संदर्भात अशी विशेष कोणतीच काळजी घेतली जात नव्हती. त्यामुळे त्या साऱ्या गोष्टीचा इतका प्रभाव जाणवत नव्हता मात्र जसजशी निकामी जहाजांची संख्या वाढू

लागली. तसेसे प्रदुषणाचे प्रमाणही वाढू लागले. सततचा धूर जहाजातून निघणारा विविध प्रकारचा कचरा तेल वंगण हे सुद्धा समुद्रातच पडत होते. त्यामुळे येथील किनाऱ्यावरील पाण्यावर तेलाचा मोठा तवंग दिसून येत असे आणि निकृष्ट दर्जाचे ऑईल, तेल वंगण हे सतत समुद्रात पडल्याने समुद्रातील जीवसृष्टीवर त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला. अलंग शीपयार्डाचा आजूबाजूच्या गावात कोळी लोकांचे वास्तव्य अधिक आहे. आणि शीपयार्डाच्या निर्मितीमुळे त्यांचा मासेमारीच्या धंद्यावर विपरित परिणाम होऊ लागला. समुद्रातील मासे नष्ट होऊ लागले. तिथल्या वन्यजीवन, शेती, उत्पादनावर सुद्धा विपरीत परिणाम होऊ लागला. जमिनीखालील पाण्याचे स्त्रोत दुषित झाल्याने पीण्याचे पाणी, जनावरांना पिण्याचे पाणी दुषित मिळू लागले आणि त्याचा पीकांवरही परिणाम झाला. जहाजांचा वाढत्या संख्येमुळे इथे मनुष्यबळही वाढले. इथे काम करणारे कामगार हे प्रामुख्याने स्थलांतरित व गरीब राज्यातून इथे रोजगार मिळविण्याच्या उद्देशाने इथे आलेले आहेत. या कामगारांच्या आरोग्यावरही विपरीत असा परिणाम होऊ लागला. सुरुवातीला सुरक्षेसंदर्भात एवढी खबरदारी घेतली जात नव्हती. त्यामुळे त्यावेळी प्रचंड मोठ्या प्रमाणात स्फोट आग लागण्याच्या घटना घडत होत्या. यात कामगारांच्या मृत्युचे प्रमाणही अधिक होते. या अपघाताची तसेच कामगारांच्या मृत्युची नैतिक जबाबदारी स्वीकारली जात नव्हती. या सर्व गोष्टी आम्ही प्रत्यक्ष पाहणीच्या दरम्यान अनुभवल्या आणि त्यानंतरच या संदर्भात सखोल चर्चा करुन आम्ही या संदर्भात काही सूचनाही केल्या.



**अलंग शिपयार्डाविषयी आपले विचार व्यक्त करताना डॉ. विद्युत जोशी**

आज परिस्थिती खूप बदललेली आहे. आम्ही अशी सूचना केली होती की जी गॅसपाईप लाईन आहे ती कायमस्वरुपी अशी बसवावी व ज्यामुळे गॅस लिकेज किंवा त्यामुळे होणारे स्फोट व अपघातापासून संरक्षण करता येऊ शकेल. त्याचप्रमाणे जहजातील अवजड सामान कामगार हे डोक्यावर उचलून नेऊन ट्रक मधे ठेवतात. अवडज सामान कामगारांनी डोक्यावर ठेवल्यामुळे त्याच्या शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होत असतो. जो सहजासहजी दिसून येत नाही. पण तो दूरगामी असा गंभीर परिणाम करत असतो. सतत आग आणि धुरामुळे कामगारांना श्वसनाचे कॅन्सर सारखे आजार उद्भवतात. त्यासाठी cold cutting प्रक्रीया अंमलात आणली जावी अशीही सूचना केली होती. तसेच जहाज तोडणीसाठी Dry-Dock System अमंलात आणण्यासाठी सूचविले होते. या सर्व सूचना आम्ही, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी, शीप ब्रेकर्स आणि कामगार या सर्वांशी चर्चा करुनच सूचविलेल्या आहेत. परंतु त्यातील काही गोष्टीवर लक्ष केंद्रीत केले गेले आहे. परंतु काही गोष्टीमधे अजिबातही बदल झालेला नाही.

आज अलंग रिसायकलींग शीपयार्डाला प्रतिबंधित एरीया म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे आज गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे प्रत्येक गोष्टींवर विशेष लक्ष आहे. प्रत्येक प्लॉटधारकाला प्लॉटवर सुरक्षा अधिकारी नेमणे सक्तीचे करण्यात आले आहे. सुरुवातीला कामगारांना रविवारी सुद्धा कामांची सुटी मिळत नसे. मात्र आता रविवारी सुटी जाहीर करण्यात आली आहे. मात्र ज्या दिवशी काम केले जाईल त्याच दिवशीचे वेतन त्यामुळे रविवारी कामगारांना कुठल्याही प्रकारचे वेतन मिळत नाही. इथे कामगारांच्या भवितव्याच्या दृष्टीने फॅक्टरी ॲक्ट लागू करावा अशी सूचनाही करण्यात आली होती. मात्र अजूनही फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आलेला नाही. आज इथे ब्लडबँक व हॉस्पिटलची सोय करण्यात आलेली आहे.

एकूणच अलंग शीपयार्डाचा दोन तीन वेळा दौरा केल्यानंतर या कामगारांच्या संदर्भातील प्रश्न मी डॉ. जोशी यांन विचारला की आपण जी पाहणी केली त्याला किमान १५ वर्षे उलटून गेली तरी सुद्धा कामगारांच्या राहणीमानात सुरक्षेच्या संदर्भात म्हणावा तसा कुठलाच फरक जाणवत नाहीये. या संदर्भात डॉ. जोशी यांनी सागितले की मी कुठल्याच सुधारणा झाल्या नाहीत असे मान्य करणार नाही पण काही गोष्टीत अजून खूप सुधारणा होणे अपेक्षित असल्याचेही त्यांनी कबूल केले. आजही कामगारांच्या जीवनात काही फारसा फरक पडलेला नाही. तरी आता गुजराथ

मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकडे खूपच जबाबदारीने दक्षता घेत आहेत. आज प्राणघातक अपघाताची पोलीस दप्तरी नोंद केली जात आहे. आणि त्या मृत कामगारांच्या कुटंबियांना योग्य तो मोबदला देण्यासाठी सांगितले जात आहे.

पण बदलांचा प्रभाव त्यातून आज खूप व्यवस्थितरित्या नियमांची काळजी घेतली जाते आहे. सुरक्षा आणि पर्यावरण या दोन्ही गोष्टीकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाते आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजूला आज याच अलंग शीपयार्डामुळे याच्या जवळील गावांचा व भावनगर शहराचाही चेहरा मोहरा पूर्णपणे बदललेला आहे. आज विविध पूरक उद्योगाना चालना मिळालेली आहे. त्यामुळे आर्थिक सामाजिक स्तरही उंचावलेला दिसून येत आहे.



**माजी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुमनबेन चौधरी भावनगर**

डॉ. सुमनबेन चौधरी मूळच्या जळगावच्या पण लग्नानंतर भावनगर येथे जे स्थलांतर केले त्यानंतर आज जवळजवळ ३० वर्षापासून भावनगर येथे वास्तव्य. पुढे भावनगर येथील सौराष्ट्र युनिव्हर्सिटीतच समाजशास्त्राच्या विभाग प्रमुख म्हणून जबाबदारी पाहिली. त्या आधी अध्यापनाचे कार्यही केले. डॉ. विद्युत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अलंग रिसायकलिंग शीपयार्डामुळे भावनगर शहरावर झालेला प्रभाव हा विषय घेऊन पीएच.डी. पूर्ण केली. आज एक स्वत:ची एक सामाजिक संस्था चालवत आहेत. संस्था प्रामुख्याने महिलांच्या विकासासाठी कार्यरत आहे. अलंगविषयी कुणी अभ्यासाच्या दृष्टीने सुमनबेन यांना भेटले असता त्या आनंदाने मार्गदर्शन तर करतातच इतकेच नव्हे तर संपूर्ण सहकार्य करण्याचीही त्यांची तयारी असते. या अभ्यासाच्या निमित्तानेच त्यांचा झालेला परिचय. त्या निमित्तानेच त्यांचेही विचार इथे व्यक्त करत आहे

जेव्हा मी लग्न होऊन इथे भावनगर शहरात पाय ठेवला तेव्हाचे भावनगर आणि आज पंचवीस वर्षानंतरचे भावनगर यात आमूलाग्र असा बदल झालेला आहे आणि भावनगरचा सर्वांगीण विकास होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भावनगरपासून ५० कि.मी.वर निर्माण झालेले अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्ड. जिथे संपूर्ण जगातील निकामी जहाजे तोडण्यासाठी येतात आणि त्यातून मिळणारे स्टील, लाकूड, फर्निचर व इतरही अतिशय महत्त्वाच्या अशा गृहपयोगी वस्तू त्यामुळे अलंगच्या आजूबाजूच्या १५ ते २० खेड्यांबरोबरच भावनगर शहराचासुद्धा चेहरामोहराच बदलून गेला. विविध उद्योगधंद्यांना चालना मिळाली आणि याचे सारे श्रेय हे अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्डलाच जाते.



**आपले अनुभव व्यक्त करताना डॉ. सुमनबेन चौधरी**

अलंग शीप ब्रेकींग यार्डमुळे भावनगर जिल्ह्याचा खूपच विकास झाला आहे. वास्तविकता अतिशय मागासलेला जिल्हा असे या भावनगर जिल्ह्याचे स्वरूप होते. परंतु आता मात्र अलंग शीप ब्रेकींग यार्डमुळे भावनगर जिल्ह्याचा फक्त आर्थिक विकासच झाला आहे असे नाही तर आज आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक सांस्कृतिक उत्कर्षही झाला आहे.

आज भावनगरमध्ये रोलींग मिल्स व जहाजातील उपयुक्त इंजिने जनरेटर पम्पस तसेच विविध प्रकारचा स्क्रॅप माल या साऱ्यांची मोठी बाजारपेठ कुंभारवाडा परिसरात आज विकसित झालेली आहे.

अलंग रिसायकलींग शीपयार्डामुळे जसा परराज्यातील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्याचप्रमाणे इथल्या एक लाखाहून अधिक लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे रोजगार मिळाला आहे.

या शीप ब्रेकींग यार्डामुळे परराज्यातील लोकांचेही इथे आगमन झालेले आहे. त्यामुळे विविध सण उत्सव एकत्रितरीतीने भावनगर मध्ये साजरे केले जातात. त्यात गणेशोत्सव, दुर्गापुजा, होळी इथे सर्वजण एकत्रित आनंदाने राहत आहेत. पूर्वी मातीमोल असणाऱ्या जमिनीने आज आकाशाचे दर गाठलेले आहेत. विविध सोसायट्या, मॉल, पंचतारांकित हॉटेल, सिनेमागृह या साऱ्या आधुनिकतेच्या गोष्टीही भावनगरमध्ये दिसू लागलेल्या आहेत.

शीप ब्रेकींग कंपन्यांचे मालकही भावनगर व मुंबई इथेच निवास करून आहेत. काही शीप ब्रेकर्स हे परराज्यातील आहेत. त्यामुळे वैचारिक व सांस्कृतिक आदान प्रदानही आता इथे पहावयाला मिळत आहे.

अलंग शीप ब्रेकींग यार्डाजवळील खेड्यातील लोकही आता चांगले सधन झाल्याने अलंग ही इथल्या लोकांची जीवनधारा असल्याचे संबोधले जात आहे. अलंगविषयी खूपच उलट सुलट बातम्या छापूनही येतात. पूर्वी तशी परिस्थिती होती. परंतु आता मात्र त्यात खूप बदल झालेला आहे आणि यापुढेही अधिक चांगले काही आपल्याला पहायला मिळेल अशी आशा आहे.

भावनगर हे संस्थान जसे सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक दृष्टीनेसुद्धा आता खूप प्रगतीपथावर आहे. फक्त भावनगर व आजूबाजूच्या परिसरातील लोकांमध्ये असलेला सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव ही गोष्ट मात्र मनाला खूपच खटकत राहते. ती जागृती आणण्याचा मी स्वत:ही खूप प्रयत्न केला. पण मला त्यात पूर्णत: अपयश आले. सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत जाणीव नाही. इथल्या स्थानिक शासकीय यंत्रणाही त्या बाबतीत अतिशय उदासीन असलेल्या दिसून येत

आहे. सार्वजनिक स्वच्छतेची अंमलबजावणी केली तर मग भावनगर शहराचा पूर्णपणे कायापालट होईल यात अजिबात शंका नाही.

## मुलाखत – त्रिवेणी शीप ब्रेकर्स – श्री. कनाकिया

अलंग शीप ब्रेकींग यार्डाची सुरुवात तर १९८२ साली झाली. मात्र मी स्वत: या व्यवसायात १९८४ साली आलो. जेव्हा मी या व्यवसायात पाऊल ठेवले तेव्हा अलंग एक अगदी छोटे खेडेगाव होते. तिथे कुठल्याही प्रकारचे रस्ते नव्हते. दळणवळणाची साधने नव्हती. काही काहीच नव्हते. १९८६ साली पक्का रस्ता झाला.



**त्रिवेणी शीप ब्रेकर्सचे श्री. कनाकिया**

अलगंच्या आधी शीप ब्रेकींग हे कलकत्त्याच्या एका स्थायी कंपनीच्या हातात होते. त्यानंतर ते मुंबईला आले. मुंबईनंतर मात्र अलंग येथे त्याचा विस्तार खूपच मोठ्या प्रमाणावर झाला. सुरुवातीला ही जहाजे लॉटरी पद्धतीने शीप ब्रेकर्सना उपलब्ध होत होती. ज्याचा नंबर असेल त्याला आधी जहाजाच्या खरेदीचे प्राधान्य असे. त्याने नकार दिला तर त्याच्या पुढच्याला

या खरेदीबाबतीत विचारले जात असे. अशी सुरुवातीच्या काळातील पद्धत होती. आता मात्र आर्थिक उदारीकरणामुळे खुल्या बाजारात कोणीही निकामी जहाजाची खरेदी करू शकतो.

आम्ही जेव्हा एखाद्या जहाजाची खरेदी करतो तेव्हा त्या जहाजाच्या संबंधात असलेली इथंभूत माहिती त्या जहाजाचे संपूर्ण वर्णन त्या करारात नमूद केलेले असते. मग निकामी जहाज तोडण्यापूर्वी संबंधित खात्याचे सर्व अधिकारी त्यात कस्टम अधिकारी प्रदूषण नियंत्रण अधिकारी व गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी या जहाजाची योग्य ती तपासणी करतात व संबंधित खात्याकडून आम्हाला तशी प्रमाणपत्रेही मिळतात. त्यानंतर आम्हाला जहाजाचा ताबा दिला जातो. तोपर्यंत त्या जहाज कंपनीची माणसे त्या जहाजावर असतात. या तपासण्यामध्ये AERD Automatic Research Board या जहाजाच्या संदेश वहनात काही रेडिओ यंत्रणा त्याची खास प्रमाणात तपासणी केली जाते. या सगळ्या प्रक्रियेला एकूण दोन तीन आठवडे लागतात. गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून जेव्हा आम्हाला अंतिम ना हरकत प्रमाणपत्र मिळते तेव्हा मग आम्ही जहाजाचा ताबा घेऊन पुढील कारवाईला सुरुवात करतो.

गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून आम्हाला भाडे तत्त्वावर प्लॉट उपलब्ध करून दिले जातात. त्याचप्रमाणे वीज पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला जातो. त्याच्या बदल्यात गुजराथ मेरी टाईम बोर्डाला स्केक्र फूटाप्रमाणे पैसे द्यावे लागतात. भाडे करारावर जे प्लॉटस उपलब्ध करून दिले जातात. त्या बाबतीत १९९४ पर्यंत कोणत्याही प्रकारची निश्चिती नव्हती. कधी पाच वर्षे तर कधी दहा वर्षे करार केला जातो. त्यामुळे कोणत्याही गोष्टीची स्पष्टता होत नसल्याने या प्लॉटवर काही सोईसुविधा करून घेण्यास आम्हालाही खूप मर्यादा येतात. कारण जहाज खरेदी आणि तोडणीच्या कामातच वर्षे दोन वर्षे अशी निघून जातात. त्यासाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डाला आमची एक अशी महत्त्वाची विनंती आहे की यांनी आमच्यासोबत केला जाणारा भाडेतत्त्वाचा करार हा दीर्घ मुदतीचा (किमान ३० वर्षांचा) तरी करावा. कारण दीर्घ मुदतीचा कालावधी मिळाला तर आम्हालाही त्यात आणखीन काही सुधारणा करता येतील. आम्ही एक्साईज ड्युटी, कस्टम ड्युटी, त्याचप्रमाणे जहाजातील आरोग्याला धोकादायक निकामी कचरा उचलून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी पैसा देतो. मग गुजराथ मेरी टाईम बोर्डाने आमची ही मागणी मान्य करावी अशी आमची रास्त अपेक्षा आहे.



**आपल्या व्यवसायाचे प्रदीर्घ अनुभव सांगताना श्री. कनाकीया**

काही सामाजिक संस्था अलंग रिसायकलिंग शीप ब्रेकींग यार्डाची विनाकारण बदनामी करत असतात. त्यात प्रदूषण आणि कामगारांचे शोषण त्यांचे राहणीमान यावर विशेष करून प्रकाश टाकला जातो. या कामगारांच्या झोपडपट्टी विषयी प्रामुख्याने चर्चा केली जाते. पण आज काय अलंगमध्येच आपल्याला झोपडपट्टी पहायला मिळते का आज आपण भारतातल्या कित्येक मोठ्या शहरातून आपल्याला या झोपडपट्ट्यांचे दर्शन घडते. फक्त भारतातच नव्हे तर जगातल्या कोणत्याही विकसनशील देशांमध्ये आपल्याला हेच चित्र पहायला मिळते. आम्ही या कामगारांच्या भवितव्याच्या दृष्टीने भव्य गृहप्रकल्प हाती घेतला असून त्या गृहप्रकल्पाचा पहिला टप्पा आम्ही या वर्षाच्या अखेरीपर्यंत पूर्ण करत आहोत. जिथे या कामगारांची रहायची सोय होऊ शकेल व त्यांना सर्व मूलभूत सुविधाही तिथे पुरविल्या जातील. ही घरे या कामगारांना कशा पद्धतीने उपलब्ध करून द्यायची याचा अंतिम निर्णय हा गुजराथ मेरी टाईम बोर्डच घेणार आहे. या कामगारांना ही घरे भाडेतत्त्वावर उपलब्ध होतील असा आमचा अंदाज आहे. या गृहप्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी येणारा खर्च हा एकूण १८ कोटी रुपये आम्ही त्रिसदस्यीय समितीच्या वतीने आम्ही जबाबदारी उचलली आहे. आम्ही आमची वर्गणी दिलेली आहे. बाकीचे सर्व अंतिम निर्णय गुजराथ मेरी टाईम बोर्ड घेईल.

भारतातील जहाज तोडणीच्या उद्योगाबद्दल मला अजिबात साशंकता नाही. पण २०१५–१६ साल हे थोडे कठीण परिस्थितीतून जाणार आहे. कारण सध्याचा कालावधी हा मंदीच्या कचाट्यात सापडलेला आहे. पण हे वर्ष फारसे चांगले नाही असा माझा स्वत:चा अंदाज आहे. परंतु हा व्यवसाय कधी बंद पडेल असे मला तरी अजिबात वाटत नाही.

अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे आज संपूर्ण अलंग व अलंगच्या आजूबाजूच्या २० खेड्यांमध्ये आमूलाग्र बदल झालेला दिसून येत आहे. इतकेच नाही तर भावनंगर मध्येही अलंगचेच सर्वत्र प्रतिबिंब पहायला मिळत आहे. अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे या स्थलांतरित कामगारांना तर रोजगार मिळालेलाच आहे पण प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सुमारे लाखाहून अधिक लोक या उद्योगामुळे आज कामधंद्याला लागलेले आहेत.

**त्रिवेणी शीपब्रेकर्सचे श्री. कनाकिया यांनीही आपले विचार व्यक्त करताना सांगितले की गुजराथ मेरी टाईम बोर्डाने आम्हाला दीर्घ मुदतीच्या करारावर प्लॉट उपलब्ध करून द्यावे. या उद्योगामुळे स्थलांतरित कामगारांबरोबरच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून द्यावे. या उद्योगामुळे स्थलांतरित कामगारांबरोबरच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे लाखो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शोषण ही एक सामाजिक समस्या आहे हे मलाही मान्य आहे. पण सतत नकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यापेक्षा ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याचाही स्वीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.**

## चिंतन कलाथिया – शीप ब्रेकर्स

चिंतन कलाथिया अतिशय उमदे युवा पिढीचे नेतृत्व करणारे आणि अतिशय अभ्यासू असे शीप ब्रेकर्स. चिंतन यांनीसुद्धा आपल्या बातचितीतून अनेक महत्त्वाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला. त्यामुळे अलंग शीप ब्रेकींग यार्डाविषयी असलेले बरेच समज गैरसमज दूर होण्यास मदत झाली.

जेव्हा अलंग शीप ब्रेकींग यार्डाची सुरुवात झाली तेव्हा सुरक्षेच्या बाबतीत तशी कोणत्याही प्रकारची जागरुकता नव्हती. परंतु आता मात्र सुरक्षेच्या बाबतीत खूपच मोठ्या प्रमाणावर जागरुकता आलेली आहे. अगदी जहाज तोडणीच्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या नियमांची

अंमलबजावणी केली जाते त्याच पद्धतीने आता अलंगमध्येही हळूहळू तशी पाऊले उचलण्यास सुरुवात झाली आहे. त्यात पर्यावरण आणि कामगारांच्या सुरक्षेवरही अधिक भर दिला जात आहे. सगळेच काही आलबेल आहे असे मी म्हणणार नाही पण आता ही जाणीव निर्माण झाली आहे यात मात्र साशंकता नाही.



**युवापीढीचे नेतृत्व करणारे अतिशय अभ्यासू शीप ब्रेकर्स श्री. चिंतन कलाथिया**

अलंग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांच्या शोषणासंदर्भात कायम नकारात्मक दृष्टिकोनातूनच त्याचा प्रचार आणि प्रसार हा प्रसारमाध्यमांकडून केला जातो. परंतु इथे येणाऱ्या या स्थलांतरित कामगारांना दिवसाला जेवढा रोजगार दिला जातो तो इतरत्र कुठेही दिला जात नाही. त्यामुळे तर हे कामगार वर्षानुवर्षे इथे काम करत आहेत आणि माझ्या अभ्यासानुसार दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कामगारांना जहाज तोडणीचे काम इतके अंगवळणी पडले आहे की त्यामुळे कुठेही दुसरे काम करण्याची त्यांची मानसिकताच उरलेली नाही. ज्या राज्यातून हे कामगार इथे कामाला येत आहेत त्यात उत्तर प्रदेश, बिहार, प. बंगाल, ओरिसा राज्यातही

मोठमोठाल्या उद्योगांना सुरुवात झाली आहे. परंतु स्थानिक लोकांना कामावर ठेवून घेतले जात नाही. या लोकांना रोजगारासाठी इथे स्थलांतरित व्हावे लागते.

या कामगारांच्या शोषणासंदर्भात किंवा प्लॉटमध्ये एखादा अपघात झाला तर सामाजिक संस्थाच पुढाकार घेऊन तो प्रश्न अधिक चिघळवत ठेवतात. त्यांना एखादे छोटेसे कारणही पुरेसे असतात. मग स्थानिक वृत्तपत्रेही आपली जबाबदारी नेटाने पार पाडतात. माझेही स्वत:चे असे प्रामाणिक मत आहे की कामावर असताना कुणाचाही अपघाती मृत्यु होऊ नये. परंतु दुर्दैवाने अशी गोष्ट जेव्हा घडते तेव्हा दोषी मात्र प्लॉटधारकालाच धरले जाते. इथे सुरक्षा व्यवस्था ठीक नाही अशा गोष्टी मोठ्या मोठ्या मथळ्यामध्ये छापल्या जातात. मला इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की आपण सर्व जण टॅक्स भरतो. तरीही आपण ज्या रस्त्यावर आपले वाहन घेऊन जातो ते रस्ते तरी कुठे धड अवस्थेत असतात. या रस्त्यांवरसुद्धा अनेक अपघात रोज होतात. कित्येक माणसे नाहक मारली जातात तर त्या बाबतीत मात्र कुठल्याही संबंधित अधिकारी मंत्र्याला कधी अटक करण्यात येत नाही. मात्र अलंगमध्ये एखादा अपघात घडला तर लगेच प्लॉटधारकाला दोषी धरले जाते. काही वेळा या घटनेमागे कामगारांचाही मोठा दुर्लक्षितपणा असतो. कामाच्या ठिकाणी कुठेही जाऊन कोपऱ्यात झोपून जाणे सुरक्षेचे नियम न पाळणे या गोष्टीमुळे अपघात घडतात पण या गोष्टींकडे लक्ष दिले जात नाही.

प्रदूषणाच्या मुद्द्यावरूनही अलंगला वारंवार बदनाम केले जाते. वास्तविकता आता निकामी कचऱ्याचीसुद्धा योग्य रीतीने विल्हेवाट लावली जात आहे आणि गुजराथ मेरी टाईम बोर्डाचा प्रदूषण नियंत्रण बोर्डाचाही आमच्यावर पूर्णपणे वचक आहे. अलंगच्या परिसरात कुठेही श्वास घ्यायला त्रास होत नाही की कुठेही संपूर्ण परिसरात दुर्गंध येत नाही. समुद्राच्या पाण्याचा जो ठराविक विशिष्ट वास आहे तेवढा येतोच. तो कुठल्याही इतर समुद्रकिनारीसुद्धा येतो. पण प्रदूषणाच्या व अत्यंत घातक अशा कचऱ्याच्या संदर्भात हा प्रश्न वारंवार उचलला जातो आणि त्यासाठी सामाजिक संस्थांना पुढे करून आंतरराष्ट्रीय स्तरावर हा प्रश्न उचलला जातो. यात चीन देशाचा मोठा हात आहे. त्यासारखे देश सामाजिक संस्थांना पैशाचे पाठबळ देऊन कायम चुकीच्या गोष्टींचा प्रसार करत असतात. यात प्रगत देशांचा मोठा हात असून त्यापाठीमागे हे विकृत राजकारण खेळले जाते. आता आपल्या स्थानिक पातळीवर अगदी गुजराथ राज्याचाच

आपण विचार करू. अगदी वलसाड वापी नवसारी सुरत या पट्ट्यात किती तरी मोठाल्या औषधाच्या आणि रसायनाच्या कंपन्या अस्तित्वात आहेत. रात्री १० ते पहाटे ३ च्या दरम्यान आपण इथून प्रवास केला तर या रासायनिक आणि औषधाच्या कंपन्या किती मोठ्या प्रमाणात धूर ओकत असतात आणि त्याचा वासही श्वास घेण्याला किती त्रासदायक ठरतो. अगदी तुम्ही एअरकंडीशन गाडीतून प्रवास करत असला तरीसुद्धा या प्रदूषणाचा खूप त्रास अनुभवता येतो. तशी कोणतीच परिस्थिती अलंगमध्ये नाही तरीसुद्धा अलंगमधल्या प्रदूषणाच्या नावाने मोठ्याने बोंबाबोंब केली जाते. या प्रदूषणाबाबत कधी कोणी काही बोलत नाही.



**मुद्देसुदपणे आपला विषय समजावून सांगताना श्री. चिंतन कलाथिया**

जहाज तोडणीचा व्यवसाय हा पूर्वेकडील प्रगत देशांकडून आशियाई देशातील विकसनशील देशाकडे आलेला आहे. त्या देशांनी प्रदुषणासंदर्भात केलेल्या कडक कायद्यामुळे

तिथे जहाज तोडणी बंद झाली. हाँगकाँगमध्ये झालेल्या बसेल अधिवेशनात प्रगत देशांनी आपल्या निकामी जहाजांना आरोग्य व पर्यावरणाला धोका पोहोचेल अशा कचऱ्यासहित विकसनशील देशांकडे जहाज पाठविण्यावर प्रतिबंध लावला. त्यानुसार विशिष्ट अशी नियमावली तयार करण्यात आली. आज बेसल अधिवेशनात ज्या नियमांना लागू केले आहे त्याचा आम्ही स्वीकार केला आहे. मात्र युरोपियन देशातील लोकांनी या संदर्भात काही वेगळेच नियम आमच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला आहे. युरोच्या नियमानुसार ज्या देशातील जहाज आहे त्याच देशात त्याची तोडणी केली जावी. पण तिथे तर कडक निर्बंध लागू केल्यामुळे ते जहाज तिथे तोडणे अशक्य आहे आणि या जहाजातील निघालेल्या मालाचा पुर्नवापर कसा आणि कोण करणार हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

वास्तविकता चीन व जपान हे देश अत्याधुनिक तंत्रज्ञानांनी सज्ञ असे देश झालेले आहेत. आता त्यांनी हळूहळू आपले अंग काढून घेण्यास सुरुवात केली आहे. आज भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणावर जहाज तोडणी केली जात आहे. त्याचाही त्यांच्या मनात आकस असल्यामुळे काही सामाजिक संस्थांना पैसे पुरवून प्रसारमाध्यमाद्वारे अलंगला बदनाम करण्याचे काम करत आहे.

आम्ही बसेल आणि युरोच्या दोघांचा नियमांचा अभ्यास करून दोन्ही दृष्टिकोनातून विचार करण्यास सुरुवात केलेली आहे. वास्तविकता हे अशा प्रकारचे राजकारण थांबविण्याची गरज आहे.

गुजराथ सरकारनेसुद्धा या उद्योगाचा विकास करण्यासाठी आम्हाला सर्वतोपरीने मदत केली पाहिजे तसे तशी अनुकुलता आम्हाला त्यांच्याकडून दिसून येत नाही. नरेंद्र मोदी जेव्हा राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हाही त्यांच्या मनात अलंगचे खाजगीकरण केले जावे अशा योजना त्यांच्या मनात होत्या. पंतप्रधान झाल्यावर त्या गोष्टी वास्तवात येतील असे आम्हाला वाटले होते. परंतु अजून तरी तसे काहीही झालेले नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक राजकीय नेत्यांमध्येही या इंडस्ट्रीजचा आणखीन विकास व्हावा असे कुणालाही वाटत नाही. ज्या उद्योगामुळे आज देशाला मोठ्या प्रमाणात स्टील, लाकूड व गृहोपयोगी इतर बऱ्याच वस्तू उपलब्ध होतात. तरीही या बाबतीतली उदासीनता दूर होत नाही.

आज एखादा नव्याने धंदा सुरू करणाऱ्या उद्योजकाला एखादा जनरेटर घ्यायचा असेल तर किर्लोस्करच्या जनरेटरची किंमत ही २० लाखाच्या घरात जाते व अलंगमध्ये या जहाजातून उपलब्ध होणारा जनरेटर हा दोन लाखाला मिळतो. त्या नव्या उद्योजकांची किती तरी बचत होते. आज अलंग रिसायकलींग शीप यार्डमुळे प्रत्यक्षपणे ३० हजार कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे तसाच अप्रत्यक्षपणे लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. मग सरकारने या व्यवसायाला चांगली दिशा देण्यासाठी सहकार्य करण्याची नितांत गरज आहे.



**हरिशभाई परमार शीप ब्रेकर्स असोसिएशनचे सह सेक्रेटरी**

अलंग विषयी खूपच नकारात्मक दृष्टिकोनातून प्रसिद्धी खूप मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली आहे. आणि तीच ती माहिती सदैव इंटरनेटच्या माध्यमातून सतत मांडली जात आहे. आणि मला हे ही मान्य आहे की एक काळ असा होता की, अलंगची परिस्थिती अतिशय वाईट होती. परंतु आता त्यात आमुलाग्र बदल झाला आहे आणि हळू हळू परिस्थिती सुधारत आहे. तेव्हा आतातरी

अलंगविषयी नकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याऐवजी अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्डाकडे, या उद्योगाकडे आता सकारात्मक दृष्टीकोनातून पाहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अलंग रिसायकलिंग शीप ब्रेकींग असोसिएशनचे श्री. हरीश परमार यांनी आपले विचार मांडताना व्यक्त केले.

१९८२ साली अलंग शीप ब्रेकीग यार्डाला सुरवात झाली. त्या वेळी इथे फक्त ८० ते ८५ प्लॉट अस्तित्वात होते. त्या काळातील परिस्थिती वेगळी होती. आणि आजची परिस्थिती खूप वेगळी आहे.

१९९५ साली मी शीप ब्रेकींग ला सुरवात केली होती. त्यावेळेस आम्हाला कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. तेव्हा आम्ही अगदी जंगलातच कामाला सुरवात केली होती. कोणत्याही मालाचे वजन करण्यासाठी आम्हाला दहा कि.मी. दूर यावे लागत होते. सुरवातीला आम्हाला कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. आम्हाला काम करण्यासाठी इलेक्ट्रीसीटी सुद्धा उपलब्ध नव्हती. त्यावेळी आम्ही आमचे सगळे काम जनरेटरच्या सहाय्याने करत होतो. जवळपासच्या वाड्यांमधून आमच्या मजूरांच्या साठी पाणी दिले जात होते. दळवळणाचे कुठलेही साधन नव्हते. संदेश वहनही वायरलेस च्या माध्यमातून केले जात होते. त्यानंतर आम्ही सोसिया शीप ब्रेकर्स असोसिएशनची स्थापना करुन आम्ही गुजराथ मेरी टाईम बोर्डाला आमचा अर्ज सादर केला. परंतु या गोष्टीची पूर्तता होण्यासाठी सुमारे पाच वर्षाचा कालावधी लागला. आणि मग त्यानंतर अलंग – सोसिया शीप ब्रेकर्स असोसिएशन म्हणून आम्ही एकत्रित रीतीने काम करु लागलो.

आम्ही आता गुजराथ मेरी टाईम बोर्डाबरोबर जोडले गेल्यामुळे आम्हालाही आता सर्व सोयीसुविधा मिळू लागल्या. त्याच दरम्यान अलंग विषयी खूपच नकारात्मक. उलट सुलट बातम्यांमुळे अलंग खूपच प्रकाश झोतात होत. मग त्या अलंगच्या प्रदुषणचा मुद्दा असो किंवा प्लॉट मधील अपघाताचा मुद्दा अ सो त्या दृष्टीने अलंग खूपच चर्चेत आले होते. सुप्रिम कोर्टाने सुद्धा अलंग येथील कामकाजात सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. तसे आदेशही काढण्यात आले होते. त्यानंतर मात्र गुजराथ मेरी टाईम बोर्ड, कस्टम अधिकारी प्रदुषण नियंत्रण अधिकारी, वास्तविकता अलंग शीपयार्डाशी जेवढी संबंधित खाती होती त्या त्या

खात्यातील प्रत्येक अधिकाऱ्यांला घेऊन सर्वानुमते विचारविनीमय करण्यात आला. त्या नुसार सुप्रीम कोर्टातर्फेच एक नियमावली तयार करण्यात आली. आणि त्या नियमानुसारच इथे अलंग इथे कामकाज करण्याचे आदेश देण्यात आले. आणि २००६ साली या संदर्भातील अंतिम आदेशानुसार आता अलंग रिसायकलींग शीप यार्डातील काम केले जात आहे.

जहाजाच्या खरेदी पासून ते अंतिम तोडणीच्या प्रक्रियेबद्दल बोलताना श्री. परमार यांनी सांगितले की जहाज विक्रीचा व्यवसाय करणारे दलाल हे प्रामुख्याने लंडन, दुबई व सिंगापूर येथेच असतात. हे दलाल आणि भावनगरमधील वित्त पुरवठा करणारे व्यापारी हे दोघे मिळून जहाजाच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतात. आम्ही सुद्धा बँकेतून लोन घेतो व ज्याप्रमाणे जहाजांची कटिंग होते, तोडणी केली जाते तो माल विकून आम्ही जे पैसे येतील त्या पैशातूनच बँक आणि वित्त पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांचे पैसे चुकते करतो.

आज तर आम्हाला गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा त्यात, प्लॉट पाणी, इलेक्ट्रीसीटी या साऱ्या सुविधा पूविल्या जातात. २०० रुपये प्रति स्क्वे. मीटर प्रमाणे आम्हाला प्लॉट उपलब्ध करुन दिला जातो. त्याचप्रमाणे जहाज जेवढ्या टनाचे आहे त्या वजनानुसार १०० रुपये प्रमाणे टॅक्स भरावा लागतो. त्याचबरोबर सेल्स टॅक्स ३% १२.१/२ एक्साईज ड्युटी, ५% अधिकतम भार एकूण २३ ते २५% एवढा एकत्रित मिळून आम्हाला टॅक्स भरावा लागतो.

स्थलांतरित कामगारांच्या साठी कोणत्याही भावी योजना आखण्यासाठी आमच्या पुढेही मर्यादा येतात. कारण हे कामगार इथे एकटेच कामाला आलेले असतात. ते काम करतात. मनात आले तर ते केव्हाही घरी जातात. तरीही आम्ही आमच्याकडून जी काही मदत करणे शक्य आहे ती सगळी मदत करतो. आणि हे कामगार आपणहून अलंग इथे कामाला येतात. आणि या कामगारांना अलंग इथे पैसे मिळतात म्हणूनच ते इथे अनेक वर्षापासून कामाला येत आहेत. या लोकांना ESI आणि प्रॉव्हिडंट फंडाची सुद्धा सुविधा आहे. आज इथे रेडक्रॉस हॉस्पिटल आहे. तिथे डॉक्टरांची कमतरता आहे. पण ती सुधारण्याचा अमाचा प्रयत्न आहे. तिथे दिली जाणारी औषधे योग्य दर्जाची नसतात पण ती गोष्ट खरी नाही. ती अफवा पसरवण्यासारखीच गोष्ट आहे.



**अलंग रिसायकलींग असोसिएनची भूमिका समजावून सांगत असताना**

या कामगारांसाठी घर बांधणीचा प्रकल्प हाती घेतला आहे. जो या डिसेंबर अखेर पर्यंत त्याचा पहिला टप्पा पूर्ण होईल व या कामगारांना ही घरे भाडे तत्वावरच उलब्ध करुन दिली जावीत कारण आजच्या जमान्यात कुणालाही कुठलीही गोष्ट फुकट देऊ नये. मग त्या गोष्टी विषयी त्याला कोणतीच आस्था राहत नाही. त्या गोष्टीची किंमत कळत नाही. अगदी नाममात्र शुल्क तरी आम्ही या कामगारांकडून आकारणार आहोत. या नव्या गृह प्रकल्पामध्ये त्यांच्या साठी खरेदी साठी अद्ययावत मॉल, मेस, स्पोर्टस क्लब व कारमूणकीसाठी हॉल बांधला जाणार आहे.

अलंग शीप ब्रेकींग यार्ड हा असा एकमेव उद्योग आहे की या उद्योगाला इतर कुठल्याही संसाधनांची गरज पडत नाही. आज या उद्योगातून आपल्या देशाच्या पायाभूत प्रकल्पसाठी लागणारे स्टील व लाकूड मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते आहे. आज आपल्याला एक टन स्टील–उत्पादित करायचे म्हटले तर कित्येक टन कोळसा, वीज व मुबलक पाणी लागू शकते. मात्र हे इथे मोठ्या प्रमाणात उलब्ध होते आहे. उपलब्ध होणाऱ्या लाकडामुळे कित्येक झाडेही

वृक्षतोडी पासून वाचलेली आहेत. त्याप्रमाणे या निकामी जहाजातून गृहयोगी वस्तूही मोठ्या प्रमाणात उलब्ध असून त्याचीही विक्री मोठ्या प्रमाणावर केली जात आहे.

आज अलंग मुळे आजूबाजूच्या खेड्यातील गावांचाही विकास झाला आहे. त्याचेच प्रतिबिंब भावनगर शहरात उमटलेले आहे, आज अलंग मधे मोठ्या प्रमाणात सुधारणा होत आहे. अलंगला यापुढेही खूप चांगले भवितव्य आहे. या उद्योगातून गुजराथ सरकारला चांगल्या प्रमाणात कर उपलब्ध होत आहे. ही सुद्धा खूप मोठी जमेची बाजू आहे. त्यामुळे अलंग कडे नकारात्मक दृष्टीकोणापेक्षा सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची अतिशय गरज आहे.

## देवेन जागड

महादेव कॉर्पोरेशन शिपींग ॲन्ड मरीन सप्लायर कंपनी

महादेव कॉर्पोरेशन शिपींग ॲन्ड मरीन सप्लायर कंपनीचे श्री महादेव जागड जे २१ ते २३ April दरम्यान सिंगापूर येथे भरलेल्या 'सी आशिया' परिषदेला उपस्थित होते. त्या निमित्तानेच त्यांच्याशी केलेली बातचीत



एकीकडे जगात जहाज तोडणीचे एका मगोमाग एक असे २००० हून अधिक प्रकल्प बंद करण्यात आले असले तरी सुद्धा भारतातील गुजराथ राज्यातील अलंग शीप ब्रेकींग यार्डात निकामी जहाजे तोडण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असून, या निकामी जहाजातून मिळणारे विविध धातू वितळवून त्यापासून मोठ्या प्रामाणात पोलाद तयार केले जाते. आणि मोठमोठ्या गृहप्रकल्प आणि पायाभूत विकासांच्या प्रकल्पामध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

२१ ते २३ एप्रिल २०१५ दरम्यान सिंगापूर येथे 'सी आशिया' या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आणि या परिषदेला महादेव कॉर्पोरेशन शिपींग ॲन्ड मरीन सप्लायर कंपनीचे मालक देवेन जागड हे आवर्जुन उपस्थित होते, त्यांच्या या परिषदेत उपस्थित राहण्यासाठीचा

आणखीन एक महत्त्वाचा उद्देश हा होता की या परिषदेच्या निमित्ताने इतर देशातील या व्यवसायातील संबंधित उद्योजक एकेकांना भेटून आपल्या विचारांची देवाण–घेवाण चांगल्यारीतीने कर शकतात. या परिषदेच्या निमित्तानेच जहाजातील उपयुक्त मशिनरी, वेगवेगळे पंप, इंजिनाचे सुटे भाग या संदर्भातील विशेष असे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. त्यामुळे त्याचाही या परिषदेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना मोठ्या प्रमाणात लाभ झाला.

वास्तविकता मी आर्टस्‌चा विद्यार्थी, पण पुढे इेल्ट्रानिकचा डिप्लोमा केला आणि योगायोगाने मी या व्यवसायात आलो. आज आता या व्यवसायात हळूहळू जम बसू लागला आहे. अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे भावनगर परिसरात कित्येक पूरक उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना मिळलेली आहे. जहाजातील सुटे भाग इंजिन, विविध प्रकारचे पंप या साऱ्या गोष्टीची विक्री मी स्वत: करतो त्यासाठी भावनगर मधे एक प्लॉटही विकसीत केला आहे. भावनगर बरोबरच वापी येथे सुद्धा हा व्यवसाय छोट्या प्रमाणात सुरु केलेला आहे. या दोन्ही ठिकाणी मी स्वत: जातीने लक्ष घालून हळूहळू आपला जम बसवत आहे.

१९८२ – ८३ सालापर्यंत इथे काहीच नव्हते. अलंग शीपयार्डाच्या निर्मितीमुळे आज भावनगर मधील कुंभारवाडा परिसरात जणु काही छोटे अलंगच तयार झाले आहे. आज या ठिकाणी जहाजातील सर्व सुटे भाग पंप विविध मोटर्स, ऑईल इंजिन, विविध छोटे मोठे स्पेअर पार्टस्, आणि नांगर ***** पासून ते अगदी छोट्या स्क्रू खिळ्यापर्यंतचे सामान विकणारे सुमारे ४०० ते ४५० प्लॉटस आज इथे थाटलेले दिसून येत आहेत.

या परिषदेच्या संदर्भात अधिक बोलताना देवेन जागड यांनी सांगितले की इतर देशातील २००० हून अधिक जहाज तोडणी प्रकल्प बंद करावे लागले. त्याची कारणेही वेगवेगळी असतील परंतु प्रमुख कारण म्हणजे निकामी जहाजातील विघटन न होणारा कचरा आणि त्या संदर्भात विकसीत देशातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी आणि त्यामुळेच हे निर्णय घ्यावे लागलेले आहेत. भारतात मात्र २०१४ साली एकूण ३५० हून अधिक जहाजे तोडण्यात आली. तसेच या चालू आर्थिक वर्षात ही जहाजांची संख्या अधिक वाढण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. कारण या परिषदेला ज्याप्रमाणे विविध जहाज तोडण्याचे प्रकल्प बंद करण्यात आल्या संदर्भात जशी खंत व्यक्त करण्यात आली त्याचप्रमाणे जुनी अकार्यक्षम कमकुवत जहाजे काढून

टाकली पाहिजेत व त्याजागी नवीन जहाजे आणण्याची आवश्यकता असल्याचा विचारही या परिषदेत मांडण्यात आला. १९९७ मधे ज्या जहाजांची बांधणी झालेली आहे ती जहाजे आता निकामी आली असून ती सर्व जहाजे पुढील काही वर्षात तोडण्यासाठी उपलब्ध होणारच आहेत. अलंग येथे येणारी निकामी जहाजे ही त्या मानाने खूपच उच्च प्रतीची व वजनाने अधिक असतात. २०१५ च्या पहिल्या चार महिन्यातच इथे ११० अधिक जहाजे तोडण्यात आली. या वर्षी सुमारे जहाजे ३५० ते ४०० जहाजे इथे नक्कीच तोडली जातील असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला.



**सिंगापूर येथील 'सी आशिया' परिषदेतील अनुभव कथन करताना श्री. देवेन जागड**

ज्याप्रमाणे जहाज बांधणी मधे चीनचा कुणीही हात धरु शकत नाही. त्याच चीन देशाने आता जहाज तोडणीतही आपली पाऊले हळू हळू रोवण्यास सुरुवात केली आहे. याही क्षेत्रात चीन आघाडीवर असल्याचे सिंगापूर मधील एका व्यवसायिक कंपनीच्या व्यवस्थापकांनी सांगितले. चीन मधे ज्या काही पायाभूत प्रकल्पांची निर्मिती झाली आहे ती निकामी जहाजातून मिळालेल्या पोलादच्या माध्यमातून झाली आहे. ही परिस्थिती २००८ च्या बीजींग ऑलम्पिक पूर्वीची होती.

आताशा जी जहाजे बांधली जातात ती खूप मोठीही असतात. आणि ती किफायतशीर सुद्धा असतात. ही जहाजे मोठ्या प्रमाणात मालवाहतूक करु शकतात.

भारतात सुद्धा अंतर्गत मालवाहतूक तसेच आयात निर्यात सुद्धा मोठ्या प्रमाणात सागराच्या माध्यमातून केली जाते. आजची मोठी जहाजे मालवाहतुकीसाठी किफायतशीर असली तरी सुद्धा या जहाजांना तांत्रिक आव्हानांना सामारे जावे लागते.

सिंगापूर मधील परिषद आणि तिथले या परिषदेच्या निमित्ताने भरविण्यात आलेले प्रदर्शन हे ४० व्या मजल्यावर भरविण्यात आले होते. या परिषदेचे आयोजन, नीटनेटकेपणा, एकूणच सिंगापूर मधली स्वच्छता आणि काटेकोरपणे पाळले जाणारे नियम त्यामुळे या साऱ्या गोष्टी आपण केव्हा आत्मसात करणार या बाबतीत मात्र आपल्या सगळ्यानांच विचार करण्याची आवश्यकता आहे, जेव्हा एखादा छोटासा  देश या सगळ्या गोष्टी करु शकतो मग आपण का नाही हा प्रश्न मात्र कायम उपस्थित राहतो. या प्रश्नाचे खरे उत्तर म्हणजे या देशातून तिथल्या नागरिकांच्या प्रत्येक गोष्टीतून झळकणारा देशाभिमान आणि भ्रष्टाचारापासून आपण कसे मुक्त राहू यासाठी सजग असलेला इथला नागरिक हीच त्या पाठीमागची कारणे आहेत.

आपला व्यवसाय वाढविण्यासाठी आम्ही आता सोशल नेटवर्कींग या मोठ्या प्रमाणात उपयोग करतो. त्यात ईमेल, एस.एम.एस. ट्वीटर, फेसबूक आणि व्हॉटसअप. अशा वेगवेगळ्या साईटचा आम्ही उपयोग करतो. जेव्हा आमच्या कडे एखादी ऑर्डर  येते तेव्हा संबंधित ग्राहकाला आम्ही त्याला आवश्यक असलेल्या वस्तू त्याची मापे त्याचे वजन त्याची किंमत त्यातील विविध प्रकार या सर्वांचे फोटो व माहिती या सोशल नेट वर्किंग च्या माध्यमातून त्वरीत पाठवू शकतो. या संगणाकाच्या युगामुळे आज संपर्क साधणे अतिशय सुलभ झाल्याने या साऱ्या गोष्टीचा उपयोग व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात होत आहे.



**एडस प्रकल्पाचे पदाधिकारी श्री. विनोद मकवाणा**

सुरवातीला जेव्हा आम्ही हा प्रकल्प हाती घेतला तेव्हा या कामगारांचा म्हणावा इतका प्रतिसाद नव्हता. अलंग शीप यार्डात काम करणारे सर्वच स्थलांतरित कामगार असून ते उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा झारखंड व प. बंगाल मधून आलेले आहेत. मूळातच गरीब व अशिक्षित असल्याने या कामगारांमध्ये स्वत:च्या आरोग्याविषयी सुद्धा म्हणावी तशी जागरुकता नव्हती. त्यामुळे त्यांच्यात ती जागरुकता आणणे हे सुद्धा अतिशय महत्त्वाचे काम होते.

हे सगळेच कामगार आपल्या कुटुंबियांना गावी ठेवून आल्याने आपली शरिरिक गरज भागविण्यासाठी ते वेश्यांकडेही जात असल्याचे दिसून आले होते. त्याच प्रमाणे सर्वच पुरुष कामगार २५ ते ५० वयोगटातील असल्याने इथे काही प्रमाणात समलैंगिक संबंधही प्रस्थापित झालेले दिसून आले आहेत. आधीच या कामगारांमध्ये स्वत:च्या आरोग्याबद्दल असलेली अनास्था त्यात असे अनैतिक व अनैसर्गिक संबंध प्रस्थापित करुन या कामगारांकडे लैंगिक रोग व त्वचा रोग होण्याचे प्रमाण अधिक होते. त्यासाठी या लेकांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेविषयीची जागरुकता आणण्यासाठी आम्ही प्रत्यक्षपणे या कामगारांशी त्यांच्याशी घरी जाऊन संवाद साधण्यास सुरवात केली. प्रत्येक गोष्ट समजावून सांगितली. त्यांच्यात जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हळू हळू या कामगारांना या विषयाचे महत्त्व पटू लागले. मग आम्ही एडस्

या रोगाविषयीची माहिती, त्याचे स्वरुप त्याची कारणे आणि मुख्य म्हणजे हा रोग संसर्गजन्य रोग नाही याची जाणीव या माध्यमातून देण्यास सुरवात केली. त्यानंतर भावनगर ब्लड बँक, रेडक्रॉस हास्पिटल व गुजराथ मेरी टाईम बोर्ड यांच्या सहकार्याने विविध आरोग्य विषयक शिबीरांचे आयोजन केले. आयोजित केलेल्या आरोग्याविषयक शिबिरांचा या कामगारांना खूपच फायदा झाल्यामुळे या कामगारांमध्ये जागृती झाली आणि मग ते आपले आरोग्यविषयक प्रश्न घेऊन ऑफिस मधे येऊ लागले. आपले प्रश्न मोकळेपणाने मांडु लागले. व स्वच्छता आणि आरोग्यविषयी ते विशेष काळजी घेऊ लागले.

शारीरिक संबंध ठेवताना कशा प्रकारच्या खबरदाऱ्या घेतल्या जाव्यात, सगळ्यात सुरक्षित म्हणजे कंडोम चा वापर कसा आणि का करावा यासाठी जागृती केली. आमच्या इथून कामगारांना कंडोम विकत दिले जातात कारण त्यांच्यात कंडोम विकत घेऊन ती वापरण्याची प्रवृत्ती निर्माण व्हावी म्हणून आम्ही कंडोम विकतच देतो.




**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन एडस् प्रकल्पाचे श्री. सर्व सह पदाधिकारी**

आम्ही ज्या आरोग्य शिबीरांचे आयोजन करतो ते बुध, गुरु, शुक्र आणि रविवारी करतो. आता दर मंगळवारी गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या संयुक्त विद्यमाने इथल्या ट्रेनिंग सेंटर मधे कामगारांच्या प्रशिक्षणामधेच आम्ही कामगारांचे आरोग्य विषयक माहिती देण्यासाठी एक तास राखीव ठेवण्यात आला आहे. यालाही कामगारांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

यंदाच्या चालू वर्षात आम्ही कामगारांच्या केलेल्या तपासणीत यंदाच्या वर्षी एकूण चार जण एडस् रोगाने बाधित असल्याचे दिसून आले आहे. त्यापैकी तीघे जण अपल्या गावी परत गेले आहेत. एकच जण सध्या इथे काम करत आहे. सुरवातीला जेव्हा एखाद्याला एडस् झाला आहे असे इतर कामगारांना समजले तर सर्व जण त्याला वाळीत टाकल्या सारखी वागणूक देत होते. परंतु आता या गोष्टीत खूप बदल घडून आला आहे, एडस् हा संसर्गजन्य आजार नाही. किंवा त्याच्या स्पर्शाने, त्याच्या सोबत राहण्याने एडस्च्या फैलाव होत नाही. या साऱ्या गोष्टींची जगजागृती करण्यासाठी आम्ही,  पथनाट्याचा आधार घेतो. रविवारी कामगारांच्या सुटीच्या दिवशी आम्ही ही पथनाट्ये त्यांच्या घरासमोरील 'मोकळ्या जागेत सादर करतो.'

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याला एडस् झाला आहे. त्याची प्रत्येक महिन्याला योग्य तपासणी त्याची औषधे, जेवणखाण व शारीरिक संबंधाविषयी आम्ही त्याला वेळोवेळी मार्गदर्शन करतो. या रुग्णाचे मानसिक संतुलन कसे ढासळणार नाही याकडे  आम्ही आम्ही जातीने लक्ष देतो.

**६) व्यावसायीक  :१) जितेंद्र मकवाणा**



**कामगारांना वेळेत चहा मिळावा यासाठी तत्परता बाळगणारे श्री. जितेंद्र मकवाणा**

जितेंद्र मकवाणा अलंगपासून ५ कि.मी. अंतरावरील भारापरा या गावातील सुशिक्षित तरुण फक्त घरची गरीबी व पुढे शिक्षण घेण्याची ऐपत नसल्याने अलंग शीपयार्डात स्वतःचे चहाचे दुकान चालविण्याचे ठरवले आणि गेल्या ५ वर्षापासून तो आज हा व्यवसाय करत आहे. ८४–डी या प्लॉटसमोर आज तो सकाळी सहा ते रात्री आठपर्यंत आपला हा व्यवसाय करत आहे. चहा बरोबरच बिस्कीटे व इतर गोष्टी सिगारेट, मावा या गोष्टीही विकण्यासाठी ठेवतो.

सकाळी ११ वाजता व दुपारी साडेतीन वाजता सुमारे ५० कप तरी चहा त्याला करावा लागतो. ११ व साडेतीन ह्या कामगारांच्या सुटीच्या वेळा आहेत. या कामगारांना वेळेत चहा मिळावा यासाठी जितेंद्रची धडपड सुरू असते. इथे सगळाच व्यवसाय हा उधारीवर सुरू आहे व बहुतांशी सर्व कामगार हे त्यांना पैसे मिळाले की ते वेळच्या वेळी चुकवण्याचा प्रयत्न करतात. इथे प्रत्येक कामगाराची डायरी ठेवली जाते व त्यात कामगार स्वतःच घेतलेल्या वस्तूची नोंद आणि मग आमच्या दोघांच्या सह्या असतात. इथे बहुतांशी आमच्या एकाच कुटुंबातील अनेक माणसे या व्यवसायात आहेत. त्यामुळे आम्हाला तशी कुठलीच भीती नाही. तसेच आम्ही स्थानिक असल्यामुळे कोणत्याही प्रकारची अडचण आम्हाला भासत नाही.

आज कामगार आणि आमच्यातही अगदी सलोख्याचे संबंध निर्माण झालेले आहेत. आज या कामगारांमुळेच आमच्या इथल्या सर्व स्थानिक लोकांचे व्यवसाय आज सुरू आहेत. हे ही कुणी नाकारू शकत नाही.

आज हिंदी विषय घेऊन जितेंद्रने बी.ए. पूर्ण केले आहे. पदवीधर आहे. पुढे परिस्थितीमुळे त्याला शिकता येत नाहीये. कारण घरची गरिबी आहे. पण पुढे एखादी चांगली नोकरी मिळाली तर पुढे शिकण्याची पण इच्छा आहे. परंतु तोपर्यंत घराची जबाबदारी सांभाळण्यासाठी सध्या तरी हा व्यवसाय चालू ठेवणे हाच एक पर्याय माझ्यापुढे आहे.

## २) रामसिंग शर्मा



**कपडे व्यवसायायिक श्री. रामसिंग शर्मा**

रामसिंग इंद्रदेव शर्मा सुमारे १५ वर्षापूर्वी अलंग येथे आपल्या भावाने बोलावून घेतल्याने इथे काम करण्यासाठी आले. मूळ वतन उत्तरप्रदेश, घराकडे थोडीफार शेती आहे. पण घरातील सदस्य संख्या अधिक असल्याने यांना सुद्धा रोजगारासाठी अलंग इथे स्थलांतरित व्हावे लागले.

१९९५-९६ सालापासून त्यांनी सुरुवातीला हेल्पर म्हणून ३२ नंबरच्या प्लॉटवर कामकाजाला सुरुवात केली. त्यावेळेस सुद्धा वेतन खूपच कमी मिळत होते. महिन्याला जेमतेम १४०० ते १५०० रुपये मिळत होते. त्याही वेळी काही विशेष अशा सुविधा नव्हत्या. पण त्या वेळच्या अलंगमध्ये आणि आजच्या अलंगमध्ये खूपच फरक दिसून येत आहे.

सुरुवातीला सुमारे ७ ते ८ वर्षे इथे काम केले. परंतु एकदा काम करत असताना माझ्या पायाला मोठी जखम झाली. प्लॉटच्या मालकांनी औषधपाण्यासाठी पैसेही दिले.

परंतु पायाला झालेल्या जखमेमुळे काम करण्यात खूप अडचणी निर्माण होऊ लागल्या आणि इथे अलंगमध्ये ज्या दिवशी काम कराल त्याच दिवसाचे पैसे मिळतात. काम करणेही अवघड होते आणि त्याहूनही इथून घरी तसेच परत जाणे खूपच जिकीरीचे होते. पुन्हा घरी तसेच परत जायला मन तयार होत नव्हते. त्यामुळे काही तरी आपण उद्योगधंदा सुरू करावा असा विचार मनात आला आणि तोच एक धागा मनात पकडून इथे कपड्याचा उद्योगधंदा सुरू करावा असा विचार मनात आला आणि मग पाच वर्षापूर्वी इथे कपड्याचे दुकान उघडले. त्यात तयार कपडे, साड्या, ड्रेस मटेरियल आणि इतरही गोष्टी विकण्यासाठी ठेवल्या. अलंगला आल्यापासून एकच महत्त्वाची गोष्ट केली की स्वतःचे एक छोटेसे घर बांधले. त्यामुळेच आज याच घरात पुढे कपड्याचा व्यवसाय व मागील बाजूस घर त्यामुळे महिन्याचा खर्च निघून जात आहे.


अलंगमध्ये जेव्हा तोडण्यासाठी जहाजे उपलब्ध होतात तेव्हा मात्र खूपच चलती असते. यंदाच्या वर्षी मात्र इथे खूपच मंदी पहायला मिळत आहे.

हा व्यवसाय सुरू करताना सुरुवातीला ६ ते ७ हजार रुपये गुंतवणूक करून व्यवसायाला सुरुवात केली. बहुतांशी व्यवसाय हा उधारीवर चालतो. परंतु अगदी नेटाने पैसे परत करणारे कामगारही आहेत. तसेच काही बुडवणारे कामगारही आहेत. पण त्यांची संख्या तशी कमी आहे. इथे विकण्यासाठी माल हा भावनगर व अहमदाबाद येथून आणतो. या व्यवसायात आता जम बसलेला आहे. आज मी एकटाच इथे राहत असल्याने सर्व काही व्यवस्थित चाललेले आहे.

सुरक्षिततेच्या बाबतीत बोलताना श्री. रामसिंग यांनी सांगितले की सुरक्षा मात्र पूर्णपणे रामभरोसे आहे. इथले स्थानिक लोकही कधी कधी कपडे घेऊन जातात पण पैसेही देत नाहीत. त्यांच्याविरुद्ध काही बोलणेही शक्य होत नाही आणि तक्रार कुणाविरुद्धही करणे म्हणजे आपणच आपल्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखी स्थिती आहे. म्हणूनच आधी सांगितले की सुरक्षेची स्थिती अतिशय रामभरोसे आहे. कधी कधी हा सारा व्यवसाय गुंडाळून पुन्हा आपल्या गावी निघून जावे असे विचारही मनात येतात. परंतु आता वयात आलेल्या मुलाला इथे बोलावून त्याच्या सोबतीने हा व्यवसाय सुरू ठेवण्याचा विचार केला आहे. आता मी तर अनेक प्रसंगांना सामोरे

गेलो. पुढची परिस्थिती आणि मिळणारे यश या बाबतीत आता तरी काही सांगता येत नाही. कारण अलंगमध्ये कामगार आहेत तरच इथे धंदापाणी आहे नाहीतर इथे तसे काहीच नाही अशीही स्थिती आहे.

### ७) सुरक्षा अधिकारी (Safety Officer)



**कामगारांच्या सुरक्षेविषयी जागरुकता बाळगणारे सुरक्षाधिकारी श्री. भरतभाई बरैय्या**

अलंग रिसायकलींग शीपयार्डाची निर्मिती १९८२ साली झाली. सुरुवातीला इथे कोणत्याही प्रकारच्या सोईसुविधा म्हणाव्या तशा काही उपलब्ध नव्हत्या. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. जेव्हापासून गुजराथ मेरी टाईम बोर्डाने जातीने लक्ष घालण्यास सुरुवात केली, तेव्हापासून सुरक्षेच्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे.

जहाज तोडणीचे काम अतिशय अवघड व अतिशय धोकादायकही आहे. सुरुवातीला कोणत्याही प्रकारच्या अद्ययावत यंत्रणा इथे उपलब्ध नव्हत्या. जे काही काम होत होते ते मनुष्यबळावरच आधारित होते. त्यामुळे त्यात धोकाही खूप मोठ्या प्रमाणावर होता. सुरुवातीच्या काळात अपघाताचे प्रमाणही जास्त होते. जीवीतहानीही होत असे. परंतु जेव्हापासून गुजराथ मेरी टाईम बोर्डाने प्रत्येक प्लॉटधारकाने आता सुरक्षा अधिकाऱ्याची नेमणूक केलीच पाहिजे अशी सक्ती केली आहे. त्यामुळे आज प्रत्येक प्लॉटवर किमान दोन तरी सुरक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक केली जात आहे.

जेव्हा जहाज तोडणीसाठी धक्क्यावर लावले जाते ते तोडणी करायला सुरुवात करण्यापूर्वी त्यात काही विस्फोटक पदार्थ तर नाहीत ना. जहाज कुठून आणि कशा रीतीने कापले जावे, याबाबतीत सर्व चर्चा विचारणा केली जाते. कोणत्या भागात जास्त धोका आहे आणि कोणत्या भागात नाही हे आधी काटेकोरपणे बघितले जाते.

जोपर्यंत गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून जहाज तोडणीचा हिरवा कंदील मिळत नाही तोपर्यंत जहाज तोडणीला सुरुवात करता येत नाही. ज्या ज्या आवश्यक गोष्टींची व कागदपत्रांची पूर्तता झाल्याशिवाय जहाज तोडणीला सुरुवात करता येत नाही.

सुरक्षा अधिकारी या नात्याने मी गेल्या दहा वर्षापासून २४ बी व ५६ नंबरच्या प्लॉटवर कार्यरत आहे. माझ्या देखरेखीखाली आजपर्यंत कुठल्याही प्रकारचा अपघात झालेला नाही. आमच्या प्लॉटवर झालेला किरकोळ जखमा लागणे, खुपणे या गोष्टी तर होत राहतात. मात्र जहाजावर काम करणाऱ्या कामगारांना कुठल्याही प्रकारचा धोका होणार नाही याची काळजी घेतली जाते.

कामगार जहाजावर जाण्यापूर्वी दहा दहा वेळा खात्री करून घेतली जाते. कुठल्या भागात स्फोट होण्याची शक्यता आहे किंवा कुठल्या बाजूने कामगार खाली पडण्याची शक्यता अधिक आहे या बाबीसुद्धा बघितल्या जातात.

कामगारांनी जहाजावर काम करण्यास जाण्यापूर्वी त्यांनी सर्व योग्य त्या सुरक्षा साधनांचा त्यांनी वापर केला आहे की नाही याची खात्री करून घेतली जाते.

सुरक्षा अधिकाऱ्याबरोबरच एक सुपरवायझरही असतो. त्यानंतर मुकादम आणि मास्टरही जहाजावर उपस्थित असतात. मुकादम आणि मास्टर यांच्या देखरेखीखाली सुमारे १५० ते २०० कामगार हे जहाजावर काम करत असतात.

प्रत्येक आठवड्याला मालक मुकादम मास्टर सुपरवायझर व सुरक्षा अधिकारी यांची मीटिंग होत असते. या मीटिंगमध्ये आलेल्या कामामध्ये कोणत्या प्रकारचे अडथळे आले व पुढील काम करताना तशा प्रकारचे अडथळे येणार नाहीत. याबाबतीत योग्य तो विचारविनिमय केला जातो. प्लॉटवर वर एखादा अपघात घडल्यास कोणकोणत्या उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत यासंबंधीच्या सर्व सूचना या मोठ्या ठळक अक्षरात लिहून ठेवलेल्या आहेत. त्या बाबतीतही कामगारांना व्यवस्थितरीत्या माहिती व या संदर्भातले जुजबी प्रशिक्षणही दिले जाते. ज्यामुळे कामगाराला काम करताना त्याच्या मनात कोणत्याही प्रकारची भीती वा शंका निर्माण होणार नाही. सुरक्षा अधिकाऱ्याचे मुख्य काम म्हणजे जहाज तोडणीचे कामही कोणताही धोका न उद्‌भवता व्यवस्थितरीत्या ते पूर्ण व्हावे. तसेच या जहाजावर काम करणाऱ्या कामगारांची पूर्ण सुरक्षा या दोन गोष्टींवर त्याला विशेष लक्ष केंद्रीत करावे लागते. कामगार–मुकादम–कामगार–मुख्य मुकादम आणि सुरक्षा अधिकारी या सर्वांच्या मधे व्यवस्थितरीत्या सुसंवाद प्रस्थापित होणे गरजेचे आहे.

या कामगारांना सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या काही गोष्टी आवश्यक आहेत त्यात सेफ्टी बेल्ट, ड्रेस, बूट, चष्मा, रबरी हातमोजे या साऱ्या गोष्टी या मालकाकडूनच पुरविण्यात येतात. काम करताना इंजिनमधील डिझेल कुठे गळत तर नाही ना सतत गॅसकटिंगचे काम चालू असते. त्या ज्वाळा, त्यातूनही कधी तरी स्फोट होण्याची शक्यता अधिक असते. लोडिंग अन–लोडिंग करताना काही सामान सुटून खाली पडण्याची शक्यता असते. काही वेळा खूप उंचावर गेलेला कामगार त्याचा चुकून तोल गेल्यास खाली पडून त्याची जीवीतहानी होण्याची शक्यताही नाकारता

येत नाही. त्यामुळे ज्या क्षेत्रावर काम करायचे आहे त्या ठिकाणी अशा कुठल्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेतली जाते.

माझ्या गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत माझ्या देखरेखीखाली कुठल्याही प्रकारचा मोठा अपघात वा जीवीतहानी झालेली नाही. हेच आमच्या कामाचे श्रेय आहे आणि सुरक्षा अधिकाऱ्याचे काम खूपच जबाबदारीचे व खूपच आव्हानात्मक असल्याचे सांगितले.

श्री. भरतभाई बरैय्या यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले.

**नानजीभाई मकवाणा – सुरक्षा अधिकारी**

"Safety is our main Target", नानजीभाईंनी मुलाखतीला सुरुवात केली तेव्हा पहिले वाक्य हेच बोलून दाखविले की सुरक्षा हेच आमचे मुख्य ध्येय आहे आणि सातत्याने त्या दृष्टीनेच आमचे काम सुरू असते.

अलंग रिसायकलिंग शीपयार्डात मी गेल्या ७ वर्षापासून सुरक्षा अधिकारी म्हणून काम करत आहे. माझ्या सात वर्षाच्या कारकीर्दीतही कोणताही मोठा अपघात घडलेला नाही आणि जे काही अपघात होतात ते मानवाच्या निष्काळजीपणामुळे किंवा दिलेल्या सूचनांचे योग्य पालन न केल्यामुळेच होतात असा माझा स्वत:चा अंदाज आहे.

दहा पंधरा वर्षापूर्वी अलंग रिसायकलींग शीपयार्डाची परिस्थिती खूप निराळी होती. त्या काळात जीवितहानीसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात होत होत्या. तेव्हा सुरक्षेच्या बाबतीत एवढी महत्त्वाची पाऊले उचलली जात नव्हती. मात्र आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आज अलंग रिसायकलींग शीपयार्डावर गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे नियंत्रण आहे आणि त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे उचित पालन करणे हे



**'सुरक्षा हेच आमचे ध्येय'.हे ब्रिद वाक्य जगणारे श्री. नानजीभाई मकवाणा**

सर्व प्लॉटधारकांना बंधनकारक आहे आणि त्या नियमाचा एक भाग म्हणजेच प्रत्येक प्लॉटवर सुरक्षा अधिकारी यांची नियुक्ती करणे. त्या दृष्टीनेच आता सुरक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात आहे.

ज्याप्रमाणे सुरुवातीला आधीच मी सांगितले की 'सुरक्षा हेच आमचे ध्येय'. याच दृष्टीकोनातून कामगारांमध्ये सुरक्षिततेच्या बाबतीत जागरुकता निर्माण करणे. त्यांना सर्व गोष्टींची सर्व नियमांची माहिती करून घेणे. ज्या ठिकाणी जहाजाची गॅस कटिंगच्या माध्यमातून तोडणी सुरू असते त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची आग लागणार नाही या बाबत दक्षता घेण्यास शिकवणे. कारण एखाद्या चुकीमुळे आग लागली आणि स्फोट झाला तर त्याचे पर्यावसान हे

जीवीतहानीतचे होते. त्यासाठी काटेकोरपणे नियमांचे पालन करण्यावर आमचा भर असतो. एखादा भाग तोडताना थोडा उशीर झाला तरी चालेल परंतु कोणत्याही नियमांचे उल्लंघन होणार नाही याकडे आमचे जास्त लक्ष असते.

लोडिंग–अनलोडिंग करताना क्रेनने अवजड सामान उचलताना काही वेळा सामान खाली पडण्याची भीती असते. त्या वेळेला त्या ठरावीक जागेपासून दूर उभे राहणे. या सर्व सूचना आणि त्या तंतोतंत पाळल्या गेल्या तर अपघात होण्याची शक्यता खूप कमी असते.

जहाजावर काम करताना जो भाग तोडण्यासाठी निवडला जातो तिथे प्रामुख्याने देखरेख ठेवावी लागते. त्याचप्रमाणे निकामी जहाजात जो अतिशय घातक असा घनकचरा त्यात, केमिकल्स, ॲसबेस्टॉस या साऱ्या गोष्टींचा समावेश होतो. जो मानवाच्या जीवीताला मोठ्या प्रमाणावर नुकसान पोहोचवू शकतात. तसा घनकचऱ्याचे पहिल्यांदा पूर्णपणे विघटन करणे. अशा रीतीने कामगारांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने आम्ही पाऊले उचलत असतो.

गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या नियमांनुसारच इथले सर्व कामकाज चालू असते. कोणतेही निकामी जहाज तोडण्यापूर्वी त्या प्लॉटधारकाला १) भावनगर कस्टम २) गुजराथ प्रदूषण नियंत्रण मंडळ ३) गुजराथ मेरी टाईम बोर्ड अलंग या सर्वांच्याकडून ना हरकतीचे प्रमाणपत्र मिळवावे लागते. त्याचबरोबर गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून जहाजातील तेल बाहेर काढण्याची परवानगी, त्याचप्रमाणे जहाज तोडणी करण्याची परवानगी मिळवावी लागते. ही परवानगी मिळण्यास कधी सहा महिने तर कधी वर्षाचा कालावधीसुद्धा लागू शकतो.

PPE That means Personal Protective Equipment कामगारांना त्यांच्या वैयक्तिक सुरक्षिततेसाठी हेल्मेट, मास्क, ग्लोव्हज, चष्मा, पॅन्ट शर्ट, बॉयलर सूट आणि आयएसआय मार्क सेफ्टी सूटही विनामूल्य दिला जातो. यासाठी कामगारांकडून कुठल्याही प्रकारचे पैसे आकारले जात नाहीत. काही प्लॉटवर पैसे घेतले जातात. पण ते प्रत्येक प्लॉटधारकारावर अवलंबून आहे.

इथे तोडणी करण्याकरिता येणाऱ्या जहाजांमध्ये कारगो आणि कंटेनर अशा दोन प्रकारची निकामी जहाजे इथे तोडण्यासाठी येतात. कारगो प्रकारात बल्कर, प्रवासी बोटी, रोरो–पॅसेंजर,

तसेच काही मिलिटरींची जहाजे ऑईल टँकर अशा विविध प्रकाराची जहाजे इथे तोडण्याकरिता येतात. ही जहाजे प्रामुख्याने जपान, कोरिया, चायना, बांगलादेश, कुवेत, इराक, इराणमधून येतात. जहाज तोडणीचे प्रमाण हे दरवर्षी कमी जास्त प्रमाण असू शकते. एक जहाज तोडण्यासाठी किमान ८० दिवसांचा कालावधी लागतो. काही वेळा त्या पेक्षाही जास्त कालावधी लागू शकतो. सर्व परवानगी मिळाल्यानंतर मगच प्रत्यक्षात जहाज तोडणीला सुरुवात होते. जहाज तोडणी सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत सुरक्षा अधिकाऱ्यांना खूप जबाबदारीने काम पार पाडावे लागते.

कामाच्या कालावधीत दररोजच्या दररोज सर्व गोष्टींची योग्य रीतीने तपासणी करणे. त्याचप्रमाणे रोजच्या रोज झालेल्या कामाचा अहवाल करून मालकांना सादर करणे. कामगारांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे. त्याचप्रमाणे पुढील कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्या कामाची व्यवस्थितरीत्या आखणी करून मग त्यानुसार काम करणे. आणखी हे काम करताना आत्मिक समाधान खूप मिळते. त्यामुळे हे काम करताना नवनवीन आव्हाने पेलतानाही आम्हाला खूप आनंद मिळतो.

३) आशिष अंधारि : सुरक्षा अधिकारी

**श्री. आशिष अंधारिया (सुरक्षा अधिकारी) :** गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या वतीने अलंग रिसायकलींग शीपयार्डात नव्याने कामाला येणाऱ्या कामगारांना तीन दिवसाच्या प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते आणि या कामगारांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी येथील अधिकारी श्री. आशिष अंधारिया सांभाळतात.

या प्रशिक्षणासंदर्भात बोलताना श्री. आशिष अंधारिया यांनी सांगितले की अलंग रिसायकलींग शीपयार्डात कामासाठी येणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित असून परराज्यातून आलेले आहेत. त्यात प्रामुख्याने बिहार, झारखंड, ओरिसा, उत्तर प्रदेश व प. बंगाल येथून येतात. हे गरीब राज्यातून व अशिक्षित असतात. सुशिक्षित कामगारांचे प्रमाण तसे खूप कमी आहे व त्यासाठी या कामगारांना सुरक्षेच्या संदर्भात त्यांच्यात पूर्णपणे जाणीव निर्माण व्हावी यासाठी या तीन दिवसाच्या प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षणामुळे त्यांना काम करताना कोणत्या संभाव्य धोक्यांना सामोरे जावे लागू शकते या सर्वांची जाणीव त्यांना आम्ही करून देतो व जहाज

तोडणीचे काम करताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची या सर्व गोष्टींची आम्ही त्यांना जाणीव करून देतो व त्यांच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

जेव्हा नव्याने कामगार इथे येतात तेव्हा त्यांच्याकडून आम्ही एक फॉर्म भरून घेतो. त्यात त्यांची संपूर्ण माहिती भरून घेतली जाते व या कामगारांनी प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर आम्ही त्यांना एक ओळखपत्र देतो आणि हे ओळखपत्र प्राप्त झाल्याशिवाय या कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम मिळू शकत नाही. ओळखपत्र असले की कामगारांना कोणत्याही प्लॉटवर काम मिळते. हा नव्या कामगारांचा आणि गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा एक प्रकारचा मेळावाच असतो.



**अलंग रिसायकलींग वर्कर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष : श्री. राम पटेल**

आजपर्यंत सुमारे दीड लाखाहून अधिक कामगारांनी तीन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या चालू वर्षात प्रशिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या ही जवळजवळ तीन हजाराच्या घरात पोहोचलेली आहे. असंघटीत कामगारांच्या प्रश्नासंदर्भात खूप भरीव असे कार्य करणारे, व सात दशकाहून अधिक काळ ज्यांनी कामगारांच्या संघर्षासाठी लढा दिला असे डॉ. शांती पटेल यांच्या

आशिर्वाद आणि प्रेरणेने आम्ही ११ नोव्हेंबर २००५ रोजी अलंग रिसायकलींग वर्कस असोसिएशन संघटनेची स्थापना केली.

आमच्या संघटनेचे मुख्य कार्यालय हे मुंबई इथे असून आमचे विद्यमान अध्यक्ष विद्याधर राणे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कार्य करत आहोत. अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या असंघटीत कामगारांच्या शोषणा संदर्भात आणि कामगारांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात हा प्रश्न युके मधे झालेल्या सेमिनार मध्ये उपस्थित करण्यात आला होता. आमचे विद्यमान अध्यक्ष विद्याधर राणे यांनीही हा प्रश्न सातत्याने ऊठविलेला आहे. कामगारांच्या प्रश्नासंदर्भात ते आज संपूर्ण जगात फिरलेले आहेत व कामगारांच्या प्रश्नाविषयी त्यांचा अभ्यासही अतिशय गाढा आहे. अलंग इथे संघटना स्थापन करण्यासाठी सुरुवातीला निधी संकलीत करण्यात आला. आज या शीप ब्रेकींग यार्डातील तीस हजार कामगार आमचे सभासद आहेत. आणि त्यांच्या प्रश्नाविषयी आम्हीही सातत्याने आवाज उठवत असतो.



**संघटनेचे उपाध्यक्ष श्री. राम पटेल व सेक्रेटरी मोहम्मद इमामुल हक अन्सारी कामगारांच्या अडीअडचणी समजावून सांगताना.**

आमच्या संघटनेच्या मुख्य मागण्या अशा आहेत की येथील सर्व कामगारांना ESI ई.एस.आय. च्या सर्व सुविधा प्राप्त व्हाव्यात त्याचप्रमाणे येथील कामगारांना दिले जाणारे वेतन हे

चेकच्या माध्यमातून दिले जावे. त्यांच्या पगाराच्या स्लीप व प्रॉव्हिडंट फंडाच्या स्लीप त्यांना दिल्या जाव्यात या आमच्या कित्येक वर्षापासूनच्या मागण्या आहेत. परंतु अजूनही त्या मागण्या मान्य करण्यात आलेल्या नाहीत. यावर शीप ब्रेकर्स च्या वतीने असा युक्तिवाद केला जात आहे की यावर बँकेचे आणि आमचेही कामकाज खूप वाढणार आहे. परत या कामगारांच्या पासबूक काढण्यासाठी सगळ्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. पण आता पंतप्रधान जनधन योजनेच्या अंतर्गत या कामगारांना आपले खाते बँकेत उघडणे अधिक सुलभ झाले आहे. पण अजूनही हा विचार मनावर घेण्यात आलेला नाही. अजूनही एक गोष्ट आम्ही मांडली आहे ती म्हणजे वर्कस असोसिएशन, गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीपब्रेकर्स या तिघांच्याही प्रतिनिधींची एक संयुक्तिक बैठक किमान तीन महिन्यातून एकदा तरी झाली पाहिजे. वास्तविकता आम्ही प्रत्येक महिन्याला व्हावी अशी मागणी केलेली आहे, यासाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डाने सकारात्मकता दर्शविली आहे. परंतु शीप ब्रेकर्स अजूनही ही गोष्ट मान्य करत नाहीयेत. वास्तविकता या गोष्टी जर जुळून आल्या तर एकमेकांचे प्रश्न सुटण्यास खूपच सहकार्य होऊ शकेल.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात फॅक्टरी ॲक्ट लागू आहे पण त्या कायद्याची अंमलबजावणी केलीच जात नाही. ज्या प्रमाणे आम्ही आमच्या काही ठोस मागण्या मांडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे कामगारांची भूमिका जिथे चूकीची ठरत असेल तर त्यांनाही आम्ही योग्य तो सल्ला देत असतो. कामगारांच्या खोट्या चूका किंवा कामचूकारपणा आम्हीही खपवून घेत नाही.

इथल्या सर्वच कामगारांना कामाचे स्थैर्य, योग्य वेतन व सुरक्षा मिळावी याच आमच्या मुख्य मागण्या आहेत. या उद्योगाच्या भवितव्याबद्दल बोलायचे तर या उद्योगाला कधीही मरण नाही. हा उद्योग निरंतर चालूच राहील. याच्या पॉलिसी धोरणामधे काळानुसार बदल होत राहतील. पण हा व्यवसाय कधीही बंद होणार नाही. कदाचित या व्यवसायाचे खाजगीकरण होईल पण हा व्यवसाय कधीच बंद होणार नाही.

**अलंग सोसिया शीप रिसायकलींग ॲन्ड जनरल, वर्कस असोसिएशन ही संघटना आज अलंग येथे कार्यरत असून येथील कामगारांच्या प्रश्नासंदर्भात आपली बाजू सातत्याने मांडत आहे. उपाध्यक्ष म्हणून श्री राम पटेल व संघटनेचे सेक्रेटरी म्हणून मोहम्मद इमामूल हक अन्सारी हे काम पाहत आहेत. त्या सदंर्भातच त्यांनी व्यक्त केलेले हे विचार, अलंग येथे काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षिततेच्या बाबतीत जागरुकता आणण्यासाठी या संघटनेच्या वतीने सुरक्षेच्या बाबतीत कामगारांनी कोणती काळजी घेतली पाहिजे या संदर्भातील माहिती देणारी अशी उपयुक्त पुस्तिकाही 'मेरी सुरक्षा जेब दैनंदिनी' या नावाने २०१४ साली प्रकाशित केली आहे. आणि त्याचे वाटपही प्रत्येक कामगाराला केलेले आहे.**

घरची गरिबी त्यामुळे कामकाजासाठी कलकत्ता सोडले. सुरुवातीला मुंबई मग आणि गुजराथमधील अलंग येथे कामाला आलो. गावच्या लोकांच्या ओळखीच्या माध्यमातूनच मी इथे कामाला आलो. आज इथे कामाला येऊन दहा ते बारा वर्षे उलटून गेली आहेत. सुरुवातीला हेल्पर म्हणून कामाला सुरुवात केली आणि आज हळूहळू प्रगती करत मुकादम या पदावर पोहोचलो आहे.



**आपले अनुभव सांगताना मुकादम – श्री. मोहसीन शेख**

आमचे मालक श्री. पटेल हे गुजराथी. सुरुवातीला मुंबईला कामाला सुरुवात केली. माझ्या मालकांनीच मला अलंग येथे आणले आणि त्या दिवसापासून मी एकाच प्लॉटवर एकाच मालकाकडे काम करत आहे.

आमच्या प्लॉटवर बहुतांशी सर्वच जण पश्चिम बंगालचे आणि मुस्लीम धर्माचेच कामगार आहेत. मला जसे ओळखीच्या लोकांनी इथे कामावर बोलावून घेतले त्याचप्रमाणे मी सुद्धा जेव्हा जेव्हा सुट्टीवर गावाला जातो तेव्हा आपल्या गावातील तरुण होतकरू गरजू मुलांना इथे कामावर घेऊन येतो.

मी इथे आलो तेव्हाचे अलंग आणि आत्ताचे अलंग यात खूपच फरक झालेला आहे. कामगारांमध्येही कामाच्या बाबतीत खूप जागरुकता आली आहे. त्याचप्रमाणे काम करताना सुरक्षेच्या नियमांचेही काटेकोरपणे पालन केले जात आहे.

मी हेल्परी म्हणून कामाला सुरुवात केली तेव्हा मला महिना फक्त ३ ते ४ हजार रुपये मिळत होते. आज मी महिना १५ हजार रुपये मिळवत आहे. आमच्या प्लॉटवर मालक कामगार व मुकादम यांच्यात अतिशय चांगले सलोख्याचे संबंध आहेत. आज माझ्या हाताखाली सुमारे ३० ते ४० कामगार एका वेळी काम करत आहेत.

मुकादम, मुख्य मुकादम व सुरक्षा अधिकारी तसेच मालक यांची आमची दर आठवड्याला कामासंदर्भात मिटींग होत असते व त्या चर्चेतून आम्ही एकमेकांच्या अडचणी समजून घेत असतो.

मुकादम कामगारांना चांगली वागणूक देत नाहीत अशा बऱ्याच गोष्टी आम्हालाही इथे अलंगमध्ये ऐकायला मिळतात. काही काही मुकादम सक्तीने वागणारेही आहेत. कारण त्यांना कामाच्या बाबतीत वरच्या अधिकाऱ्यांकडून तसा दबाव येत असतो. त्यामुळे सक्ती केली जाते. पण सक्ती करून कुठलेही काम चांगले होत नाही. हा माझा अनुभव आहे.

मी माझ्या हाताखाली काम करणाऱ्या कामगारांना सुरुवातीलाच आज आपण कोणते काम करायचे आहे, ते कशा पद्धतीने करायचे आहे. सर्व सुरक्षा साधने नियमांचे काटेकोर पालन करून आपल्याला काम करायचे आहे. हे सर्व चांगल्या रीतीने समजावून सांगितल्यावर कामगारांनाही काम करताना हुरुप येतो. त्यांना चहा जेवण्याच्या सुटीला सुद्धा योग्य वेळी त्यांना

पाठवले जाते. कोणत्याही प्रकारची सक्ती न करता खेळीमेळीच्या वातावरणात काम केल्याने कामही खूप चांगले होते हा माझा वैयक्तिक अनुभव आहे.

आमच्या प्लॉटवर काम करणाऱ्या कामगारांना मालकांनीच प्लॉटच्या मागेच निवास, पाणी, वीज, शौचालयाची सुविधा करून दिली आहे. त्यामुळे इथे काम करणाऱ्या कामगारांना इतर कोणत्याही अडीअडचणींचा सामना करावा लागत नाही.

मुकादम म्हणून मी माझी कामगिरी चोख बजावत आहे. मी मालकांशीसुद्धा इमान इतबारीने रहात आहे. तसेच माझ्या हाताखाली काम करणाऱ्या कामगारांचीही योग्य काळजी घेत आहे. त्यामुळे आज माझ्या या कामात मी अतिशय समाधानी आहे.

व्यवसायात चढउतार हा चालूच राहतो. जेव्हा कधी मंदीचा काळ असेल तेव्हा आम्ही आमच्या मूळ गावी जाऊन शेतीची, मासेमारीची कामे करतो. जेव्हा अलंगमध्ये जरुर आहे तेव्हा इथेही लगेच येतो. आम्ही प्लॉटची धरसोड कधीच करत नाही. त्यामुळे आम्ही अतिशय समाधानी आहोत. ईदचा सण साजरा करण्यासाठी मात्र आम्ही आवर्जून घरी जातो. येताना दोन चार मुलांच्या रोजीरोटीची सोय करूनच अलंगला परततो.

**मुकादम – छोटेलाल महंतो, ओरिसा**

अलंग शीपयार्डाची निर्मिती झाली तेव्हापासून मी अलंग शीपयार्डात काम करत आहे. अगदी बिगारी, हेल्परीपासून ते अगदी क्रेन चालविणे, लोडिंग–अनलोडिंग कामाचाही अनुभव आहे. सगळ्या कामांचा अनुभव घेतल्यानंतर आता मुकादम म्हणून काम पहात आहे. 24 F या प्लॉटवर काम करत आहे.



**मुकादम छोटेलाल महंतो**

पूर्वीपेक्षा आता स्थिती खूप बदलली आहे. ३० ते ४० रुपयांची मजुरी आता १४० ते १६० च्या घरात पोहचली आहे. मूळात इथे येणारे सर्वच कामगार हे गरीब राज्यातून गरिबी व बेरोजगारीमुळे इथे आलेले आहेत व इथे मजबुरीमुळे काम करत आहेत. त्यांना खूपच अंग मेहनतीचे व कष्टाचे काम करावे लागत आहे. प्रामुख्याने ओरिसा राज्यातून येणारे कामगार हे लोडिंग–अनलोडिंगच्या कामात खूपच कुशल आहेत. माझ्या हाताखाली सुमारे ५० ते ६० कामगार काम करत आहेत. लोडिंग अनलोडिंगसुद्धा तसे खूप कष्टाचे काम आहे.

माझी मुकादमाची भूमिका म्हणजे मालक–अधिकारी व कामगार या दोघांना सांधणारा मी दुवा आहे. मला दोन्हीकडच्या बाजू ऐकून घ्याव्या लागतात. परंतु मालक–अधिकारी लोकांचे म्हणणे मला आधी ऐकावे लागते. एवढे काम एवढ्या वेळेत झालेच पाहिजे अशी सुद्धा कधी कधी परिस्थिती होते. त्या वेळेला मला कामगारांवर थोडी सक्ती करावी लागते. पण तेव्हा नाईलाज असतो. पण मीसुद्धा कामगारांच्या परिस्थितीचासुद्धा प्रामुख्याने विचार आधी करतो. त्यांना जेवण किंवा चहा पाण्याहून यायला पाच दहा मिनिटे उशीर झाला तरी मी त्यांना समजून घेतो. काही

वेळा हेच कामगार रात्री उशीरापर्यंत कामाला थांबतात. ती गोष्ट सुद्धा मी मालकांच्या समोर आणून देतो. पण ही जाणीव ठेवणारे मालकही थोडे आणि मुकादमी थोडे आहेत. काही ठिकाणी तर कामानंतर या कामगारांकडून त्यांची वैयक्तिक कामेही करून घेतली जातात. असाही अनुभव काही प्लॉटवरील कामगारांना येतो.

यावर्षी खूप कमी जहाजे लागली आहेत. त्यामुळे जेव्हा प्लॉटला जहाज नसते तेव्हा कामगारांना एक तर घरी तरी जावे लागते किंवा बेरोजगारी पत्करावी लागते. या वेळेला कामगारांच्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. कारण अलंगमध्ये काम आहे तर पैसा आहे आणि काम नाही तर काही नाही अशी परिस्थिती आहे.

**३.५ समारोप :** दुसऱ्या प्रकरणात आपण संशोधन पद्धतीच्या संदर्भात पूर्णपणे विवेचन केले. आता या तिसऱ्या प्रकरणात आपण  गुजराथ मेरी टाईम बोर्ड व अलंग शीप ब्रेकर्स असोसिएशनच्या कार्यप्रणाली विषयी सविस्तर माहिती पाहिली आहे. यासाठी आपण परिशिष्ट आणि परिशिष्ट ब या दोन वेगळ्या विभागामधे ही मांडलेली आहे. परिशिष्ट अ मधे आपण ब्ल्यू लेडी जहाजाचा रोमांचकारी प्रवास या विषयी सुद्धा माहिती जाणून घेतली आहे. तसेच परिशिष्ट ब मधे आपण स्थलांतरित कामगारांच्या मुलाखतींचे व संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण केले आहे. त्यासाठी आपण बिहार, झारखंड, ओरिसा, पं. बंगाल व उत्तरप्रदेश या राज्यातील स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात सर्व माहिती ही अनुसूची च्या माध्यमातून भरून ती सर्व माहिती विविध तालिकांच्या माध्यमातून भरून घेतली आहे. या तालिकांच्या माध्यमातून भरून घेतली आहे. या तालिकांच्या माध्यमातून या कामगारांविषयीची वैयक्तिक व कामाच्या स्वरूपाची संपूर्ण माहिती भरून घेतलेली आहे. ज्या प्रमाणे संख्यात्मक विश्लेषण केले आहे. त्याच प्रमाणे गुणात्मक विश्लेषणातूनही त्यांचे विश्लेषण केले आहे. या विषयाला अनुसरूनच विशेष व्यक्तींच्या मुलाखतींचा गोषवारा घेतला आहे. या मुलाखतींच्या माध्यमातून या विषयाचा गाढा अभ्यास करणारे अभ्यासक, शीप ब्रेर्स, त्याचप्रमाणे शीपयार्डात फॅमिली प्लॉनिंग असोसिएशनच्या वतीने राबविण्यात येणारा एडस प्रकल्प व त्याचे अधिकारी व सहकारी गणांच्या माध्यमातून त्यांच्या उपक्रमाविषयी अधिक माहिती मिळवता आली. मुख्य म्हणजे शीप ब्रेकर्स यांची भूमिका त्यांचे विचारही स्पष्टपणे जाणून घेतले. तसेच अलंग रिसायकलींग वर्क्स असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री. राम पटेल व सेक्रेटरी यांचे मनोगत जाणून घेतले. सुरक्षा अधिकारी, मुकादम आणि व्यावसायिकांच्या बाजूही जाणून घेतल्या यापुढील चौथ्या प्रकरणात आपण अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांचे मूलभूत प्रश्नाविषयी आपण सविस्तर माहिती पाहणार आहोत.

## संदर्भ सूची :

1) Breman Jan. 1994, wage hunters and catherrs search for work in urban and rural economy of south gujarat. oxford university press, New Delhi.

2) Breman Jan, 1996, Footloose labour, Cambridge University press.

3) Breman Jan. Das arvind 2000 Down and out labouring undar global captializam.

4) Biswaroop 2015 migrant labours in urban areas for social studies surat.

5) D. P. Saxena (1977), migration in India, popular Prakashan Mumbai.

6) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड ३ रा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

7) Ghanshyam shah (1990), migrant labour in india center for social studies surat.

8) डॉ. बी.आर. जोशी, समाजशास्त्र मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

9) Jhabvala Renna & subrmeinam the unorganised sector work, security and social protection SAGE Publication, New Delhi.

10) डॉ. दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

11) प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, २०१३,

12) Kothari and visaria-1984 Rural Urban migration in Gujart in Analisis of census Delta.

13) S.P. Institute of eco. & Sociology Reserech Ahmedbad.

14) Dr. W. N. Salve Reports on Labour rights and Labour Standards for migrant labour in India.

15) M.S.A. Rao 1986

16) डॉ. नीलम ताटके, समाजकार्य कोश २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

17) Studies in migration Internal and International migration in India.

118) Madam G.R. 2009, Indian Social Problems, Allied Publisher mumbai.

11) Ram Aahuja 2007 Social Problems in India Rawat Publication. Jaipur.

12) Ram awtar 1971, Lectures on labour problems and social welfare in India.

13) Ram Aahuja 2007, social problems in India Rawat Publication Jaipur.\

14) Sreenivasuil N.S. 2008, Human rights; many sides to coin. regal publisher new Delhi.

15) Smita panjour 2007, Locked homer empty school, Zubben , New Delhi.

16) T.K. PANDA & P. MAHAPATRA 1997 Report on working and living condition of oriya migrant labours.

17) T.N. Bhogiwal 1965, Labour problems in India, Kitabghar, Kanpur.

18) Tribhwan Robin, Jayshree Patil 2009 Stone quarry workers, Discovery Publishing house, New Delhi,

19) Tribhuwan Robin & Karche Jayshree Child labour and right issue. Astudy of migrant labour, Discovery Publishing house, New Delhi

21) मराठी विश्वकोश खंड १३ (२०००)

22) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ ला व २ डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७)

23) गुरुनाथ नाडगोंडे (२०००) कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे २.

24) सामाजिक विचार प्रवाह, प्रा. पी. के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर.

25) गणपति शंकर १९८२, मंथन कर्णकृष्ण भाग– १,

26) गोरे एम. एस. १९७८, शहरीकरण व कौटुंबिक परिवर्तन.

27) कौशिक आर शुक्ल, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, सरदार पटेल, युनिर्व्हसिटी.

28) डॉ. सुमनबेन चौधरी, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध भावनगर, युनिर्व्हसिटी.

## Internet Webside

1) www.gmb.ports.org


2) www. asain academic

3) www.industiral union.org

4) www. shipbraking platform.org

5) www.lucion marnine.com

# अलंग रिसायकलींग शीप ब्रेकर्स असोसिएशन




## <u>Contact Us  Office</u>

206, Turning Point,
2nd floor, Waghawadi Road,
Bhavnagar, 364002. Gujarat

प्रकरण ४ थे

## अनुक्रमणिका

## अलंग रिसायकलिंग शीपयार्डतील कामगारांचे मूलभूत प्रश्न

४.१ प्रस्तावना

४.२ स्थलांतरीत कामगारांचे मूलभूत प्रश्न

१) भाषा

२) निवास

३) पाणी उपलब्धता

४) वीज पुरवठा

५) शौचालये – स्वच्छतागृहे

६) मुकादम – मक्तेदारी

७) कामगार वेतन – जाता कामाचे पैसे

८) उधारी

९) एकीचा अभाव संघटनेचे पाठबळ नाही

१०) आरोग्य – स्वच्छता

११) स्थानिक लोकांचे वर्चस्व व सुरक्षा

४.३ समारोप

**प्रकरण ४ थे**

## स्थलांतरित कामगारांचे मूलभूत प्रश्न :

प्रस्तावना – अलंग रिसायकलिंग शीपयार्डात काम करणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित आहेत. गरिबी, बेरोजगारी व व्यवसाय धंद्याचे इतर कुठलेही साधन उपलब्ध नसल्याने या कामगारांनी रोजगाराच्या निमित्तानेच स्थलांतर केलेले आहे, हे सर्व स्थलांतरित कामगार प्रामुख्याने उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, झारखंड व पं. बंगाल अशा गरीब राज्यातून इथे आलेले आहेत. काही ओळखीच्या लोकांच्या माध्यमातून तर काही मुकादमांच्या तर काही स्वत:हून अलंग रिसायकलींग शीपयार्डात कामाला आलेले आहेत. शीपयार्डात काम करणारे ९०% हून अधिक कामगार हे स्थलांतरित आहे. या राज्याव्यतिरिक्त सुद्धा इथे कामासाठी कामगार आलेले आहेत. परंतु त्यांची संख्या नगण्य आहे. नेपाळ मधून जे स्थलांतर करुन इथे कामकाजासाठी आलेले आहेत. ते प्रामुख्याने फक्त रखवालदारीचे काम करत आहेत. अन्न वस्त्र निवारा या जशा प्रत्येक मानवाच्या मूलभूत गरजा आहेत त्याचप्रमाणे या गरजांची पूर्तता करताना जसे प्रत्येकाला अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्याच प्रमाणे अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या या स्थलांतरित कामगारांनाही इथे काम करताना अनेक मूलभूत प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना प्रत्येक गोष्टीत समायोजन करावे लागत आहे. तेव्हा त्यांना भेडसावणाऱ्या त्या अडचणींचा त्या प्रश्नांचा विचार आपण या प्रकरणात करणार आहोत.

### १) भाषेचा प्रश्न :–

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांची मूळ भाषा हिंदी, बिहारी, भोजपूरी वा बंगाली आहे. त्यामुळे इथे काम करण्यासाठी येणाऱ्या कामगाराला इथल्या भाषेच्या प्रश्नाला आधी सामोरे जावे लागते. कारण गुजराथ राज्यात प्रामुख्याने गुजराथी भाषा बोलली जाते व या लोकांना गुजराथी भाषा बोलणे तर सोडाच त्यांना ही बोललेली भाषा समजत सुद्धा नाही. त्यामुळे इथे सुरुवातीला संवाद साधण्याचा मोठा प्रश्न निर्माण होतो. परंतु हे कामगार आपल्या ओळखीचे लोक किंवा मुकादमाच्या माध्यामातून आलेले असतात त्यामुळे सुरुवातील ते आपल्या ओळखीच्या लोकांच्या संपर्कातच राहतात व हळूहळू ते हिंदीतून इथल्या स्थानिक लोकांशी संवाद साधायला सुरवात करतात. आज अनेक वर्षापासून इथे काम करणारे काही

कामगार आता गुजराथी भाषा चांगल्या रीतीने समजू लागले आहेत, तर काहींना थोड्या फार प्रमाणात ही भाषा बोलताही येत आहे. तरीही बहुतांशी कामगार हे हिंदी भाषेचाच उपयोग करतात.


२) **निवासाचा प्रश्न :–** या स्थलांतरित कामगारांना अलंग शीपयार्डात कामासाठी आल्यावर निवासाची सोय स्वत:चीच स्वत:ला करावी लागते. अगदी बोटावर मोजण्याएवढे शीप ब्रेकर्स आपल्या कामगारांची निवासाची सोय करतात. सुमारे ८०% हून अधिक कामगारांना ज्या प्लॉटमध्ये ते काम करत आहेत त्या प्लॉटसमोरच ते या कामगारांनी निकामी जहाजातून मिळालेल्या भंगार मालापासून तयार केलेल्या झोपडीवजा घरात ते राहतात. या झोपड्या ते पत्रे कार्डबोर्ड चे तुकडे, लाकडाचे तुकडे, फळ्या याच्या सहाय्याने तयार करतात, या एका झोपडीवजा घरात एका खोलीत सुमारे १० ते १२ जण वास्तव्य करुन असतात.



**त्यांचे घराचे दर्शन घडविणारे हे छायाचित्र**



प्लॉटच्या समोरच लागून असलेल्या ह्या  झोपड्या



कामगारांच्या घरांचे दर्शन घडविणारे हे छायाचित्र




**ज्या परिसरार हे कामगार राहतात, त्याच्या आजुबाजूला साचलेले पाण्याचे डबके**


या शिवाय काही स्थानिक लोकही आपल्या छोट्या खोल्या भाड्याने देतात. ज्या १०० रुपये प्रतीमाणशी २०० व ३०० रुपये प्रतीमाणशी अशा स्वरुपाने ते भाड्याने देतात. अशा ठिकाणीही सुमारे ८ ते १० जण एका खोलीत राहत असतात, इथे फक्त या कामगारांची राहण्याची सोय होते या शिवाय त्यांना या घरात कुठल्याच प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसतात. एकाच खोलीत त्याही अवस्थेत हे आठ दहा जण एकत्रितपणे राहत असतात. इथे त्यांना वीज पाणी शौचालय या कुठल्याही प्रकारची सोय उपलब्ध नसते. दिवसभर अतिशय काबाडकष्ट केल्यावर या कामगारांना रात्री सारे काही अंधारात काम करावे लागते. किंवा अंधार पडण्यापूर्वी या कामगारांना अन्न शिजवून ठेवावे लागते. एकतर घरासमोर लागूनच समुद्रकिनारा त्यामुळे इथले हवामान अतिशय दमट असते. आणि भावनगरपासून ५० कि.मी. असलेल्या या अलंग गावाचे तापमानही ५० डिग्री सेल्सिअस इतके असते त्यामुळे कामाच्या ठिकाणी सुद्धा सतत आगीशी व उन्हाशी संपर्क त्यात प्रचंड गरमी अशा अवस्थेत या झोपडीवजा घरात राहणेही अशक्य होते. त्यामुळे रात्री बहुतांशी कामगार हे प्लॉटसमोरील फूटपाथवरच झोपण्याचे पसंद करतात.

## पाण्याची सुविधा :

ज्या ठिकाणी प्लॉटसमोरच आपल्या झोपडीवजा बांधलेल्या घरात किंवा पैसे विभागून भाड्याच्या घरात राहणाऱ्या या कामगारांना पाण्याचा पुरवठा केला जात नाही. समोर अथांग समुद्र आहे पण ते पाणी न पिण्याजोगे ना आंघोळीला उपयुक्त त्यामुळे टँकर द्वारे पुरविलेल्या पाण्याचा वापर करावा लागतो. त्यासाठी घरासमोरच एक सिमेंटचा पक्का बांधलेला छोटा ड्रम वजा पाणी साठविण्याकरीता ठेवलेला आहे. त्यात अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या किड्यांचेही वास्तव्य आहे. त्याच ड्रम मधे टँकरवाला पाणी टाकून जातो तेच पाणी या कामगारांना वापरावे लागते. पिण्याचे पाणी ३० रुपये प्रति बॅरल प्रमाणे विकत घ्यावे लागते. या परिसरात विहीर आहे पण त्याचे पाणीही अतिशय दुषित असे आहे. त्यामुळे या पाण्याने आंघोळ करणेही तसे धोकादायक आहे. तरीही या कामगारांना या अशा दुषित पाण्यानेच आंघोळ करावी लागते, व त्याच पाण्याने कपडेही धुवावे लागतात.



**विहीरीतून पाणी काढताना कामगार**



या अशा

**परिस्थितीतच अंघोळ रोज अंघोळ करावी लागते**

या कामगारांचे कामही अतिशय कष्टाचे व सतत धूर, धूळ आणि आगीशी संपर्कामुळे या कामगारांना आंघोळ करणे अपरिहार्य असते. हे कामगार आपल्या घरासमोरीलच उघड्यावर एका दगडावर आपली आंघोळ करतात. पाण्याचा निचरा होण्यासाठी एक छोटीशी वाट करुन दिलेली असते तेच पाणी समोर जाऊन तिथे डबकेही तयार होत. कारण घराच्या आजुबाजूला कोणत्याही प्रकारची गटारीची योजना नाही. त्यामुळे आहे अशा परिस्थितीतच या कामगारांना रहावे लागते.

## वीज नाही (Electricity) :–

हे कामगार ज्या ठिकाणी राहतात त्या घरांना वीजेची सोय नाही. अगदी मोजक्याच, जे कामगार भाड्याच्या घरात राहतात. त्या मालकाने मेहरबानी केल्यास त्यांच्या घरात वीजेचे कनेक्शन दिले जाते. त्याबदल्यात हे घरमालक या कामगारांकडून जास्त पैशाची आकारणी करतात. त्याचप्रमाणे लाईट आकारणी करतात. त्याचप्रमाणे लाईट बीलही  या कामगारांकडूनच वसूल करुन घेतात. या घरमालकांची भाषाही सतत उपकाराची असते. ते कायम या कामगारांना आपल्या दबावाखाली ठेवतात. त्याचप्रमाणे मालकाची मर्जी फिरली तर त्याच क्षणी या हे घरमालक या कामगारांना दिलेले वीजेचे कनेक्शन बंदही करु शकतात इतकेच नव्हे तर या कामगारांना घरातून बाहेर सुद्धा काढू शकतात.

## शौचालयाची व्यवस्था :

आज आपण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत आहोत आणि सध्या तर आपल्या सरकारने सुद्धा घर तेथे शौचालय त्यासाठी सबसीडी सुद्धा देण्याचे ठरविले आहे. एकीकडे जाहीरातींचा असा मारा आहे. मात्र दुसरीकडे आज भारतातही अनेक राज्यात अजुनही काही लोकांना उघड्यावर शौचाला जावे लागते हे वास्तव आहे. आपले महाराष्ट्र आणि देशाची आर्थिक राजधानी मुंबईत सुद्धा आपल्याला हे चित्र पहायला मिळते. गुजराथ सुद्धा प्रगत राज्यच आहे. आणि त्याच राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या या कामगारांना सुद्धा शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. या कामगारांच्या सोयीसाठी सुलभ शौचालय बांधण्यात आले आहे ते पैसे देऊन त्याचा वापर करा या तत्वावर बांधण्यात आले आहे. परंतु कामगारांशी केलेल्या गटचर्चेतून व प्रत्यक्ष निरिक्षणातून हे सुलभ शौचालय कायम बंद असलेलेच दिसून आले. कामागरांनी या संदर्भात बोलताना सांगितले की हे सुलभ शौचालय सकाळी कधीच उघडे नसते. ते दहा वाजल्यानंतर उघडले तर उघडते वास्तविक या कामगारांना हे सुलभ शौचालय सकाळी उघडे असावे अशी अपेक्षा असते मात्र ते कधीच उघडे नसते. आणि ज्या वेळेला हे कधी उघडे असले तर तिथे पाणीच उपलब्ध नसते त्यामुळे या कामगारांना उघड्यावरच शौचाला जावे लागते. त्याशिवाय त्यांच्याकडे कुठलाच पर्याय उरत नाही.




**कामगारांसाठी सुलभशौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.**

या कामगारांना नाईलाजाने उघड्यावर शौचाला जावे लागते. सकाळी आठ वाजता या कामगारांना प्लॉटवर  कामाला जावे लागते. इतर ऋतु मधे इतका मोठा प्रश्न वाटत नाही मात्र पावसाळ्यात मात्र याचा खूप त्रास होतो. आणि त्यामुळे संसर्गजन्य रोज पसरण्याची सुद्धा शक्यता नाकारता येत नाही.



**१० वाजेपर्यंत हे उघडत नाही. हे उघडे असले तर तर तिथे पाण्याची सोय नसते.**

या कामगारांना आता कोणत्याही प्लॉटवर कामावर रुजु होण्यासाठी गुजराथ मे

री टाईम बोर्डाच्या तीन दिवसांचे प्रशिक्षण घ्यावे लागते. आणि ते प्रशिक्षण पूर्ण केल्यावर या कामगारांना गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून ओळखपत्र आधारावरच या कामगारांना प्लॉटवर काम करण्याची परवानगी मिळते. पूर्वी असे काही नव्हते. परंतु आता या ओळखपत्रामुळे कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम मिळवणे सहज शक्य होत आहे.

## मुकादमांची मक्तेदारी :–

कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम मिळवताना सुद्धा अनेक अडचणींना समोरे जावे लागते. या संदर्भात इथे आणखीन एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की, या कामगाराना कुठल्याही

प्लॉटवर कायमस्वरुपी काम असतेच असे नाही. एखाद्या प्लॉटवर जहाजाची तोडणी पूर्ण झाली की, त्या प्लॉटवर दुसरे जहाज तोडणीसाठी येईस्तव या कामगारांना दुसऱ्या प्लॉटवर जिथे गरज आहे तिथे काम मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. काही वेळा दुसऱ्या प्लॉटवर सहज रीतीने काम मिळते. तर काही ठिकाणी त्या प्लॉटवर काम उपलब्ध असले तरी सुद्धा जर काही कामगार या मुकादमाच्या मर्जीतले नसले तर या कामगारांना त्या प्लॉटवर काम मिळत नाही. त्यामुळे अशा वेळेला या कामगारांवर काही दिवस तसेच कामाविना दिवस काढावे लागतात. त्यामुळे काही दिवस त्यांना बेकारीत दिवस काढावे लागतात.

काही प्लॉटवर काही मुकादम कामगारांशी चांगली वर्तणूक करतात. पण त्यांचे प्रमाण खूप कमी आहे. या कामगारांना प्लॉटवर काम करताना मुकादमाच्या अखत्यारी खालीच काम करावे लागते. काही मुकादम पाच मिनिटेही यांना उसंत देत नाहीत. कधीही नीट बोलत सुद्धा नाहीत. पाणी पिण्यासाठी सुद्धा मनाई करतात. तुम्ही काम टाळण्यासाठी हे असे बहाणे करता आले मुकादमांचे म्हणणे असते. ज्या प्लॉटवर हे कामगार काम करतात तिथेही त्यांना सगळ्या मूलभूत सुविधा उपलब्ध असतातच असे नाही. सकाळी कामावर येताना प्लॉटच्या दाराशीच या कामगारांना त्यांचे हजेरीपत्रक जमा करावे लागते. प्लॉटवर यायला पाच मिनिटे जरी उशीर झाला तर मुकादम त्या कामगाराला कामावर येण्यास मनाई केली जाते. एकूणच या कामगारांचे सगळे भवितव्य हे मुकादमाच्या हातीच असते.

## कामगारांचे वेतन + जादा तासाचे पैसे :

शिपयार्डात काम करणारे कामगार, त्यांच्या कामाचे स्वरुप असे असते. १) जोडीवाला २) बाटलीवाला ३) फोरमन ४) वींच ड्रायव्हर ५) सुपरवायझर ६) क्रेन ड्रायव्हर ७) कारपेंटर ८) हेल्पर ९) अकुशल कामगार, यातील जोडीवाल, बाटलीवाला, क्रेन ऑपरेटर, वींच ड्रायव्हर सुपरवायझर या कामगारांना थोडे अधिक पैसे मिळतात. आज जास्तीत जास्त वेतन हे ३५० ते ४५० च्या घरात आहे तर सर्वात कमी वेतन हे १५० ते २५० रुपयांच्या दरम्यान आहे. या कामगारांना कुठल्याही प्रकारची उचल दिली जात नाही. ज्या दिवशी काम कराल त्याच दिवसाचे पैसे ग्राह्य धरले जातात. म्हणजे इथे काम करणाऱ्या कामगारांना काम केले तरच पैसे मिळतात. अन्यथा कुठल्याही प्रकारचे पैसे मिळत नाहीत. या कामगारांचे वेतन पूर्ण महिना भरल्या नंतर

पंधरा दिवसांनी दिले जातात. जेव्हा महिना भरतो त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी यांच्या हजेरीचे कार्ड काढून घेतले जाते. आणि जेवढे दिवस भरले असतील त्या दिवसांचा एकत्रित हिशोब हा पंधरा दिवसांनी मिळतो. त्यांच्याकडील हजेरीचे कार्डच काढून घेतल्यामुळे या कामगारांकडे आपण या प्लॉटवर काम केले याचा कुठलाच पुरावा राहत नाही. कामगारांना पैसे लवकर मिळावेत की उशीरा, किंवा एखाद्या कामगाराला त्या कामांचे पैसे मिळूच नयेत या साऱ्या गोष्टी या मुकादमाच्या हातात असतात. काही वेळा काम करुन सुद्धा कामगारांना पैसे न मिळाल्याचा घटना घडलेल्या आहेत. पण दाद मागायची तर कुणाकडे असाही या कामगारांपुढे मोठा प्रश्न आहे. अशा घटना अधून मधून घडत असतात. पण कुणीही कामगार एकत्रितपणे येऊन या विरुद्ध आवाज उठवू शकत नाही. या कामगारांना सुमारे ११ ते १२ तास सलग काम करावे लागते. त्याव्यतिरिक्त जास्त काम केल्यास त्या कामाचे त्यांना मजुरीच्या अर्धे पैश्याप्रमाणे त्या तासांचा हिशोब केला जातो. आणि जादा काम केल्यास त्या तासांना डबल नाही तरी थोडी जास्त रक्कम मिळणे अपेक्षित आहे. पण तसे होत नाही. त्यांना ठरलेल्या रोजगारीच्या अर्धेच पैसे दिले जातात. यांना कधी पैशाची गरज पडली तर कुठल्याही प्रकारची उचल दिली जात नाही. एखाद्या कामगाराला जर अचानकपणे गावी जाण्याची गरज पडली तर मालक यांना कुठल्याही प्रकारची मदत करत नाही. या कामगारांचे जेवढे कामाचे दिवस भरलेले असतीतल व त्या भरलेल्या दिवसांची जी रक्कम होत असेल तेवढीच रक्कम या कामगाराला मिळू शकते त्या व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे पैसे या कामगारांना मिळत नाही. अशा अचानक उद्‌भवलेल्या परिस्थितीत हे कामगार आपल्याच ओळखीच्या लोकांकडून पैसे उधार घेतात आणि गावाला जातात. या कामगारांना इथले स्थानिक लोकही कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत करत नाहीत. त्यामुळे असा अचानक उद्‌भवलेला आर्थिक प्रश्नही या कामगारांना ज्याचा त्यालाच सोडवावा लागतो.

## उधारीवर सामान :

अलंग शीपयार्डात राहणारे हे कामगार त्यांना लागणाऱ्या चीजवस्तू या उधारीवर आणत असतात. इथे चहापाणी, नाश्ता जेवण या साऱ्या गोष्टी उधारीवर मिळतात. इथले स्थानिक लोक जे छोटी मोठी दुकाने चालवतात तेच लोक यांना उधारीवर चहा पाणी जेवण देत असतात. प्रत्येक हॉटेल मालकाकडे या कामगारांची डायरी ठेवलेली असते. व डायरीत याची नोंद केली

जाते. हे हॉटेल व्यावसायिक किंवा किराणा मालाचे व्यापारी या कामगारांना उधारीवर वस्तू देतात पण प्रत्येक वस्तू या कामगारांना दाम दुपटीने विकतात. कारण ते त्यांना हवा तो माल उधारीवर देत असतात. बहुतांश कामगार जेव्हा कामाचे पैसे मिळतात तेव्हा त्या त्या महिन्याची उधारी चूकवून टाकतात. परंतु काही महाशय पैसे बुडवून निघून जाणारेही असतात. तरीही जे प्रामाणिकपणे केलेली उधारी चूकवत असतात त्या कामगारांना मात्र कायम कोणतीही वस्तू दामदुपटीने विकत घ्यावी लागते. हॉटेल वर जाऊन जेवण करणारे कामगार थोडेच आहेत. जे महिन्याची मेस लावतात. परंतु तिथे दिल्या जाणाऱ्या जेवणाचा दर्जा म्हणावा इतका चांगला असतोच असे नाही. त्यामुळे हे कामगार आपले आपणच अन्न शिजवून खाण्याकडे त्यांचा कल असतो. परंतु सकाळी लवकर कामाला जायचे असते त्यामुळे कामाला जायच्या आधी जेवण तयार करुन मगच यांना कामाला बाहेर पडावे लागते. दिवसभर काबाडकष्ट करुन आल्यामुळे रात्री जेवण बनविण्याचे त्राणही या कामगारांमध्ये उरत नाही. त्यामुळे दोन्ही वेळचे जेवण ते सकाळीच करुन ठेवतात. प्रामुख्याने दाल भात बटाट्याची भाजी हाच सगळ्या कामगारांचा मुख्य आहार आहे. रविवारी सुटीच्या दिवशी हे थोडे वेगळे जेवण बनवितात. मांसाहार करणारे कामगार थोडेच आहेत.

## गुंड प्रवृत्तीचा सामना :–

हे सर्वच कामगार स्थलांतरित आहेत. या कामगारांचे वैशिष्ट्ये असे आहे की प्रत्येक कामगार हा आपापल्या राज्यातील कामगारांच्या सोबतच एकत्रितपणे राहत असतो. त्यामुळे इथे आपल्याला वेगवेगळ्या राज्यातील कामगारांचे समूह एकत्रितपणे राहताना दिसून येतात. हे जरी समूहाने एकत्रित राहत असले तरी सुद्धा हे सगळेच कामगार एका मानसिक दडपणाखाली आपले जीवन व्यतित करीत असतात. हे स्थलांतरित असल्याने स्थानिक समाजातील लोकांचे यांच्यावर कायम वर्चस्व असते. यातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा या कामगारांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या त्रास होत असतो. परंतु या गुंड प्रवृत्तीच्या लोकांविरुद्ध आवाज उठविणे तेवढी सोपी गोष्ट नाही. कारण कायदा आणि सुव्यवस्था या बाबतीत अधिक खोलात जाणे संयुक्तिक होणार नाही. आज अलंग मधे पोलीस स्टेशन आहे. ती यंत्रणा कार्यान्वित आहे तरी सुद्धा या प्रवृत्तींचा त्रास या कामगारांना होत आहे. एक तर हे कामगार ज्या ठिकाणी राहतात तिथे इलेक्ट्रिसिटी नसल्याने रात्री प्रचंड काळोखात या कामगारांना रहावे लागते. या लोकांची घरे

म्हणजे कोणत्याही प्रकारची सुरक्षा त्या घरांना नसते त्यामुळे या घरात कोणत्याही प्रकारची रोख रक्कम वा महत्त्वाच्या वस्तू ठेवणे हे कामगारांच्या दृष्टीने अतिशय घातक ठरु शकते. कारण गुंड प्रवृत्तीचे लोक हे रात्री अपरात्री ११ वाजल्यानंतर टोळी टोळीने येऊन या कामगांच्या घरातल्या चीजवस्तू वा रोख रक्कम लुटून नेण्यासाठी कमी करत नाहीत. अणि ज्या प्रकारची भीती या कामगारांना सतत सतावत असते. त्यामुळे हे कामगार आता कुठल्याही प्रकारची रोख रक्कम वा चीजवस्तू घरात ठेवत नाहीत. कारण इतक्या काबाडकष्टाने मिळवलेले पैसे असे क्षणात कुणी घेऊन गेले तर गावी ज्या कुटुंबाला ठेवून ते इथे काम करण्यासाठी इथे आलेले आहेत त्यांना काय पाठविणार असाही प्रश्न या कामगारांच्या पुढे निर्माण होतो. त्यामुळे ज्या दिवशी पैसे हातात पडतात त्याच दिवशी हे कामगार प्रथम आपली उधारी चुकवतात व त्यानंतर गावाकडे जी रक्कम पाठवायची आहे ते पैसेही त्या माणसाकडे सूपर्द करतात. या कामगारांना बँकेचे व्यवहार करण्या इतकाही वेळ त्यांच्या कडे नसतो. आणि रविवारी सुटीचा दिवशी त्या दिवश बँकही बंद असते. आणि एकाच दिवशी त्यांना त्यांची आठवड्याभराची कामेही पूर्ण करायची असतात. त्यामुळे फक्त गरजेपुरतेच पैसे हे कामगार जवळ बाळगतात.

## एकीचा अभाव संघटनेचे पाठबळ नाही :

अलंग शीप यार्डात काम करणारे हे सर्व कामगार असंघटीत व स्थलांतरित आहेत. या कामगारांमधे एकजुटीचा अभाव आहे कारण त्यांच्या हक्कासाठी त्यांना उद्भवणाऱ्या प्रश्नांविरुद्ध लढा देणारी अशी कोणतीही संघटना किंवा सामाजिक संस्था नाही. त्यामुळे कधी एखादा प्रसंग निर्माण झाला तर या कामगारांच्या पाठीशी उभे राहणारे कोणी नसते. प्रश्न हा त्या कामगाराचा वैयक्तिक असो की प्लॉटमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीचा असो. जरी एखाद्या प्रश्नाविरुद्ध कामगारांनी एकत्रितपणे येऊन आवाज उठविण्याचा प्रयत्न केला तर मालक वर्गाची दडपशाही हा उठलेला आवाज मोडून काढते. त्यासाठी या प्रश्नासाठी जो कोणी कामगार नेतृत्व करत असेल तर त्याला एकदम हिरो तरी केले जाते किंवा त्या कामगाराला कशा रीतीने संपवून टाकले जाते हे कधी कुणाच्या लक्षातही येत नाही. अशा परिस्थितीचा सामनाही या कामगारांना इथे करावा लागतो. कामगारांमधल्या एकजुटीच्या अभावामुळेही एखाद्या प्रश्नाचे निराकरण होण्याऐवजी तो प्रश्न कायमस्वरुपी चिघळत राहतो.

औद्योगिकीकरणाचा व्यापक अर्थाने विचार करता उद्योगाच्या स्थापनेबरोबरच अर्थव्यवस्थेच्या रचनेत व समाजरचनेत परिवर्तन घडवून आणणे व त्यासाठी मोठ्या प्रमाणात औद्योगिक उत्पादन वाढवून राष्ट्रीय उत्पन्न वाढविता येते. त्यामुळे आर्थिक सामाजिक परिवर्तनाला उत्तेजन मिळते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ जरी झाला तरी या प्रक्रियेला गती स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच मिळाली.

औद्योगिकरणानंतर कारखान्यांची वाढ होऊन कामगार संघटना व त्यांच्या चळवळीचा उदय झाला. कामगारांना योग्य वेतन मिळावे, त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारावी यासाठी संघटितरित्या प्रयत्न केले. उद्योजक व कामगार यांच्यात चांगले संबंध निर्माण व्हावेत व उद्योगधंद्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी कामगार संघटनांची गरज वाटू लागली.

इंग्लंडमध्ये १८५० पासून कामगार संघटनांची सुरुवात झाली. भारतात १८८५ पासून कामगार चळवळीस प्रारंभ झाला होता. भारतात १९१८ मध्ये मद्रास लेबर युनियन ही पहिली कामगार संघटना स्थापन झाली. १९०८ मध्ये लोकमान्याच्या शिक्षेच्या निषेधार्थ गिरणी कामगारांनी केलेला सार्वत्रिक संप हा स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात महत्त्वाची नोंद करणारा ठरला.

१९२० मध्ये All India Trade Union Congress ची स्थापना झाली. ना. म. जोशी यांची कायदेमंडळात नेमणूक झाल्यानंतर १९२६ साली कामगार संघाचा कायदा मंजूर झाला. १९२६ सालापासून कम्युनिस्ट पार्टीचा सहभाग यामुळे ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये फूट पडली. १९३१ ते १९३६ हा काळ कामगार चळवळीसाठी कठीण होता. १९४० साली म. गांधींच्या विचारसरणीवर आधारित इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (इंटक) या संस्थेची स्थापना झाली. १९४८मध्ये प्रजा–समाजवादी पक्षाच्या प्रभावी नेतृत्वाखाली हिंदू मजूर सभेची स्थापना झाली. कोणत्याही संघटनेत राजकीय पक्षाचा प्रभाव नसावा या गोष्टीवर जरी भर दिला गेला असला तरीसुद्धा या संघटनांवर पक्षीय राजकारणाचा प्रभाव हा राहिलाच.

फाटाफूट, विघटन या कारणांमुळे कामगार संघटना या यशस्वी झाल्या नाहीत. उद्योगधंद्याची खूप वेगाने अनपेक्षित असलेली पण संथ असताना झालेली वाढ कामगार नेतृत्वाचा

अभाव, असंघटित व अंधश्रद्धाळू कामगार, राजकीय वर्चस्व यामुळे कामगार संघटनांचा मार्ग खडतर ठरला.

भारतामध्ये 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC) ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC), हिंदू मजदूर सभा (HMS) युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस (UTUC) या महत्त्वाच्या श्रमिक संघटना आहेत. कामगार संघटनांना औद्योगिक समाजात वेगळेच स्थान आहे.

लोकसंख्या वाढली तशी बेकारीही वाढली. आधुनिक उत्पादन वाढले तशा या समस्या अधिक उग्र रूप धारण करू लागल्या. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कामगारांची कपात होऊ लागली. त्यातील संभाव्य धोके, कामाच्या ठिकाणी कामगारांना होणाऱ्या इजा, अपघात, मृत्यू यामुळे कामगारांची सुरक्षा कामगारांचे संरक्षण ही बाब अपरिहार्य ठरली. त्यामुळेच विकसित आणि विकसनशील देशातही कामगार संघटना निर्माण झाल्या.

## कामगारांचे कायदे –

औद्योगिक विवादाच्या अनेक रुपांपैकी एक संप, म्हणजे अन्यायाविरुद्ध सामुहिक प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी काही काळ उत्पादन थांबविणे. लोकशाही देशातून संप करण्याचा कायदेशीर हक्क मान्य करण्यात आला आहे. कामाच्या ठिकाणी काम करताना कामगाराला अपघात झाला तर त्याला आर्थिक साहाय्याची जरुरी असते. भारतातही औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरणामुळे अपघात होतात. अलंग रिसायकलींग शीपयार्डातही छोटे मोठे अपघात हे होत असतात. परंतु आता सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन केले जात असल्याने अपघाताचे प्रमाण खूप कमी आहे. पण कधी असा अपघात घडलाच तर कामगाराला नुकसान भरपाई दिली जाते. मालक ती जबाबदारी स्वीकारतात. १९२३ मध्ये कामगार नुकसान भरपाईचा कायदा मंजूर झाला व १९२४ पासून तो अंमलात आला.

१९४८ साली कामगार राज्य विमा कायदा लागू झाला व त्यात १९५९, १९६२, १९६७ मध्ये त्या वेळच्या परिस्थितीनुसारही सुधारणा होत गेल्या. परंतु 'कामगार राज्य विमा कायदा १९४८' हा सर्वांसाठी लागू होत नाही.

औद्योगिक संघर्ष अधिनियमाच्या कलम ७ नुसार सरकार औद्योगिक संघर्षाचा निवाडा देण्यासाठी एक किंवा अधिक औद्योगिक न्यायालयाची नियुक्ती करू शकते. भारतात श्रम

न्यायालये, औद्योगिक लवाद, औद्योगिक न्यायालय समकक्ष औद्योगिक लवादांची एकूण संख्या ३३१ आहे. यामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त ६८ तर गुजराथेत ५६ औद्योगिक न्यायालये आहेत व त्याद्वारा कामगार हिताचे रक्षण करण्याचे काम चालते.

(डॉ. नीलम ताटके : २००८ समाजकार्य कोश : पृष्ठ १६८ ते ७२)

## स्थलांतरित कामगारांची सद्यस्थिती व स्थलांतरित कामगारांचे हक्क :

असंघटित व स्थलांतरित कामगारांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय (ILO) कामगार संघटनेने खूप महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. कामाच्या ठिकाणी निकोप व चांगले वातावरण, योग्य वेतन, सक्तीची मजूरी व बाल मजूरी सारख्या गोष्टींना प्रतिबंध अशा अनेक चांगल्या मुद्यांचा विचारविनिमय अधिवेशनातून करण्यात आला. (मिश्रा – २००१)

भारत देश सुद्धा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या संस्थापक सदस्य असून संघटनेची १८१ अधिवेशने झाली आहेत. व त्यापैकी २९, ८७, ९८, १००, १०५, १११ व १३८ ही सात महत्त्वाची अधिवेशन होती. त्यातील २९ नंबर चे अधिवेशन झाले त्यात सक्तीच्या मजूरी विरोधात विचार–विनिमय करण्यात आला. १०० व्या अधिवेशनात समान वेतनाचा विचार मांडला गेला. व १११ या अधिवेशनात भेदा–भेद दूर झाले पाहिजेत हा विचार मांडला गेला आणि भारताने या तिन्ही गोष्टींना संमती दर्शवली होती.

भारतीय संविधानानुसार कामगारांसाठी विविध कायदे ही तयार करण्यात आले. त्यात स्त्री–पुरुष समान हक्क, कामाचे तास, वेतन, त्याचप्रमाणे विविध सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले. आणि त्यादृष्टीने कायदेही तयार करण्यात आले. त्यात Trade unin act 1926, The minimum wages Act 1948, employee state insurance act 1948, industrial dispute act 1949, Industrial Dispute Decei act. 1955, payent of Bonous act 1955, in personal injuries (Compensation insurance) Act 1963, Maternity Benefit act 1967, Contact labour (Regulaton and Abolition) Act 1970, Bonded labor systems (Abolition) Act 1976 Equal remunaration Act 1976, Interstate migramt work (Regulation of Employment Act 1976, condition of service Act 1979. The child labour probition and Regulation Act 1986, हे जरी एवढे कायदे अस्तित्वात असले तरी सुद्धा या सार्‍या कायद्याचे पालन मुक्त संघटित क्षेत्रातील कामगारांच्या बाबतीत लागू होताना दिसून येते. आणि असंघटित

क्षेत्रात सुमारे ९२% कामगार आणि येतात. तर असंघटित क्षेत्रात फक्त ८% कामगारांचे कायद्याद्वारे संरक्षण केले जाते.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे जरी वारंवार असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचा उल्लेख केलेला असला तरी सुद्धा कायद्याचे पालन केले जात नसल्याने असंघटित क्षेत्रातील कामगारांना बेरोजगारी आणि सामाजिक असुरक्षितता या गोष्टींना सामोर जावेच लागते. स्थलांतरित कामगारांना कुठल्याही प्रकारचा मुलभूत सुविधाही कामाच्या ठिकाणी उपलब्ध होऊन शकत नाहीत.

१९४८ साली जो फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आलेला आहे.. त्या कायद्यानुसार या स्थलांतरित कामगारांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मालकांची आहे. परंतु त्या गोष्टी पाळल्या जात नाहीत. आज अलंग रिसायकलिंग शीपयार्डात सुद्धा फॅक्टरी ॲक्ट लागू आहे पण त्याची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

(ILO) आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या दृष्टीने संपूर्ण जगातील १०% कामगारांना सर्व प्रकारच्या सेवा सुविधा पुरविल्या जातात त्यांना सामाजिक सुरक्षाही प्राप्त होते. बाकीच्या लोकांना काहीच मिळत नाही.

स्त्री कामगारांचे विचार करता २८% स्त्रिया काम करत आहेत. तर पुरुषांची टक्केवारी ही ५४.५ इतकी आहे. (१९९४ साली) आता त्यात खूप वाढ झाली आहे. परंतू पुरुष हा भेदाभेद केला जाऊन स्त्री कामगाराला पैसेही कमी दिले जातात. त्यांना कायम दुय्यम स्वरुपाची वागणू क दिली जाते. काही वेळा कामाच्या ठिकाणी या स्थलांतरित कामगारांचे लैगिक शोषणही होताना दिसून येत आहे.

## आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

(इंटरनॅशनल लेबर ऑरगानायझेशन) ने असंघटटित व स्थलांतरित कामगारांनाही सर्व प्रकारच्या सोयी सुविधा, योग्य वेळी वेतन, कामाच्या ठिकाणी सुरक्षा आणि मालक आणि कामगार यांच्यात सुसंबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आणि या संघटनेने कामगारांच्या सुरक्षे संदर्भात जो काही आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नियमावली तयार केली आहे. तीच नियमावली या संघटनेच्या सदस्य देशांनी सुद्धा अंगीकारावी अशी या संघटनेची आग्रही

भूमिका आहे. असंघटटित क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांची संख्या ही जवळ जवळ ९०% चा घरात आहे.

जे स्थलांतरित कामगार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात कामासाठी काही ठराविक काळापुरते, अथवा कायम स्वरुपी कामासाठी स्थलांतर करतात. व ते ज्या ठिकाणी काम करतात तिथे त्यांना कोणत्याही प्रकारची सुरक्षितता किंवा कुठल्याही संघटनेचे पाठबळ नसते. हे स्थलांतरित होणारे कामगार एक तर गरीब, अशिक्षित तसेच समाजातील दुर्बल घटकातील असतात. या कामगारांना पुरेसे वेतनही मिळत नाही. हे कामगार शेतमजूर गृहबांधणी प्रकल्प, वीट भट्टी कामगार, ऊसतोडणी कामगार, तसेच अलंग येथील जहाज तोडणी कामगार अशा अनेक ठिकाणी हे कामगार करत असतात. परंतु या कामगारांना अनेक बिकट परिस्थितीचा सामना करावाच लागतो.

या स्थलांतरित असंघटित कामगारांच्या भवितव्यासाठी काम करणारी अशी कोणतीही कामगार संघटना आज तरी अस्तित्वात नाही. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक योजना कामगारांचे भवितव्य सुधारण्यासाठी अमलांत आणल्या. पण त्याची योग्य रीतीने अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. पण यात सुधार होण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता कामगारांचे भवितव्य सुधारण्यासाठी काह ठोस पाऊले उचलण्याचे ठरविले आहे आता तसे झाले तरच या कामगारांचे भवितव्य उज्वल होऊ शकेल. अशी आशा आहे.

(Report on Labour rights and Labour standards for migrant labour in India) Dr.W.N.Salve)

## आरोग्य आणि स्वच्छता :-

हे कामगार ज्या परिसरात राहतात तिथे सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत खूपच दयनीय अशी अवस्था आपल्याला पहायला मिळते. कारण इथे कोणत्याही प्रकारची गटार व्यवस्था नाही. त्यामुळे सगळीकडे छोटी मोठी डबकी तयार झालेली आपल्याला दिसून येतात. दिवसभर उन्हातान्हात हे कामगार जहाज तोडण्याच्या कामात व्यवस्त असतात, आग धूराच्या सततच्या संपर्कामुळे या कामगारांना गरमी चा खूप त्रास होतो. आणि अंघोळ करावी तर मुबलक पाणीही नाही त्यामुळे या कामगारांना विविध त्वचा रोगही होत असतात. विविध विषयी वायू त्या  वायूंचा या कामगारांच्या श्वसन संस्थेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असतो. याचा घातक परिणाम

म्हणजे त्याचे कॅन्सर / टी.बी. मधे सुद्धा रुपांतर होत असते. पावसाळ्यात तर या कामगारांना खूपच त्रास सहन करावा लागतो. रात्री विंचू साप निघण्याचे प्रकारही खूप घडतात. त्याचप्रमाणे आजूबाजूच्या अस्वच्छ परिसरामुळे रात्री डासांचेही साम्राज्य अधिक आहे. त्यामुळे या कामगारांना सतत ताप, खोकला सर्दी अंगदुखी अशा आजारानाही सामोरे जावे लागते. आज ज्या अवस्थेत हे कामगार इथे राहत आहेत ती अतिशय गलिच्छ दयनीय अशी अवस्था आहे. या संदर्भात आता गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून या कामगारांसाठी निवासी घरांची योजना हाती घेण्यात आली आहे. मात्र ही घरे कामगारांना मोफत की भाडे तत्वावर उपलब्ध होणार या गोष्टी अजून स्पष्ट झालेल्या नाहीत. आज कामगारांच्या साठी म्हणून जी घरे बांधली जात आहेत ती या कामगारांच्या कामाच्या ठिकाणापासून अतिशय दूर आहेत. त्यामुळे या राहत्या घरापासून इथे प्लॉटवर येण्यासाठी कामगारांना कमीत कमी २० ते २५ मिनिटे लागणार आहे. आज ज्या प्लॉटवर हे कामगार काम करतात त्याच प्लॉटवरच्या समोर किंवा त्याच्या आजूबाजूच्या परिसरात ते राहत आहेत, जेवणाची सुटी एक तासाची असते या सुटीत हे एवढ्या लांब ठिकाणी रहायला गेल्यावर घरी पोहोचणार कधी जेवणार कधी  आणि कामावर वेळेवर येणार कधी हे प्रश्नही उपस्थित होणार आहेत. उशीर झाला तर पुन्हा कामावर घेतले न जाण्याची भीतीही आहे. त्यामुळे आज जी घरांची संकल्पना साकारली जात आहे ती या कामगारांना कितपत फायदेशीर ठरेल अशी साशंकता मनात निर्माण होत आहे.

वास्तविकता ज्या मूलभूत गरजा या कामगारांना आवश्यक आहेत त्याच त्यांना योग्य वेळी मिळत नाही. आपण आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीतच बोलत आहोत तर या कामगारांना चांगले साधे पिण्याचे पाणीही व्यवस्थितरित्या उपलब्ध होत नाही. प्लॉटधारक एखादी बादलीभर पाणी भरण्याची परवानगी देतो. पण यांची राहण्याची जागा आणि प्लॉट मधून मिळणारे बादलीभर पाणी यासाठी त्यांना प्रचंड श्रम घ्यावे लागतात. त्यामुळे या कामगारांना पाणी विकतच घ्यावे लागते. अस्वच्छ पाण्याने आंघोळ केल्यास विविध त्वचारोगांना सामोरे जावे लागते. समुद्रात आंघोळ करावी तर समुद्राच्या खाऱ्या पाण्याचाही त्रास त्वचेला होतो. त्यामुळे तीही गोष्ट संयुक्तिक ठरत नाही. समुद्राचे पाणीही जहाजातील वंगण तेल सतत पडल्याने आजूबाजूच्या परिसरातील समुद्राचे पाणीही दुषित झालेलेच पहायला मिळते. त्यामुळे त्या पाण्याचाही म्हणावा तसा उपयोग होत नाही.

आज इथे सुमारे ३०००० कामगार काम करत आहेत. ते सर्वजण २५ ते ५० वयोगटातील आहेत. आधीच वर ऊल्लेख केल्याप्रमाणे हे कामगार आपल्या कुटुंबापासून खूप दूर राहत आहेत. त्यात सर्व जण बहुतांशी युवा अवस्थेतील असल्याने व एकाच खोलीत दहा बारा जण एकत्रित राहत असल्याने शारीरिक गरजा भागविण्यासाठी इथे समलैंगिक संबंधही प्रस्थापित होत असल्याची शक्यताही निर्माण होत आहे. फक्त पुरुष कामगार असल्याने वेश्यावृत्तीलाही चालना मिळत आहे. त्यामुळे काही कामगार आज एडस् या रोगाचे बळी ठरलेले आहेत. त्यामुळे सफाई कर्मचारी हे फक्त महत्त्वाचे रस्ते तेवढेच झाडतात. पण ज्या ठिकाणी हे कामगार राहतात तिथे कुठल्याही प्रकारची स्वच्छता केली जात नाही. त्यामुळे इथे सातत्याने घाणीचे साम्राज्य वाढत जाते. व डास, माश्या व इतरही जीवजंतूमध्ये संसर्गजन्य रोग पसरण्यास मोठा हातभार लागतो. त्यामुळे स्वच्छतेच्या अभावामुळे या कामगारांना अनेक आरोग्याच्या समस्यांनाही सामोरे जावे लागते.

## पर्यावरण, प्रदुषण व मानवी आरोग्य :

पर्यवरण म्हणजे आपल्या भोवतालचा परिसर, ज्यात हवा, पाणी, जमीन व वृक्ष इ. घटक समाविष्ट आहेत. याच पर्यावरणाचा समतोल बिघडला की प्रदुषणात वाढ होते. हवा पाणी आणि जमीन यांच्या भौतिक, जैविक किंवा रासायनिक द्रव्यांमध्ये झालेल्या अनिष्ठ परिवर्तनामुळे जीवनमानाचे आरोग्य, सुरक्षा आणि कल्याण यांना हानी पोहोचते यालाच प्रदुषण म्हणतात.

प्रदुषण हे नैसर्गिक व मानवनिर्मित असते. नैसर्गिक प्रदुषणात वादळे, ज्वालामुखी अवर्षण इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. तर मानवनिर्मित हवा प्रदुषण हे उद्योगधंदे निर्मिती प्रक्रिया, वाहने घरगुती वापराचे ज्वलन या सर्वांतून होत असते. याशिवाय शहरीकरण वाढते. औद्योगिकीकरण लोकसंख्येची वाढ या गोष्टीमुळेही प्रदुषणात वाढ होत असते.

मानव व त्याच्या सभोवतालचे नैसर्गिक पर्यावरण या संबंधातून मानवनिर्मित पर्यावरण अस्तित्व येत असते. या दोन्हीतील बदलांचा परिणाम हा मानवी जीवनावर होत असतो.

आणि ही बाब अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांच्या बाबतीतही आज लागू होत आहे. आज, इथेही अनेक सुधारणा होताना दिसून येत आहेत तरीही कामगारांचे राहणीमान.

सतत आग, विविध प्रकारचे वायू व रासायनिक द्रव्ये. त्यांचे राहणीमान व आजूबाजूच्या परिसराचा पर्यावरणाचा कामगारांच्या आरोग्यावरही परिणाम होत असतो.

(डॉ. नीलम ताटके : समाजकार्य कोश : २००८ पृष्ठ : १२५, १२८)

**स्थानिक लोकांचे वर्चस्व व सुरक्षा :** शीपयार्डात येणाऱ्या स्थलांततिर कामगारांना सातत्याने स्थानिक लोकांच्या वर्चस्वाखाली दबून रहावे लागते. या लोकांना प्रत्येक गोष्टीत समायोजन करावे लागते. यांना कोणत्याही प्रकारची सुरक्षितता मिळत नाही.सदैव ते स्थलांतरित असल्याचे त्यांच्या मनावर बिंबवले जाते. त्यामुळे स्थानिक लोकांच्यापुढे त्या लोकांची जरी कोणतीही चूक नसली तरीही त्यांना सतत एका अनामिक भीतीपोटी जीवन जगावे लागते.

## सामाजिक नियमने :

समाज संरचनेच्या स्थिरत्वासाठी सामाजिक नियमने महत्त्वाची ठरतात. समाजात स्थिरता सुरक्षा प्रस्थापित व्हावी यासाठी समाजात वर्तन व्यवहाराच्या पद्धती त्या समाजाच्या संस्कृतीतील नियमनाद्वारे निर्धारित केले जातात. व्यक्तीच्या वर्तनाची योग्य – अयोग्यता हे दर्शविणारे जे नियम समाजात तयार झालेले असतात त्यांनाच प्रमाणके किंवा नियमने असे म्हणतात.

हॅरी जॉन्सन यांच्या मते, वर्तनावर नियंत्रण ठेवणारा जो प्रतिमान आपण मनात बाळगतो, त्यालाच प्रमाणके म्हणतात.

तर थॉमस इलियट यांच्या मते, ‘समाज संमत असलेल्या व समाजाकडून अंमलात येणाऱ्या अनेक आदेश व निषेधाचा संच म्हणजेच प्रमाणके होत. या प्रमाणकांना अनुषंगून व्यक्ती प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्याचे आचरण करत असतात आणि अशा सुयोग्य आचरणामुळेच समाजात सुरक्षा ऐक्य शांती नांदत असते.

आजच्या आधुनिक समाजात नागरीकरण व औद्योगिकीकरणाबरोबरच समाजव्यवस्थेत आज मोठा बदल होऊ लागला आहे. व या समाजासमोर मुल्य हीनतेची समस्या निर्माण झाली आहे. जुनी मुल्ये आज कमकूवत झाली आहेत. परंतु याची जागा नवीन मूल्यांनी न घेतल्याने व्यक्तींचे वर्तन स्वच्छंदी होऊन समाजांगर्तग अनेक प्रकारच्या समस्या आज डोके वर काढू लागल्या आहेत. त्यामुळे स्वार्थीवृत्ती, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, स्वैराचार इत्यादी बाबी पुढे येऊन फक्त पैशासाठी माणूस आज कोणत्याही थराला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच समाजात

आज अस्थिरता वाढत असल्याचे दिसून येत आहे. पण समाजात स्थिरता आणि सुरक्षितता जपण्यासाठी या मूल्यांची नितांत आवश्यकता आहे. मर्टन यांच्या मते सुद्धा व्यक्ती–व्यक्तीमध्ये परस्पर आंतरक्रिया व निश्चित स्वरुपाचा सामाजिक संबंध निर्माण झाले की, समाजात स्थिरता आणि एकमेकांबद्दल एकात्मतेची जाणीव निर्माण होते. (डॉ. दिलीप खैरनार, : समाजशास्त्र परिचय : पृष्ठ ११७, १२०, १२५)

## असुरक्षिततेच्या भावनेतून निर्माण होणारे ताणतणाव :

अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांना विविध मूलभूत प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर हे सर्वच कामगार स्थलांतरित असल्यामुळे त्यांना मनात सातत्याने असुरक्षिततेची भावना निर्माण होत असते. या असुरक्षिततेच्या भावनेच्या पाठीमागे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आर्थिक असुरक्षितता आहे. कारण कोणत्याही उद्योगात तेजी व मंदी या गोष्टी आपल्याला सातत्याने पहायला मिळतात. कारण जेव्हा इथे बंदरात जहाजे आहेत तेव्हाच या कामगारांना काम उपलब्ध होते. जेव्हा जहाज नाही तेव्हा त्यांना एक तर पुन्हा आपल्या गावी परतावे लागते किंवा बेरोजगारीचा सामना करावा लागतो. याचबरोबर यांत्रिकीकरणाचा प्रभावही या कामगाराच्या कौशल्याबरोबरच त्याच्या मनावरही विपरित परिणाम करत असतो. त्यामुळेही त्याच्या मनात विफलता घर करून बसते. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी असणारे भौतिक वातावरण पोषण असणे जरुरीचे आहे व कामाच्या ठिकाणी असणाऱ्या वरिष्ठांशीसुद्धा कामगारांचे योग्य संबंध असणे गरजेचे असते. या गोष्टी जर योग्य नसतील तर कामगारांना या सगळ्या असुरक्षिततेच्या भावनेतून अनेक ताण सहन करावे लागतात. कामगारांपुढे आर्थिक ताण ही एकच बाजू नसते तर त्यांना भावनात्मक व सामाजिक तणावांनाही सामोरे जावे लागते. या ताणांच्या असह्यपणामुळे या कामगारांना 'उद्याचा प्रश्न' हा कायम भेडसावत असतो. त्यामुळे आर्थिक सुरक्षितता ही कामगारांच्या दृष्टीने खूपच महत्त्वाची गोष्ट आहे.

(प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे : औद्योगिक समाजशास्त्र; पृष्ठ १९०, १९१)

उलरिक बेकच्या मतानुसार आजचा समाज हा आव्हानात्मक समाज (Risk Society) झाला आहे. जागतिकीकरणामुळे सर्वच स्तरावर आंतरराष्ट्रीय कंपन्याच्या स्पर्धेचा दबाव वाढत आहे. स्थानिक बाजारपेठेवर सावकार, मोठा जमीनदार, दलाल यांचे वर्चस्व असल्याचे दिसून येत आहे

आणि या विषमतेचा परिणाम हा शेतकऱ्यांप्रमाणेच सर्वसामान्य जनतेलाही त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. जागतिकीकरण प्रक्रियेचाही समाजजीवनावर परिणाम हा होतच असतो.

(प्रा. जगन कराडे : जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, पृष्ठ १२०)

## अमर्त सेन यांचे विचार :

अमर्त्य सेन यांनीही समाजातील दुर्बल घटकांविषयी आपले विचार मांडताना सांगितले आहे की, आपल्याला उपलब्ध साधनसामग्रीच्या विवेकपूर्ण उपयोगाने मानवाचे हीत साधणे हा आहे. दुर्बल घटकांच्या समस्या कमी करुन एकूणच समाजाच्या कल्याणात वाढ करण्यासाठी योग्य अशा धोरणांचा अवलंब करण्याची खरी गरज असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्याकडे लक्ष पूरवून त्यांच्या आरोग्याची पातळी उंचावणे, निरक्षरता घालवून शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणे. स्त्री. पुरुष भेदभाव नष्ट करुन सर्वांना सगळ्याच बाबतीत समान हक्क प्राप्त करुन देणे. आणि सामाजिक ऐक्य सामाजिक शांती टिकवून ठेवण्यासाठी सुद्धा प्रयत्न केले गेले पाहिजेत यावरही त्यांनी भर दिला होता.

(डायमंड सामाजिक ज्ञानकोश : खंड ३ रा पृष्ठ १९७३–७४)

## ४.३ समारोप :

प्रकरण चौथ्यामधे आपण प्रामुख्याने अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांच्या मूलभूत प्रश्नाविषयी सविस्तर विवेचन केले आहे. अलंग शीपयार्डात काम करणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित असून ते सर्वच्या सर्व परराज्यातून इथे काम करण्यासाठी आलेले आहेत. व त्यांना इथे काम करताना सगळ्याच गोष्टीत समायोजन करून काम करावे लागते. त्याचप्रमाणे या स्थलांतरित असंघिटत कामगारांना इथे अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यात प्रमुख पहिला प्रश्न हा भाषेचा असतो. बहुतांशी कामगार हे हिंदी व बंगाली भाषिक आहेत. पण इथे गुजराथ राज्यात स्थानिक भाषा ही गुजराथी आहे. त्यामुळे स्थानिक लोकांशी बोलताना त्यांना भाषेचा मोठा अडथळा जाणवतो. त्याचप्रमाणे या कामगारांना निवासाची व्यवस्था ही स्वत:चीच स्वत:ला करावी लागते. निवासाच्या ठिकाणी त्यांना पाण्याची सुविधा उपलब्ध होत नाही. घरात वीजेचे कनेक्शन नाही. शौचालयाची व्यवस्थाही नाही. अशा मुलूभूत प्रश्नांसाठीही त्यांना सातत्याने झगडावे लागते. कामाच्या ठिकाणी या कामगारांना मुकादमांच्या मक्तेदारीलाही सामोरे जावे लागते. त्यांना मिळणारे वेतन व जादा तासाचे पैसेही योग्य प्रमाणात मिळत नसल्याची भावना या कामगारांच्या मनातून दिसून आलेली आहे. हे कामगार इथे उधारीवर सामान घेतात ते उधारीवर घेतल्याने ते त्यांना दामदुप्पटीने विकत घ्यावे लागते. तसेच रात्रीच्या वेळी या कामगारांना गुंड प्रवृत्तीच्या लोकांचाही सामना करावा लागतो. या कामगारांना आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीतही खूप काळजी घ्यावी लागते. कामगारांमध्ये एकीचा अभाव व कुठलीही संघटना या कामगारांच्या पाठीशी नसल्याने यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अलंग रिसायकलींग शीपयार्डातील या स्थलांतरित कामगारांना आजही अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. या पुढील पाचव्या प्रकरणात आपण स्थलांतरित कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षिततेच्या बाबतीत विवेचन पाहणार आहोत.

## संदर्भ सूची :


1) Breman Jan. 1994, wage hunters and catherrs search for work in urban and rural economy of south gujarat. oxford university press, New Delhi.

2) Breman Jan, 1996, Footloose labour, Cambridge University press.

3) Breman Jan. Das arvind 2000 Down and out labouring undar global captializam.

4) Biswaroop 2015 migrant labours in urban areas for social studies surat.

5) D. P. Saxena (1977), migration in India, popular Prakashan Mumbai.

6) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड ३ रा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

7) Ghanshyam shah (1990), migrant labour in india center for social studies surat.

8) डॉ. बी.आर. जोशी, समाजशास्त्र मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

9) Jhabvala Renna & subrmeinam the unorganised sector work, security and social protection SAGE Publication, New Delhi.

10) डॉ. दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

11) प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, २०१३,

12) Kothari and visaria-1984 Rural Urban migration in Gujart in Analisis of census Delta.

13) S.P. Institute of eco. & Sociology Reserech Ahmedbad.

14) Dr. W. N. Salve Reports on Labour rights and Labour Standards for migrant labour in India.

15) M.S.A. Rao 1986

16) डॉ. नीलम ताटके, समाजकार्य कोश २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

17) Studies in migration Internal and International migration in India.

118) Madam G.R. 2009, Indian Social Problems, Allied Publisher mumbai.

11) Ram Aahuja 2007 Social Problems in India Rawat Publication. Jaipur.

12) Ram awtar 1971, Lectures on labour problems and social welfare in India.

13) Ram Aahuja 2007, social problems in India Rawat Publication Jaipur.\

14) Sreenivasuil N.S. 2008, Human rights; many sides to coin. regal publisher new Delhi.

15) Smita panjour 2007, Locked homer empty school, Zubben , New Delhi.

16) T.K. PANDA & P. MAHAPATRA 1997 Report on working and living condition of oriya migrant labours.

17) T.N. Bhogiwal 1965, Labour problems in India, Kitabghar, Kanpur.

18) Tribhwan Robin, Jayshree Patil 2009 Stone quarry workers, Discovery Publishing house, New Delhi,

19) Tribhuwan Robin & Karche Jayshree Child labour and right issue. Astudy of migrant labour, Discovery Publishing house, New Delhi

21) मराठी विश्वकोश खंड १३ (२०००)

22) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ ला व २ डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७)

23) गुरुनाथ नाडगोंडे (२०००) कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे २.

24) सामाजिक विचार प्रवाह, प्रा. पी. के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर.

25) गणपति शंकर १९८२, मंथन कर्णकृष्ण भाग– १,

26) गोरे एम. एस. १९७८, शहरीकरण व कौटुंबिक परिवर्तन.

27) कौशिक आर शुक्ल, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, सरदार पटेल, युनिर्व्हसिटी.

28) डॉ. सुमनबेन चौधरी, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध भावनगर, युनिर्व्हसिटी.

## Internet Webside

1) www.gmb.ports.org

2) www. asain academic

3) www.industiral union.org

4) www. shipbraking platform.org

5) www.lucion marnine.com

**प्रकरण ५ वे**

**प्रस्तावना :**

## कामगारांचे स्थलांतर आणि त्यांची आर्थिक सामाजिक परिस्थिती :

समाजात शहरीकरण आणि औद्योगिकरण या दोन महत्त्वाच्या प्रक्रीयमुळे आपोआपच खेड्यातील तरुण वर्ग हा रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतो. आज जरी खुले आर्थिक धोरण औद्योगिकीकरण झाले असले तरी सुद्धा वाढती लोकंसख्येमुळे बेकारीचा प्रश्नही तितकाच गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे स्थलांतर प्रक्रियेला चालना मिळाली आहे. आज दळणवळणांची साधने व्यापार आणि आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अर्थाजन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले जात आहे. आणि स्थलांतर ही एक सामाजीक प्रक्रिया असून अगदी प्राचीन काळापासून ते आजच्या अगदी संगणकाच्या युगापर्यंत आपल्याला ही स्थलांतराची प्रक्रीया दिसून येत आहे.

आज फक्त अर्थाजनासाठीच नाही तर शिक्षण उत्तम व्यवसायाच्या संधीमुळेही स्थलांतर होताना दिसून येत आहे. आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन स्तरावर आपल्याला स्थलांतर दिसून येत आहे.

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत आणि त्या गरजांची अधिकाधिक चांगल्या रीतीने पूर्तता करण्यासाठी आपले जीवनमान उंचावण्यासाठी अर्थाजन करणे जरुरीचे आहे आणि त्यासाठी तो प्रयत्नशील असतो. आपल्या उद्देशापर्यतं पोहचवण्यासाठी मानव सातत्याने प्रयत्नशील असतो आणि त्यासाठीच तो स्थलांतर करत  असतो.

अगदी प्राचीन काळपासून स्थलांतर ही प्रक्रीया सुरु असून धर्माचा प्रचार व्यापार या दृष्टिकोनातून सुरवातीला स्थलांतर केले जात होते. त्यानंतर औद्यौगिकीकरण, वाढते शहरीकरण, शहरीकरणामुळे शहरात उपलब्ध होणारे विविध रोजगार त्यामुळे अगदी अशिक्षितापासून ते सुशिक्षितांपर्यंत तसेच कुशल ते अकुशल अशा सगळ्याच प्रकारची लोक स्थलांतराला प्रवृत्त होत असत. भारतात स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. खेड्यातनू खेड्यातून २) खेड्यातून शहराकडे ३) आणि शहरातून शहराकडे तसेच शहराकडून खेड्याकडे असेही स्थलांतर आपल्याला दिसून येत आहे.

स्थलांतरापाठीमागे आर्थिक घटक महत्त्वाचा असला तरी सुद्धा ती एक सामाजिक प्रक्रीया आहे. या प्रक्रीयेला सामाजिक संदर्भ आहेत. आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी माणूस स्थलांतर करतो.

आणि स्थलांतर हे ऐच्छिक आणि अनैच्छिक अशा दोन स्वरुपाचे असते. काही वेळा उत्तम संधीच्या निमित्ताने स्थलांतर केले जाते तर काही वेळा नाईलाजाने परिस्थितीवशतेमुळे स्थलांतर करावे लागते.

कामगारांचे स्थलांतर हे प्रामुख्याने आहे त्या परिस्थतीतून बाहेर पडण्याची प्रबळ इच्छा. कुटुंबातील संघर्ष, दारिद्र्य मिटविण्यासाठी आहे त्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी ज्या ठिकाणी त्यांना काम उपलब्ध होईल त्या ठिकाणी स्थलांतर करण्याची या कामगारांची तयार असते.

भारतात आणि गुजराथ राज्यातही विविध उद्योगधंद्याना मिळालेल्या चालनेमुळेच स्थलांतर प्रक्रीयेला गती प्राप्त झालेली दिसून येत आहे. आणि आजकाल शेतीवर अवलंबून राहणे तितके संयुक्तिक ठरत नसल्याने आज रोजगारासाठी जिथे उद्योगधंदा आहे तिथे स्थलांतर होताना दिसून येत आहे. १९९५ नंतर या स्थलांतर प्रक्रियेला खूपच गती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अलंग शीप ब्रेकींग यार्डात काम करणारे स्थलांतरित कामगार हे सरळ आपल्या राज्यातून निघून एवढ्या दूरवर कामाला आलेले आहेत. काही कामगारांनी कामाच्या निमित्ताने दुसरीकडे स्थलांतर केल्याचे दिसून येत आहे.

अलंग येथे जे स्थलांतरित कामगार आहेत त्यांच्या स्थलांतराचे स्वरुप हे हंगामी स्वरुपाचे आहे. कारण जो पर्यंत जहाज तोडणीला उपलब्ध आहे तो पर्यंत हे कामगार काम करतात. व ज्या वेळेला काम नाही किंवा पावसाळ्यात शेतीच्या कामाच्या निमित्ताने हे कामगार आपल्या मूळ वतनी निघून जातात. व पुन्हा चार महिन्यांनी अलंगाला येतात. यांना कायमस्वरुपी  कामाची हमी आहे असेही सांगता येत नाही.

इथे येणारे कामगार हे प्रामुख्याने एकटेच स्थलांतर करतात. आणि चांगला रोजगार मिळवणच्या दृष्टिकोनातून ते इथे स्थलांतर करतात. आपल्या कुटुंबाना ते आपल्या मूळ गावीच ठेवून येतात. काही कामगार अलंग येथे रोजगारातला स्वेच्छेने येतात काही जणांना मनाविरुद्ध कुटुंबाच्या पालनपोषण करण्यासाठी इथे येणे भाग पडते, त्यांच्या मुळ वतनाच्या इथे रोजगारीचे कुंलेही साधन उलब्ध न झाल्याने ते लोक एवढ्या दूरवर इथे स्थलांतर करत असतात. अणि तिथे काम जरी मिळाले तरी मिळणारे वेतन हे अतिशय तटपुंजे असते. त्यामुळे त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करणे शक्य होत नाही. आणि जरी शेती असली तरी त्यातून कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळत नाही. या सर्य कारणांमुळे या कामगारांना स्थलांतर करावे लागते.

अलंगाला येण्यापूर्वी  या शीप ब्रेकींग यार्डाची थोड्याफार प्रमाणात माहिती मिळवतात आणि मग स्थलांतरित होतात. काही ओळखीच्या लोकांच्या तर काही मुकादमाच्या माध्यामातून इथे कामाला आलेले असतात.

या स्थलांतरित कामगारांना अलंग येथे प्रामुख्याने आर्थिक प्रश्नाबरोबरच भाषा, स्वतःच्या कुटुंबाविषयीची काळजी आणि इतर लोकांचे सहकार्य मदत कशी मिळेल या सदंर्भातले प्रश्न त्यांना सतत भेडसावत असतात.

या स्थलांतरित कामगारांना सुरुवातीला इथे काम करताना भाषेची मोठी अडचण असते. इतर राज्यापेक्षांही ओरिसा राज्यातील कामगारांना ही अडचण प्रामुख्याने जाणवते. तसेच कुटुंबाच्या जबाबदारीची चिंताही त्यांना सातत्याने भेडसावत असते.

आज अलंग शीप ब्रेकींग यार्डात काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक वेतन मिळत असल्याने आपल्या गरजेपुरते पैसे बाजूला ठेवून हे कामगार दरमहा  आपल्या कुटुंबियांच्या जीवनात आमुलाग्र बदल आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पण वाढती महागाई त्यामुळे आर्थिक सुधारणा झाली त्याचबरोबर आता अनेक खर्चही वाढल्यामुळे खर्चाचा ताळमेळ बसणे थोडे कठीण जात आहे.

अलंग शीपयार्डात कामासाठी आलेले हे कामगार बाहेर राज्यातील असून ते उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, पं. बंगाल व झारखंड या गरीब राज्यातून इथे कामाला आल्याचे दिसून येत आहे. इथे काम करण्यासाठी आलेले कामगार हे २५ ते ५० वयोगटातील असल्याचे आढळून आले आहे. अतिशय कष्टप्रद अशा कामामुळे इथे युवा वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे कामगारच जास्त करुन पहायला मिळत आहेत.

अलंग शीप यार्डात काम करणारे कामगार हे उच्च जातीचे आढळून आले आहेत. पण ते आर्थिक दृष्ट्या अतिशय कमकुवत आहेत. त्याचप्रमाणे अशिक्षित कामगारांचे प्रमाण अधिक आहे. मात्र हिंदु आणि मुस्लिम या दोन्ही धर्माचे कामगार इथे काम करताना आढळत आहेत.

इथे काम करायला आलेले बहुतांशी कामगार हे विवाहित आहेत. त्यामुळे आपल्या कुटुंबियांना ते मूळ आपल्या वडीलधाऱ्या माणसांच्या सोबत ठेवून निश्चितपणे स्थलांतर करु शकतात. त्यामुळे कुटुंबियांविषयी त्यांना काळजी वाटत नाही.

अलंग इथे एवढ्या दूर कामाला आल्याने या कामगारांना कुटुंबाचा सहवासही लाभत नाही. त्यामुळे विभक्ततपणा आणि एकटेपणाचा त्यांना थोडाफार त्रास होतोही, त्यामुळे त्यांचा मानसिक स्थितीवर विपरीत परिणाम होत असतो. या परिस्थितीचे समायोजन करण्याचाही ते प्रयत्न करतात. परंतु काही त्यात यशस्वी

होतात तर काही व्यसनांचा आधार घेतात. त्यात दारु, सिगारेट, जुगार आणि वेश्याकडे जाऊन आपली शारीरिक इच्छा पूर्ण करतात. काही समलैंगितेचाही आधार घेतात. या साऱ्या गोष्टींचा आजूबाजूच्या परिसरावरही विपरीत असा परिणाम होत  असतो.

एकंदरीत गरीबी, बेरोजगारी, कुटुंबातील सदस्य संख्या जास्त त्या सर्वांची जबाबदारी पेलणे अशक्य होते. शेती असूनही नुसत्या शेतीवर अवलंबून राहून चालत नाही. कुटुंबातील सदस्य संख्या अधिक असल्याने वयात आलेल्या मुलांना कोणत्या ना कोणत्या कामाला लावून कुटुंबाच्या पोषणासाठी आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न करणे. त्यामुळे या मुलांना शिक्षणापासूनही वंचित रहावे लागते. आणि शिक्षण कमी असल्याने या लोकांना मजूरी करण्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय उरत नाही. त्यामुळे या अशा सर्व कारणांमुळे त्यांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. परंतु स्थलांतर करुनही त्यंच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीतही फारसा बदल झालेला दिसून येत नाही.

## ३) स्थलांतरित कामगारांवर होणारा प्रभाव :

अलंग इथे कामाला आलेल्या या स्थलांतरित कामगारांना इथे नव्या ठिकाणी आल्यावर प्रत्येक गोष्टीत समायोजन करावे लागते. या इथे असणारे अतिशय कष्टप्रद असे काम कुटुंबापासून दूर आल्यामुळे निर्माण झालेली विभक्तता व एकटेपणा या साऱ्या गोष्टी विसरण्यासाठी ते कोणत्या ना कोणत्या कारणाने आपल्या मूळ वतनी परत जात असतात. एखाद्‌ा मोठा सण, लग्न प्रसंग, धार्मिक कार्य किंवा शेतीच्या कामाच्या निमित्ताने हे लोक वर्षातून किमान दोनदा तरी आपल्या मूळ वतनी परत जातात. पण तेव्हाही येण्याजाण्याचा खर्च आणि कुटुंबासाठी द्यायवाची ठराविक रक्कम या साऱ्या गोष्टीचा ताळमेळही त्यांना घालावा लागतो. कुटुंबातील सदस्य अलंग इथे येण्यापेक्षा हे कामगारच आपल्या मूळ वतनी जाऊन कुटुंबियांना भेटणे पसंद करतात, कारण कुटुंबाला एवढ्या दूर येणे शक्य नाही व परवडणारेही नाही.

कुटुंबातील लग्न कार्य, धार्मिक सामाजिक कार्यासाठी मूळ वतनी सर्वांना एकत्रित आणणे शक्य होते. कारण अलंग इथे कामगारांचाच राहण्याचा ठावठिकाणा योग्य नसल्याने हे कामगारच आपल्या मूळ वतनी जाऊन प्रासंगीक कराराच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची पसंदगी दर्शवितात.

उत्तर प्रदेश बिहार मधील स्थलांतरित कामगार अशा कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहतात. वेळ पडल्यास ते इथले काम अर्धवट सोडून जेवढे दिवस भरले आहेत तेवढे पैसे घेऊन आपल्या गावी जातात. कुटुंब आणि समाजाशी आपली जोडलेली नाळ तूटू नये ही भावना त्या पाठीमागे असते. मात्र

ओरिसा व पं.बंगाल मधील स्थलांतरित कामगार मात्र अश्या छोट्या मोठ्या कारणासाठी लगेच घरी जाणे पसंद करत नाहीत.

ज्याप्रमाणे हे एखाद्या धार्मिक किंवा कौटुंबिक कार्यक्रमात सणाच्या वेळेत उपस्थित राहून त्या कार्याला हातभार लावण्यचा प्रयत्न करतात. त्याच प्रमाणे कुटुंबाला उपयुक्त असणाऱ्या अशा दैनंदिन गरजेच्याही कित्येक गोष्टी खरेदी करुन ते आपल्या कुटुंबाचा आर्थिक सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करत असतात.

या कामगारांच्या अनुपस्थितील इथल्या घराची देखभाल कुटुंबातील सदस्यांची काळजी हे वडील किंवा भाऊच घेत असतात. तेही घर जमीन यात कशी सुधारणा करता येईल त्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात.

आपल्या कुटुंबाचा उत्कर्ष करण्यासाठी सुद्धा हे धडपडत असतात. त्याचप्रमाणे दिवाळी, दुर्गापूजा, होळी, ईद अशा मोठ्या व महत्त्वाच्या सणांना सुद्धा उपस्थित राहून कुटुंबासोबत राहण्याच्या या कामगारांचा प्रयास असतो. आणि थोडे दिवस कुटुंबा सोबत घालविल्यानंतर पुन्हा हे कामगार अलंग येथे कष्टप्रद काम, करण्यासाठी अर्थाजनासाठी परत येत असतात.

## जागतिकीकरणाचा समाजावर होणारा परिणाम :

जागतिकीकरणाने आज भांडवलशाही पुढे आणली आहे. ती श्रमाच्या जागेवर भांडवल आणण्याचा सातत्याने प्रयत्न करत असली तरी सुद्धा आज इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमामुळे जागतिकीकरणाचे सांस्कृतिक परिणाम भारताच्या शेवटच्या माणसापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. जागितीतरक सांस्कृतिक परिणाम भारताच्या शेवटच्या माणसापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. जागतिकीकरणातून निर्माण होणारी सत्ता, स्पर्धा, अराजकता, सांस्कृतिक संघर्ष उदारमतवाद व विषमता या गोष्टीचीसुद्धा आज भारतीय समाजाला पूर्णपणे जाणीव झालेली आहे. या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत सांस्कृतिक संघर्ष व एकात्मता टिकवण्याचे प्रयत्न केले जातात. संपत्तीची प्रचंड वाढ व त्यातून गरिबी व श्रीमंती ही दरी वाढलेली दिसून येते. या सर्व बाबींचा परिणाम हा भारतीय समाजव्यवस्थेवर होताना दिसून येत आहे. या गोष्टीमुळे समाजव्यवस्थेत बदल होत आहे आणि त्यातूनच काही सामाजिक समस्या निर्माण होत आहेत आणि त्याचा सर्वाधिक प्रतिकूल परिणाम सामाजिक नियंत्रणावर होताना दिसून येत आहे आणि सामाजिक शांतता बिघडण्यापाठीमागे याही घटकांचा प्रभाव आहे (डॉ. दिलीप खैरनार : समाजशास्त्र परिचय : पृष्ठ ३३५)

## जागतिकीकरणाचा – सामाजिक – सांस्कृतिक परिणाम :

जागतिकीकरणामुळे विविध संस्कृती धर्म, भाषा आचार विचार, खाद्य पदार्थ याची मोठ्या प्रमाणात देवाण घेवाण सुरु झाली. चंगळवाद, स्त्री–पुरुष संबंधातील नको इतका मोकळेपणा मूल्याचा ऱ्हास, व्यक्तिस्वातंत्राचा अतिरेक, कुटुंब संस्थेचे महत्त्व कमी होणे, कुटुंबाच्या प्रत्येक व्यक्तिच्या पारंपारिक भूमिकेत बदल नैतिकतेचा ऱ्हास अशा अनेक गोष्टी घडताना दिसून येत आहेत.

पाश्चात्य शिक्षण, स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. वाढती व्यसनाधीनता निकोप संबंध नसणे. परस्परांविषयी आस्था नसणे. स्वार्थीपणा हे दुष्परिणाम आलेले दिसून येत आहेत. मानसिक आजार, वृद्धांच्या समस्या वाढलेल्या आहेत. चंगळवादामुळे – माध्यमाच्या प्रभावामुळे, जीवनाचे जगण्याचे फसवे चित्र डोळ्यासमोर उभे केले जात असल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

आज आपल्या समाजातील सामाजिक सुरक्षितता बिघडण्यापाठीमागे या साऱ्या गोष्टीचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव होताना दिसून येत आहे. गरीबी आणि बेरोजगारी मुळे स्थलांतर करणारे कामगार या कामगारांना कामावर ठेवण्यापूर्वी खूप वेगळी स्वप्ने दाखवली जातात. परंतू वास्तव मात्र काही वेगळेच असते. आणि या साऱ्या गोष्टी एका साखळीप्रमाणे एकमेकांशी बांधलेल्या असतात.

(डॉ. नीलम ताटके ; २००८ समाजकार्य कोश : पृष्ठ – १६०–६१)

## ४) अलंग येथील स्थलांतरित असंघटीत कामगार

अलंग रिसायकलिंग शीप ब्रेकींग यार्डात आज सुमारे ३० हजार इतके स्थलांतरित कामगार काम करत आहेत. या कामगारांची अलंग – सोसियो वर्कस असोसिएशन नावाची संस्थाही अस्तित्वात आहे. वास्तविकता या उद्योगाला फॅक्टरी ॲक्ट लागू आहे. पण त्या कायद्याची अंमलबजावणी इथे केली जात नसल्याने या कामगरांना जे फायदे मिळायला पाहिजे ते मिळत नाहीत. इथे काम करणारे कामगार ते अगदी सहा महिन्यापासून ते २० वर्षाहून अधिक वर्षे काम करणारे कामगार इथे आहेत जे अनेक वर्षापासून इथे काम करत आहेत. त्यांना आता या कामातच स्थिरता आलेली आहे. ते इथेच काम करुन आपल्या जीवनाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत. तरीही अलंग येथेच कायम स्वरुपी वास्तव करण्यास मात्र हे कामगार तयार नाहीत. कारण अलंग शीप यार्डात कधी आले तर खूप काम असते. आणि काही वेळा दोन तीन महिने असेच बसूनही काढावे लागतात. अलंग शीपयार्डात काम करणेही तसे धोकादायक खूप आहे. वारंवार लगाणे, कापणे, भाजणे. स्फोट होणे अशा घटना तर घडतच असतात. त्यामुळे इथे

काम करणे म्हणजे मृत्यूला सोबत घेऊन फिरण्यासारखेच आहे. केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. तरीही आता सुरक्षिततेचे खूप नियम पाळले जात असल्यामुळे आता प्राणघातक अपघात होण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. तरीही या कामगारांची असे अवजड काम करण्याची मानसिक तयारी नसली तरी सुद्धा हे कामगार इथे काम करत आहेत. या कामगारांना ज्या मूलभूत सुविधा मिळायला पाहिजेत त्याही मिळालेल्या नाहीत त्यामुळ` ते इथे कायमस्वरुपी स्थाईक होण्यास ते तयार नाही. या कामगारांसाठी आता गृहप्रकल्प हाती घेतला आहे त्याचा पहिला टप्पा आता या डिबेंबर अखेर पर्यंत पूर्ण होईल परंतु आता जी घरे बांधण्यात आलेली आहेत. ती खूप दूर असल्याने या कामगारांना त्यांचा वापर करणे किती संयूक्तिक होईल हे पुढील काही दिवसातच स्पष्ट होईल.
इथे विविध राज्यातील लोक एकत्रितपणे ठिकठिकाणी राहताना दिसून येत आहेत. इथे काम करणारे सर्व पुरुष कामगार आहेत. या स्थलांतरित कामगारांमध्ये प्रामुख्याने गॅसकटर चे काम करणारे अधिक आहेत. त्या खालोखाल जोडीवाला, मालपाणी व इतर हेल्पर, बिगारीकाम करणारे कामगार आहेत.

काही कामगार हे मुंबई इथे काम करत असतानाच त्यांच्या मालकांनीच त्यांन अलंग येथे आणलेले आहे. त्यामुळे काही जहाज तोडण्याच्या कामात अनुभवी तर काही अगदीच नवखे आहेत. परंतु गुजराथ मेरी टाईम बोर्डातफे दिले जाणारे तीन दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागत;/ त्यानंतर त्यांना प्रमाणपत्र व कार्डही दिले जाते.  त्याशिवाय या कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम करण्याची अनुमती दिली जात नाही.

काही कामगार ओळखीच्या माध्यमातून काही मुकादमाच्या माध्यमातून तर काही स्वत:च इथे कामाला आलेले आहेत. सुरवातीला या कामगारांना खूप कमी वेतन दिले जाते. मात्र जसजसा कामाचा अनुभव येईल तसतशी वेतनात  वाढ केली जाते. पण प्रत्येक प्लॉटवर समान वेतनच असेल असेही सांगता येत नाही.

कामाच्या ठिकाणी सुद्धा या कामगारांना विशेष काही सुविधा दिल्या जात नाहीत. सर्वच प्लॉटधारक सुरक्षेचे सर्व साहित्य या कामगारांना पुरवितोच असे नाही. काही प्लॉटवर पुरविले जाते. काही ठिकाणी साहित्य पूरवून त्या साहित्याचे पैसे या कामगारांच्या वेतनातून कापले जातात, त्याच प्रमाणे पी.एफ. वगैरे सुविधा या कामगारांना मिळत नाहीत.

या कामगारांचा महिन्याचा खर्च २ ते ३ हजार रुपये आहे. त्यात घरभाडे, जेवण–खाण, चहापाणी व सिगरेट दारु तंबाखू या साऱ्या गोष्टीचा समावेश आहे. काहींचा तर याहूनही कमी आहे. यावरुनच त्यांचे

राहणीमान आणि त्यांचा सामाजिक दर्जाही लक्षात घेता येतो. कधी कधी कामगार – कामगार, मुकादम – कामगार किंवा मालक आणि कामगार यांच्यात वादाचे प्रसंगही निर्माण होतात. पण वास्तविकता कामगार आणि मालक हे दोघेही जण जहाज – तोडणीच्या कामासाठी परस्परांवर अवलंबून आहेत. उद्या मालकांनी जहाज खरेदी केली नाहीत किंवा कामगारांनी काम करण्यास नकार दिला तर हे कामच होणे शक्य होणार नाही. आणि स्थानिक कामगार हे अवजड अतिशय कष्टप्रद काम करुच शकणार नाहीत. ही सत्य सत्यताही नाकारता येत नाही. सगळेच मालक वाईट वागत नाहीत. काही कामगारांना खूप सहकार्य करतात. काही प्लॉटधारकांनी आपाल्या कामगारांसाठी निवास, पाणी, वीज याही सुविधा आपल्या प्लॉटच्या पाठीमागेच उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

## ५) अलंग शीप यार्डातील कामगारांची कार्यपद्धती :

अलंग शीप ब्रेकींग यार्डाला कोणत्याही प्रकारे शासनाकडून ज्या पद्धतीने या कामाला प्रोत्साहन व इतर सोयी सवलती दिल्या गेल्या पाहिजेत तशा मिळत नसल्याने इथे काम करणारे हे स्थलांरित कामगारही सर्व सुविधा मिळण्यापासून वंचित राहिलेले दिसून येतात. त्यामुळे फक्त परिस्थितीवशतेमुळे या कामगारांना इथे १० ते १२ तास अतिशय कष्टाचे काम करावे लागते. मात्र आपल्या अडीअडचणी समजून घेणारी यंत्रणाच नाही आणि असली तरी सुद्धा त्याचा काहीच उपयोग नाही. त्यामुळे या कामगारांना आहे त्या परिस्थीतीचा स्वीकार करुन काम करावे लागते.

अतिरिक्त जादा तास काम केल्यास त्याचाही योग्य मोबदला या कामगारांना दिला जात नाही. जास्त करुन काम हे उन्हाळ्याच्या दिवसात अधिक असते व जेव्हा जहाजे लागतात तेव्हाच या कामगारांना रोजगार मिळतो. उन्हाळ्याच्या दिवसात काम करणे म्हणजे एक मोठे दिव्यच असते. ऋतु प्रमाणेही कामात आणि वेतनातही फरक होताना दिसून येतो.

या कामगारांना रोख स्वरुपातच वेतन दिले जाते. व महिना पूर्ण झाल्यावर दहा ते पंधरा दिवसांनी त्याचे वितरण केले जाते.

छोट्या मोठ्या जखमा झालेले असंख्य कामगार इथे पहायला मिळतात. अलंग शीप ब्रेकींग यार्डाची निर्मिती झाल्यापासून ते आत्तापर्यंत हजाराहून अधिक कामगार मृत्युमुखी पडले असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

परंतु आता पूवीसारखी परिस्थिती राहीलेली नाही आता यात आमूलाग्र बदल होताना दिसून येत आहे. आता गुजराथ मेरी याईम बोडोचेही या सगळ्या गोष्टीवर नियंत्रण आहे.

## कामगारांच्या समस्या :

अपुरे वेतन आणि कामाच्या आणि राहण्याच्या ठिकाणी मिळणाऱ्या अपुऱ्या सुविधा या कामगारांच्या मुख्य समस्या आहेत.

त्या दृष्टीने कामगारांकडून आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी घोषणा, घेराव हडताळ रस्तारोको अशा प्रकारची पाऊले उचलून याबाबतीत निषेध व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु आतत्तापर्यंत खूपच कमी प्रमाणात हडताळ झाल्याचे सांगण्यात आले. आणि त्याचा कालावधीही एक ते दाने दिवस इतकाच मर्यादित असलेला दिसून आला आहे. परंतू आधीच गरीब असलेल्या या कामगारांना त्यांचे आर्थिक नुकसान करुन घेणे तितके योग्य नाही त्यामुळे या कामगारांना लवकरच मागार घ्यावी लागते.

परंतु कामगारांच्या या कृतीचा आवाज कुठे ना कुठे तरी पोहचतो आणि त्या दृष्टीने पाऊले उचलण्याचा प्रयत्न केला जातो.

## उद्योगधंद्यातील अपघाताची कारणे :

उद्योगधंद्यातील काम करण्याच्या ठिकाणची एकूण स्थिती, काम करण्याची पद्धत, कामगारांची मानसिक स्थिती, आजूबाजूचा परिसर वरिष्ठ कर्मचाऱ्यासोबतची आंतरक्रिया परस्पर संबंध या गोष्टीचा अभ्यास करून मानसशास्त्रज्ञांनी अपघाताची काही कारणे विशद केली आहेत.

१) प्रतिकूल परिस्थितीजन्य घटक – यात अयोग्य तापमान खूप उष्णता, कमी उष्णता, तीव्र प्रकाश वा अंधुक प्रकाश हवेतील आर्द्रता, वाजवीपेक्षा अधिक कामाचे तास, या गोष्टीमुळेही अपघात घडत असतात. प्रदीर्घ शारीरिक श्रमामुळेही अपघात होण्याची शक्यता असते. गोल्डमार्क या मानसशास्त्रज्ञाने हे सिद्ध करून दाखविले आहे की कामाचा कठीणपणा म्हणजेच अतिशय कष्टप्रद काम हेही अपघाताचे एक कारण असू शकते. सुरक्षेच्या साधनांचा अभाव असेल तर अपघात घडण्याची दाट शक्यता असते. कमी वय, अनुभवाचा अभाव, प्रकृती सुदृढ व निरोगी नसणे, या गोष्टीही अपघाताला कारणीभूत ठरू शकतात. अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांच्या बाबतीत वरील सर्वच गोष्टी तंतोतंत लागू होत आहेत आणि या सर्व घटकांमुळे इथेही अपघात होत असतात.

(डॉ. भीमसेन रंगाचार्य जोशीः समाजशास्त्र मानवशास्त्र, २००८, पृष्ठ ५)

## शोषण (सामाजिक संकल्पना सिद्धांत कोष : २००८–२३९) :

शोषण सिद्धांत म्हणजे असा सिद्धांत की ज्यात सत्ताधारी वर्ग सत्ताधारी नसलेल्या वर्गाचे शोषण करतो. तेव्हा त्या संबंधीच्या अध्ययनास शोषण सिद्धांत असे म्हणतात. कार्ल मार्क्स यांनी सांगितल्याप्रमाणे समाजात दोन वर्ग असतात. (१) ज्यांच्याजवळ उत्पादन साधनांची मालकी आहे अशा लोकांचा म्हणजे मालकांचा वर्ग आणि दुसरा वर्ग श्रमशक्ती हेच ज्याच्या उपजीविकेचे साधन आहे. एकीकडे भांडवलदार तर दुसरीकडे गुलामांचा वर्ग. पहिला वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करत असतो. या संबंधी मांडलेले सर्व सिद्धांत या संज्ञेत बसतात. ग्रामक्षी यांचा अधिसत्तेचा सिद्धांत, डारेनडार्फ यांचा द्वंद्वात्मक संघर्ष सिद्धांत रॅन्डल कॉलिन्स यांचा स्तरीकरणाचा संघर्ष सिद्धांत त्याचप्रमाणे मार्क्स यांचा ऐतिहासिक भौतिकवाद, वर्ग संघर्ष सिद्धांत हे सिद्धांत आपण शोषण सिद्धांताखाली घेऊ शकतो. संघर्ष सिद्धांतात शोषण सिद्धांत ही संकल्पना अंतर्भूत आहे. (सामाजिक सैद्धांतिक दृष्टीकोन २००२) जे दुसऱ्याचे व त्याच्या हक्काचे आहे ते त्याच्या कळत नकळत ओरबाइन घेणे. त्याला मिळू न देणे म्हणजेच शोषण होय. 'बळी तो कान पिळी' या म्हणीतून ते काहीसे व्यक्त होते. शोषणाची संकल्पना ही विशेषत: उत्पादनकार्याच्या विश्लेषणातून पुढे आली. तिचा जनक कार्ल मार्क्स होय. त्याच्या प्रतिवादानुसार गुलाम, भूदास, कामगार हा शोषित वर्ग, तर गुलामांना बाळगणारे तसेच सरंजामदार, भांडवलदार हा शोषक वर्ग होय. (मराठी विश्वकोष: खंड १८:१४०)

कामगारांना स्वत:च्या आवश्यक चरितार्थासाठी म्हणजेच संगोपन, प्रशिक्षण, पोषण निवास यासाठी लागणाऱ्या वस्तू मिळवायला, आयुष्याच्या हिशोबात समजा रोजी चार तास श्रम पुरेसे होतात. परंतु वस्तूच्या उत्पादनात भांडवलदार कारखानदार रोज सहा श्रम तास वेचायला भाग पाडतो. तेव्हा कारखानदार कामगारांचे रोज दोन श्रमतास शोषण करीत राहतो. यालाच मार्क्सने श्रममूल्यांचा सिद्धांत म्हटले आहे. कारखानदार किंवा मालक अशाच रीतीने कामगारांचे शोषण करीत असतो.

शोषणामुळे मजूर नेमी हालाखीत राहतात. आज जरी त्या बाबतीत अधिनियम केले असले तरी सुद्धा ते संघटित क्षेत्रापुरते मर्यादित असलेले दिसून येतात. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे शोषण कमी झालेले नाही. अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगार त्यांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण होत असते. हे त्यांचे उत्तम असे उदाहरण म्हणता येईल.

**शोषणाचे वर्गीकरण** :– कामगारांचे शोषण हे अनेक रीतीने केले जाते. त्यात प्रामुख्याने आर्थिक शोषण हा जितका महत्त्वाचा घटक आहे त्याचप्रमाणे त्यांचे मानसिक, शारीरीक मूलभूत सुविधांपासून त्यांना वंचित ठेवून त्यांचे शोषण होत असते. ज्याप्रमाणे पुरुष कामगारांचे सर्वच बाबतीत शोषण होत असते त्याही पेक्षा स्त्री कामगाराला तर प्रत्येक ठिकाणी दुय्यम दर्जाच प्राप्त होत असतो. पुरुष आणि स्त्री कामगार एकाच प्रकारचे ठरविक तास काम करत असतात. तरी सुद्धा स्त्री कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनातही दुजाभाव केला जातो. त्याचप्रमाणे स्त्री मजूर व बालमजुरांचे अनेक ठिकाणी लैंगिक शोषणही केले जाते. आज समाजात सर्वच थरात छुप्या रीतीने शोषण हे होतच असते. प्रत्येकाला आपल्या हक्कासाठी अस्तित्वासाठी लढा हा द्यावाच लागतो.

शोषण या संकल्पने बरोबरच वेठबिगारी आणि गरीबी या संकल्पनाचाही आपण थोडक्यात विचार करूया कारण या दोन्ही गोष्टीही शोषण संकल्पनेशी संबंधित आहेत.

वेठबिगार–या संकल्पनेचा अर्थ असा आहे की आयुक्त किंवा बांधलेला शेतकरी किंवा कामगार की जो त्याच्या कर्जबाजारीपणामुळे आपल्या मालकाकडे आयुष्यभर काम करतात ते कर्जफेडीच्या मोबदल्यात भारतात यासाठी वेठबिगार (Bonded Labour) ही संज्ञा वापरली जाते.

कोणताही मोबदला न देता सक्तीने एखाद्या व्यक्तीकडून काम करून घेणे म्हणजेच वेठबिगारी होय. वेठबिगारीची प्रथा भारतात जुन्या काळापासून आहे. प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. स्वातंत्र्यानंतर घटनेतील तरतूदीशी सुसंगत असे कायदेही झाले पण ही प्रथा मात्र नष्ट झाली नाही.

**निरपेक्ष 'गरीबी'** : निरपेक्ष गरिबी ची व्याख्या करताना डॉ. जी. आर मदन असे म्हणतात की,' ''ज्या व्यक्तींना तिच्या व तिच्या कुटुंबाच्या उपजीवीकेसाठी कमीत कमी ठरवून दिलेल्या मापदंडापेक्षाही कमी उत्पन्न मिळाल्यामुळे ती व्यक्ती स्वत:ची व कुटुंबाची योग्य प्रकारे मूलभूत गरजांची पूर्तता करू शकत नाही, त्यास निरपेक्ष गरीबी असे म्हणतात.'' दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर व्यक्ती व तिच्या कुटुंबाच्या अत्यावश्यक जेव्हा असमर्थ ठरते तेव्हा त्यास निरपेक्ष गरीबी ही संज्ञा लावली जाते.

गरीबी ही एक अशी परिस्थिती आहे की ज्यात व्यक्तीचा जीवनस्तर अतिशय खालवलेला असतो की ज्यामुळे व्यक्तीच्या स्वत:च्या व तिच्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या अत्यावश्यक गरजाही पूर्ण होऊ शकत नाही. भारतात पाच माणसांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दरसाल १८०००, पेक्षाही कमी असेल तर ही कुटुंबे गरीब मानली जातात.

उपेक्षितता आणि शोषण हे अशिक्षितपणा आणि कर्जबाजारीपणामुळे येते आणि वेठबिगारी ही तर भारतातील असंघटित कामगारांची सर्वात मोठी समस्या आहे. याच संदर्भात श्री. शंकरराव यांनी मांडलेले विचार खूप महत्त्वाचे आहेत. (Some Social Problem of India:678) वेठबिगारी ही भारतात हजारो वर्षांपासून सुरू आहे. आणि जास्त करून असंघटित मजूर कामगारच यात भरडले जात असतात. यात पुरुष–स्त्रिया लहान मुलांचाही सहभाग आहे. जमीनदार किंवा व्यापारी आपला स्वार्थ आणि स्वत:च्या फायद्यापुरताच विचार करतात. त्यामुळे हे कामगार वेठबिगारीच्या दुष्टचक्रात अडकलेले असतात.

'बॉन्डेड लेबर ॲबॉलिशन ॲक्ट १९७६' च्या नुसार वेठबिगारीची व्याख्या अशी केली जाते की कर्जबाजारी/सक्तीच्या मजूरी अंतर्गत जो कर्जदार व्यापाऱ्याकडून कामाच्या बदल्यात पैशाची उचल घेतो तो कर्जदार स्वत: किंवा त्याच्या कुटुंबातील एखाद्या सदस्य वा त्याच्यावर अवलंबून असलेला सदस्य हे ठराविक वेतन/विनावेतनावर मर्यादित वा अमर्यादित काळासाठी या व्यापाऱ्याकडे काम करण्यासाठी बांधील असतात आणि त्यामुळे अशा रीतीने वेठबिगारीची प्रक्रिया ही निरंतरपणे चालूच राहते

कर्जबाजारीपणा आणि सक्तीची मजूरी अशा दोन प्रकारे वेठबिगारी या कमागारांचे शोषण करत असते. भारतात विविध राज्यात वेठबिगारी अजून सुरू असून हे वेठबिगार विविध राज्यात विविध नावाने ओळखले जातात. जीथादळू (कर्नाटक) जीधाम (आंध्रप्रदेश) पंडियाल (तामीळनाडू) आदीयास (केरळा) कोलता सेवक हरी (उत्तप्रदेश), दाली (गुजराथ) हरवा आणि हाली मध्यप्रदेश, काविस (बिहार), गोथीस (ओरिसा), अशा नावाने हे वेठबिगार ओळखले जातात.

आजही आपल्या भारत देशात एकुण किती वेठबिगार कार्यरत आहेत. यांची नक्की आकडेवारी उपलब्ध नाही मात्र वेठबिगारी आजही अस्तित्वात आहे. गांधी पीस फाऊंडेशन आणि नॅशनल लेबर इन्स्टिट्यूट संदर्भात एक सर्वेक्षण करण्यात आले आणि त्यातून जी माहिती समोर आणि त्यानुसार या दहा राज्यातील वेठबिगारांचे प्रमाण हे २६:१७ लाखांच्या घरात आहे. शेतमजूर, मीठकामगार, बीडीकामगार, काच कारखाने, वीट भट्टीवरील कामगार, दगडफोड करणारे, डीर्टजन्ट, कार्पेट त्याचप्रमाणे इतर छोट्या इंडस्ट्रीज मधून काम करणारे कामगार वेठबिगारी करत असतात. व त्यांचे शोषण होत असते. सर्वात जास्त वेठबिगार हे उत्तरप्रदेशात ५.५ लाख त्यानंतर मध्यप्रदेश ५.०, ओरिसा ३.५ त्यानंतर आंध्रप्रदेश व गुजराथचा नंबर लागतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ८७% वेठबिगार हे प्रामुख्याने अनुसूचित जाती जमातीचे असल्याचे आढळून आले आहे. भारतात असंख्य लोक वेठबिगारीचे जीवन जगत असून ५०

लाखाहून अधिक ही लहान मुलांची आकडेवारी असल्याचे आंतरराष्ट्रीय लेबर ऑरगायझेशनच्या अहवालात मांडलेले आहे.

शासनाकडून वेठबिगारी, संपुष्टात आणण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी २५ ऑक्टोबर १९७५ रोजी बॉन्डेड लेबर सिस्टीम (अब्रॉलिशन) ॲक्ट १९७६ हा कायदाही मंजूर करण्यात आला. आणि या कायद्याच्या आधारे व्यापारी सरकार जे पैसे व्याजाने देण्याचे व्यवहार करतात त्यांच्याविरुद्ध कडक कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यानुसार वेठबिगारी कमी करण्याचे प्रयत्नही शासनाकडून सुरू आहेत. पण अजूनही वेठबिगारी पूर्णत: संपुष्टात आली आहे असे मात्र म्हणता येणार नाही. त्यामुळेच वेठबिगारी व शोषण हे अजूनही सुरूच आहे.

**वेठबिगारी :**

१९७६ मध्ये वेठबिगार मुक्ती अधिनियम व १९८६ मध्ये बालकामगार प्रथा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला. पण आजपर्यंत या कायद्याखाली ज्यांनी अशा प्रकारे बालकांचे, कामगारांचे शोषण केले आहे. त्याना साधी एक दिवसाची शिक्षाही झालेली नाही.

भारतात पलायू जिल्ह्यातील 'कोयल क्राशे' धरणामुळे विस्थापित आदिवासांची १७ ते २० हजार मुले नर्मदा नदीवर बांधण्यात येणाऱ्या धरणामुळे विस्थापीत झालेल्या कुटंबाची ४० हजाराहून मुले गुलामीची शिकार झाली आहेत.

(डॉ. नीलम ताटके : २००८ समाजकार्य कोश : )

सामाजिक विचारवंत, साम्यवादाचा पुरस्कर्ता कार्ल मार्क्स याने आपल्या 'दास कॅपिटल' या ग्रंथात नमूद केले आहे की भांडवलशाही समाजरचना ही जीवंत शरीरासारखी आहे. तिचा विकास तिच्या अंतर्गत स्वभावनियमानेच होतो. नफा मिळवण्याची आणि त्याच करीता उद्योग चालविण्याची प्रवृत्ती भांडवलशाही समाजरचनेत अंतर्भूत असते. नफा मिळवण्याची प्रवृत्ती अपयशी होऊ लागली की संपुर्ण समाजरचना डळमळते. भांडवलशाहीचा नाश होऊन तिच्या जागी उच्च दर्जाच्या समाजसंस्थेची स्थापना होते. भांडवलशाहीची गोड फळे ही वरिष्ठ वर्गाकडे तर कटू फळे ही श्रमजीवी वर्गाकडे होती.

कार्ल मार्क्स याने आपल्या ऐतिहासिक भैतिकवाद आणि श्रममूल्याचा सिद्धांत या दोन्ही सिद्धांताच्या आधारे भांडवलशाही समाजरचनेत कामगारांचे शोषण कसे केले जाते आणि शोषणामुळे क्रांतीला समाज कसा तयार होतो हे दाखवले आहे. समाजात आहे रे आणि नाही रे असे दोन वर्ग कसे तयार होतात आणि आहे रे वर्गाकडून नाही रे वर्गाचे कसे शोषण केले जाते हे दाखवून दिले आहे. वर्गविहीन समाज हे कार्ल मार्क्सचे स्वप्न होते पण ते तसेच राहिलेले आहे कारण समाजात आजही मालक वर्गाकडून कामगारांचे शोषण होत आहे.

आपल्या उत्पादनाचा खर्च कमी करण्याकडे भांडवलदारांचे लक्ष असते. कामाची गती आणि तास यात वाढ पण मजुरी मात्र तेवढीच दिली जाते. त्याने उत्पादनात वाढ होते. नफा वाढतो पण मजुरांची मजुरी वाढत नाही आणि हा झालेला नफा म्हणजेच कामगारांचे शोषण आणि पिळवणूक असते. हा नफा म्हणजेच अतिरिक्त मूल्य.

उपभोगाची वा जीवनाची साधने ही मानवी श्रमातून निर्माण होतात. वस्तूमध्ये मूल्य निर्माण होते. ते श्रमशक्तीच्या वापरामुळे कामगार आपल्या श्रमांनी सर्व मुल्ये निर्माण करतात. परंतु सर्व मूल्य त्यांच्या हाती येत नाही. त्याचा काही अल्प भागच येतो. श्रमातून निर्माण झालेल्या मुल्यांचे दोन भाग एक भाग म्हणजे कामगारांचे वेतन आणि दुसरा भाग म्हणजे अतिरिक्त मूल्य हे नफा म्हणून उत्पादन साधनावरील मालकीमुळे भांडवलदारांच्या पदरात पडते. वाढीव उत्पादनामुळे भांडवलदार वर्ग हा अधिकाधिक श्रीमंत व समर्थ बनतो आणि कामगार वर्ग आणि भांडवलदार यांच्यातील ही दरी वाढतच जाते. त्यामुळे कामगारांची स्थिती अधिकाधिक दयनीय होत जाते.

मार्क्सने सांगितलेला हा शोषणा संदर्भातील विवेचन हे अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांच्या बाबतीत तंतोतंत लागू होत आहे. कारण इथेही आपल्याला आहे हे आणि नाही रे असे दोन वर्ग दिसून येत आहेत. भांडवलशाही आणि कामगार यातील सहसंबंधही अधिक स्पष्ट होताना दिसून येत आहेत.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगार हे असंघटित व स्थलांतरित आहे. अशिक्षित व गरीब असल्याने या कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होताना दिसून येत आहे.

**शोषण** : शोषण ही संज्ञा मार्क्स यांनी त्यांच्या अतिरिक्त मूल्यासंबंधीच्या विचारात वापरली होती. अतिरिक्त मूल्याच्या श्रम सिद्धांतात अतिरिक्त मूल्याच्या सामित्वहरण प्रक्रियेतच शोषण समाविष्ट आहे.

मार्क्स यांना शोषणाला आर्थिक घटक वा उत्पादनसाधनाचा मालकी घटक महत्त्वाचा वाटत असला तरीसुद्धा अन्य घटकही शोषणास कारणीभूत ठरतात. यात धर्मगुरुकडून धर्मभोळ्या जनतेचे होणारे शोषण, भारतातील वरिष्ठ जातीतील लोकांकडून कनिष्ठ जातीतील लोकांचे होणारे शोषण, गोऱ्या लोकांकडून काळ्या व निग्रो लोकांचे होणारे शोषण या गोष्टी त्यात समाविष्ट आहेत. शोषण ही एक सार्वत्रिक प्रक्रिया आहे.

ग्रामसी यांचा अधिसत्तेचा सिद्धांत, डाहरेन ऊर्फ यांचा द्वंद्वात्मक संघर्ष सिद्धांत, कॉलिन्स यांचा स्तरीकरण संघर्ष सिद्धांत तसेच मार्क्स यांचा ऐतिहासिक भौतिक वाद, वर्गसंघर्ष सिद्धांत हे सारे सिद्धांत शोषण सिद्धांत या संज्ञेखाली आपण घेऊ शकतो. शोषण ही संज्ञा सर्वांनी वापरली असली तरी शोषण सिद्धांत या संज्ञेचा वापर यापैकी कोणीही केला नाही. संघर्ष सिद्धांतातच शोषण सिद्धांत ही संज्ञा अंतर्भूत आहे.

(डॉ. बी. आर. जोशी, पृष्ठ क्र. २३८, २००८)

## शोषणाचे प्रकार

वास्तविकता आपण एखाद्या व्यक्तीचे शोषण झाले असे संबोधतो पण खऱ्या अर्थाने शोषण ही संकल्पना समजून घेणे खूपच कठीण अशी गोष्ट आहे. एखाद्याचे आर्थिक शोषण झाले तर आपल्याला ती गोष्ट दाखवता येते की त्या व्यक्तीचे अमूक इतके पैसे बुडाले. त्याचे आर्थिक नुकसान झाले. आर्थिक नुकसान हे दाखवता येऊ शकते. परंतु शारीरिक मानसिक व सामाजिक शोषण हे आपल्याला सहजासहजी दाखवता येऊ शकत नाही. परंतु त्याचे परिणाम हे खूपच गंभीर स्वरूपाचे असतात.

सामाजिक अभ्यासक पी. आर. सरकार यांच्या मते समाजात फक्त आर्थिक स्वरूपाचे शोषण होत नाही तर मानसिक शारीरिक सामाजिक शोषणही होतच असते आणि शारीरिक, मानसिक व सामाजिक शोषणाचे परिणाम हे खूपच गंभीर स्वरूपाचे असतात. ज्याप्रमाणे आर्थिक नुकसान झाले की मनुष्याला जे काही दुःख होते त्याहीपेक्षा याचे स्वरूप अधिक असते पण ते दाखवता येऊ शकत नाही. (श्री. पी. आर. सरकार यांच्या मतानुसार)

**सामाजिक सुरक्षा** :– जेव्हा आपण सामाजिक संरचनेचा विचार करतो तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत स्वतंत्र विचार करत असतो. व्यक्तीचे स्वतंत्र्य अस्तित्व वा व्यक्तीसमूह, या समूहातील व्यक्तींचे परस्परांशी असणारे संबंध या सर्व बाजूचा विचार आपण करतो.

याच दृष्टीकोनातून आपण जेव्हा कुटुंबाचा विचार करतो तेव्हा कुटुंबप्रमुख आणि कुटुंबातील इतर सदस्य हे सर्व जण एकमेकांच्या सहकार्य आणि सहसंबंधाने त्यांच्यात एक आपुलकी निर्माण झालेली असते. कुटुंबात ज्याप्रमाणे कुटुंब प्रमुखाच्या छात्रछायेखाली कुटुंबातील इतर सर्व सदस्य सुरक्षितता अनुभवत असतात. अगदी लहान मूल आपल्या आईच्या कुशीत जसे अतिशय सुरक्षित असते. त्या सुरक्षिततेमुळे जसे एक स्थैर्य प्राप्त होते. त्याचप्रमाणे या समाजाचे आहे. समाजात राहणाऱ्या विविध गटांच्या समूहात आत्मीयता सलोख्याचे संबंध असतील तरच समाज एकसंघ आणि सुरक्षित राहू शकतो आणि समाजात जर सुरक्षा प्रस्थापित असेल तरच समाजाचा विकास होतो. समाजाचा विकास झाला तरच देशाचा विकास होऊ शकतो. या दृष्टीकोनातून ज्याप्रमाणे व्यक्तीला जशी स्वातंत्र्य आणि सुरक्षितता या गोष्टीची गरज आहे त्याचप्रामणे समाजालाही स्वातंत्र्य आणि सामाजिक सुरक्षिततेची तेवढीच नितांत आवश्यकता आहे. सामाजिक सुरक्षितता जेव्हा डळमळते तेव्हा त्याचा परिणाम हा संपुर्ण समाजावर, त्या समाजातील व्यक्ती समूहावर होत असतो. सामाजिक सुरक्षितता डळमळते म्हणजे त्याचा समाजस्वास्थावर त्याचा विपरित

परिणाम होत असतो आणि त्या परिणामांचे स्वरूप हे आर्थिक मानसिक व सामाजिक असते अगदी या संदर्भातले ताजेच उदाहरण द्यायचे झाले तर गुजराथ राज्यातच हार्दिक पटेल या युवकाच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले पटेल समाजाला ओबीसीचा दर्जा मिळावा या आरक्षणाच्या मुद्याला धरून सुरू झालेले आंदोलन आंदोलनाची सुरुवात होऊन फक्त दोन चार दिवसच झाले आहेत परंतु त्याचे पडसाद मात्र खूपच मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. याच आंदोलनाच्या निमित्ताने झालेला हिंसाचार जाळपोळ आणि ९ जणांचा गेलेला बळी यात कित्येक लाखो रुपयांचे सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर सामाजिक स्वास्थ आणि सामाजिक सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची गोष्ट असल्याचेच आपल्या लक्षात येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजराथच्या जनतेला सामाजिक शांतता ठेवण्याचे आवाहन केले आहे. गुजराथ राज्याला धार्मिक दंगली असो वा आरक्षणाच्या मुद्यावरून झालेला हिंसाचार असो या गोष्टी त्या राज्याला नव्या नाहीत. नवनिर्माण आंदोलन त्याने घेतलेले उग्र स्वरूप झालेला हिंसाचार या गोष्टी इतिहास जमा झालेल्या आहेत. परंतु यावरून गुजरात राज्यातील जनतेने कुठलाही बोध घेतलेला दिसून येत नाही हे सर्व थांबविण्यासाठी कायद्याचा आधार घेतला जाईल. वरील संदर्भ देण्याचा मतितार्थ एवढाच की सुरक्षा आणि स्थैर्य यांचा परस्पर संबंध आहे आपण अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात विचार केला असता आपल्याला असे दिसून येते की या कामगारांचेही आर्थिक मानसिक व सामाजिक या तीनही स्तरावर मोठ्या प्रमाणात शोषण होताना दिसून येत आहे. या पाठीमागचे महत्त्वाचे कारण म्हणजे हे कामगार असंघटित व स्थलांतरित आहेत. या कामगारांमध्ये संघटन नसल्याने यांना कुठल्याही कायद्याचे पाठबळ नसल्याने या कामगारांचे शोषण होत आहे. कार्ल मार्क्सने सांगितल्याप्रमाणेच या समाजात आहे रे वर्गाकडून नाही रे' वर्गाचे शोषण होत असते. या कामगारांच्या बाबतीतही ही गोष्ट तंतोतंत लागू होत आहे. इथला मालक वर्ग, कामाच्या ठिकाणी मुकादम या गरजू आणि शोषित कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण करत असतात. आर्थिक स्वरूपाचे शोषण हे ठळकपणे दाखविता तरी येऊ शकते. परंतु या कामगारांचे या ना त्या प्रकाराने शारिरीक मानसिक शोषण होत असते आणि अशा प्रकारचे शोषण सातत्याने होत असते पण ते दाखवता येऊ शकत नाही.

अलंग रिसायकलींग शीपयार्डात काय करणारे बहुतांशी कामगार हे स्थलांतरित असंघटित व गरीब आहेत. आज आपल्या देशातील वाढती लोकसंख्या, वाढती बेरोजगारी बेकारी आणि गरीबी या सगळ्याच गोष्टी सामाजिक समस्या होत चाललेल्या आहेत. अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे कामगार हे

गरीबी आणि बेरोजगारी मुळे स्थलांतर करतात. तेव्हा या सगळ्याच गोष्टी एकमेकांशी जोडल्या गेलेल्या आहेत आणि अशा गरजू आणि गरीब कामगारांचे शोषणही मोठ्या प्रमाणात होत असते. हे कामगार या शोषणाचे बळी ठरतात कारण त्यांना रोजगारीची नितांत आवश्यकता असते आणि पैसे मिळवण्याच्या आशेवर हे लोक एवढ्या दूर इथे आलेले असतात. त्यामुळे जे काही पैसे मिळतील. त्यावर ते काम करायला तयार होतात. आणि त्यांचे सगळ्याच बाबतीत म्हणजे आर्थिक मानसिक सामाजिक स्तरावर शोषण होत असते. तेव्हा या सगळ्याच गोष्टी सामाजिक समस्येशी निगडीत आहेत. त्यासाठी आपण थोडक्यात सामाजिक समस्या या संकल्पनेचा सुद्धा थोडक्यात विचार करूया.

सामाजिक समस्या:– जेव्हा समाजातील विपरीत परिस्थितीकडे लोकांचे लक्ष वेधले जाते. तेव्हा त्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणतात. किंवा आव्हान म्हणून समोर आलेली गोष्ट किंवा उकल करण्यासाठी असलेला प्रश्न म्हणजे सामाजिक समस्या होय.

केस या विचारवंतांच्या मते ''जेव्हा समाजातील महत्तम सक्षम विचारवंताचे लक्ष अशा कोणत्याही सामाजिक परिस्थितीकडे वेधले जाते. त्या संदर्भात सामूहिक किंवा इतर कोणतीतरी क्रिया किंवा समायोजन करण्याची आवश्यकता जाणवते तेव्हा त्या सामाजिक परिस्थितीला सामाजिक समस्या असे म्हणतात.

सबंगटन आणि वेईनबर्ग यांच्या मते, सामाजिक समस्या म्हणजे समाजातील बहुसंख्या लोकांच्या मुल्याशी विसंगत अशी परिस्थिती की ज्या परिस्थितीत बदल करण्यासाठी सामूहिक क्रियेची गरज आहे अशी सर्वांची मान्यता असते.

पूर्वी गरीबी बेकारी या सामाजिक समस्या मानल्या जात नव्हत्या परंतु आज गरीबी, बेकारी, शोषण, वेठबिगारी, स्थलांतर यांचाही समावेश सामाजिक समस्यांमधे केला आहे. त्याचबरोबर आता प्रदुषण ही सुद्धा मोठी सामाजिक समस्या म्हणूनच तिच्याकडे बघितले जात आहे.

हंगामी श्रमिक ठेवणाऱ्या मालकांना साधारण बेकारी ही आहे तशीच रहावी असे वाटते कारण त्यामुळे त्यांना कमी पैशात काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची उपलब्धता होत असते. त्यामुळे हे सारेच प्रश्न एकमेकांशी निगडित असे आहेत. पण हे सारे प्रश्न मुळात नष्ट व्हावेत यासाठी कुठल्याही ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. आणि या पाठीमागे मुख्य दोष हा यंत्रणाचा आहे.

स्थलांतरित झालेल्या कामगारांचे शोषण कशा रीतीने केले जाते या संदर्भातील काही रिपोर्ट सादर झाले तर काही वृत्तपत्रातून आलेल्या बातम्यांचा आढावाही या संदर्भात घेतलेला आहे. यात स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर केलेल्या कामगारांचा समावेश आहे.

शोषणात फक्त पुरुष कामगारांचाच समावेश असतो असे नाही तर स्त्रिया आणि लहान मुलांचेही मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. अलंग रिसायकलिंग शीपयार्डात काम करणारे कामगार हे पुरुषच आहेत. ते २५ ते ५० वयोगटातील आहेत. परंतु आपण एकंदरीत शोषणासंदर्भातला विचार लक्षात घेतला असता आपल्याला यात स्त्रिया आणि लहान मुलांचेही शोषण मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येत आहे.

## सामाजिक सुरक्षितता :

एकत्र नांदणाऱ्या समूहाची संभावित आर्थिक, सामाजिक संकटापासून केलेली उपाययोजना व त्या संबंधीची रुपरेषा म्हणजेच सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न होय.

बेकारी, वार्धक्य, निराधार अवस्था इ. कारणांनी मानवी जीवन कष्टमय व दुःखी होते. त्यासाठी औषधयोजना वैद्यकीय सहाय्य, अर्थसहाय्य, निर्वाहभत्ता इ. सुविधा करण्याचा कार्यक्रम म्हणजे सामाजिक सुरक्षिततेसाठी केले जाणारे प्रयत्न होत. श्रमिकांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन, भविष्य निर्वाह निधी, जीवनस्वास्थ्य, विमा योजना असतात. परंतु आधुनिक काळातल्या कल्याणकारी राज्याच्या (welfare state) संकल्पनेत सर्व समुदायासाठी सामाजिक सुरक्षितता महत्त्वाची मानली जाते. जेव्हा महापूर, भूकंप, अपघात, दंगली यासारख्या संकटाच्या वेळी जेव्हा सामाजिक सुरक्षितता धोक्यात येते तेव्हा माणुसकी, स्वयंसेवा, सामंजस्य, सामाजिक कर्तव्यातून सामाजिक सुरक्षितता बिघडणार कशी नाही याकडे विशेष लक्ष दिले जाते.

अलंग रिसायकलींग शीपयार्डातही एखादा अपघात घडला तर त्यावेळी आपत्ती व्यवस्थापनाद्वारे अपघातग्रस्त कामगाराला त्वरित औषधोपचार मिळावेत यासाठी प्रयत्न केले जातात. वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. एकूणच कामगारांच्या स्वास्थ्याची काळजी घेतली जाते. अशा रीतीने इथेही कामगारांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

(डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड तिसरा : पृष्ठ २०२९)

## शोषण व सामाजिक सुरक्षितता :

२०२२ मध्ये कतार मधे होणाऱ्या FIFA च्या वर्ल्ड कप च्या निमित्ताने व इतर काही कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्या अति भव्य व अलिशान अशा इमारतींचे बांधकाम करण्यात आले, त्या इमारतींचे बांधकाम करण्यासाठी भारतातून जे स्थलांतरित कामगार तिथे कामासाठी गेले होते त्यांचे खूप मोठ्या प्रमाणात इथे शोषण करण्यात आले. जे एक स्वप्न उराशी बाळगून हे लोक तिथे गेले होते ते त्यांचे स्वप्न पूर्णपणे धूळीला मिळाले होते. आणि कतार येथे आधुनिक गुलामगिरीचे एक नवे पर्व सुरु झालेले पहायला मिळत आहे.

कतार या देशात कामासाठी येणारे हे स्थलांतरित कामगार प्रामुख्याने भारत, श्रीलंका, नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश व फीलीपाईन्स या देशातून कामासाठी येतात. या तेलाने समृद्ध आणि अतिशय श्रीमंत असलेल्या या देशातही या कामगारांना अतिशय कमी वेतनावर राबवून घेतले जाते. घरात काम करणाऱ्या कामगारांना तर अगदी गुलामाप्रमाणे वागणूक दिली जाते. यातील किती तरी लोक व्हिसा आणि वेतनाशिवाय इथे खितपत पडलेले दिसून आले आहेत. इथोपिया आरि नेपाळी स्थलांतरित कामगारांच्या लेखी पुराव्यामुळेच हे सत्य बाहेर आलेले आहे.

ऑस्ट्रेलियाच्या एका सामाजिक संस्थेच्या वतीने केलेल्या संशोधनानुसार अशी माहिती पुढे आली आहे की (वॉक फ्री फाउंडेशन मानव अधिकार जपणारी संस्था) गेल्या वर्षी गुलामगिरीच्या बाबतीत १६० देशातून कतार चे स्थान हे ४६ व्या स्थानावर होते. मात्र या वर्षा कतार या देशात स्थलांतरित कामगारांना अतिशय वाईट अशी गुलामांची वागणूक देऊन त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जात आहे. त्यामुळे आज कतार हे ४थ्या स्थानावर पोहोचले आहे. अंदाजे कतार मधे १.६ मिलियन एवढे कामगार पैसे कमविण्याच्या उद्देशाने येतात.

इथे कामावर येण्यापूर्वी त्यांना मोठमोठाली आश्वासने दिली जातात. चांगले वेतन चांगली नोकरी असे आमीष दाखवून त्यांची पूर्णपणे फसवणूक केली जाते. त्यांना कामाचे पैसेही वेळेवर दिले जात नाहीत. या कामगारांचे पासपोर्टही जप्त केले जातात. तसेच त्यांचे शारीरिक आणि लैंगिक शोषणही केले जाते. आणि अतिशय धोकादायक अशा परिस्थितीत त्यांच्याकडून प्रचंड प्रमाणात काम करुन घेतले जाते. आणि ज्या प्रमाणे जनावरांना पिंजऱ्यात ठेवले जाते त्याप्रमाणे त्या कामगारांना ठेवले जाते. त्या पिंजऱ्याचा खोलीचा आकार २६x८ असा असतो. त्यात १५ ते २० कामगार दिवस काढतात. जिथे या कामगारांना ठेवले जाते. यांना टॉयलेट, बाथरुम एकत्रितरित्या वापरावे लागते. त्यांचे बाधरुम व स्वयंपाकघर अतिशय

गलिच्छ असते. अशातच या कामगारांना कपडे बदलावे लागतात. कामगारांना काम बदलण्यासाठी मालकांची परवानगी घ्यावी लागते. मिळाली नाही तर देश सोडावा लागतो.

मात्र आता मानवअधिकार संघटना व ब्रिटीश मधील एका कायदेतज्ञ कंपनीच्या वतीने या विरुद्ध जोरदार आवाज उठवला जात असून अशा रीतीने कामगारांचे शोषण करणाऱ्या मालकांकडून दंड वसूल केला जात  आहे. कायदेशीर कारवाई कारवाई केली जाते आहे. तर काहींचे काम बंद केले जात आहे.

कामगार कायद्याबद्दल आमच्या इथे खूप अडचणी आहेत पण त्यात आम्ही सुधारणा करण्याचा प्रयत्न करु असे कतार चे अमीर ऑफ शेख तामीन बीन अहमद अल तानी यांनी या संघटनाच्या प्रतिनिधींशी बोलताना आपले मत व्यक्त केले. कतार जेधा मधे अत्यंत सुंदर भव्य इमारती ग्रहप्रकल्प उभारले जात आहेत. परंतु या स्थलांतरित कामगारांचे अत्यंतिक शोषण करुनच २०१० च्या वर्ल्डकपच्या वेळेला १२०० कामगार मृत पावले होते. या वेळेस तो आकडा आणखीन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

परंतु कतारला बदनाम करण्यासाठी हे उद्योग केले जातात. असे या गृहप्रकल्प निर्माण करणाऱ्या व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांचे म्हणणे आहे. आमच्यावर टीका करणाऱ्यांनी इथे येऊन खर्च गोष्टीची खातरजमा करुन घ्यावी.

## तामीळनाडू व बांगलादेश हातमागावर काम करणाऱ्या कामगारांचे शोषण :

स्थलांतरित कामगारांचे शोषण हे फक्त देशपातळीवरच होते असे नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या लोकांचे शोषण झाले आहे होत आहे अशा संदर्भातील काही महत्त्वाच्या घडामोडींचा आढावाही इथे थोडक्यात घेण्यात आलेला आहे.

बंगाल देशातील रत्नाप्लाझा नावाची एक इमारत कोसळून त्या अपघातात सुमारे ११०० हून अधिक हातमागावर काम करणारे कामगार ठार झाले. या संदर्भात गुन्ह्याची नोंद करण्यात आल आहे. आणि त्या संदर्भात कामगारांच्या सुरक्षेच्या संदर्भात आणि  इमारतीच्या पक्क्या बांधकामासाठीही सूचना देण्यात आलेल्या  आहे आणि या झालेल्या मोठ्या अपघातामुळेच आता ही गोष्ट प्रकर्षाने समोर आलेली आहे. आणि या अपघातात मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना अजूनही कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यासाठी ते गेल्या पंधरा महिन्यांनपासून वाट पाहत आहेत. आणि या बांगलादेशातील घडलेल्या अपघातामुळे हा कामगार आणि कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आलेला आहे. सेंटर ऑफ रिसर्च ऑन मल्टीनॅशनल कॉर्पोरेशन (SOMO) आणि (ICN) India

Committee of Netherland. यांनी (Rlowed fabrics) या संदर्भात हा रिपोर्ट सादर केला आहे की दक्षिण भारतातील तामीळनाडू राज्यात अगदी कुमार वयात आलेल्या मूली व तरुण मुलींना या हातमागाच्या कामात अक्षरश: जुंपले जाते. त्यांच्याकडून गुलाम (वेठबिगारांप्रमाणे)काम करुन घेतले जाते. अणि ही अतिशय निर्दयपणे केली जाणारे बालकामगार आणि कामगारांचे शोषण आहे. अगदी नामांकित कापड उद्योग या लोकांकडून अशी कामे करुन घेत असतात. आणि तामिळनाडूतील हातमाग परदेशी कंपन्या आणि बांगलादेशातील हातमाग व्यावसायिक या साऱ्या लोकांची एकमकांची साखळी गुंफलेली आहे.

तामिळनाडूतील हातमागावर काम करणाऱ्या या मुली १५ ते २० वयोगटातील असून या सर्वजण दलीत समाजातील अत्यंत गरीब घरातून कामासाठी आलेल्या मुली आहेत. या मुलींना सुद्धा उत्तम वेतन, उत्तम काम आणि विविध सुविधांचे अमिष दाखवून कामावर ठेवून घेतले जाते आणि आठवड्यातून त्यांच्याकडून ६८ ते ७० तास काम करुन घेतले जाते. आणि अत्यंत तटपुंजे असे वेतन दिले जाते. (१५० मुली) कामाच्या ठिकाणी फॅक्टरी आणि त्यानंतर बंदिस्त अशा एका मोठ्या घरात त्यांना बंद करुन ठेवले जाते. त्यांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते.

कामगार संघटना आणि कामगारांचे हीत जपणाऱ्या संस्थाही या गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात. आणि या अशा रीतीने पूर्णपणे कायद्याचे उल्लंघन होत असूनही त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. यात फक्त व्यावसायिक कमी पैसे देऊन मोठ्या प्रमाणात नफा कमवत असतात असेच चित्र पुढे येताना दिसत आहे. आणि हे सर्व कपड्याचे मोठे व्यावसायिक कच्चा माल पुरविणाऱ्या त्याच प्रमाणे हातमागावर काम करणाऱ्या ते अत्यंत उच्च नामांकित दर्जेदार कपड्याची निर्मिती करणाऱ्या लोकांशी यांची हातमिळवणी झालेली असते. यात कर्जपुरवठा करणाऱ्या बँकाचाही समावेश आहे. कामगार संघटना या अस्तित्वात असल्याचे जरुर दाखवतात परंतु त्या या कामगारांच्या भवितव्याचा विचार अजिबात करीत नाहीत.

दर्जेदार कपड्याचें उत्पादन करणाऱ्या नामवंत अशा कंपन्यांनी वास्तविकता या कामगारांच्या कामाचा आदर केला पाहिजे. व त्या संदर्भात त्यांनी कामगारांचे शोषण करणारी ती साखळी फोफावली आहे त्या विरुद्ध आवाज उठविण्याची गरज आहे. आणि नामंत दर्जेदार कपड्याची विक्री करणाऱ्या या कंपन्या मिळालेली ही एक सुवर्णसंधी आहे की ज्यात या कामगारांना थोड्या प्रमाणात तरी न्याय मिळू शकेल.

परंतु व्यवसाय आणि मानवी हक्क या सदंभात ज्या काही गोष्टी युके सरकारने मान्य केलेल्या आहेत. त्या गोष्टी विचारात घेता या सरकारने बांगला देशात घडलेल्या अपघाताबद्दल व या तामीळनाडूतील

महिला कामगारांच्या होणाऱ्या शोषणाबद्दल योग्य ती पाऊले उचलून या  सुरु असलेल्या आधुनिक गुलामगिरीचबद्दल आवाज उठविण्याची गरज आहे.

The moren day salverly bill हे पार्लमेंट मधे दाखल करण्यात आले आहे. त्यावर विचारविनिमय करऱ्यास ही सुरवात झाली आहे. आणि या बीलाला सशक्त ठोस पुरावा मिळण्याच्या दृष्टीकोनातून या कंपन्या आणि या साखळीत दृष्टिकोनातून या कंपन्या आणि या साखळी जोडले गेलेले सारे धागे दोरे त्यांचे व्यवहार स्पष्ट करणारे अहवाल सादर करण्याची गरज आहे. आणि या होणाऱ्या प्रगतीचे स्वागतच करण्याची जरुरी आहे. परंतु या कायद्याद्वारे तळागाळातल्या लोकांचे जे शोषण होते ते थांबण्याची गरज आहे.

## नेपाळ मधील भूकंपपीडीत महिलांचे शोषण :

नेपाळ येथे नुकतीच घडलेली नेपाळ मधील भीषण भूकंप दुर्घटना या दुर्घटनेचा सुद्धा समाजकंटकानी विपरीत असा फायदा घेतला असून या भूकंपामुळे बेघर झालेल्या कित्येक महिलांना नोकरीचे आमीष दाखवून या लोकांनी या महिलांना गल्फ देशात घरकाम (वेठबिगार) आणि वेश्यावृत्तीच्या व्यवसायात गुंतवले आहे.

दिल्ली पोलिसांनी घातलेल्या छाप्यामध्ये ही गोष्ट निदर्शनास आली. आणि यात विमान कंपन्याचे दोन सहकारी आणि अशा दलांलाचाही समावेश होता. या लोकांच्या देखरेखीखाली एकूण २१ महिला त्यांच्या ताब्यात होत्या ज्यांना दुबईच्या विमानात बसविण्यात येणार होते. आणि त्यापूर्वी त्यांना दिल्लीच्या विमानतळावरील एका हॉटेलात ठेवण्यात आले होते. आणि या सर्वच महिला अतिशय गरीब घरातल्या होत्या. त्यांना चांगल्या नोकरीचे खोटे आमिष दाखवून गल्फ देशात त्यांना पाठविण्याचा त्यांचा इरादा होता. आणि एप्रिल महिन्यात घडलेला भीषण भूकंपाचा तडाखा त्याला कारणीभूत होता. या भीषण भूकंपात सुमारे १० हजाराहून अधिक लोक मृत्युमुखी पडलेले होते.

स्थानिक सामाजिक संस्थाच्या माहितीनुसार दरवर्षी अंदाजे १० ते १५ हजार अशा खोट्या आमिषला बळी पडून स्त्रिया आणि बालकांचा व्यवहार केला जातो. आणि या महिला आणि मुलांना काही जणांना भारतात कामाला व वेश्याव्यवसायाला जुंपले जाते. तर काही साऊथ कोरिया, आफ्रिका इथेही पाठविले जाते मात्र गल्फ देशात मोठ्या प्रमाणात महिलाना वेश्या व्यवसायासाठी धाडले जाते.

विमातळावर पकडलेल्या दोन्ही माणसांनी हे ही कबूल केले की, आम्ही एकूर २५० महिलांना दुबई आणि सौदी अरेबियात पाठविण्याचा आमचा इरादा होता. आणि नेपाळ मधून दिल्लीत काम

मिळवण्याच्या उद्देशाने येणाऱ्या या महिलांना आम्ही खोटी आमीषे देऊन आपल्या जाळ्यात खेचतो. दिल्लीच्या विमानतळावरील कर्मचारी यांची चाचणी करुन यांना विमानात बसवून देण्यासाठी पैशाच्या बदल्यात आमचे सहकार्य करतात. दुबई मधील अधिकारीही या महिलांचे पासपोर्ट ताब्यात घेऊन मग तेथील दलालांच्या हाती महिलांना हवाली करतात.

आत या संदर्भात अधिक संशोधन करण्याची गरज असल्याचे पुलिस अधिकारी हैदर यांनी सांगितले.

नेपाळ सुद्धा आशिया खंडतला अतिशय गरीब देश म्हणून ओळखला जातो आणि इथे वाघाची कातडी, मद्य आणि इतर अनेक गोष्टीची तस्करी केली जाते. आणि काठामांडू इथे या गोष्टी घडत असल्या तरी त्याचे सगळे सूत्रधार हे भारतातच असलेले दिसून येतात. हे गुन्हेगारी जगताशी जोडलेले दलाल हे अशा गरजू महिलांच्या शोधातच असतात. मे महिन्यात भारतीय अधिकाऱ्यांनी अशा २० मुलांना व महिलांना लोकांच्या ताब्यातून सोडविले होते.

दिल्ली विमानतळावर ताब्यात घेण्यात आलेल्या मा. महिला सिंधूपूलचौक या रामछापा या जिल्ह्यातील होत्या, आणि काही महिला या आपा आणि चितवाला इथल्या होत्या.

आणि या दलालांच्या टोळ्या विविध प्रकारचे कार्य करत असतात. या स्थानिक दलालांना सुद्धा हे माहीत नसते की या महिलांना कुठे नोकरी व्यवसायासाठी पाठवले जाणार असते. त्यामुळे त्यांना काठमांडू किंवा भारतात चांगल्या ठिकाणी कामावर ठेवले जात असेल अशा ते भ्रमात असतात. नेपाळ सरकारने सुद्धा आता या गोष्टीमध्ये जातीने लक्ष घालण्याची खुप गरज आहे.

अलंग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांचे काम खालील पद्धतीने चालते.

कामगारांच्या कामाचे स्वरूप –

**१) जोडीवाला –** जोडीवाला म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे काम खूपच कठीण आणि तितकेच धोकादायकही असते. या कामगारांना लोखंडाच्या मोठाल्या प्लेटस उचलून दुसऱ्या जागेला ठेवाव्या लागतात. जहाजातील वायर खेचून काढण्याचेही काम हेच लोक करतात. त्याचप्रमाणे दोरखंडाने जहाज पाण्यातून खेचून किनाऱ्यावर आणण्याचे कामही हेच कामगार करतात.

**२) बाटलीवाला –** हे काम करणाऱ्या कामगाराचे कामही अतिशय अवघड व खूपच धोकादायक असे असते. हे कामगार ऑक्सिजन आणि एल.पी.जी. गॅस सिलेंडरच्या सहाय्याने जहाज

तोडणीला सुरुवात करतात. त्यासाठी त्यांना दोरीच्या साहाय्याने जहाजावर चढून जावे लागते. अगदी वरच्या भागापासून ते जहाज तोडणीला सुरुवात करतात. या कामात अपघाताची सर्वाधिक शक्यता असते.

**३) हेल्पर –** प्रत्येक मुख्य कामगाराला सहाय्य करण्याचे काम ही लोक करतात. सिलेंडरचे बाटला उचलणे. रिकामा जागेवर नेऊन ठेवणे. यांना जी जी कामे सांगितली जातात ती ती कामे हे मदतनीस म्हणून करत असतात.

**४) सुपरव्हायजर –** हे काम करणाऱ्या कामगारावर पूर्णपणे देखरेख करतात. दिलेले काम कामगार योग्य रीतीने करत आहेत की नाहीत याकडे जातीने लक्ष घालतात.

**५) मुकादम –** कॉन्ट्रॅक्टरच मुकादम म्हणून ओळखले जातात. हे सर्व कामगारांचे मुख्य असतात. कुठल्या कामगारांना कुठे कामाला लावायचे त्यांच्याकडून दिलेले काम कसे पूर्ण करून घ्यायचे याकडे ते जातीने लक्ष घालतात.

**क्रेन ऑपरेटर –** जहाजातील सुटे झालेले अवघड भाग क्रेनच्या सहाय्याने प्लॉटवरील मोकळ्या जागेत ठेवण्याचे काम क्रेन ऑपरेटर करतात. क्रेनच्या सहाय्याने हे मोठाले अवजड सामान उचलण्यात येते.

**तेल काढणे –** जहाजातील इंजिन रुममध्ये विविध प्रकारची तेले व डिझेल मोठ्या प्रमाणात असते. ती तेले वंगण डिझेल हे सारे बॅरेलमध्ये भरण्याचे काम तेल काढणारे कामगार करत असतात. त्यांना प्रती बॅरेल प्रमाणे पैसे दिले जातात.

**मालपाणी –** मालपाणी म्हणून ओळखले जाणारे कामगार जहाजातील भंगार मालातील विविध प्रकारचे धातू, तांबे, पितळ, लोखंड इ. सर्व वेगवेगळे करून एकत्र करून ठेवतात.

## कामाच्या ठिकाणी सुरक्षेचा अभाव :

वास्तविकता हे स्थलांतरित कामगारच हे निकामी जहाज तोडण्याचे अतिशय कष्टप्रद आणि अत्यंत धोक्याचे काम करू शकतात. कारण त्यांना कामाची आणि पैशाची दोन्ही गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. इथले स्थानिक लोक हे अशा कुठल्याही प्रकारचे अवजड काम करू शकत नाहीत. हे कामगार

ज्या प्लॉटवर जहाज तोडण्याचे काम करतात तिथे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती पाऊले उचलली जातातच नाही. प्रत्येक प्लॉटवर सुरक्षेच्या सर्व सूचना मात्र मोठ्या ठळक अक्षरात लिहिलेल्या आहेत.

## कागारांची वैयक्ति सुरक्षेची साधने






फोटो स्टुडीयो
MO. 9033740887





भावनगर





दुपारी जेवणाच्या सुटीत घरी परतलेले कामगार



काही क्षण झोपडीखाली विसावा घेणारा कामगार



चहाच्या सुटीत थोडावेळ निवंत गप्पा मारणारे कामगार



**ढाब्यावर चहा व डबा खाणारे कामगार**

मात्र त्या सुरक्षेच्या संदर्भातल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणाऱ्या अगदी तीन ते चारच शीपिंग ब्रेकींग कंपन्या आहेत. बाकी सगळीकडे कारभार यथातथाच आहे. प्लॉटवरसुद्धा सगळा भंगार माल इकडे तिकडे पडलेला असतो. सगळीकडे लोखंडाचे तुकडे खिळे स्क्रू याचे साम्राज्य असते. त्यानेसुद्धा पायांना हाताला इजा होण्याची शक्यता असते. काही वेळा गंजलेल्या लोखंडाचा चुरा पायात जाऊनही पायाला सेप्टीक होत असते. या कामगार सतत ऊन हवा वारा यांचा सामना करावा लागतो. कारण सर्व काम हे उघड्या प्लॉटच्या मोकळ्या जागेतच चालू असते आणि उन्हाळा हिवाळा पावसाळा या तिन्ही ऋतूत हे काम असेच उघड्यावर चालू असते आणि महाकाय जहाजाच्या सुट्या विभागाचेसुद्धा छोटे छोटे तुकडे करणे तसे अतिशय कष्टाचे आणि प्रचंड श्रमाचे काम असते. त्याचप्रमाणे तोडलेले तुकडे प्लेटस उचलण्यासाठी प्रचंड असे मनुष्यबळ लागते. या अवजड सामान उचलणे ठेवणे या कामाचाही या कामगारांच्या शरीरावर अप्रत्यक्षपणे गंभीर असा परिणाम हा होतच असतो. काही वेळा हे कामगार अतिशय धोका पत्करून अगदी जीवावर उदार होऊन आपले काम करत असतात. त्यात गंभीर असा अपघात वा जीवीतहानी होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. जोडीवाला आणि गॅसकटर हे काम करणाऱ्या कामगारांना मोठ्या प्रमाणात धोका असतो. त्याचप्रमाणे लोडिंग अन लोडिंग करणारे कामगार टीम वर्कने

काम करत असतात. त्यांच्यात जरा जरी थोडीशी चूक झाली तर गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यासाठी या कामगारांना आपला बचाव करण्यासाठी योग्य त्या गोष्टीची (Safety tools) आवश्यकता असते. त्यात हातमोजे, चष्मा, बूटस् आणि हेल्मेट या गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. या गोष्टी प्रत्येक प्लॉटधारक पुरवतातच असे होत नाही. काही ठिकाणी कामगारांना या सुविधा पुरविल्या जातात. परंतु त्या सर्व वस्तूचे पैसे यांच्या रोजगारीतून कापून घेतले जातात. ज्या कामगारांना आपल्या जीवाची काळजी आहे ते स्वत:साठी या गोष्टी स्वत:च्या पैशाने खरेदी करतात. या जहाजातून काही वेळा बूट (bamboots) मोठ्या प्रमाणात मिळतात. परंतु मालक ते बूट बाहेर बाजारात विकून टाकतात. त्यामुळे कामगारांना हे बूट बाहेरून विकत घ्यावे लागतात. जे पुरविण्याची जबाबदारी प्लॉटधारकाची असते. पण तसे होत नाही. या कामगारांना ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या साध्या साध्या गोष्टीसुद्धा पुरविल्या जात नाहीत. मात्र जहाज तोडणीचे काम त्वरित व लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी मात्र या कामगारांवर प्रचंड प्रमाणात दबाव आणण्याचे काम हे मुकादम करत असतात. मुकादमांना मालकाकडून तशा सूचना आलेल्या असतात. पण अशा कामासाठी केलेल्या दबावामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. जहाजाच्या उंच भागावर चढण्यासाठी शिडीची आवश्यकता असते. पण ती सुद्धा मालकांकडून पुरवली जातेच असे नाही. अशा वेळी हे कामगार मोठ्या दोरखंडाचा वापर करून त्यावर चढून तशा अवस्थेत जहाज तोडण्याचे काम करत असतात. यातून उंचावरून खाली पडण्याचीसुद्धा भीती असते. मालक आणि मुकादमाच्या अशा वर्तनाचा या कामगारांच्या मनावर विपरीत परिणाम होत असतो. मात्र जेव्हा गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे सुरक्षा अधिकारी प्लॉटची तपासणी करण्याकरिता येतात तेव्हा मात्र या कामगारांना आपल्या कुठल्याही तक्रारी या अधिकाऱ्यापुढे मांडता येत नाहीत. त्यांना सगळे काही आलबेल असल्याचीच ठराविक उत्तरेच दिली जातात. आणि ज्या अशी तपासणी होणार असते त्या ठराविक वेळेपुरते सर्व कामगारांना सुरक्षेचे सर्व वस्तू वेळच्या वेळी पुरविल्या जातात.

एखाद्या कामगाराला काम करताना काही दुखापत झाली तर कामगाराला घरी जावे लागते. अशा वेळी कामगाराला त्या दिवसाचे पैसे मिळत नाहीत. त्याची गैरहजेरी मांडली जाते. वास्तविकता सुरक्षेची साधने वेळेत न पुरविल्याने अपघात होत असतात. प्लॉटधारकाने सर्व कामगारांना ड्रेस हेल्मेट, बूट, चष्मा, हातमोजे व पायमोजे एवढ्या गोष्टी तरी कामगारांना दिल्या गेल्या पाहिजेत.

कामगाराची अपघाताची नुकसानभरपाई हीसुद्धा वेळच्या वेळी त्या कामगाराच्या कुटुंबियांपर्यंत पोहचत नाही. कामगाराचा विमा उतरवला जातो. पण त्या विम्याची रक्कम त्याचेपुढे काय होते याची पुसटशी कल्पनाही कामगारांना नसते. फक्त त्याचा फॉर्म भरून त्यांच्या नावाने विमा काढल्याचे त्यांना सांगण्यात येते. वास्तविकता एखाद्या अपघातात मृत पावलेल्या कामगाराच्या कुटुंबियांना ही विम्याची रक्कम वा नुकसानभरपाई कधीच वेळेवर दिली जात नाही. आधीची परिस्थिती खूप बिकट होती. मात्र आता गुजराथ मेरी टाईम बोर्ड जातीने लक्ष घालत असल्याने अपघाताची रीतसर चौकशी केली जाते. पोलीस दप्तरी नोंदही केली जाते. पण या साऱ्या गोष्टीसाठी मृत कामगारांच्या कुटुंबियांना खूप पाठपुरावा करावा लागतो. या पाठपुरावा करण्यातच दोन–तीन वर्षे निघून जातात.

**एकटेपणाची भावना :** हे कामगार आपल्या कुटुंबापासून दूर इथे पैसे कमवून आपल्या कुटुंबाला जेवढी मदत करता येईल त्यासाठी इथे अहोरात्र काम करत असतात. त्यांनाही त्यांच्या कुटुंबाची, घरच्यांची खूप आठवण येत असते. परंतु त्यांच्या स्वतःच्याच राहण्याची इतर दुसऱ्या गोष्टींची योग्य व्यवस्था नसल्याने ते आपल्या कुटुंबांना मुलाबाळांना इथे घेऊन येत नाहीत. काही काही वेळा इथल्या स्थानिक लोकांचाही तुसडा स्वभाव व घरच्यांच्या पासून दूर असल्याने या कामगारांना आपण खूप एकटे पडल्याची जाणीव यांच्या मनात निर्माण होत असते. पण या कामगारांचाही पूर्णपणे नाईलाज असतो. हे कामगार पावसाळ्याच्या दरम्यान आपल्या गावी जाऊन पुन्हा अलंग इथे येत असतात.

**औषधोपचार :** या कामगारांना विविध आजारांना सामोरे जावे लागत असते. अलंग शीपयार्डात रेडक्रॉसचा एक दवाखाना आहे. जिथे हे कामगार जाऊन औषधे घेतात. परंतु त्या औषधांचा काहीही उपयोग होत नाही. त्यामुळे या कामगारांना खाजगी दवाखान्यात जावे लागते. रेडक्रॉस दवाखान्यात पुष्कळ वेळा डॉक्टरच उपलब्ध नसतात तर खाजगी दवाखान्यातील डॉक्टर हे प्रशिक्षित डॉक्टर असतातच असे नाही. काही खाजगी दवाखान्यातील डॉक्टर यांना तारीख बाद झालेली औषधे देतात. हे अशिक्षित व गरीब असल्यामुळे त्यांच्या या गोष्टी लक्षातही येत नाहीत. या कामगारांना आजारातून लवकरात लवकर बाहेर पडायचे असते. कारण जितके दिवस हे कामगार आजारी तितके दिवस त्यांना विना वेतनच रहावे लागणार असते. त्यामुळे त्यांना लवकर बरे होण्याची घाई असते. इथल्या खाजगी दवाखान्यांची अवस्था तर अतिशयच गंभीर अशी आहे.



**अपघातग्रस्त कामगाराची जबाबदारी मालक घेतात**

फक्त भावनगर ब्लड बँकेच्या माध्यमातून चालविण्यात येणारे एडस सेंटर जिथे या कामगारांना आरोग्याच्या संदर्भात कशी काळजी घेतली जावी त्यासाठी जागरुक केले जाते. त्याचप्रमाणे विविध आरोग्य विषयक कॅम्पचे आयोजन करून उपयुक्त माहिती बरोबर योग्य त्या औषधांचा पुरवठा केला जातो. एडसपासून बचाव करण्यासाठी सुरक्षित संभोग करण्याविषयीचे मार्गदर्शन केले जाते. त्याचबरोबर निरोधचे वाटपही या कामगारांना करण्यात येते.

**कामगार कायदे :** वास्तविकता अलंग रिसायकलिंग शीपयार्डात काम करणारे सर्वच कामगार हे स्थलांतरित व असंघटित आहेत. या कामगारांच्या हित जपणारे असे कोणतेच कायदे इथे अस्तित्वात नाही किंवा या कामगारांचे प्रश्न मांडणारी अशी कोणतीही कामगार संघटना नाही. यांना त्यांच्या दिल्या जाणाऱ्या वेतनाची स्लीपही दिली जात नाही. एका कागदावर कामगारांची सही वा अंगठा करून एवढे पैसे या महिन्याचे जमा झाले असे सांगून पैसे देऊन टाकले जातात. या कामगारांचा प्रॉव्हिडंट फंड कापला जातो तो किती व कसा कापला जातो, एकूण किती जमा झाला आहे याबाबतीतही त्यांना कुठलीही माहिती दिली जात नाही. आज कित्येक वर्षापासून कामगार यार्डात काम करत असला तरी तो कुठल्या क्षणी कामावरून काढून टाकला जाईल याची शाश्वती देता येत नाही. म्हणजेच कामाच्या बाबतीतही

कोणतीही खात्री देता येत नाही. पण कामगारांनी कायदा हातात घेतला तर त्यांची नोकरी जाण्याची भीती त्यांना असते. त्यामुळे हे कामगार एकत्रही येत नाहीत आणि कायदाही हातात घेत नाहीत.

इतर कामगाराप्रमाणे वॉचमनला तर बारा बारा तास ड्युटी करून खूपच कमी वेतन मिळते. कामगाराच्या विमा पॉलिसी पण काढली जाते. पण अपघातानंतर मालक लोक औषधाचा खर्च करून बाजूला होतात. बाकी इतर काहीही मोबदला दिला जात नाही. तरी आता गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी लक्ष घालतात. त्यामुळे मालकांना पैसे देणे भाग पडत आहे.

## समारोप :

या पाचव्या प्रकरणात आपण स्थलांतरित कामगारांचे शोषण व सामाजिक सुरक्षिततेच्या बाबतीत पूर्ण विवेचन केले आहे. त्यात आपण प्रथम स्थलांतर, गरीबी, वेठबिगारी व शोषण  या सामाजिक समस्या आहेत. आणि त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बघितला आहे. या स्थलांतरित कामगारांचे कशा रीतीने शोषण केले जाते. त्यात आर्थिक मानसिक व शारीरिक या तिन्ही बाजूंचा आपण विचार केला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक शोषणा संदर्भातही आपण विवेचन पाहिले आहे. या कामगारांना कामाच्या ठिकाणी व समाजातही सामाजिक सुरक्षितता कशा रीतीने मिळू शकेल. या कामगारांना कोणकोणत्या कायद्याचे संरक्षण मिळू शकते या गोष्टींचाही आपण विचार घेतला आहे. या कामगारांना स्थलांतर का करावे लागते. व यांच्या स्थलांतरा पाठीमागची कारणेही आपण जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या कामगारांची आर्थिक सामाजिक परिस्थिती कशी आहे ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे या कामगारांच्या जीवनावर स्थलांतरामुळे झालेला प्रभाव पाहिला आहे. कामाच्या ठिकाणी या लोकांना सुरक्षेचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. व या कामगारांच्या कल्याणासाठी कायदे खूप आहेत पण त्यांची अंमलबजावणी होणेही जरूरीचे आहे. या पुढील सहाव्या प्रकरणात आपण या विषयाचा अनुषंगून आपण निष्कर्ष सूचना व या बरोबरच गृहितकांचे पुर्नविलोकन केलेले आहे.

## संदर्भ सूची :


1) Breman Jan. 1994, wage hunters and catherrs search for work in urban and rural economy of south gujarat. oxford university press, New Delhi.

2) Breman Jan, 1996, Footloose labour, Cambridge University press.

3) Breman Jan. Das arvind 2000 Down and out labouring undar global captializam.

4) Biswaroop 2015 migrant labours in urban areas for social studies surat.

5) D. P. Saxena (1977), migration in India, popular Prakashan Mumbai.

6) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड ३ रा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३0

7) Ghanshyam shah (1990), migrant labour in india center for social studies surat.

8) डॉ. बी.आर. जोशी, समाजशास्त्र मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३0

9) Jhabvala Renna & submeinam the unorganised sector work, security and social protection SAGE Publication, New Delhi.

10) डॉ. दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३0

11) प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, २०१३,

12) Kothari and visaria-1984 Rural Urban migration in Gujart in Analisis of census Delta.

13) S.P. Institute of eco. & Sociology Reserech Ahmedbad.

14) Dr. W. N. Salve Reports on Labour rights and Labour Standards for migrant labour in India.

15) M.S.A. Rao 1986

16) डॉ. नीलम ताटके, समाजकार्य कोश २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३0

17) Studies in migration Internal and International migration in India.

118) Madam G.R. 2009, Indian Social Problems, Allied Publisher mumbai.

11) Ram Aahuja 2007 Social Problems in India Rawat Publication. Jaipur.

12) Ram awtar 1971, Lectures on labour problems and social welfare in India.

13) Ram Aahuja 2007, social problems in India Rawat Publication Jaipur.\

14) Sreenivasuil N.S. 2008, Human rights; many sides to coin. regal publisher new Delhi.

15) Smita panjour 2007, Locked homer empty school, Zubben , New Delhi.

16) T.K. PANDA & P. MAHAPATRA 1997 Report on working and living condition of oriya migrant labours.

17) T.N. Bhogiwal 1965, Labour problems in India, Kitabghar, Kanpur.

18) Tribhwan Robin, Jayshree Patil 2009 Stone quarry workers, Discovery Publishing house, New Delhi,

19) Tribhuwan Robin & Karche Jayshree Child labour and right issue. Astudy of migrant labour, Discovery Publishing house, New Delhi

21) मराठी विश्वकोश खंड १३ (२०००)

22) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ ला व २ डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७)

23) गुरुनाथ नाडगोंडे (२०००) कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे २.

24) सामाजिक विचार प्रवाह, प्रा. पी. के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर.

25) गणपति शंकर १९८२, मंथन कर्णकृष्ण भाग– १,

26) गोरे एम. एस. १९७८, शहरीकरण व कौटुंबिक परिवर्तन.

27) कौशिक आर शुक्ल, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, सरदार पटेल, युनिर्व्हसिटी.

28) डॉ. सुमनबेन चौधरी, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध भावनगर, युनिर्व्हसिटी.

## **Internet Webside**

1) www.gmb.ports.org

2) www. asain academic

3) www.industiral union.org

4) www. shipbraking platform.org

5) www.lucion marnine.com

| | |
|---|---|
| | प्रकरण ६ वे |
| | समरी अनुमान व निष्कर्ष |
| ६.१ | प्रस्तावना |
| ६.२ | गृहितकांचे पुर्नविलोकन |
| ६.३ | निष्कर्ष |
| ६.४ | सूचना |
| ६.५ | समारोप |
| | संदर्भसूची |

# प्रकरण ६ वे

## प्रस्तावना :

गुजराथ राज्य हे अत्यंत प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जाते. विविध उद्योगधंद्यामुळे इथे रोजगाराला मिळणारी संधी. याच प्रगत राज्यातील भावनगर जिल्ह्यातील अलंग – सोसियो रिसायकलिंग शीपयार्ड हे जगातले एक महत्त्वाचे असे जहाज तोडणी केंद्र अस्तित्वात आहे. याच शीपयार्डात देश विदेशातील निकामी झालेली जहाजे इथे तोडण्यासाठी उपलब्ध होतात. आणि आज हा व्यवसाय खूपच मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. या निकामी जहाजातून मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारे स्टील ज्याचा उपयोग भारतातील पायाभूत प्रकल्पांसाठी वापर केला जातो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या शीपयार्डामुळे हजारो लोकांना उलब्ध होणारा रोजगार. ही निकामी जहाजे तोडण्यासाठी भारतातील अत्यंत गरीब ओळखल्या राज्यातून म्हणजे बिहार, उत्तरप्रदेश झारखंड, ओरिसा व प.बंगाल या राज्यातून स्थलांतरित कामगार इथे कामासाठी येतात. एवढ्या दूरवर कामाला येण्यापाठीमागचा मूळ उद्देश हाच की त्यांच्या मूळ वतनात त्यांना कुठल्याही प्रकारचा रोजगार उलब्ध होत नाही. आणि उपलब्ध झालाच तर मिळणारे वेतन अतिशय तटपुंजे असते. ज्यात त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा खर्चही भागात नाही आणि आपला जीवनस्तर सुधारावा याच दृष्टीने हे लोक इतक्या दूरवर इथे काम करण्यासाठी येतात.

अगदी पायलेट अभ्यासापासून ते त्यानंतरही तीन ते चार वेळा या शीपयार्डाला भेट दिली तेव्हा इथली एकूणच सगळी परिस्थिती समोर आली. इथे येणाऱ्या कामगारांना आपल्या राज्यात कामाची संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ते रोजगाराच्या निमित्ताने इथे स्थलांतरित होतात. इथे काम करुन त्यांना थोडीफार बचतही करता येते. पण कामाचे स्वरुप अतिशय कष्टदायक असेच आहे.

'अलंग शीप ब्रेकींग यार्डातील असंघटीत कामगारांच्या शोषणा संदर्भात संशोधन. एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाला अनुषंगुनच त्या दृष्टीकोनातून अभ्यास केला. तेव्हा काही ठळक गोष्टी समोर आल्या त्या म्हणजे,

१) अलंग शीप ब्रेकींग रिसायकलिंग यार्डाची निर्मिती झाल्यापासून ज्या प्रमाणे या स्थलांतरित कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला आहे. त्याच प्रमाणे या यार्डाच्या आजूबाजूच्या जवळजवळ २० गावातील लोकांना सुद्धा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे रोजगार मिळालेला आहे.

२) आज या शीपयार्डात कामगारांची संख्या ३० हजाराच्या आसपास आहे. आणि स्थानिक लोकांच्या पेक्षाही स्थलांतरित कामगारच सर्वाधिक आहेत.

३) आज एवढ्या मोठ्या प्रमाणात कामगार काम करत असूनही त्यांची संघटना आहे. त्यांचे कायदेशी आहेत पण ते लागू केले जात नाहीत. स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात (त्यात उसतोडणी वीटभट्टी शेतमजूर, बांधकाम करणारे मजूर सूतगिरण्यातील मजूर आणि हीऱ्याला पैलु पाडणारे हीरे कारागिर या स्थलांतरित कामगारांचा अभ्यास झाला आहे. अलंग च्या स्थलांतरित कामगारांच्या संदर्भात कौशिक शुक्ल यांनीही अभ्यास केलेला आहे पण तो अगदी सुरुवातीचा काळ होता. सुरवातीचा काळ होता. तेव्हाच्या आणि आत्ताच्या अलंग शीपयार्डात आमूलाग्र बदल झाला आहे. तेव्हाची परिस्थिती खूप वेगळी होती. आताची परिस्थिती खूपच वेगळी आहे.

४) हे स्थलांतरित कामगार एवढ्या लांबून इथे कामासाठी का येतात. त्याच्या पाठीमागच्या कारणाचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला.

५) इथे काम करणाऱ्या कामगारांच्या शारीरिक आर्थिक मानसिक व सामाजिक दृष्टिकोनातूनही अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.

६) त्याचप्रमाणे स्थलांतरित कामगारांबरोबरच त्यांचे प्रश्न त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या शीप ब्रेकर्स असोसिएशन च्या सदस्यांशी बातचीत केली त्याचप्रमाणे गुजराथ मेरी टाईम बोर्ड व गुजराथ सरकारच्या संदर्भातही अलंग शीप ब्रेकींग यार्डाविषयी च्या दृष्टिकोन जाणून घेण्याच्या प्रयत्न केला.

या अभ्यासाच्या निमित्ताने ज्या गोष्टीचा अभ्यास करण्यात आला त्यात अलंगची भौगोलिक पार्श्वभूमी कामगारांचे वर्गीकरण त्यांच्या कामाचे स्वरुप, विविध उद्योगांना मिळालेली चालना शीपयार्डाचा विकास त्या दृष्टीने आखलेली पाऊले सरकारकडून मिळणाऱ्या सोई सवलती इथे काम करणारे स्थलांतरित कामगार त्यांच्या दैनंदिन गरजा त्यांचे निवास स्थान, त्यांना मिळणाऱ्या सोई सुविधा त्या दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे.

या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून सर्व माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मुलाखत अनुसूची

प्रश्नावली विविध संदर्भ ग्रंथ पुस्तके, रिपोर्ट या सगळ्या गोष्टींचा आधार घेतला आहे. संशोधनाची सत्यता दर्शविण्यासाठी छायाचित्राचा आधार घेतलेला आहे. या कामगारांच्या मुलाखती बरोबरच काही स्थानिक लोकांशी सुद्धा बातचीत करुन सत्यासत्यता पडताळून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच चर्चा, गटचर्चा, निरिक्षण, प्रत्यक्ष सहभागातून माहीती संकलित करुन तिचे विश्लेषणही संख्यात्मक, गुणात्मक दृष्टिकोनातून विश्लेषण केले. आणि एकूण सहा प्रकरणातून हा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) अलंग रिसायकलिंग शापब्रेकींग यार्डाची पार्श्वभूमी** : गुजराथ राज्यात खनिज संसाधनाची तशी कोणतीच उपलब्धता नाही.  त्यामुळे विविध पायाभूत प्रकल्पांना लागणारे लोखंड स्टील यांची कायम कमतरता भासत होती. त्यासाठी,

वास्तविकता लाभलेला विपुल असा सागरी किनारा आणि या सागरी किनाऱ्यांचा मालवाहतूक तसेच प्रवासवाहतूकीसाठी उपयोग केला जावा. त्याचबरोबर इतर काही उद्योग इथे आपल्याला उभारता येऊ शकतो का? अशा दृष्टिकोनातून विचार करणारे त्या काळचे गुजराथ राज्याचे अर्थमंत्री श्री. सनत मेहता यांनी आपल्या सागरी किनाऱ्यावर निकामी जहाजे तोडण्या संदर्भात आपल्याला काही करता येऊ शकते. का असा विचार व्यक्त केला. व त्यादृष्टिने गुजराथ मेरी टाईम बोर्डाची स्थापना करण्यात आली व त्यासाठी एका समितीची नेमणूक करण्यात आली. या समितीच्या सदस्यांनी गुजराथ राज्यातील विविध बंदरांचा सखोल अभ्यास केला. आणि सगळ्याच दृष्टीने अनुकूल ठरलेल्या अलंग गावाची निवड करण्यात आली. त्यावेळचे पंतप्रधान नरसिंहराव आणि केंद्रीय अर्थमंत्री श्री मनमोहनसिंग यांनीसुद्धा आर्थिक पाठबळ दिल्याने अलंग गावातच शीप ब्रेकींग यार्ड स्थापण्याचे निश्चित झाले.

अलंग शीप ब्रेकींग यार्ड हे भावनगर जिल्ह्याच्या गल्फ च्या आखातात पश्चिमी किनाऱ्यावर भावनगरच्या पूर्व दिशेला ५० कि.मी. वर आलेले आहे. १३. १२, १९८३ रोजी पहिले जहाजाने डेडियर याने नागंर टाकला होता.

१९८३ साली खऱ्या अर्थाने सुरु झालेल्या जहाज तोडणीला आज ३० वर्षे उलटून गेली आहेत. सुरुवातील जहाजांची संख्या कमी होती. पूर्वी एक जहाज तोडायला सुमारे ८ ते १० महिन्याचा कालावधी लागत होता. तेच जहाज आज २ ते ३ महिन्यात तोडून पूर्ण होते. सुरुवातीला

जहाजांची विक्री ही लॉटरी पद्धतीने होत असे. परंतु आता खुल्या जागतिकीकरणामुळे कोणीही जहाजांची खरेदी करु शकते, तसेच सुरुवातील वर्षाला जहाज, तोडण्याची संख्या अतिशय कमी होती. ती आता ३५० ते ४०० जहाजे तोडण्या इतपर्यत पोहोचली आहे. या चालू आर्थिक वर्षात मंदीचे सावट असल्याने या वर्षी या उद्योगावर थोडा विपरित परिणाम होऊ शकतो. परंतु आज अलंग शीप ब्रेकींग यार्डाने जगात मानाचे स्थान मिळविले आहे. इथे उपलब्ध होणाऱ्या रोजगारामुळेच स्थलांतरित कामगार इथे काम करण्यासाठी आर्कषिले गेले आहेत. आणि दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढताना दिसून येत आहे.

जहाज तोडण्याच्या दृष्टीकोनातून अलंग येथील लाभलेला सागर किनारा त्याची नैसर्गिक ठेवण ही अतिशय उपयुक्त ठरत आहे. भरतीच्या वेळेला समुद्राच्या पाण्याची पातळी ही २२ ते ४० एवढी उंची गाठते त्या दृष्टीने जगात अलंगाचा तिसरा क्रमांक लागतो आणि जहाजाचा खालचा भाग कापण्यासाठी खंभातचा किनारा अतिशय उपयुक्त ठरत आहे. आणि जेव्हा इथल्या सागर किनारी ओहोटी येते तेव्हा हे समुद्राचे पाणी सुमारे दोन कि.मी. दूर निघून जाते. त्यामुळे तिथे निर्माण होणाऱ्या उतारामुळे कामगारांना काम करणेही सोपे जाते. आणि या सागर किनाऱ्यावर बोटी चालविणे किंवा मासेमारी करण्यासाठी परवानगी नाही. अलंग चा सागर किनारा हा गळ्यातील हाराप्रमाणे (Neckless) असल्यामुळे जहाजे अगदी सागर किनारी आणणे शक्य होते. त्याच बरोबर इते उपलब्ध होणारा मजूर वर्ग त्यामुळे अलंग हे जगातले एक अत्यंत महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र म्हणून नावारुपाला आले आहे.

सुरवातीला इथे असलेल्या प्लॉटची संख्या ही ५० ते ६० होती. आज मात्र १६० च्या वर प्लॉटस् कार्यरत आहेत. १) ३० x ४५ २) ५० x ४५ ३) ७० x ४५ ४) ८० x ४५ ५) १२० x ५० मीटर प्रमाणे प्लॉटची आकारणी आहे.

जुन्या जहाजातून मिळणारे पोलाद त्याचप्रमाणे उपलब्ध होणारे लाकूड आणि इतरही अनेक गोष्टींमुळे या व्यवसायाला आज मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जहाजांची विक्री ही खुल्या बाजारपेठेतच होते. विक्री करणारे दलाल हे सिंगापूर लंडन इथेच आहेत. त्याच्या मार्फत व स्थानिक कर्जपुरवठा करणारे व्यापारी त्याच्यात हा सौदा पूर्ण होऊन मग शीप ब्रेकर्सला ते जहाज उपलब्ध होते. जसे जहाज कापून त्यातील माल विकला जाईल तसे पैसे चुकविले जातात. जहाज

तोडण्याची सुरवात पुढच्या भागापासून खाली तळापर्यंत केली जाते. मोठमोठाले शीट आणि प्लेट कापण्यासाठी सिलेंडरचा उपयोग केला जातो. त्यासाठी वीजेची गरज पडत नाही.

जहाज तोडणीच्या कामात कामगारांच्या कामाची प्रतवारी अशी असते. गॅसकटर, जोडीवाला, फीटर, हेल्पर, क्रेन ड्रायव्हर, विंच ड्रायव्हर, मिस्त्री, भंगार उचलणार हेल्पर (बिगारी) चौकीदार आणि स्टोअर कीपर. यात कामगार आपापल्या पद्धीतीने काम करतात. आता मुकादम आणि सुरक्षा अधिकारी  सुद्धा प्रत्येक प्लॉटवर कार्यरत करण्यात आले आहेत. मुकादमाच्या हाताखाली ३० ते ४० कामगार सांगितलेल्या पद्धतीप्रमाणे काम करतात. आज सुमारे १८० ते ३५० रुपया पर्यंत या कामगारांना रोजगार उपलब्ध होतो. मुकादम व सुपरवायझर यांचे पगार कायम स्वरुपी ठरलेले असतात. या कामगारांच्या वेतनात थोडीफार सुधारणा झाली आहे. परंतु त्यांना दिल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधां मध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा दिसून येत नाहीये. आता या कामगारांसाठी एक भव्य गृहप्रकल्प उभारला जात आहे. त्यातला १ला टप्पा हा डिसेंबर १५ पर्यंत पूर्ण होईल अशी आशा आहे. या कामगारांना ही घरे कशी उपलब्ध करुन देणार या बाबतीत अजून निर्णय व्हायचा आहे. परंतु नाममात्र शुल्क आकारुन यांना भाडेतत्त्वावर ही घरे उलब्ध करुन दिली जातील असा अंदाज व्यक्त केला जात आहे

अलंग शीप ब्रेकींग रिसायकलींग यार्डामुळे आजूबाजूच्या पूरक उद्योगांचाही मोठ्या प्रमाणात विकास  झालेला दिसून येत  आहे. रोलींग मिल्स, ऑक्सिजन गॅस प्लांट, तांब पितळेच्या वस्तू बनविणे छोटे मोठे स्क्रू बनविण्याच्या उद्योगाना चालना मिळाली आहे. त्यामुळे या यार्डामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपण सुमारे लाखाहून अधिक लोकांना रोजगाराच्या संधी उलब्ध झालेल्या आहेत.

अलंग येथे येणारी निकामी जहाजे ९०% अधिक विदेशातूनच येतात. त्यात अभेरिका, रशिया, युरोपातील देश, जपान मधील स्टीमर प्रवासी बोटी यांचा समावेश आहे.

या निकामी जहाजातून निघालेल्या वस्तूची विक्री करणारे सुमारे ४०० हून अधिक प्लॉट हे आपण अलंग गावात प्रवेश करतानाच ते यार्डात प्रवेश करे पर्यंत पहायला मिळतात. आणि या निकामी जहाजातून सुमारे १५ ते २०% अतिशय किंमती असे सामान उपलब्ध होते. त्यात जनरेटर, इलेक्ट्रीकल मोटारी, वायर इलेक्टिकल लाईट, वॉशिंग मशीन, टेबल खुर्च्या, सोफासेट, आणि गृहपयोगी कित्येक वस्तू इथे उपलब्ध होतात. या वस्तू बाजारात विकल्या जातात. त्याच प्रमाणे भंगार माल हा ट्रक मार्फत गुजराथ बरोबर इतर राज्यातही पाठविण्यात येतो.

अलंग ला जोडणारा मुख्य रस्ता त्रापज ला जोडला जातो. तोच भावनगरला जाणारा मुख्य हायवे आहे.

अलंग शीप ब्रेकींग यार्डाची धूरा गुजराथ मेरी टाईम बोर्ड सांभाळते. बोर्डाकडूनच प्लॉट भाडेतत्वार उलब्ध करुन दिले जातात. ते काही वर्षाच्या कराराने दिले जातात. त्या बदल्यात वीज, पाणीपुरवठा अग्निरक्षक दल रस्ते या गोष्टी पुरविल्या जातात. या शीपयार्डात दोन पे अॅन्ड यूज असलेली  सुलभ दोन शैचालये आहेत. बँक, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी, एक हॉटेलही आहे. त्याचप्रमाणे रेडक्रॉस सोसायटीचे एक हॉस्पिटल सुद्धा आहे.

अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्डाच्या निमित्ताने असंघटित स्थलांतरीत कामगारांच्या शोषणा संदर्भातील जो काही अभ्यास केला त्या अभ्यासानुसार खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१) स्थलांतर ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

२) प्राचीन काळापासून स्थलांतर ही प्रक्रिया सुरू असून त्या काळात धर्माचा प्रचार व प्रसार आणि व्यापाऱ्याच्या निमित्ताने स्थलांतर केले जात होते.

३) औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे स्थलांतर प्रक्रियेला अधिक गती प्राप्त झाली आहे. फक्त अर्थाजनासाठीच नाही तर उच्च व उत्तम शिक्षणासाठीही स्थलांतर केले जाते.

४) स्थलांतर हे आतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरावर होत असते.

५) स्थलांतर हे प्रामुख्याने ग्रामीण भागाकडून शहराकडे व शहराकडून मोठ्या शहरांकडे होत असते.

६) स्थलांतर हे ऐच्छिक व अनैच्छिक स्वरुपाचे असते. (Pull & Push Factors)

७) स्थलांतर प्रक्रियेपाठीमागे काही (आकर्षित करणारे घटक तर काही (Push) ढकलणारे घटक कारणीभूत असतात.

८) स्थलांतरापाठीमागे जशी गरीबी बेकारी व अर्थाजन हे जसे महत्त्वाचे घटक आहेत त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती, त्यात पूर, भुकंप राजकीय अस्थिरता या गोष्टींचा सुद्धा समावेश होऊ शकतो. अगदी ताजे उदाहरण द्यायचे झाले तर (नेपाळ मधील भूकंपाची परिस्थिती)

९) काही वेळा स्थलांतर हे मनाविरुद्ध करावे लागते. तर काही ठिकाणी स्थलांतर प्रक्रियेमुळे उत्कर्षही झालेला दिसून येतो.

१०) संघटित आणि असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या स्थलांतरापाठीमागे खूपच मोठा फरक असतो.

११) संघटित क्षेत्रातील कामगारांना सर्व प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध असतात. त्यांना कायद्याचे संरक्षण असते. व स्थिरता आणि आर्थिक स्थैर्यामुळे या लोकांना समाजात एक मानाचे स्थान असते. (हक्काची रजा, बोनस, पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड) या अशा सुविधा या कामगारांना मिळतात. या क्षेत्रातील कामगारांचे स्थलांतर झाले तरी सुद्धा एक प्रकारचे स्थैर्य असते.

१२) असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगारांना ज्या ठिकाणी रोजगार उपलब्ध असेल त्या ठिकाणी स्थलांतर करावे लागते. या कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सोई सुविधा किंवा कायद्याचे संरक्षण उपलब्ध होत नाही. प्रामुख्याने गरीब, अशिक्षित व निम्न स्तरातील लोकच आपल्याला असंघटित क्षेत्रात काम करताना दिसून येतात.

१३) संघटित क्षेत्रात काम करणारा वर्ग सुशिक्षित असतो. यास नामांकित कंपन्या सरकारी नोकऱ्या, शाळा–कॉलेज मधील शिक्षक वर्ग, बँकामधील कर्मचारी अशा लोकांचा समावेश होतो.

१४) असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार हे शेतमजूर, वीटभट्टी, शीपयार्ड कामगार, ऊसतोडणी कामगार, सूत–गिरण्यातून काम करणारे कामगार हिऱ्याला पैलु पाडणारे कारागिर, गृह प्रकल्पाच्या निर्मितीत काम करणारे कामगार, मीठ कामगार व लघु उद्योगामधून काम करणारे, कामगार या लोकांचा यात समावेश असतो.

१५) असंघटित क्षेत्रात काम करणारे काही कामगार हे आपल्या कुटुंबासमवेतच कामाच्या ठिकाणी स्थलांतर करतात. मात्र अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणारे हे कामगार आपल्या कुटुंबियांना आपल्या मूळ गावी ठेवूनच एकटेच कामासाठी स्थलांतर करतात.

१६) असंघटित स्थलांतरित कामगारांना कामाच्या ठिकाणी सगळ्याच प्रकारचे समायोजन करावे लागते. त्यांना निवास, पाणी व इतर मूलभूत गरजांची पूर्तता स्वत:ची स्वत:लाच करावी लागते. त्याचबरोबर तिथल्या स्थानिक लोकांबरोबर समायोजन करून रहावे लागते. सतत एका दडपणाखाली भीतीखाली त्यांना जीवन जगावे लागते.

१७) स्थलांतरित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे अलंग हे एक उत्तम उदाहरण म्हणून देता येऊ शकते.

१८) अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्डात काम करणारे बहुतांशी कामगार हे परराज्यातील आहेत. त्यात उत्तरप्रदेश बिहार, ओरिसा, झारखंड व पं. बंगाल येथील कामगारांचा समावेश आहे.
१९) अलंग येथे जगातील निकामी झालेली जहाजे तोडण्यासाठी येतात व ही निकामी जहाजे तोडण्याचे काम हे कामगार करतात.
२०) अतिशय कष्टप्रद व अत्यंत धोकादायक व प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शरीराला हानी पोहचवणाऱ्या अशा धोकादायक परिस्थितीतही हे कामगार काम करतात.
२१) फक्त गरीबी व बेरोजगारी, तसेच त्यांच्या मूळ वतनी रोजगाराचे कुठलेच साधन उपलब्ध होत नाही. आपल्या कुटुंबाच्या पालन पोषणासाठी हे कामगार एवढ्या दूरवर स्थलांतरित होऊन फक्त परिस्थितीवशतेमुळे इथे काम करत असतात.
२२) अलंग मधे स्थलांतरित झालेल्या कामगारांना निवासाच्या, किंवा इतर कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. आपल्या कामाच्या प्लॉटसमोरच बांधलेल्या झोपडीवजा घरातून हे लोक आपला निवास करत असतात.
२३) भारतात इतर ठिकाणी जरी जहाज तोडणीचे काम होत असले तरी सुद्धा अलंग रिसायकलींग शीप ब्रेकींग यार्डातच सर्वाधिक निकामी जहाजे तोडली जातात.
२४) आज जगात भारत, चीन, पाकिस्तान, बांग्लादेश, तुर्कीस्थान, या ठिकाणी जहाज तोडणीचे काम केले जाते.
२५) सुमारे १००० हून अधिक निकामी जहाजे तोडण्यासाठी दरवर्षी उपलब्ध होतात. त्यात टँकर, कंटेनर, प्रवासी वाहतूक, करणारी जहाजे मालवाहू तसेच युद्ध नौकाचा सुद्धा समावेश असतो.
२६) अलंग येथील सागरी किनारा निवडण्यापाठीमागचे मूळ कारण म्हणजे अलंगला लाभलेला उत्तम असा नैसर्गिक किनारा ज्याचा आकार हा गळ्यातील हाराप्रमाणे आहे. त्यामुळे इथे जहाज तोडणी करण्याकरीता ज्या ज्या आवश्यक गोष्टी लागतात त्या असल्याने त्याची निवड करण्यात आली आहे. तसेच या सागरी किनाऱ्याला कधीही सुनामीचा धोका नाही असे तज्ञांचे मत आहे.
२७) अलंग शीप ब्रेकींग यार्ड हे गुजराथ राज्यातील भावनगर शहरापासून ५० कि.मी. अंतरावर असून ते रेल्वे व महामार्गाने जोडलेले आहे. गल्फ ऑफ खंभातच्या सागरी किनारी वसलेले आहे.

२८) गुजराथ मेरी टाईम बोर्ड यांच्या अधिपत्याखाली अलंग शीप ब्रेकींग यार्डाचा सर्व व्यवहार चालतो.

२९) आज अलंग शीप ब्रेकींग यार्डात सुमारे १६० हून अधिक प्लॉटस कार्यरत आहेत.

३०) शीप ब्रेकर्स ना भाडेतत्त्वावर प्लॉटस उपलब्ध करून देणे. वीज पाणी रस्ते आणि संदेशवहन यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे काम गुजराथ मेरी टाईम बोर्ड करते. त्या बदल्यात शीप ब्रेकर्स ना ठराविक रक्कम गुजराथ मेरी टाईम बोर्डाला द्यावी लागते. ही आकारणी प्लॉटच्या विस्तारानुसार ठरलेली आहे.

३१) निकामी जहाजांची विक्री करणारे दलाल हे लंडन, दुबई व सिंगापूर येथे असतात. त्यांच्या मार्फत व पतपुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या सहाय्याने शीप ब्रेकर्स जहाजांची खरेदी करतात.

३२) ज्या प्रमाणे जहाजाची तोडणी होईल त्यानुसार मालाची विक्री करून आलेल्या पैशातून बँकेचे कर्ज व वित्त पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्याला पैसे चुकते करतात.

३३) जहाज तोडणीला सुरुवात करण्यापूर्वी कस्टम अधिकारी, प्रदुषण नियंत्रण बोर्ड, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी या जहाजाची कसून तपासणी करतात आणि त्या नंतरच मग गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावरच मग जहाज तोडणीला सुरुवात करता येते.

३४) अलंग सोसियो रिसायकलींग शीपयार्डात प्रत्येक प्लॉटवर सुमारे १५० ते २०० कामगार काम करत असतात.

३५) गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून या कामगारांना तीन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते व त्यानंतर प्रमाणपत्र व कार्डही दिले जाते. या कार्डाशिवाय कामगारांना कुठल्याही प्लॉटवर काम करण्याची परवानगी मिळत नाही.

३६) अलंग रिसायकलींग शीपयार्डात काम करणाऱ्या कामगारांना १६० ते ४५० रुपये इतके वेतन मिळते. प्रत्येक कामगाराच्या कामाचे स्वरुप भिन्न-भिन्न असते. त्यात गॅसकटर, जोडीवाला मालपाणी, मुकादम सुपरवायझर, सुरक्षा अधिकारी हेल्पर व बिगारी अशा स्वरुपाचे काम करणारे कामगार असतात. मुकादम, सुपरवाझर, व सुरक्षा अधिकारी यांना महिन्याचा पगार ठरलेला असतो. मात्र इतर कामगारांना ज्या दिवशी काम कराल त्याच दिवशीच्या कामाचे पैसे मिळतात.

३७) आधी या कामागारांना रविवारची सुट्टी सुद्धा उपलब्ध नव्हती. पण आता रविवारची सुट्टी माजी पोर्ट ऑफिसर श्री. वाघेला यांच्या प्रयत्नांमुळे या कामगारांना रविवारची सुट्टी मिळू लागली आहे. परंतु त्या दिवसाचे वेतन दिले जात नाही.

३८) आत्ताचे सध्याचे पोर्ट ऑफिसर श्री. चढ्ढा साहेब यांचाही कामगारांच्या प्रती दृष्टीकोन चांगला आहे. आता जी. एम.बी. चे शीपयार्डातील सगळ्याच घडामोडींवर चांगले नियंत्रण आहे.

३९) सुरुवातीच्या काळात प्रदूषण विविध अपघात सुरक्षेचा अभाव या गोष्टीमुळे अलंग सातत्याने प्रसारमाध्यमांच्या झोतात होते. परंतु आता या परिस्थितीत आमुलाग्र बदल होताना दिसून येत आहे. त्याआधी अलंगकडे बघण्याचा दृष्टिकोन खूप नकारात्मक होता. वास्तविकता या पाठीमागेही मोठे राजकारणच होते.

४०) आता अलंग येथील सारे काम हे सुप्रिम कोर्टाने दिलेल्या आदेशातील नियमांप्रमाणे केले जात आहे.

४१) प्रत्येक प्लॉटवर आता सुरक्षा अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे सगळ्याच दृष्टीने आता सुरक्षेततेच्या बाबतीत शीप ब्रेकर्स व कामागारांमधेही खूप जागरुकता आलेली आहे.

४२) पूर्वी अपघातात मृत पावलेल्या कामगारांचे सगळेच राम भरोसे अशी अवस्था होती. मात्र आता तसे होत नाही. आता मोठा अपघातात, मृत कामगार या संदर्भात पोलीस दप्तरी नोंद केली जाते. त्याचप्रमाणे मृत कामगारांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई दिली जाते. या बाबतीत गुजराथ मेरी टाईम बोर्ड आता जातीने लक्ष घालून प्रत्येक गोष्टीचा पाठपुरावा करते.

४३) अलंग शीप ब्रेकींग यार्डातील कामगारांना चेकने पैसे चुकते करणे म्हणजे आमच्या कामाचा पसारा खूप वाढेल व ते करणे म्हणजे या कामगारांची सगळ्याची बँकेत खाती उघडावी लागतील. परंतु यासाठी सर्व कागदपत्रे लागतील असा युक्तीवाद शीप ब्रेकर्सच्या वतीने करण्यात आला होता. परंतु आता पंतप्रधान जन धन योजने अंर्तगत आता या कामगारांची बँक खाती उघडली असूनही या कामगारांना त्यांच्या कामाचे पैसे चेकने देण्यास शीप ब्रेकर्स तयार नाहीत.

४४) शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी व अलंग वर्कस असोसिएशन या संस्थेच्या सदस्यांची मिळून किमान नोंद केली जाते. अपघाताची व मृत कामगाराची जबाबदारी प्लॉट धारक घेतात. औषधपाणी व मृत कामगाराच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई दिली जाते. पण त्यासाठी बराच पाठपुरावा करावा लागतो.

४५) या कामगारांना मिळणारे वेतन हे चेकच्या माध्यमातून मिळावे. त्याच्या पगाराचा तपशील लेखी मिळवा. तसेच पी.एफचे पुस्तकही त्यांना मिळावे. परंतु आजपर्यंत ही मागणी मान्य करण्यात आलेली नाही.

४६) काही कामगारांना पीएफ दिला जातो. पण सगळ्याच कामगारांना ही सुविधा प्राप्त होत नाही. यापाठीमागचे कारण काय असावे ते अजूनही समजलेले नाही. दोन महिन्यातून एकदा तरी संयुक्तिक बैठक व्हावी जेणे करून एकमेकांच्या अडचणी समजून घेता येतील व सगळ्यांच्या मधे सुसंवाद प्रस्थापित होईल. यासाठी गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी सकारत्मकता दर्शविली आहे. परंतु शीप ब्रेकर्स मात्र या गोष्टीसाठी तयार नाहीत. अलंग रिसायकलींग शीपयार्डातील कामगारांना मालकांकडून कोणत्याही प्रकारची उचल दिली जात नाही. या कामगारांना अचानक पैशाची गरज पडल्यास आपल्या संबंधित माणसाकडून किंवा मित्राकडून पैसे उधार घ्यावे लागतात.

४७) अलंग शीपयार्डात येणारी निकामी जहाजे ऑस्ट्रेलिया, जपान, सिंगापूर, दुबई, युरोपातील अनेक देशातून इथे जहाजे तोडण्यासाठी येतात. ऑस्ट्रेलिया व अमेरिकेची जहाजे खूप महाग असतात. त्यामानाने जपान, सिंगापूर, येथून येणारी जहाजे त्यामानाने स्वस्त व वजनाला हलकी असतात. एक जहाज तोडण्यासाठी अंदाजे ३ ते ४ महिन्याचा कालावधी पुरेसा होतो.

४८) या इथे कामाला येणाऱ्या कामगारांना आम्ही जेवढे वेतन एका दिवसाला देतो एवढे वेतन इतरत्र कुणीही देत नाहीत. त्यामुळे हे कामगार त्यांची शेतीची कामे पूर्ण करून पुन्हा अलंगलाच कामाला येतात.

४९) या कामगारांना आता जहाज तोडण्याचे कसबल पूर्णपणे समजले असल्याने ते इतरत्र कुठल्याही कामाला आता प्राधानय देत नाहीत. त्यामुळेच ते पुन्हा पुन्हा इथे कामाला येतात हा आमचा अभ्यासपूर्ण अंदाज आहे.

५०) आज अलंगला वास्तविकता सरकारच्या सहकार्याची खूप गरज आहे. जेणेकरून हा उद्योग व्यवस्थित रीतीने चला राहून त्यात आणखीन मोठ्या प्रमाणावर सुधारणा होऊ शकतील. पण सरकारकडून आम्हाला ज्या पद्धतीचे सहकार्य अपेक्षित आहे. त्या प्रकारचे सहकार्य मिळत नसल्याची खंत शीप ब्रेकर्सच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

५१) स्थानिक राजकीय नेत्यांना या बाबतीत काहीच स्वारस्य नाही त्यांची भूमिका तर खूप उदासिनतेची भूमिका आहे.

५२) आज अलंग शीप ब्रेकींग यार्डातून देशाला उपलब्ध होणारे स्टील व लाकूड याची तर गणनाच करता येऊ शकत नाही. आणि ते स्टील आपल्याला देशातील विविध पायाभूत प्रकल्पांसाठी वापरता येत आहे. या जहाजातून मिळणारे लाकडू अतिशय उत्तम प्रतीचे असते. त्यामुळे अपरोक्षपणे आपण कितीतरी वृक्षतोड करण्यापासून परावृत्त होत आहेत.

५३) या निकामी जहाजातून मिळणाऱ्या विविध वस्तू ज्या विकल्या जाऊन पुर्नवापरात येत आहेत. यात घरसामान फर्निचर, कपडे, ब्रॉकरी पासून ते अगदी लहानतला लहान स्क्रू सुद्धा या अलंगच्या प्रवेशद्वाराजवळ उभारलेल्या दुकानामध्ये विक्री साठी उपलब्ध आहे.

५४) अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे अलंग परिसराचाच नव्हे तर आजूबाजूच्या २० हून अधिक खेडेगावचा विकास झाला आहे. त्याच बरोबर अलंग शीप ब्रेकींग यार्डामुळे भावनगर, शहाराचाही पूर्ण चेहरा–मोहरा बदलला आहे. आज भावनगर शहरात अनेक रोल्डिंग मील्स कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे कुंभारवाडा परिसरात तर या जहाजातील अनेक इंजिन, विविध मशीनरी जनरेटर अशा अनेक वस्तुंनी थाटलेले मीनी अलंगच इथे पहायला मिळत आहे.

५५) वास्तविकता जहाज तोडणीचा व्यवसाय हा पूर्वेकडील देशांकडून आपणाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. कारण या जहाजातील निकामी कचरा जो पर्यावरण आणि मनुष्याच्या आरोग्यालाही धोका पोहचवू शकतो त्या कचऱ्यासहित आपण ही जहाजे इथे भारतात आयात करत आहोत.

५६) पुर्वेकडील देशामध्ये पर्यावरणाला धोका निर्माण होईल अशा कोणत्याही प्रकारच्या कचऱ्याचे विघटन करण्यास कायद्याने पूर्णत: बंदी आणली असून त्याचे काटेकोरपणे पालनही केले जात आहे. व आता त्या देशामध्ये निकामी जहाजे तोडण्यास स्वस्तात मजूरही उपलब्ध होत नसल्याने आता ही निकामी जहाजे भारत, पाकिस्तान, बांगलादेश व तुर्कीस्थानात ही जहाजे पाठवली जातात. यात भारताचे स्थान अव्वल आहे.

५७) हाँगकाँग मधे झालेल्या बेसल अधिवेशनात जहाज तोडणीच्या संदर्भात काही सूचना करण्यात आलेल्या आहेत. या सूचनाप्रमाणे विकसित देशांनी आपली निकामी जहाजे त्यातील पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या व तेथील लोकांच्या आरोग्याला धोका उत्पन्न होईल असा विघटन न

होणारा कचरा विकसनशील देशात पाठवू नये. त्यासाठी त्यांनी जहाज तोडणी करणाऱ्या देशांना योग्य अशा सूचना केलेल्या आहेत. आणि अलंग येथील शीप ब्रेकर्स त्या सूचनांचे तंतोतंत पालन केले आहे.

५८) युरोपातील काही देशांनी सुद्धा या संदर्भात काही जाचक अटी लादण्याचा नवा खेळ सुरू केला आहे. पण त्याचाही अभ्यास अलंग येथील शीप ब्रेकर्स करत असून येणाऱ्या नव्या आव्हानांना सुद्धा सामोरे जाण्याचे ठरविलेले आहे.

५९) परदेशात जी काही निकामी जहाजे भारतात पाठवली जातात त्या जहाजांचे प्रतिनिधी प्रवास करताना जहाजावर आपल्या देशाचा झेंडा न लावता इतर कुठल्या तरी देशाचा लावतात. फक्त आपल्या देशाची प्रतिमा जपण्यासाठी हा असा प्रकार करतात. पण तो नैतिकतेला धरून नाही.

६०) अलंग शीपब्रेकींग यार्डामुळे फक्त अलंग गावाच्या जवळचा जवळ जवळ १५ ते २० गावांचा विकास झाला आहे. इतकेच नव्हे तर भावनगर शहराचाही मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे.

६१) आज अलंग शीप यार्डात काम करणाऱ्या असंघटित स्थलांतरित कामगारांमधे एकीचा अभाव, अज्ञान अशिक्षितता व कायद्याविषयीचे, अज्ञान त्यामुळे या कामगारांना अनेक फायद्यापासून वंचित रहावे लागते. त्यात (E.S.I. ) प्राव्हिडंट फंड या सुविधा मिळू शकत नाही.

६२) या इथे काम करणाऱ्या कामगारांसाठी रेड क्रॉस सोसायटीचे हॉस्पिटल उभारण्यात आले आहे व कामगारही या दवाखान्यातूनच आपले उपचार करून घेतात.

६३) या कामगारांना निवासाच्या ठिकाणी व कामाच्या ठिकाणी सुद्धा म्हणावी तशी सुरक्षितता उपलब्ध होत इथे रज्ञत्री काही स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा सुद्धा उपद्रव या कामगारांना सहन करावा लागतो. त्यामुळे ज्या झोपडीवजा घरात हे कामगार राहतात त्या घरात त्यांना कुठल्याही स्वरूपाचे महत्त्वाचे सामान किंवा रोख रक्कम घरात ठेवता येत नाही.

६४) अलं रिसायकलींग शीपयार्डा संदर्भात प्रदुषण कामगारांचे शोषण या संदर्भात खूप नकारात्मक दृष्टीने खूपच प्रसिद्ध झाले आहे. व काही वेळा या पाठीमागे सामाजिक संस्थांना पैशाचा पाठबळ देऊन अशा रीतीने पद्धतशीर रीतीने अशा नकारात्मक रीतीने अलंग विषयी प्रसिद्धी दिली जाते.

६५) पूर्वीची परिस्थिती आणि आत्ताच्या अलंग मधे हळूहळू आमुलाग्र बदल होत आहे. त्यामुळे ज्याकाही चांगल्या गोष्टी आता इथे घडत आहेत. त्याकडेही लक्ष देण्याची आता गरज आहे. आज अलंग मुळे या परराज्यातील सुमारे ३० हजार इतक्या कामगारांना प्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध

झाला आहे. व अप्रत्यक्षपणे सुमारे एक लाखाहूनही अधिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत या गोष्टी लक्षात घेण्याची जरुरी आहे.

अलंग रिसायकलींग शीपयार्डविषयी व तेथील स्थलांतरित असंघटित कामगार गुजराथ मेरी टाईम बोर्ड व शीप ब्रेकर्स या सर्वांच्या भूमिका जाणून घेतल्यानंतर जे काही वास्तव समोर आले त्यानुसार जसे निष्कर्ष काढलेले आहेत. त्याचप्रमाणे या विषयीच्या काही महत्त्वाच्या सूचनाही इथे कराव्याश्या वाटत आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे सूचना मांडलेल्या आहेत.

## सूचना :–

१) अलंग शीप ब्रेकींग यार्डात काम करणारे स्थलांतरित असंघटित कामगार हे परराज्यातून इथे कामाला येतात. ज्या प्रमाणे या कामगारांना रोजगाराची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे या कामगारांच्या शिवाय येथील जहाज तोडणीचे काम अशक्य आहे. वास्तविकता दोघेही एकमेकांना परस्पर पूरक आहेत. तेव्हा दोघांनीही एकमेकांच्या सहकार्याचा विचार लक्षात घेतला पाहिजे.

२) कामगारांना कामाच्या ठिकाणी सर्व प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यांच्या निवास व इतर मूलभूत आवश्यक गोष्टींची पूर्तता करून देणे याची नैतिक जबाबदारी शीप ब्रेकर्स यांनी घेण्याची जरूरी आहे.

३) आज त्या बाबतीत काही पाऊले उचलण्यात आली आहेत. या कामगारांच्या निवासासाठी आज नव्याने गृहप्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्णत्वाकडे जात आहे. परंतु ही निवासस्थाने कामगारांना कशा पद्धतीने उपलब्ध करून देणार. या कामगारांकडून काही नाममात्र भाडे आकारले जाणार का? या बाबतीत अजूनही काही या बाबतीत कुठलेही स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही. तसेच या गृहप्रकल्पाला प्रत्यक्ष भेट दिली असता ही जी नवी घरी कामगारांसाठी बांधलेली घरे ही कामाच्या ठिकाणाहून खूपच दूर आहेत. व या घराच्या ठिकाणापासून ते कामाच्या ठिकाणापर्यंत या कामगारांना नेण्या आणण्यासाठी काही वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणार की नाही या गोष्टींचा सुद्धा इथे प्रामुख्याने विचार केला जाणे आवश्यक आहे.

४) या नव्याने निर्माण केलेल्या कामगारांच्या घरासाठी योग्य त्या गोष्टी त्यात पाणी, वीज, गटार व्यवस्था या गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर या नव्या घरांची देखभाल कशा पद्धतीने केली जाणार आजूबाजूचा परिसर स्वच्छ राहील यासाठीही पाऊले

उचलण्याची गरज आहे. कारण सध्या ज्या अवस्थेत हे कामगार राहत आहेत त्यांचे गलिच्छ झोपडपट्टीप्रमाणेच आहे. तेव्हा सर्वात महत्त्वाची गोष्ट या निवास स्थानाची सुद्धा सुधारित झोपडपट्टी होऊ नये त्यासाठी कडक नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. कारण नव्या घरांची तिथल्या आजूबाजूच्या परिसराची झोपडपट्टी होण्यास वेळ लागत नाही. या साठी गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या पदाधिकाऱ्यांनी कडक धोरण अमलात आणण्याची गरज आहे.

५) ज्या प्रमाणे गुजराथ मेरी टाईम बोर्डातर्फे या कामगारांना तीन दिवसांचे प्रशिक्षण देऊन त्यांना जी.एम.बी. कडून ओळखपत्र दिले जाते. त्याच वेळी या कामगारांना त्याच्या कामाच्या प्रतवारी प्रमाणे ज्या सुरक्षा साधनांची आवश्यकता आहे त्यात गॉगल्स, बुट, हेल्मेट, फायरकोट या गोष्टी या अधिकाऱ्यांनीच या कामगारांना पुरवाव्यात व त्या बाबातीत त्यांच्या कार्डावरच यांना या गोष्टी पुरविल्याची नोंद ही करावी जेणे करुन कामगारांना स्वत:च्या सुरक्षतेसाठी ही साधने मिळाली नाहीत किंवा आम्हाला प्लॉटधारकाने पुरवलीच नाहीत असेही सांगता  येणार नाही.

६) त्याचप्रमाणे अलंग येथे कामाला येणाऱ्या प्रत्येक कामगाराची नोंद त्यात नाव, मूळ पत्ता, या आधी कुठे काम करत होते. घरातील एकूण सदस्य या विषयीची सविस्तर नोंद ठेवणेही आवश्यक आहे.

७) ज्या प्रमाणे गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडून शीप ब्रेकर्सना जसे प्लॉटची उपलब्धता करुन दिली जाते. त्यांना वीज पाणी इतर सुविधा पुरविल्या जातात. त्याचप्रमाणे या इथे काम करणाऱ्या कामगारांना निदान एका ठराविक प्लॉटवरच काम दिले जावे. जेणे करुन या कामगारांना एका प्लॉटवरुन दुसऱ्या प्लॉटवर काम मिळविण्यासाठी धडपड करावी लागू नये. व जेव्हा या प्लॉटचे काम संपलेले असेल तेव्हा त्यांना जे काही दिवस बेकारीत काढावे लागतात त्या बाबतीतही काही उपाययोजना करण्याची गरज आहे.

८) या इथे कामगारांना दिले जाणारे वेतन प्रत्येक प्लॉटधारकाच्या मर्जीनुसार आहे. तसे न होता यातही एकसूत्रता आणण्याची गरज आहे. एखादा प्लॉटधारक, गॅसकटर ला ३०० रुपये तर दुसऱ्या प्लॉटवर ३५० रुपये दिले जातात. यामुळे कामगारांमध्येही या प्लॉटवरुन

त्या प्लॉटवर कामासाठी जाण्याची धर सोड वृत्ती वाढते. व एकाच मालकाच्या हाती का करण्याचे जे काही फायदे असतात ते या कामगारांना मिळत नाहीत.

९) अलंग शीप ब्रेकींग यार्डाला काम करणाऱ्या या कामगारांना फॅक्टर अॅक्ट लागू आहे परंतु त्या कायद्याद्वारे अमलात आणाव्या लागणाऱ्या नियमांची अंमलबजावणी मात्र इथे केली जात नाही. वास्तविकता आता या उद्योगाला सुरुवात होऊनही पंचवीस वर्षाहून अधिक कालावधी उलटून गेला आहे तेव्हा या मधे ज्या काही त्रुटी असतील त्या त्रुटी दूर करुन या नियमांची अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे.

१०) E.S.I (Employment State Insurance) या योजनेचे फायदे इथे काम करणाऱ्या सर्व कामगारांना मिळण्याची आवश्यकता आहे. त्याची अंमलबजावणी सुद्धा इथे होताना दिसून येत नाहीये. त्याचप्रमाणे या काम करणाऱ्या कामगारांचा पी.एफ. कापला जातो. परंतु या बाबतीतही कोणतीही पारदर्शकता दिसून आलेली नाही. त्यासाठीच कामावर संघटनांच्या प्रतिनिधींची जी मुख्य मागणी आहे की, या कामगारांना मिळणारे वेतन हे चेकच्या माध्यमातूनच दिले जावे. त्यांच्या महिन्याच्या वेतनाची स्लीप ही त्यांना दिली जावी. आधी या कामगारांकडे बँकेत खाते नाही म्हणून ही प्रक्रीया करता येत नव्हती. परंतु आता पंतप्रधान जन धन योजने अंतर्गत इथे काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराकडे आता बँकेचे खाते आहे. पासबुकही आहे. तेव्हा आता या कामगारांना चेक द्वारे पैसे देण्यात मालकांना कोणतीच अडचण भासणार नाही असे वाटते.

११) या कामगारांना जे वेतन दिले जाते ते महिना पूर्ण भरल्यानंतर दहा ते पंधरा दिवसांनी दिले जाते. तर हा कालावधीही कुठेतरी कमी व्हावा. ५ ते ७ तारखेपर्यंत कामगारांना वेतन दिले जावे. तसेच महिना पूर्ण झाला की कामगारांकडे असलेले हजेरी कार्ड काढून घेतले जाते. तसे न करता या कार्डाप्रमाणेच ऑफीसमध्येही तसेच दुसरे कार्ड तयार केले जावे जेणे करुन कामगारांकडे आपण या प्लॉटवर काम केल्याचा सबळ पुरावा राहू शकेल. या अशा प्रकारामुळे काही वेळा कामगारांना काम करुनही पैसे न मिळाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या बाबातीतही काही सुधारणा होण्याची आवश्यकता आहे.

१२) वाढत्या महागाईबरोबरच व अतिशय कष्टप्रद काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनात दर पाच वर्षांनी वेतन करार करुन त्यात थोडीफार सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. आज

रविवारची एक दिवसाची सुटी दिली जाते आहे. पण त्या दिवशीचे वेतन दिले जात नाही. तर त्या दिवशीचे पूर्ण नाही पण त्याचा १/३ भाग तरी या कामगाराना दिला जावा. हे कामकगार दररोज दहा दहा बारा बारा तास काम करतात. या व्यतिरिक्त जादा तास काम करुनही यांना जादा तासाच्या कामाचे पैसे योग्य दिले जात नाहीत त्याबाबतीतही सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता आहे.

१३) कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची जी मुख्य मागणी आहे की, शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी व कामगार संघटनांचे प्रतिनिधी तिघांचीही मिळून अशी एकत्रित बैठक जी दर महिन्याला होणे अपेक्षित आहे त्या साठी गुजराथ मेरी टाईम बोर्डाच्या प्रतिनिधीनी पूर्णपणे सकारात्मकता दर्शविली आहे मात्र या गोष्टीला शीप ब्रेकर्स कडून अजून म्हणावा तितका योग्य प्रतिसाद मिळत नाहीये. त्या बाबतीतही सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. जेणे करुन या तिघांनाही एकमेकांच्या अडचणी समजून घेऊन त्यात योग्य तो बदल करता येऊ शकेल. व ज्या काही त्रुटी होत असतील त्या दूर करता येऊ शकतील.

१८) प्लॉटची संख्या वाढविण्यापेक्षा आहे ह्या प्लॉटवरच कामगारांची योग्य रीतीने विभागणी करुन या कामगारांना कायमस्वरुपी काम देण्याचा प्रयत्न इथे केला गेला पाहिजे त्यामुळे या कामगारांना सुद्धा स्थैर्य व आश्वासता प्राप्त होऊ शकेल.

१९) जेव्हा प्लॉटवर जहाज लागलेले असेल तेव्हाच या कामगारांना काम उपलब्ध होते. जेव्हा इथे मंदीचा काळ असतो तेव्हा हे कामगार आपल्या मर्जीनुसार केव्हाही घरी निघून जातात. घराकडची कामे पूर्ण झाली की त्यांच्या मनाला येईल तेव्हा परत येतात. ।बाबतीतही कामगारांच्या बाजूनेही काही नियमावली लागू करण्याची गरज आहे अन्यथा इथे कोणत्याही प्रकारची सुसूत्रता येणार नाही.

२०) आज हे कामगार फक्त एकटेच इथे कामाला येतात. कुटुंबाना घेऊन येणाऱ्या कामगारांची संख्या खूपच नगण्य आहे. तेव्हा सगळेच कामगार आपल्या कुटुंबासहीत इथे कामाला येतील त्या दृष्टीने सुद्धा काही सकारात्मक पाऊले उचलण्याची गरज आहे आज या एकट्या कामगारांनाही एका छुप्या अनामिक भीतीखाली ताणतणावाखाली इथे रहावे लागत आहे. कारण हे स्थलांतरित परराज्यातील हा स्थानिक लोकांचा बघण्याचा जो दृष्टिकोन आहे

त्यातही आमूलाग्र बदल होण्याची गरज आहे जर या उद्योगाचा मोठ्या प्रमाणावर विकास करावयाचा असेल तर त्या दृष्टीने विचार करुन पाऊले टाकण्याची गरज आहे.

२१) स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या लोकांचाही जो त्रास या कामगारांना रात्रीच्या वेळी होत असतो त्या बाबतीत गुजराथ मेरी टाईम बोर्ड शीप ब्रेकर्स पोलीस यंत्रणा या सर्वांनी मिळून ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कारण स्थानिक गुंड प्रवृत्तीचे लोक हे फक्त या कामगारांच्या घरामधील चीजवस्तू चोरण्यासाठी येतात असे नाही तर प्लॉटवरील स्क्रॅप मालही चोरण्याचा ते प्रयत्न करतात. आणि ते एकटे दुकटे नाही तर मोटार सायकलवर टोळीच्या स्वरुपात येतात. तेव्हा सुरक्षा व्यवस्थाही रात्रीच्या वेळी आणखीन कडक करण्याची आवश्यकता आहे.

२२) जेव्हा प्लॉटवर एखादा गंभीर अपघात किंवा आग लावण्याच्या घटना घडतात तेव्हा प्रथम गुजराथ मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी प्लॉटधारक व कामगार संघटेनेचे प्रतिनिधी यांनी आधी अपघातग्रस्त कामगाराला दवाखान्यात पोहचवून त्याला उपचार कसे लवकर मिळतील या दृष्टीने आपातकालीन यंत्रणा कायम सजग ठेवण्याची आवश्यकता आहे व त्या अपघाताची रीतसर पोलीस दप्तरी नोंद करुन योग्य रीतीने त्याची प्रसारमामध्यमांना माहिती दिली पाहिजे. जेणे करुन प्रसार माध्यमाकहूनही चुकीची माहिती प्रसिद्ध केली जाणार नाही व अलंग शीप ब्रेकींग यार्डाच्या बाबतीत कुठलाही चुकीचा प्रचार व प्रसार होणार नाही. त्या दृष्टीने सकारात्मक पाऊले उचलण्याची गरज आहे.

२१) अपघातग्रस्त कामगाराला योग्य उपचार तसेच मृत कामगाराच्या कुटुंबियांना योग्य व त्वरीत नुकसान भरपाई दिली जावी. यासाठी शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोर्ड व कामगार प्रतिनिधी यांची बैठक होऊन त्यात योग्य तो निर्णय घेतला जावा. त्या निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत व्हावी आणि या सगळ्या गोष्टीची नोंद गुजराथ मेरी टाईम बोर्डाकडे दस्ताऐवजाच्या स्वरुपात त्याची नोंद असावी. या दस्ताऐवजावर शीप ब्रेकर्स, गुजराथ मेरी टाईम बोडोर्च अधिकारी, कामगार संघटनेचे प्रतिनिधी व मृत कामगारांच्या कुटुंबियांच्या स्वाक्षऱ्या घेणेही आवश्यक आहे.

२२) या कामगारांचे शारीरीक व मानसिक आरोग्य चांगले रहावे त्यासाठीही प्रयत्न करण्याचे जरुरी आहे. आज हे कामगार एकटेच इथे कामाला येतात. सगळेच २५ ता ४० वयोगटातील

पुरुष आहेत. एकेका खोलीत ते १५ ते २० जण राहतात. त्यामुळे यांच्यात समलैंगिकता हळू हळू बळावत चालल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे वेश्यावृत्ती व इतर व्यसने जुगार या गोष्टीही दिसून येत आहेत. काही कामगार हे एडस् या रोगाचे बळी ठरलेले आहेत. त्या दृष्टीने बँक व फॅमिली प्लानिंग असोसिएशनच्या वतीने यात सुधारणा करण्यासाठी चांगल्या रीतीने प्रयत्न सुरु आहेत. परंतु काही वेळा फंडाच्या अभावी या राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांवर मर्यादा येतात तेव्हा त्या बाबतीत विचार विनिमय करण्याची तसेच कामागारांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकून राहण्यासाठी दर रविवारी किमान अर्धा तास तरी योग किंवा विवश्यना संदर्भातील माहिती या कामगारांना देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वैयक्तिक स्वच्छेतेबरोबरच सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबबतीतही या कामगारांमध्ये जागृती आणण्याची गरज आहे.

२३) आज गुजराथ राज्यात दारुबंदी आहे. परंतु याच अलंग मधे काम करणाऱ्या कामगारांपैकी ९०% कामगार हे दारु पितात हे आढळून आले आहे व तेही देशी, गावठी दारु. या कामगारांना (५० रुपये एक पाऊच) अगदी हवी तेव्हा उपलब्ध होते. म्हणजे हा अवैध धंदाही राजरोस पणे सुरु आहे व हे कामगारही हीच दारु अगदी, 'दबाके दारु पिते है' असे स्वत: सांगतात. तेव्हा या दारुचाही या कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. तेव्हा या बाबतीतही काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.




**अलंग येथील रविवारी भरणारा बाजार**




रविवारी सर्व कामगार आपले आठवड्याचे सामान भरुन ठेवतात






282
ખોડીયાર ટ્રેડર્સ

## ६. ५ समारोप

अलंग रिसायकलींग शीपयार्डातील स्थलांतरित कामगारांचे शोषण:– एक समाजशास्त्रीय कामगारांचे शोषण एक समाजशास्त्रीय अभ्यास या संशोधनाच्या विषयाला अनुषंगून जो काही सविस्तर अभ्यास केला. त्याचप्रमाणे जनरल व समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या विषयीची जी काही विस्तृत माहिती संकलीत केली त्यानंतर जी दोन महत्त्वाची गृहितके मांडली होती. त्या गृहितकांचे पुर्नविलोकन करून त्याची सत्यासत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. व एकूणच मिळालेल्या माहितीच्या आधारे जी तथ्ये समोर आली आहेत त्या तथ्यांच्या आधारेच या विषयाला अनुषंगून असे निष्कर्ष ही मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि या निष्कर्षाला अनुसरूनच या कामगारांचे भवितव्य कशा रीतीने उज्वल राहील. यासाठी काही सूचनाही मांडलेल्या आहेत. या सूचनांच्या आधारेच गुजराथ मेरी–टाईम बोर्ड शीपब्रेकर्स व कामगार यांच्यात कशा रीतीने सुसंवाद प्रस्थापित होईल व या सूचनांची अंमलबजावणी सुद्धा लवकरात लवकर होऊ शकेल व सरकारला सुद्धा या कामगारांच्या सद्य जीवनाविषयी योग्य ती माहिती मिळून त्या दृष्टीने अंमलबजावणी करणेही सोपे जाईल व या संशोधनाचा संबंधित खाती, गुजराथ सरकार यांनाही नव्या योजना आखताना त्याचा उपयोग होऊ शकेल.

## संदर्भ सूची :


1) Breman Jan. 1994, wage hunters and catherrs search for work in urban and rural economy of south gujarat. oxford university press, New Delhi.

2) Breman Jan, 1996, Footloose labour, Cambridge University press.

3) Breman Jan. Das arvind 2000 Down and out labouring undar global captializam.

4) Biswaroop 2015 migrant labours in urban areas for social studies surat.

5) D. P. Saxena (1977), migration in India, popular Prakashan Mumbai.

6) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड ३ रा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

7) Ghanshyam shah (1990), migrant labour in india center for social studies surat.

8) डॉ. बी.आर. जोशी, समाजशास्त्र मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

9) Jhabvala Renna & subrmeinam the unorganised sector work, security and social protection SAGE Publication, New Delhi.

10) डॉ. दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

11) प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, २०१३,

12) Kothari and visaria-1984 Rural Urban migration in Gujart in Analisis of census Delta.

13) S.P. Institute of eco. & Sociology Reserech Ahmedbad.

14) Dr. W. N. Salve Reports on Labour rights and Labour Standards for migrant labour in India.

15) M.S.A. Rao 1986

16) डॉ. नीलम ताटके, समाजकार्य कोश २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०

17) Studies in migration Internal and International migration in India.

118) Madam G.R. 2009, Indian Social Problems, Allied Publisher mumbai.

11) Ram Aahuja 2007 Social Problems in India Rawat Publication. Jaipur.

12) Ram awtar 1971, Lectures on labour problems and social welfare in India.

13) Ram Aahuja 2007, social problems in India Rawat Publication Jaipur.\

14) Sreenivasuil N.S. 2008, Human rights; many sides to coin. regal publisher new Delhi.

15) Smita panjour 2007, Locked homer empty school, Zubben , New Delhi.

16) T.K. PANDA & P. MAHAPATRA 1997 Report on working and living condition of oriya migrant labours.

17) T.N. Bhogiwal 1965, Labour problems in India, Kitabghar, Kanpur.

18) Tribhwan Robin, Jayshree Patil 2009 Stone quarry workers, Discovery Publishing house, New Delhi,

19) Tribhuwan Robin & Karche Jayshree Child labour and right issue. Astudy of migrant labour, Discovery Publishing house, New Delhi

21) मराठी विश्वकोश खंड १३ (२०००)

22) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ ला व २ डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७)

23) गुरुनाथ नाडगोंडे (२०००) कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे २.

24) सामाजिक विचार प्रवाह, प्रा. पी. के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर.

25) गणपति शंकर १९८२, मंथन कर्णकृष्ण भाग– १,

26) गोरे एम. एस. १९७८, शहरीकरण व कौटुंबिक परिवर्तन.

27) कौशिक आर शुक्ल, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, सरदार पटेल, युनिर्व्हसिटी.

28) डॉ. सुमनबेन चौधरी, पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध भावनगर, युनिर्व्हसिटी.

## Internet Webside

1) www.gmb.ports.org

2) www. asain academic

3) www.industiral union.org

4) www. shipbraking platform.org

5) www.lucion marnine.com